
मूकमोर्चात जळगावकरांचा उत्स्फूर्त सहभाग
वाचा पान ३ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएल/८८/२०२४-२०२६
रविवार, दि. ४ मे २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३०। अंक : २५७। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८+६ = १४ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध

## विचारपुष्प



भारतात राहणारा आणि त्याच्याबद्दल प्रेम वाटणारा मानवसमूह एकच आहे. त्यांची जीवनपद्धती, कला, साहित्य, तत्त्वज्ञान ही सर्व भारतीय संस्कृती आहे. म्हणून ही संस्कृती भारतीय राष्ट्रवादाचा पाया आहे. या संस्कृतीवर निष्ठा असेल तरच भारत एकात्म राहील.


पं. दीनदयाल उपाध्याय,
पूर्व अध्यक्ष भारतीय जनसंघ

# भारताकडून पाकिस्तानची व्यापार कोंडी

पहलगाम हल्ला प्रकरण



● आयात-निर्यातीवर घातली बंदी ● अर्थव्यवस्थेवर घातला घाव




◆ नवी दिल्ली, ३ मे
पाकिस्तानातून भारतात आयात होणाऱ्या आणि भारतातून पाकिस्तानात निर्यात केल्या जाणाऱ्या सर्व वस्तूंवर बंदी घालण्यात आली. पाकिस्तानची व्यापार कोंडी करण्याचा भाग म्हणून एखादी वस्तू आयात होणारी असो किंवा अप्रत्यक्षपणे दुसऱ्या कोणत्याही देशातून पाकिस्तानी वस्तू भारतात आयात होणार असली तरी त्यावर बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयाने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसणार आहे.

भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने शनिवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारतात पाकिस्तानमधून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वस्तूंच्या आयात आणि निर्यातीवर बंदी घातली आहे. पाकिस्तानमधून भारतात होणाऱ्या सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मग ती मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो किंवा नसो, पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित असेल. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक धोरणाच्या हितासाठी हे निर्बंध लादण्यात आले आहे.

या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्व परवानगी आवश्यक असेल. दरम्यान पाकिस्तानमधून थेट आयात कमी झाली असली तरी, काही वस्तू अप्रत्यक्ष मार्गांनी किंवा तिसऱ्या देशांमधून भारतात येत होत्या. त्यामुळे वाणिज्य मंत्रालयाने कठोर निर्णय घेतला.

### पहलगाम हल्ल्यानंतर घेतलेले निर्णय

- सिंधू पाणी करार स्थगित
- पाकिस्तानी नागरिकांचे सर्व व्हिसा रद्द
- अटारी-वाघा सीमेचे दरवाजे बंद
- पाकिस्तानी विमानांसाठी भारतातील हवाई क्षेत्र बंद
- व्यापारी संबंध संपुष्टात, आयात-निर्यातीवर बंदी
- पाकिस्तानी माध्यमे, समाज माध्यम चॅनेलवर बंदी
- फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सच्या ग्रे लिस्टमध्ये टाकण्याची मागणी

### टपाल सेवा स्थगित

केंद्र सरकारने पाकिस्तानमधून हवाई आणि भूपृष्ठ मार्गाने येणाऱ्या सर्व प्रकारच्या टपाल आणि पार्सलची देवाणघेवाण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पाकमधून भारतात पत्र किंवा पार्सलदेखील येणार नाही. पाकिस्तानचा ध्वज असलेल्या जहाजांना कोणत्याही भारतीय बंदरात जाण्याची परवानगी दिली जाणार नाही. भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना देखील पाकिस्तानच्या कोणत्याही बंदरात जाण्याची परवानगी नसेल.

### आंतरराष्ट्रीय निधी थांबवणार

भारताने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात् आयएमएफ, जागतिक बँक आणि आशियाई विकास बँकेकडे पाकिस्तानला देण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय आर्थिक मदतीचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी केली आहे. पाकिस्तानला देण्यात येणारी आर्थिक मदत दहशतवादाला चालना देण्यासाठी वापरली जात असल्याचा आरोप करण्यात आला.

### पाकिस्तानी सैन्याकडून गोळीबार सुरूच

◆ श्रीनगर, ३ मे
जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यापासून पाकिस्तानी सैन्याकडून दररोज प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. शुक्रवार आणि शनिवारी रात्री नवव्या दिवशी पाकिस्तानी सैन्याने कुपवाडा, उरी आणि अखनूर सेक्टरमध्ये हलक्या शस्त्रांनी गोळीबार केला. या कारवाईला भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले.

शनिवारी रात्री पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवर कोणत्याही चिथावणीशिवाय लहान शस्त्रांनी गोळीबार केला. याशिवाय, ३० एप्रिल रोजीही पाकिस्तानी सैन्याने नियंत्रण रेषेवर नौशेरा, सुंदरबनी आणि अखनूर सेक्टर तसेच काश्मीर विभागातील बारामुल्ला आणि कुपवाडा जिल्हा तसेच आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडे जम्मू आणि सांबा जिल्ह्यातील परगल आणि रामगढ सेक्टरमध्ये लहान शस्त्रांनी गोळीबार केला. भारतीय सैन्यानेही लगेच प्रत्युत्तर दिले. दोन्ही सैन्यांमध्ये छोट्या शस्त्रांचा वापर करून झालेल्या चकमकीत कोणीही जखमी किंवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.


## महत्त्वाचे

### एसबीआयच्या नफ्यात झाली घसरण

नवी दिल्ली : स्टेट बँक ऑफ इंडियाने शनिवारी मार्च २०२५ मध्ये संपलेल्या चौथ्या तिमाहीत स्वतंत्र निव्वळ नफ्यात १० टक्क्यांनी घट झाली आहे. तो १८,६४३ कोटी रुपये झाला आहे. देशातील सर्वात मोठ्या कर्ज देणाऱ्या बँकेने २०२३-२४ च्या जानेवारी-मार्च कालावधीत २०,६९८ कोटी रुपयांचा नफा कमावला होता. मार्च तिमाहीत एकूण उत्पन्न १,४३,८७६ कोटी रुपयांवर पोहोचले. जे गेल्या वर्षी याच कालावधीत १,२८,४१२ कोटी रुपये होते, असे स्टेट बँक ऑफ इंडियाने नियामक फाइलिंगमध्ये म्हटले आहे. या तिमाहीत बँकेने १,१९,६६६ कोटी रुपयांचे व्याज उत्पन्न मिळवले आहे, जे गेल्या वर्षी १,११,०४३ कोटी रुपये होते. बँकेच्या मालमत्तेच्या गुणवत्तेत सुधारणा दिसून आली. चौथ्या तिमाहीत एकूण अनुत्पादित मालमत्ता एकूण कर्जाच्या १.८२ टक्क्यांपर्यंत घसरली, जी मार्च २०२४ च्या अखेरीस २.२४ टक्क्यांवरून कमी झाली. त्याचप्रमाणे, निव्वळ एनपीए ०.५७ टक्क्यांवरून ०.४७ टक्क्यांपर्यंत कमी झाले.

### साई मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी

अहल्यानगर : शिर्डीतील साई मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाली आहे. यासंबंधीचा एक ईमेल साई संस्थानला मिळाला आहे. या ईमेलमुळे पोलिस प्रशासन तर्क झाले आहे. साई संस्थानला धमकीचा एक ईमेल मिळाला आहे. त्यात साईसमाधी मंदिर पाइपबॉम्बने उडवण्याचा इशारा देण्यात आला आहे. या धमकीमागे आणखी काय आहे, हे स्पष्ट झाले नाही. पोलिसांनी यावर भाष्य करणे टाळले आहे. पण यामुळे सुरक्षा यंत्रणांत एकच खळबळ माजली आहे. या धमकीनंतर पोलिसांनी मंदिर परिसराची तपासणी करून तेथील सुरक्षा व्यवस्था चोख केली आहे. हा खरेच धमकीचा ईमेल आहे की, कुणी खोडसाळपणा केला आहे, याचा तपास पोलिस करत आहेत.



# दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांना अद्दल घडवू

पंतप्रधान मोदींची घोषणा ● ठोस आणि निर्णायक कारवाईसाठी वचनबद्ध

◆ नवी दिल्ली, ३ मे
दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्यांना कडक इशारा देताना पंतप्रधान म्हणाले, आम्ही दहशतवाद्यांवर आणि त्यांच्या समर्थकांवर कठोर व निर्णायक कारवाई करण्यास वचनबद्ध आहे. सीमापार दहशतवादाविरोधातील आमच्या लढाईत अंगोलाने दिलेल्या पाठिंब्याबद्दल आम्ही त्यांचे आभार असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

हैदराबाद हाऊस येथे शनिवारी पंतप्रधान मोदी यांनी अंगोलाचे राष्ट्रपती जोआओ मॅन्युएल गोन्साल्विस लॉरेन्को यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय बैठक घेत अनेक विषयांवर चर्चा केली. संयुक्त निवेदनात मोदी म्हणाले, ३८ वर्षानंतर अंगोलाचे राष्ट्रपती भारत दौऱ्यावर आले. त्यांच्या भेटीमुळे भारत-अंगोला संबंधांना नवी दिशा आणि गती तर मिळाली, शिवाय भारत-आफ्रिका भागीदारीही बळकट होत आहे. यावेळी पहलगाम हल्ल्याचा उल्लेख करीत मोदी यांनी सांगितले की, दहशतवाद हा मानवतेसाठी सर्वात मोठा धोका आहे. सीमापार दहशतवादामुळे भारताचे मोठे नुकसान झाले. अतिरेक्यांना पाठिंबा देणाऱ्यांना अशी अद्दल घडवू की, ते कदापि विसरू शकणार नाही. त्यांच्याविरोधात निर्णायक कारवाई सुरू झाली आहे.

# पाकिस्तानने ओतले आगीत तेल

● अब्दाली बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी
● ४५० किलोमीटर मारा करण्याची क्षमता



◆ नवी दिल्ली, ३ मे
पहलगाम हल्ल्यानंतर दोन्ही देशांतील तणाव शिगेला पोहचला असतानाच पाकिस्तानने अब्दाली नावाच्या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी घेतली आहे. आधीच तणाव जीवितहानीबद्दल संवेदना. पण भर पडणार असल्याची टीका भारताने केली आहे.

पर्यटकांवरील हल्ल्यानंतर भारताने गुन्हेगारांना धडा शिकविण्यासाठी अत्यंत कठोर उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. या घटनेचा जगभरातून निषेध व्यक्त होत आहे. सीमेवर तणाव असताना पाकिस्तानने जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या अब्दाली या बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची अज्ञात स्थळावरून चाचणी घेतली आहे. ४५० किलोमीटरपर्यंत मारा करण्याची अब्दालीची क्षमता आहे. अत्यंत गंभीर आणि स्फोटक परिस्थितीत क्षेपणास्त्र चाचणी म्हणजे चिथावणी देणारे कृत्य होय, अशी प्रतिक्रीया भारताने व्यक्त केली आहे.

# लैराई देवीच्या यात्रेत चेंगराचेंगरी, ७ ठार, ७५ भाविक जखमी

मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांचा चौकशीचा आदेश, अफवा उडाल्याने झाला घात

◆ पणजी, ३ मे
उत्तर गोव्यातील शिरगावमध्ये लैराई देवीच्या यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेत दोन महिलांसह सात भाविकांचा मृत्यू झाला, तर ७५ जण जखमी झाले. जखमी नागरिकांवर गोवा येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि म्हापसा येथील जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे. पणजीपासून ४० किमीवर अंतरावर ही घटना झाली. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले आणि घटनेच्या चौकशीचे आदेश दिले.

राज्याचे पोलिस महासंचालक आलोक कुमार यांनी सांगितले की, शुक्रवारपासून सुरू झालेल्या लैराई देवीच्या यात्रेसाठी राज्यासह महाराष्ट्र, कर्नाटकमधून ४० हजार भाविक आले होते. शनिवारी सकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली असता, उतारावरून काही भाविक खाली पडले, यावेळी विजेचा धक्का लागल्याची अफवा उडाली आणि चेंगराचेंगरी घटना घडली. दरम्यान गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी घटनेचा आढावा घेतला असून चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या भाविकांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली.



### चेंगराचेंगरीची घटना दुःखदः राष्ट्रपती मुर्मू

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, लैराई देवी मंदिरात वार्षिक यात्रेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत काही भाविकांचा मृत्यू आणि अनेक जण जखमी झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. सर्व शोकाकुल कुटुंबांना मी माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करते.

### पंतप्रधान मोदींनी व्यक्त केल्या संवेदना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, शिरगाव येथील चेंगराचेंगरीच्या घटनेतर जीवितहानीबद्दल दुःख झाले. ज्यांनी आपल्या प्रियजनांना गमावले त्यांच्याबद्दल संवेदना. या घटनेत जखमी झालेले भाविक लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना करतो. मुख्यमंत्री आणि प्रशासनाशी माझे बोलणे झाले असून अपघातग्रस्तांना सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले.

### पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी श्रीलंकेला पळाल्याचा संशय

◆ नवी दिल्ली, ३ मे
पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याशी संबंधित संशयित दहशतवादी विमानात असल्याची माहिती शनिवारी भारताच्या गुप्तचर यंत्रणेकडून मिळाली. यानंतर श्रीलंकन पोलिसांनी चेन्नईवरून कोलंबोकडे जाणाऱ्या विमानाची बंदरनायके आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानाची व्यापक सुरक्षा तपासणी करण्यात आली.

कोलंबोला जाणाऱ्या श्रीलंकेच्या विमानात लष्कर-ए-तोयबाचे दहशतवादी असल्याचा दावा करणारा ईमेल अधिकाऱ्यांना मिळाल्यानंतर चेन्नई विमानतळावर सुरक्षा वाढवण्यात आली. विमान कोलंबोला रवाना झाल्यानंतर हा ईमेल आला. विमानाची कसून तपासणी करण्यात आली. मात्र त्यात कोणताही संशयास्पद व्यक्त आढळला नाही.

श्रीलंकेच्या एअरलाईन्सने निवेदनात भारताला पाहिजे असलेल्या तो संशयित दहशतवादी हा चेन्नई-कोलंबोच्या विमानात नसल्याचे सांगितले.

# ॲंथनी अल्बानीज दुसऱ्यांदा पंतप्रधान

ऑस्ट्रेलियात सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल जाहीर

◆ मेलबर्न, ३ मे
ऑस्ट्रेलियामध्ये शनिवारी पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सत्ताधारी मजूर पक्षाचा विजय झाला. यामुळे पक्षाचे नेते आणि विद्यमान पंतप्रधान ॲंथनी अल्बानीज यांचा दुसऱ्यांदा पंतप्रधानपदाचा मार्ग मोकळा झाला. या निवडणुकीत कंझर्व्हेटिव्ह पक्षाचा पराभव झाला आहे. पंतप्रधान म्हणून सलग दुसऱ्यांदा तीन वर्षांचा कार्यकाळ जिंकणारे अल्बानीज हे पहिले ऑस्ट्रेलियन ठरले.



ऑस्ट्रेलियन संसदेचे कनिष्ठ सभागृह असलेल्या प्रतिनिधीगृहाच्या १५० जागांसाठी शनिवारी निवडणूक पार पडली. त्यानंतर झालेल्या मतमोजणीत मजूर पक्षाचे सर्वाधिक उमेदवार निवडून आहेत. कनिष्ठ सभागृहासाठी आवश्यक असलेले बहुमत ॲंथनी अल्बानीज यांच्या पक्षाला मिळाल्याने त्यांचीच दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवड होणे निश्चित आहे. या निवडणुकीत महागाई आणि घरांची कमतरता हे मुख्य मुद्दे होते. मतदारांनी अल्बानीज यांच्यावर विश्वास दाखवत त्यांच्या पक्षाच्या बहुतांश उमेदवारांना निवडून दिले. यावेळी वरिष्ठ सभागृहाच्या ७६ पैकी ४० जागांसाठी मतदान झाले, तेथेदेखील मजूर पक्षाचे सर्वाधिक उमेदवार निवडून आले.

### मोदींनी दिल्या शुभेच्छा

ॲंथनी अल्बानीज यांची ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान म्हणून पुन्हा निवड झाल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी एक्सवर लिहिलेल्या पोस्टमध्ये त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी पुढे म्हटले की, ऑस्ट्रेलियासोबतची भागीदारी आणखी दृढ करण्यास भारत उत्सुक आहे. (वृत्तसंस्था)

श्री क्षुधाशांती सेवा संस्था
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुद्ध व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबद्ध संस्था
सकाळी १० ते ८ (जेवण पार्सल उपलब्ध)
रविवार, दि. ४ मे २०२५
लसूण चटणी, शेंगदाणे चटणी, ताक, वेफर्स, उपवास चिवडा, मुरमुरे चिवडा उपलब्ध आहे.
सँडविच भाकरी २० रू. नग पोळी भाजी १५ रु. प्लेट मेथी पराठा व चटणी २० रू. मसाला पुरी उपलब्ध.
पार्सल मिळेल.
पार्सल वेळ १० ते ८ पर्यंत
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# ...अन् अर्धांगवायू झालेला बिबट चालू लागला

नागपूरच्या ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटरची जगभरात दखलपात्र कामगिरी

◆ नागपूर, ३ मे
माणसांवर केली जाणारी फिजिओथेरपी आता वन्यप्राण्यांवरही यशस्वी ठरत असल्याचे उदाहरण नागपूरजवळील नितगाव येथील ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरने घडवून आणले आहे. अर्धांगवायूने ग्रस्त झालेल्या एका मादी बिबट्यावर फिजिओथेरपीचा प्रयोग करून तिला पुन्हा चारही पायांवर उभे करण्याची अभूतपूर्व कामगिरी येथे करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, केवळ उभी राहण्यातच नव्हे तर धावण्याइतपत बळ त्या बिबट्याला पुन्हा मिळाले असून, हा कदाचित जगातील पहिलाच प्रयोग ठरला आहे.



जखमी अवस्थेतील ही मादी बिबट ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरच्या बचाव पथकाने कळमेश्वरजवळील भागातून पकडली. वाहनाच्या धडकेमुळे तिच्या शरीरातील चारही पाय निकामी झाले होते. सुरुवातीला पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तिची क्ष-किरण तपासणी केली मात्र कोणताही फ्रॅक्चर अथवा मोठी इजा दिसून आली नाही. पायांचे कार्य थांबले असताना उपचार सुरू ठेवण्यात आले. मात्र तिच्या वाढत्या निष्क्रियतेमुळे उपचार अधिक आव्हानात्मक ठरत होते. या यशस्वी प्रयोगामुळे नागपूरच्या ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारतात वन्यप्राण्यांच्या पुनर्वसनासाठी स्थापन करण्यात आलेले हे पहिले ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटर असून येथील अत्याधुनिक सेंटर अत्याधुनिक देशात आणि परदेशातही आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहे.

### मानाचा तुरा रोवला

दरम्यान, या घटनेची माहिती नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील फिजिओथेरपी विभागातील एका महिला डॉक्टरला मिळाली. त्यांनी ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरमध्ये येऊन या मादी बिबट्यावर फिजिओथेरपी करण्याची विनंती केली. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समन्वयातून त्यांनी फिजिओथेरपी उपचार सुरू केले. सुरुवातीला दोन पाय हळू हळू लागले, नंतर तिसराही पाय सक्रिय झाला आणि काही महिन्यांत ती मादी बिबट पुन्हा चारही पायावर उभी राहिली. सलग नऊ ते दहा महिन्यांच्या अथक प्रयत्नांनंतर ती धावायलादेखील लागली.

# नगर परिषदेचे अभियंता विजय घुगरे बेपत्ता

### मुलाची शहर पोलिसात तक्रार

◆ कारंजा लाड, ३ मे
येथील नगर परिषद कार्यालयातील बांधकाम अभियंता विजय घुगरे बेपत्ता झाल्याने खळबळ उडाली आहे. त्यांच्या मुलाने यासंबंधी कारंजा शहर पोलिस स्टेशनमध्ये २ मे रोजी वडील बेपत्ता झाल्याची फिर्याद नोंदवली आहे.



प्राप्त माहितीनुसार, विजय निवृत्ती घुगरे कारंजा नगर परिषदेत अभियंता पदावर नोकरीवर आहेत. १ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त नगर परिषदेत ध्वजारोहणाचा कार्यक्रम असल्याने ते सकाळी ६.३० वाजता वाशीम येथून कारंजासाठी रवाना झाले होते. तिथे त्यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. हा कार्यक्रम आटोपल्यानंतर ते दहाच्या सुमारास साईट व्हिजिट करण्याचे कारण सांगून नगर परिषद कार्यालयातून बाहेर पडले होते. पण, त्यानंतर ते ना नगर परिषदेत पोचले ना घरी. कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला. परंतु, ते आढळून आले नाहीत.

विशेष म्हणजे, त्यांचा मोबाईल बंद येत आहे. अखेर त्यांचा मुलगा गौरव विजय घुगरे याने कारंजा शहर पोलिसात ते बेपत्ता असल्याची फिर्याद नोंदवली. त्यानुसार पोलिसांनी शोधकार्याला सुरुवात केली. अभियंता घुगरे बेपत्ता झाल्याने शहरात वेगवेगळ्या चर्चेंने जोर धरला आहे. घटनेचा अधिक तपास पोलिस निरीक्षक दिनेशचंद्र शुक्ला यांच्या मार्गदर्शनात हेड कॉन्स्टेबल बरडे करीत आहेत.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### जातनिहाय जनगणना निर्णयाचे धुळे ग्रामीण भाजपतर्फे स्वागत

**धुळे :** केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. धुळे ग्रामीण मतदारसंघात भाजपतर्फे जल्लोष करण्यात आला.

आ. राघवेंद्र भदाणे यांनी सांगितले की, जातनिहाय जनगणनेतून धोरणात्मक निर्णय घेण्यास गती प्राप्त होणार आहे. यामुळे मागास व अति मागास वर्गातील नागरिकांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास साधता येईल. या ऐतिहासिक निर्णयातून राज्याच्या विकासाला चालना मिळेल. या वेळी माजी संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, खासदार स्मिता वाघ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. अरविंद जाधव, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा धरती देवरे, किरण शिंदे, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब भदाणे, बापूसाहेब खलाणे, जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब देसले, देवेंद्र पाटील, रावसाहेब शिंदे, तालुकाध्यक्ष रवींद्र निकम, छोटू मासुळे, प्रवीण पवार, डॉ. दिनेश माळी, शरद पाटील, विश्वनाथ वाणी, सुनीता शिंदे, विश्वास शिंदे, सखाराम पाटील, प्राचार्य किशोर पाटील, नाना वाघ, राजेश परदेशी, भैया देवरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



### शिंदखेड्यात भाजपतर्फे आनंदोत्सव

**मेथी (शिंदखेडा) :** भाजपतर्फे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनात आणि भाजपचे शिंदखेडा गटनेते रावसाहेब अनिल वानखेडे यांच्या नेतृत्वात 'अभिनंदन मोदी' या शीर्षकाखाली शिंदखेडा येथील भगवा चौकात घोषणा देत, आतषबाजी करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी गटनेते अनिल वानखेडे, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश देसले, भिला पाटील, युवराज माळी, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन रमेश भामरे, व्हाइस चेअरमन बन्सी बोरसे, माजी नगरसेवक मनोहर पाटील, चेतन परमार, जितेंद्र जाधव, दीपक चौधरी, चंद्रकांत गोधवानी, जिल्हा सरचिटणीस प्रवीण माळी, माजी शहराध्यक्ष ॲड. विनोद पाटील, नवनिर्वाचित शहराध्यक्ष संजयकुमार महाजन, भाजप युवा मोर्चाचे शहराध्यक्ष दादा मराठे, संदीप राजपूत, शहर उपाध्यक्ष मिलिंद पाटोळे, गुलाब सोनवणे, रावसाहेब बैसाणे, दीपक गुरव, गणेश खलाणे, जितेंद्र भामरे, गोपाल माळी, गोपाल चौधरी, राकेश माळी, नंदूनाना वानखेडे, श्याम फुले, दीपक सोनवणे, रवींद्र पाटोळे आदी उपस्थित होते.



### फागणेत श्री बयामायदेवी यात्रा उत्साहात

**धुळे :** तालुक्यातील बाळापूर व फागणे येथील श्री बयामायदेवी यात्रा उत्साहात झाली. यात्रेत आमदार राघवेंद्र भदाणे यांनी भेट देऊन देवीचे दर्शन घेतले. यात्रेनिमित्त विविध नवस फेडले जातात. उत्सवात तगतराव मिरवणूक काढण्यात आली. बारा गाड्या ओढण्याच्या कार्यक्रमाला भाविकांची उपस्थिती होती. विविध पाळण्यांसोबत मनोरंजनाचे आकर्षण होते. आमदार भदाणे यांनी यात्रेत भेट देऊन दर्शन घेतले. त्यांनी यात्रा व विकासकामांविषयी ग्रामस्थांसोबत चर्चा केली. या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रा. अरविंद जाधव, सरपंच विद्या सूर्यवंशी, गोकुळ सिंघवी, किशोर सिंघवी, भालचंद्र सूर्यवंशी, प्रवीण सूर्यवंशी, विक्रम सूर्यवंशी, भैया सोनवणे, नागराज सूर्यवंशी, राहुल पाटील आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

### धुळेकरांना आज सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी

**धुळे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाने मुंबई येथे वेव्हज परिषद सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून सांस्कृतिक कार्य संचालनालयमार्फत शहरात रविवारी (४ मे) सायंकाळी सहाला संतोषी माता चौकातील कल्याण भवनात वेव्हज २०२५ हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर अध्यक्षस्थानी असतील. प्रमुख पाहुणे म्हणून वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. मधुकर भिसे, भाजपचे शिरूड विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण पवार आदी उपस्थित राहणार आहेत. सांगवी येथील कलाकार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणार आहे. कार्यक्रमात संयुक्त महाराष्ट्राचा पोवाडा. मनोरंजन क्षेत्रातील भारताचे स्थान, चर्चासत्र तसेच नृत्य, महाराष्ट्र गीते, लोककलाकारांचे नृत्य, वाद्यांची जुगलबंदी, नाट्यगीते, चित्रपट गीते, लोकगीत लोकधारा यासह विविध कार्यक्रम होणार आहेत. धुळेकरांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निधन वार्ता



### संजय पाटील

**जळगाव :** येथील ज्ञानदेव नगरातील रहिवासी संजय शालिग्राम पाटील (वय ५७) यांचे शनिवारी (३ मे) सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. ते उद्योजक वरुण पाटील यांचे वडील तर किशोर व योगेश पाटील यांचे बंधू होत.

# शेतीला व्यवसाय म्हणून पाहा!

## जैन हिल्सला फालीच्या अकराव्या अधिवेशनाच्या तिसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांचा शेतकऱ्यांशी संवाद

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

जमीन कमी असली तरी चालेल, मात्र त्याला व्यावसायिक दृष्टीने बघितले पाहिजे. भांडवल, बाजारपेठ यासह जे जे नवतंत्र उपलब्ध आहे त्याचा वापर आवश्यकतेनुसार केला पाहिजे. निर्यातक्षम उत्पादन घेतले पाहिजे. शेतीत सातत्य ठेवले पाहिजे. संघर्षाच्या काळातही ती करत राहिले पाहिजे, असा सल्ला शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

'फ्युचर ॲग्रिकल्चर लीडर्स ऑफ इंडिया' अकराव्या अधिवेशनाच्या तिसऱ्या टप्प्याची शनिवारी जैन हिल्सला सुरुवात झाली. जैन हिल्स येथील शेती संशोधन प्रात्यक्षिक केंद्रातील क्षेत्रभेटीनंतर फालीच्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. चर्चासत्रात बऱ्हाणपूर जिल्ह्यातील फोफनार येथील सचिन मधुकर महाजन, चंदन विनायक महाजन, संदीप पाटील वढोदा, ता. चोपडा, बापूसाहेब शिवाजी पाटील तरळी, ता. शिरपूर, अंकुश पाटील खिर्डी, ता. रावेर या शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. टरबूज, केळी, हळद, कापूस, जैन स्वीट ऑरेंज, मोसंबी, लिंबू, हरभरा, गहू उत्पादनातील त्यांचे अनुभव सांगितले.

शैक्षणिक पात्रतेतून शेतात आलात तर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करू शकतो. स्वयंचलित यंत्रणा ऑटोमेशन, विविध फिल्टरच्या वापरातून पाण्याचा कार्यक्षमतेने वापर करणे याविषयी माहिती दिली. शेतीतील भविष्य काय आहे त्यासाठी विद्यार्थ्यांनी निरीक्षणातून कसे बदल करावे याबाबत माहिती दिली. रेहांत फकीर, प्रणव पाटील, आकांक्षा सूर्यवंशी, आदिती मंदाळे, वेदांती चंदिवाल, रितू डाबी या फाली विद्यार्थ्यांनी लीड केले. रोहिणी घाडगे, जुली पटेल यांनी सूत्रसंचालन केले.



**तिसऱ्या टप्प्यातील पहिला दिवस**

फाली उपक्रमात तिसऱ्या टप्प्यात ४०० विद्यार्थी व फालीचे शिक्षक सहभागी झाले. पहिल्या दिवशी जैन हिल्स येथील फळ व भाजीपाला निर्जलीकरण प्रकल्प, परिश्रम, जैन हिल्स शेती संशोधन प्रात्यक्षिक केंद्र, ठिबक डेमो, अल्ट्रा हायडेन्सिटी प्लान्ट डेमो प्लॉट, फ्यूचर फार्मिंग, एअर आलू, टिश्यूकल्चर येथे भेट दिली. जगप्रसिद्ध अशा गांधी तीर्थच्या म्युझियमलादेखील भेट दिली.

**आज इनोव्हेशन आणि व्यवसाय योजनांचे सादरीकरण**

फाली-११ मध्ये सहभागी होणाऱ्या शाळांमधील फालीचे विद्यार्थी शालेय स्तरावरील व्यवसाय योजना आणि ॲग्रिटेक इनोव्हेशन स्पर्धेचे विजेते आहेत. हे विद्यार्थी जैन हिल्सच्या आकाश ग्राऊंड कृषी क्षेत्रातील संशोधनाविषयी सादरीकरण करणार आहेत.

**अधिकारी व शेतकरी यांच्यासमवेत विद्यार्थ्यांची गट चर्चा**

दुपार सत्रात परिश्रम जैन हिल्स येथे राऊंट राबिन गट चर्चा झाली. यामध्ये जैन इरिगेशनचे आंतरराष्ट्रीय डॉ. सुब्रमण्यम, डॉ. कल्याणी मोहरीर, किशोर रवाळे, अतिन त्यागी, हे तसेच शिवकुमार, विजय वर्धन वासीरेड्डी (आयटीसी), आयुषी मित्तल, दिव्या छांगलानी (प्रोमेप्ट), स्वीटी वेगुंठा (हेरिटेज न्युट्रीव्हेर), मंगेश देशमुख (गोदरेज), अमित तायडे (नाबार्ड), कैलास कालबंधा, प्रवीणकुमार कासट (स्टार ॲग्री) त्याचप्रमाणे हिंगणे येथील शेतकरी नीलेश पाटील, शैलेश कृष्णा पाटील (पहूर) सहभागी झाले.

**फालीचा अकरावा वर्धापन दिन**

फाली कार्यक्रमाचा आज अकरावा वर्धापन दिन होता. यानिमित्ताने फालीच्या संस्थापिका नॅन्सी बॅरी यांच्यासह शिक्षक, अधिकारी आणि शेतकरी यांच्या उपस्थितीत केक कापण्यात आला.

## पाळधी येथे गणपती मंदिरातील दानपेटीवर चोरट्यांचा डल्ला; ७२ हजारांची चोरी

**पाळधी, ता. धरणगाव :** येथील प्रसिद्ध असलेल्या गणपतीच्या मंदिराची दानपेटी फोडून त्यातील ५० हजारांच्या रकमेसह २२ हजारांचे दागिने चोरीस गेल्याने येथे एकच खळबळ उडाली आहे. येथील महामार्गावर असलेल्या व मणियार यांनी बांधलेल्या सिद्धी गणपती मंदिरात मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी मागील दरवाजाच्या कुलुपाचे कडीकोयंडा तोडून आत प्रवेश केला. या वेळी त्यांनी आधी मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील जवळपास ५० हजारांची रक्कम व सिद्धी गणपतीच्या अंगावर असलेले ९ ग्रॅम वजनाचे दागिने, त्यांची रक्कम २२ हजार असा एकूण ७२ हजारांचा ऐवज लंपास केला. या वेळी तेथे पुजारी झोपलेले असूनही त्यांना चोरांचा सुगावा लागला नाही. सकाळी मंदिर उघडण्यास गेले असता हा प्रकार लक्षात आला. पाळधी पोलिसांना हा प्रकार समजताच पाळधी पोलीस चौकीचे स. पो. नि. प्रशांत कंडारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी धाव घेतली. या वेळी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन चोरटे मध्ये जात असताना अस्पष्ट दिसत आहे. मंदिरावर सुरक्षा रक्षक नाही. घटनास्थळी चोपडा भागाचे पोलीस उपविभागीय अधिकारी घोलप, धरणगावचे पो. नि. पवन देसले, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक यांनी भेट देऊन पाहणी केली. याबाबत तेथील व्यवस्थापक विनायक लक्ष्मण तायडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास विठ्ठल पाटील करीत आहेत.

### पारोळ्यातील आठवडे बाजार आजऐवजी उद्या

**पारोळा :** येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयात रविवारी (४ मे) नीट परीक्षा होईल. आठवडे बाजार व परीक्षार्थींची गर्दी यामुळे उमेदवारांना परीक्षा केंद्रावर पोहोचण्यासाठी उशीर होऊ शकतो. त्यामुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये पारोळा शहरातील ४ मे रोजी भरणारा आठवडे बाजार रद्द केला आहे. हा आठवडे बाजार सोमवारी (५ मे) भरविण्यात येईल. याची सर्व व्यापारी, अडते, दुकानदार तसेच शहरातील सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी व होणारी गैरसोय टाळावी. ही परीक्षा ही इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय व अभियांत्रिकी भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## खंडणीसाठी अपहरण केलेल्या इसमाची १२ तासांत सुटका

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, ३ मे**

खंडणीसाठी अपहरण केलेल्या इसमाची १२ तासांत पोलिसांनी सुटका केली.

अनिल गणेश राठोड रा. वाघले, ता. चाळीसगाव यांचे वडील गणेश ताराचंद राठोड (४२) यांचे अनोळखी लोकांनी अपहरण केले असून, त्यांच्या सुटकेसाठी ४५ लाख रुपयांची खंडणी मागत असल्याची फिर्याद दिली होती. त्यावरून चाळीसगाव ग्रामीण पोलिसात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेकडून नेमलेल्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनिय माहितीच्या आधारे आरोपी जपेदा शिंदे (वय २८) निळी, श्रावण पुंडलिक भागोरे (रा.नांदगाव, नाशिक) यांची नावे निघाली. ते मोजे मोझ, ता.नांदगाव परिसरात असल्याचे समजले. आरोपी हे मनमाड रेल्वेस्टेशनकडे मोटार सायकलवरुन जात असल्याची माहिती मिळाली. पाठलाग करत असताना पोलीस गाडी पाहून दुचाकी सोडून शेतामधून पळाले. आरोपींचा पाच किलोमीटर पाठलाग करुन त्यांना पकडण्यात आले. आमचे मित्र जनार्दन बाळू आवारे उर्फ राजू पाटील रा. शिंदी, ता चाळीसगाव, ह.मु. जि. ठाणे व त्याचा मित्र सोनू रा. मुंबई यांच्या सांगण्यावरून आम्ही गणेश ताराचंद राठोड यांचे अपहरण केले होते व त्यांना मारहाण करुन तसे व्हिडीओ त्यांच्याच मोबाईल फोनवरुन त्यांचा मुलगा अनिल गणेश राठोड याला पाठवित होतो.

पीडित व्यक्ती गणेश ताराचंद राठोड हे लासलगाव जंगलामध्ये जखमी अवस्थेत आढळले. त्यांना ताब्यात घेऊन दोन आरोपीसह त्यांना चाळीसगांव ग्रामीण पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले आहे.

**यांनी केली ही कारवाई**

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह चंदेल, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड, निरीक्षक, संदीप पाटील, पेहलोत, महेश पाटील, सागर पाटील, भूषण शेलार, ईश्वर पाटील, भूषण पाटील, जितेंद्र पाटील, दीपक चौधरी (सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव) या पथकाने केली.

## भोकरी येथे ध्वनी प्रदूषण, डीजेचालकावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**रावेर, ३ मे**

ध्वनी प्रदूषण केल्यामुळे अमळनेर येथील डीजे चालकावर रावेर पोलिसांनी कारवाई केल्याने चालकांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, रावेर पोलीस ठाणे अंतर्गत भोकरी (ता. रावेर) येथे अमळनेर येथील श्री. म्युझिकल बॅण्ड हे शासनाने दिलेल्या नियमापेक्षा जास्त तीव्रतेने मोठ्या आवाजात गाणी वाजवीत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांना मिळाली. पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन यांनी ध्वनी मोजणीसाठी लागणारी मोजणी यंत्रद्वारे पंचनामा करुन आवाजाची तीव्रता मोजली. ती नियमापेक्षा जास्त भरल्याने डीजेची आयशर क्रमांक एमएच १२ एनएक्स ४५६० चे बॅण्डचालक अजय संजय बोरसे (रा. शिरुड, ता. अमळनेर) यांच्यावर ध्वनी प्रदूषण कायद्याचा भंग केला. त्यांच्यावर पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात आली. अहवाल ध्वनी मापन विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

**यांनी केली ही कारवाई**

ही कारवाई पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, भुसावळ उपविभागीय पोलीस अधिकारी कृष्णात पिंगळे, पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मनोज महाजन, पोलीस नाईक पुरुषोत्तम पाटील, नितीन सपकाळे या पथकाने कार्यवाही केली आहे.

**डीजे चालकांनी नियमांचे पालन करावे**

ध्वनीप्रदूषणसंदर्भात डीजे बॅण्डमालक यांनी शासनाने ठरवून दिलेल्या नियमानुसार व वेळेत बॅण्ड वाजवावा अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आवाहन रावेर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांनी केले आहे.

### पाचोऱ्यात आज रंगणार मंजुषा शिंदे व संविधान मनवरे यांच्या भीमगीतांचा सामना

**पाचोरा :** महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त पाचोरा येथे आमदार किशोर पाटील व पाचोरा भडगाव तालुक्यातील सर्व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यांच्यातर्फे प्रबोधनात्मक भीमगीत गायन कार्यक्रम आयोजित केला आहे.

हा कार्यक्रम ४ मे रोजी सायंकाळी सात वाजता पाचोरा बसस्थानक शेजारील आवारात होईल. सुप्रसिद्ध गायिका मंजुषा शिंदे व अमरावती येथील सुप्रसिद्ध गायक तथा प्रबोधनकार संविधान मनवरे यांची विशेष उपस्थिती असेल. आमदार किशोर पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाची सुरुवात होईल. मतदारसंघातील समस्त शिव, फुले, शाहू व आंबेडकरी प्रेमी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## धुळे पोलिसांकडून अवैध सुपारी वाहतुकीवर मोठी कारवाई

### सात वाहनांसह अडीच कोटींचा मुद्देमाल जप्त

**धुळे :** येथील पोलिसांनी गुरुवारी मोठी कारवाई करीत अडीच कोटींचा अवैधपणे सुपारीचा साठा हस्तगत करीत वाहतूक करणाऱ्या सात वाहने ताब्यात घेतली. त्यात कर्नाटकमधील सहा आणि गुजरात पासिंगच्या एका वाहनाचा समावेश आहे. चालकांना ताब्यात घेण्यात आले आहे.

काही वाहनांमधून अवैध सुपारीची वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्यावरून पोलिसांनी जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी सापळा रचत ही कारवाई केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या निरीक्षक अमरजित मोरे व अंमलदारांच्या पथकाने ३० एप्रिलला पहाटे मोहाडीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मुंबई-आग्रा महामार्गावर पाच आणि साक्री पोलीस ठाणे हद्दीत दोन अशी सात वाहने ताब्यात घेतली. चालकांना माल व कागदपत्रांबाबत विचारपूस केली असता, त्यांनी नागपूर येथून सुपारी भरून धुळेमार्गे गुजरातमध्ये जात असल्याचे सांगितले.

उपनिरीक्षक मोरे, त्यांच्या पथकाने ही यशस्वी कारवाई केली. नागपूर येथून सुपारी घेऊन भरुचमार्गे गुजरातच्या दिशेने जात होते. पोलिसांनी अन्न व औषध प्रशासन विभागला संपर्क साधला आहे. जप्त केलेल्या सुपारीच्या मालाची पाहणी आता अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी करणार आहेत. धुळ्यातील कारवाईत पाच वाहनांत सुमारे एक लाख ३६ हजार ८३९ किलो सुपारी, साक्री येथील कारवाईत दोन वाहनांत आठ हजार २७१ किलो सुपारीचा साठा मिळून आला. चालक मोबीन सुलेमान, भुरा मोहम्मद समीन, धरमपाल यद्रम, जाफ्रोद्दीन नूर मोहम्मद, मुखीम खान इलियास, फकीर अल्लाबक्ष पठाण (रा. करमाळा, जातेगाव, जि. सोलापूर), राहुल सोमाभाई जाट (रा. अंजार, गुजरात) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सर्व वाहने मिळून तब्बल दोन कोटी ५२ लाख ९२ हजार ४६४ रुपयांचा वाहनांसह मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाने यापुढेही अशा प्रकारच्या कारवाया अधिक तीव्र करणार असल्याचे संकेत दिले आहेत.

**ताब्यात घेतलेली मालवाहू वाहने**

पोलिसांनी कर्नाटकच्या पासिंगची सहा मालवाहू वाहने (केए १४, सी ३३७८, केए १४, सी ७३०५, केए १४, सी ५६४६, केए १४, सी ५२८७, केए १४, सी ५६१४, केए १४, सी ३०९०) व गुजरात पासिंगचे एक वाहन (जीजे ३३, टी ५९९९) ताब्यात घेतले आहे. तपासणीत वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात सुपारीचा साठा आढळला.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, उपनिरीक्षक अमरजित मोरे, संजय पाटील, हवालदार सदेसिंग चव्हाण, प्रशांत चौधरी, दिनेश परदेशी, तुषार सूर्यवंशी, पंकज खैरमोडे, पोलीस शिपाई महेंद्र सपकाळ, हर्षल चौधरी, किशोर पाटील, अमोल जाधव, चालक हवालदार कैलास महाजन यांच्या पथकाने केली.

## पाणंद रस्तेकामांची चौकशी करा; अन्यथा आंदोलन

### मेथीतील शेतकरी आक्रमक; जि. प. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**मेथी (शिंदखेडा) :** मेथी येथील पेडकाई शिवारात मनरेगाअंतर्गत पाणंद रस्तेकामाची चौकशी करून, पुन्हा रस्ता बनवून मिळावा; अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा परिसरातील शेतकऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदनातून दिला आहे. विकासाच्या कुठल्याही कामांना विरोध नाही. मात्र, शेतीसाठी रस्ता हवा. पेडकाई शिवारातील पाणंद रस्त्याचे काम सुरू असल्याचे भासवून ग्रामप्रशासनाकडून देयके काढण्यात आली आहेत, असा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. रस्ता तयार करताना कुठल्याही प्रकारची जीपीएस प्रणालीद्वारे छायाचित्रे, नोंदवहीतील नोंदी, कामावर मजूर नसतानाही देयके काढली आहेत. याबाबतची माहिती, माहिती अधिकार कायद्यान्वये मागण्यात आली आहे. शिवाय, रस्तेकामच न झाल्यामुळे आगामी पावसाळ्यात शेतकऱ्यांची वाट बिकट होणार आहे. यामुळे या पाणंद रस्तेकामाची चौकशी करून शेतकऱ्यांना होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळावी, अशी मागणी शेतकरी जिभाऊ डोंगर माळी, दौलत हिम्मत माळी, मुरलीधर पुंडलिक माळी यांच्यासह रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांनी निवेदनाद्वारे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

## नंदुरबार जिल्ह्यात पशुधनास साथरोगांच्या लसमात्रा प्राप्त

**नंदुरबार :** या वर्षी जिल्ह्यातील पशुधनासाठी घटसर्प, फऱ्या, लंपी चर्मरोग, आंत्रविषार, मेंढ्यांचा व कोंबड्यांचा देवी रोग आदी लसमात्रा जिल्ह्याला प्राप्त झाल्या असून, लसीकरण मोहिमेस सुरुवात करण्यात आली आहे. जिल्ह्यात गोवर्गीय व म्हैसवर्गीयसह सुमारे सात लाख २५ हजार ३५६ पशुधन आहे.

पशुसंवर्धन विभागातर्फे या वर्षी जिल्ह्यातील पशुधनासाठी लसीकरण मोहीम सुरुवात करण्यात आली आहे. पशु-पक्ष्यांमध्ये उद्भवणाऱ्या विविध विषाणूजन्य व जीवाणूजन्य रोगांना प्रतिबंध करण्यासाठी नियमितपणे लसीकरण करणे गरजेचे आहे. पशु-पक्ष्यांमधील लाळ्या खुरकूत, घटसर्प, फऱ्या, संसर्गजन्य गर्भपात (ब्रुसेल्लोसिस), लंपी चर्मरोग, अँथ्रेक्स, क्लासिकल स्वाईन फिव्हर, आंत्रविषार, पीपीआर, देवी, मानमोडी आदी महत्त्वाच्या रोगांविरुद्ध परिणामकारक लस उपलब्ध असून, लसीकरणामुळे रोग प्रादुर्भावाचे प्रमाण कमी होते व शेतकरी पशुपालकांचे होणारे नुकसान टाळणे शक्य होते.

राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत (एनएडीसीपी) लाळ खुरकुत रोग नियंत्रण ही देशव्यापी महत्त्वाकांक्षी योजना २०२५ पर्यंत लाळ खुरकुत रोगाचे नियंत्रण आणि २०३० पर्यंत निर्मूलन या उद्देशाने राबविली जात असून, गो व म्हैसवर्गीय पशुधनास लाळ खुरकुत रोगनियंत्रण प्रतिबंधक लसीकरण सहा महिन्यांनी केले जात आहे.

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या विविध साथरोगांपासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने पशुधनाला मॉन्सूनपूर्व लसीकरण करणे आवश्यक आहे. एप्रिल व मेदरम्यान गोवर्गीय पशुधनामध्ये लंपी चर्मरोग नियंत्रणासाठी गोट पॉक्स लसीकरण, गो व म्हैसवर्गीय पशुधनात घटसर्प, फऱ्या, थायलेरियासिस प्रतिबंधक आणि शेळ्यामेंढ्यांमध्ये घटसर्प, आंत्रविषार, पीपीआर प्रतिबंधक तसेच कुक्कुट पक्ष्यांमध्ये मानमोडी व देवी प्रतिबंधक लसीकरण करण्यात येत आहे.

**जिल्ह्यातील पशुधन दृष्टिक्षेपात...**

जिल्ह्यात विसाव्या पशुगणनेनुसार तळोदा तालुक्यात ७९ हजार, नवापूरमध्ये एक लाख २६ हजार ७१२, शहाद्यात एक लाख २६ हजार ८१०, नंदुरबारमध्ये एक लाख २९ हजार ५३९, अक्कलकुव्यात ९३ हजार ९५८ व अक्राणी तालुक्यात एक लाख ६९ हजार ३३५, असे सुमारे सात लाख २५ हजार ३५६ पुशधन आहे. यामध्ये गोवर्गीय तीन लाख २४०, म्हैसवर्गीय ७१ हजार ९९२, मेंढ्या ३५ हजार ४५१, शेळ्या तीन लाख ११ हजार ८०, वराह सहा हजार ५९३ असे विविध पशुधन प्रकार समाविष्ट आहेत.

> या वर्षी जिल्ह्यातील पशुधनासाठी एक लाख ७७ हजार ६०० घटसर्प, एक लाख ४४ हजार फऱ्या, दोन लाख ८ हजार ७०० लंपी चर्मरोग, दोन लाख २४ हजार आंत्रविषार, २२ हजार ६०० मेंढ्यांचा देवी रोग, एक लाख ८० हजार कोंबड्यांचा देवी रोग आदी लसमात्रा जिल्ह्याला प्राप्त झाल्या असून, ७ एप्रिलपासून लसीकरण मोहिमेस सुरुवात करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पशुपालकांनी पशुधनास लसीकरण करून घेण्यासाठी तत्काळ जवळच्या पशुवैद्यकीय केंद्रात संपर्क साधावा.
> **- डॉ. उमेश पाटील, उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन विभाग, नंदुरबार.**

Kirloskar

जगप्रसिध्द **किर्लोस्कर** कंपनीचे सर्व प्रकारचे घरगुती, शेती उपयोगी, औद्योगिक व जीनींग प्रेसींग पंप, मोटर्स अल्टरनेटर्स उपलब्ध.



संपर्क : निलेश संघवी
M.9373232643
• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'कस्तुरी' २६, नवीपेठ, जुन्या बस स्टॅन्ड समोरील गल्लीत, जळगांव
☎ 2232641 To 2232645

### जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच सर्व वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बँका, पतसंस्था, नगरपालिका, विकास सोसायट्या, ग्रामपंचायत यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे झाडी, ता. अमळनेर येथील गट नं. १८१/१/अ याचे क्षेत्रफळ ०-७४आर. आकार रु.३-७६ पै. वर नमुद केलेली मिळकत ही **रमेश पुंडलिक पाटील, रा. झाडी, ता. अमळनेर** यांच्या मालकीची असुन प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीतील आहे.

सदरच्या मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा बोझा, कर्ज प्रकरणात जप्ती, जामीनकी, नुकसानी वारस हक्काच्या अडचणीत नसुन ती बोझे विरहीत क्लियर मार्केटेबल टायटलची आहे.

वर नमुद मिळकत ही ललित शंकरलाल ब्रम्हेचा यांना खरेदी करावयाची आहे. तरी तमाम लोकांना या नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकती संबंधी कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, बोझा, तारण, गहाण, जप्ती, जामीन कर्ज प्रकरण, वारसा हक्क, जागेच्या दिशा, सीमा वापर, वहिवाट वगैरे बाबत हक्क दावा अधिकार असल्यास खालील सही करणार यांना **सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत** समक्ष भेटून कागदपत्र दाखवुन त्यांचे समाधान करावे अन्यथा सदरच्या मिळकतीचे रजिस्टर खरेदीखत करण्यात येईल, तदंनतर सदरच्या मिळकतीबाबत कोणतीही तक्रार त्यांचेवर बंधनकारक राहणार नाही. सबब सदरची जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांक :-** ०१/०५/२०२५

सही/-
**ॲड. आर. ए. निकुंभ,**
**अमळनेर, जि.जळगाव**
**मो.९२२६१६३३०२**
नोटीस देणारतर्फे ॲडव्होकेट

**नोटीस देणारची सही**
**ललित शंकरलाल ब्रम्हेचा**
ब्रह्मकुमारी मंदिराजवळ, अमळनेर
ता.अमळनेर, जि.जळगांव
मोबा.नं. ९४२२२९६७८२
शिक्का

### जाहीर प्रगटन नोटीस

सविता संदिप बाविस्कर, उ.व. २७, सद्यस्थितीत पत्ता माहित नाही हीस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते खालील प्रमाणे-

आमचे अशिल **संदिप सुखदेव बाविस्कर, वय ३३, रा. कानळदा, ता.जि. जळगांव, ह.मु. आहुजानगर, जळगांव** व तुमचा विवाह दि.४/५/२०१६ रोजी हिंदूधर्मशास्त्र व जातीरिवाजानुसार कानळदा, ता. जि. जळगांव येथे संपन्न झालेला असून सदरहू विवाह संबंधातून आमचे अशिल व तुम्हास मुलगा वैभव, वय-९ वर्षे, व मुलगी ऐश्वर्या, वय-५ वर्षे असे दोन अपत्य झालेले आहेत आज रोजी दोन्ही अपत्य आमचे अशिलांकडे राहत आहेत.

तुम्ही दि.३/११/२०२४ रोजी आमचे अशिलांना व त्यांचे कुटूंबीयांना माहेरी जात असल्याचे सांगून मुलगी ऐश्वर्या हीस घेवून घरातून निघून गेलात. त्यानंतर आमचे अशिलांनी तुमचे माहेरी संपर्क केला असता, तुम्ही माहेरी नसल्याबाबत कळाले. त्यानंतर आमचे अशिलांनी तालुका पोलीस स्टेशन, जळगांव येथे तुम्ही हरविले बाबतची तक्रार दिली असता, तुम्ही सांगितले की, मला संदीप सुखदेव बाविस्कर सोबत राहावयाचे नाही असे सांगत आहात व आमचे अशिलांना सोडून पवन राजेंद्र ठाकरे हया व्यक्तीसोबत तुमचे स्वेच्छेने राहत आहात. तसेच दोन्ही मुले आज रोजी आमचे अशिलांकडेच राहत आहे. आमचे अशिलांनी त्यानंतर तुम्हास अनेकदा स्वतः व नातेवाईकांमार्फत नांदणेस येणेसाठी अनेकदा प्रयत्न केले. परंतु तुम्ही नांदणेस येणे बाबत कोणताही प्रतिसाद दिला नाही व तुम्ही आमचे अशिलासोबत नांदणे बाबत स्पष्टपणे नकार दिलेला आहे व स्वेच्छेने पवन ठाकरे सोबत राहत आहात. आमचे अशिल हे तरूण असून त्यांना संसारसुखाची अत्यंत आवश्यकता आहे. तुम्ही आमचे अशिलांना टाकून घातल्यामुळे आमचे अशिलांची खाणेपिणेविषयीची देखील आबाळ होत असून त्यांना अनेकदा उपाशीपोटी झोपावे लागते. त्यामुळे त्यांच्या जीवनात नैराश्य आलेले असून त्यांचे मानसिक संतुलन देखील बिघडत आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्यावर विपरीत परिणाम होवून त्यांचे आयुष्य निकामी होत आहे.

तरी सदरहू जाहीर नोटीसीने तुम्हास कळविणेत येते की, सदरील **जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत** आमचे अशिलांकडे नांदणेस यावे व आमचे अशिलासोबत सुखाने संसार करावा. असे करणेस आपण कसूर केल्यास आमचे अशिलांना नाईलाजास्तव दुसरा घरठाव करणे गरजेचे होईल व त्यानंतर तुम्ही काहीही हरकत घेतल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहिती, सुचना व अधिकारावरून व सांगितल्यावरून योग्य ती फी घेऊन आमच्या मार्फत दिली असे.

**दि :०३/०५/२०२५**

**जाहीर नोटीस देणार तर्फे**
**ॲड. योगेश बी. पारख**
ग.नं.८८, प्लॉट नं.९. तिलक नगर, गुजराल पेट्रोल पंपाचे मागे, जळगांव मो.नं.९४०४४९२०४०
शिक्का
सही /-
संदिप सुखदेव बाविस्कर

### The Court Of I Civil Judge Class-I and Chief Judicial Magistrate, District Court, Harda

Presiding Officer : लवकेश सिंह
(आदेश 5 नियम 20 व्यवहार प्रक्रिया संहिता 1908 के अन्तर्गत प्रकाशन हेतु)
(MJC/0000089/2023)

जैनमेरी उर्फ जयामेरी म्रत वारसन एलीजोबेथ.......वादी
Vs
गर्नेट प्रत वारसन कमलाबाई.......प्रतिवादी

Process Id-/2025
प्रेषिती:- पेशी दिनांक:- 16/05/2025

1) अरनोल्ड पिता पीटर सोलमन पताः परिचालिका नगर इंदौर, तहसिल व जिला इंदौर, 2) ऐशली एंथनी पिता रावट एंथनी, पताः बसई मुंबई महाराष्ट्र, 3) डेनीस पिता पीटर सोलमन पताः परिचालिका नगर इंदौर, तहसिल व जिला इंदौर, 4) ट्रीजा पिता पीटर सोलमन पताः परिचालिका नगर इंदौर, तहसिल व जिला इंदौर, 5) रवि पिता पीटर सोलमन पताः परिचालिका नगर इंदौर तहसील व जिला इंदौर, 6) सरलीन पति अलवर्ट रिंग, पताः रिंग रोड भुसावल महाराष्ट्र, 7) डॉली पिता रावत एंथनी, पताः बसई मुंबई महाराष्ट्र, 8) सिलवेस्टर पिता लारेंस एथनी, पताः सरस्वती नगर भुसावल महाराष्ट्र, 9) सुजैन पति विशाल रावदेलेकर, पताः फालक नगर भुसावल महाराष्ट्र, 10) मारिया पति रावट एंथनी, पताः बसई मुंबई महाराष्ट्र, 11) साबियो पिता लारेंस एथनी, पताः सरस्वती नगर भुसावल महाराष्ट्र, 12) मारी रिचर्डसन पति सनुडेविट, पताः दाहोद गुजरात, 13) पीटर एथनी पिता एथनी माईकल पताः अंजनी नगर नागपुर महाराष्ट्र

यह कि प्रार्थी जैनमेरी उर्फ जयामेरी प्रत वारसन एलीजोबेथ ने आपके विरूद्ध विविध सिविल प्रकरण के लिए वाद संस्थित किया है, आपको इस न्यायालय में सूचना के प्रकाशन के 30 दिवस के भीतर वाद का उत्तर देने के लिये उपसंजात हाजिर होने के लये सम्मन किया जाता है, आप न्यायालय में स्वयं या किसी ऐसे प्लीडर (अधिवक्ता) द्वारा उपसंजात हो सकते है, जिसे सम्यक अनुदेश दिये गये हो और जो इस वाद में संबंधित सभी सारवान कथनों का उत्तर दे सके। आपको यह निर्देश भी दिया जाता है कि उस दिन अपनी प्रतिरक्षा का लिखित कथन प्रस्तुत करें और उस दिन ऐसे सब दस्तावेज जो आपके कब्जे या शक्ति में में है पेश करें जिन पर आपका प्रतिरक्षा या मूजराई का दावा या प्रतिदावा आधारित हो, और यदि आप अन्य किसी दस्तावेज पर चाहे वह आपके कब्जे या शक्ति में हो अपनी प्रतिरक्षा या मुजरा के दावे या प्रतिदावे के समर्थन में साक्ष्य के रूप में निर्भर करते है तो ऐसी सभी दस्तावेज की लिखित कथन के साथ उपलब्ध की जाने वाली सूची में प्रविष्टि करें। आपको सूचित किया जाता है कि यदि आप उपर बताई गई अवधि में इस न्यायालय में उपस्थित नहीं होंगे तो वाद की एक पक्षीय सुनवाई कर उसका निपटारा आपकी अनुपस्थिति में किया जायेगा। साथ ही यह भी सूचित किया जाता है कि यदि आप निराकरण मध्यस्थ के माध्यम से करने के इच्छुक हैं तो पीठासीन अधिकारी को अवगत करावें।

यह आज तारीख 22 April 2025 को मेरे हस्ताक्षर से और न्यायालय की मुद्रा लगा कर दिया गया है।

न्यायालय की मुद्रा

**न्यायाधीश (लवकेश सिंह)**
**प्रथम व्यवहार न्यायाधीश वरिष्ठ खण्ड, हरदा, जिला हरदा (म.प्र.)**

**कृपया ध्यान दें:- यदि किसी कारणवश उक्त तिथी को न्यायालय अवकाश में रहेगा तो आगामी कार्यदिवस पर यह प्रकरण सुनवाई में लिया जाएगा।**

हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com




## महत्त्वाचे

### सेवार्थ रुग्णालयाचे आज जळगावमध्ये लोकार्पण

**जळगाव :** शहरात सेवाभारतीच्या माध्यमातून अनेक जनहितार्थ सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून रविवारी (४ मे) खोटेनगर बसथांब्यानजीक सर्वज्ञ मेडिकलच्या बाजूला सेवार्थ रुग्णालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. वनिता हॉस्पिटलचे संचालक डॉ. भूषण सोमाणी, निपुण पॅथॉलॉजी लॅबचे संचालक डॉ. राहुल मयूर यांच्या उपस्थितीत व उद्योजक कंवरलाल संघवी यांच्या अध्यक्षतेखाली सेवाभारतीतर्फे कार्यक्रम रविवारी सकाळी नऊला होईल. या वेळी आयोजित शिबिरात उपस्थित रुग्ण तसेच नागरिकांची हिमोग्लोबिन अर्थात रक्ततपासणी करण्यात येणार असल्याचेही सेवाभारतीचे जिल्हाध्यक्ष मनीष काबरा, जिल्हा सचिव संदीप कासार यांनी सांगितले.


### सुनील देवधर यांचे आज जळगावमध्ये व्याख्यान



**जळगाव :** बहुभाषिक ब्राह्मण संघातर्फे समस्त हिंदूंचे परम आस्थास्थान, हिंदू धर्म पुन: प्रतिष्ठापना करणारे व चारही धामांची स्थापना करणारे आदी जगद्गुरू शंकराचार्य यांच्या जयंतीनिमित्त रविवारी (४ मे) सायंकाळी साडेपाचला शहरातील छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृहात व्याख्यान होणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून भाजपचे राष्ट्रीय नेते सुनील देवधर उपस्थित राहतील. नागपूर येथील माजी महापौर दयाशंकर तिवारी अध्यक्षस्थानी असतील. याप्रसंगी भुसावळ रेल्वेच्या महाप्रबंधक इती पांडेय, खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे उपस्थित राहतील. व्याख्यान सर्वांसाठी खुले असून, जास्तीत जास्त श्रोत्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन बहुभाषिक ब्राह्मण संघाचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत खटोड, अध्यक्ष वास्तुविशारद नितीन पारगावकर, सचिव राजेश नाईक, महिला संघाच्या अध्यक्षा वृंदा भालेराव, सचिव अंजली हांडे यांनी केले आहे. व्याख्यानानंतर सशुल्क १०० वर भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.

### जिल्ह्यात १६ मेदरम्यान जमावबंदी लागू

**जळगाव :** संभाव्य निवडणुका आणि येणारे सण-उत्सव लक्षात घेता जिल्ह्यातील सामाजिक आणि राजकीय वातावरण तापू शकते, हे लक्षात घेऊन, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये अपर जिल्हा दंडाधिकारी गजेंद्र पाटोळे यांनी शनिवारी (३ मे) मध्यरात्रीपासून जमावबंदी आदेश जारी केला आहे. तो १६ मे रोजी रात्री १२ पर्यंत जिल्हा हद्दीत लागू राहील. या कालावधीत पाच किंवा अधिक लोकांनी जमणे, सभा, मिरवणूक घेणे, शस्त्र बाळगणे, दाहक किंवा स्फोटक पदार्थ बरोबर ठेवणे, चित्रांचे दहन, अशांतता पसरविणारे वर्तन किंवा साहित्य तयार करणे, प्रसारित करणे यावर बंदी घालण्यात आली आहे. जिल्ह्यातील अलीकडील घटनांमुळे जातीय सलोखा बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच ८ ते १६ मेदरम्यान विविध सण, जयंती, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय एकत्र येणार असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. आदेशांतर्गत वृद्ध, अपंग, वैद्यकीय कारणास्तव वापर करणाऱ्या नागरिकांना, तसेच शासकीय कार्यक्रम, धार्मिक मिरवणुका, अंत्ययात्रा व विवाह मिरवणुकांवर आदेश लागू होणार नाही. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधीक्षकांची पूर्वपरवानगी आवश्यक राहील.

गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध

संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९



अंकासाठी संपर्क

'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

मो.९८३४७४५४२२ ९६२३६०४७१२







# मूकमोर्चात जळगावकरांचा उत्स्फूर्त सहभाग

## निवेदन घेण्यासाठी येण्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांनी नाकारले

## राष्ट्रपतींसह पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांना टपाली निवेदन पाठविण्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी २७ हिंदू पर्यटक आणि एका स्थानिक मुस्लिमाची हत्या केल्याच्या संतप्त घटनेचा निषेध करण्यासाठी शनिवारी (३ मे) काढण्यात आलेल्या मूकमोर्चात जळगावकर उत्स्फूर्त सहभागी झाले. सकाळी सातला आंदोलनात सहभागी होण्याची जळगावकरांना सवय नाही, तरीही समाजातील भिन्न घटकांमधील सर्वच मान्यवर मूकमोर्चात सहभागी झाले.

मूकमोर्चा जळगाव नागरिक मंचसोबत शहरातील १२६ पेक्षा अधिक सहयोगी संस्थांतर्फे काढण्यात आला. या ऐतिहासिक मूकमोर्चात जळगावकरांची पहाट ही राष्ट्रभक्तीसाठी समर्पित झाली होती. शनिवारी दिवसभर सगळीकडे जळगाव नागरिक मंच व सहयोगी संस्थांनी केलेल्या मूकमोर्चाच्या या नियोजनाचीच चर्चा होती. सकाळी सातला शिवतीर्थ मैदानावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मूकमोर्चास प्रारंभ झाला. मूकमोर्चा संयोजकांनी सहभागासाठी कोणतीही सक्ती समाजघटक, संस्था-संघटनांना केली नव्हती. त्यामुळे बहुसंख्य जळगावकर स्वयंस्फूर्तीने सकाळी सातपासून मोर्चात सहभागासाठी उपस्थित झाले. ७.०५ वाजता मूकमोर्चास प्रारंभ झाला. सहभागी होणाऱ्या सर्वांना आयोजकांनी मुखपट्टी दिली आणि उजव्या दंडावर निषेधाची काळी फीत लावली.

मूकमोर्चासमोर भारतमातेची प्रतिमा आणि तिरंगा असलेला राष्ट्रध्वज होता. निषेधाचे काळे झेंडे आणि राष्ट्रभक्तीचे घोषणा फलक सहभागी महिला-पुरुषांच्या हाती होते.

मोर्चाच्या संयोजनासाठी वाहतूक पोलिसांनी नियोजन केले होते. सोबत राष्ट्रीय छात्र सेनेच्या युवकांचे पथक होते. मूकमोर्चाची सुरुवात शांततेत झाली. प्रत्येक चौकात विविध संस्था- संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. सर्वांत लक्षवेधी बाब म्हणजे जरी सकाळची वेळ असली, तरी चौकाचौकांत पाणी वाटपाची व्यवस्था केली होती. मूकमोर्चा शांतपणे टॉवर चौक, चित्रा चौक, बेंडाळे चौक, जिल्हा रुग्णालय, पांडे डेअरी चौक, टपाल कार्यालयमार्गे स्वातंत्र्य चौकात पोहोचला.

चौकात समारोप करताना 'भारत माता की जय' आणि 'छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो' या दोनच घोषणा देण्यात आल्या. यानंतर मोर्चा संयोजनाच्या मागील भूमिका जळगाव नागरिक मंचचे दिलीप तिवारी यांनी विशद केली. राष्ट्रपती व इतरांना पाठविण्याचे निवेदन सार्वजनिक गणेश महामंडळाचे अध्यक्ष सचिन नारळे यांनी वाचले. मूकमोर्चाचे निवेदन घेण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक येणार नाहीत, असा निरोप होता. त्यामुळे मोर्चेकऱ्यांचे मत विचारून निवेदन टपालाने पाठवावे, असे ठरले. यानंतर मूकमोर्चात सहभागी संस्था-संघटनांची नावे वाचण्यात आली. पंडित जोशी यांनी शांतिमंत्र म्हणून पहलगाम घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहिली. सरिता खाचणे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### दृष्टिक्षेपात मूकमोर्चा

- भारत मातेच्या राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून समाजातल्या प्रत्येक घटकाचे प्रतिनिधित्व होते.
- बालगोपाळांपासून वयोवृद्धांनी मूकमोर्चात सहभाग नोंदविला. १२६ हून अधिक संघटनांचा मूकमोर्चास पाठिंबा व सक्रिय सहभाग.
- अनेक समाजसेवी लोकांनी पाणी वाटपची व्यवस्था स्वयंस्फूर्तीने केली. मूकमोर्चा हा नियोजनबद्ध व सुनिश्चित वेळेवर सर्व विषयांना सुरुवात झालेली होती.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून मूकमोर्चाला सकाळी ७.०५ वाजता सुरुवात होऊन स्वातंत्र्य चौकात ९ वाजून १० मिनिटांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास माल्यार्पण करून समारोप.
- मूकमोर्चाचे यश-अपयश पाहण्यासाठी शहरातील रस्त्यांच्या दुतर्फा पाहणाऱ्यांची गर्दी होती.
- पोलीस प्रशासन, एनसीसीचे विद्यार्थी आदींनी वाहतुकीचे उत्तम सुनियोजित व्यवस्था केली.
- दोन अग्निवीरांचा समावेश होता.
- हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीला काळी मुखपट्टी, निषेधाची काळी फीत यांसह काळे झेंडे व निषेधाचे फलक तसेच राष्ट्रभक्तीचे फलकही वितरित करण्यात आले होते.

### काही वृद्ध वाहनांवर सहभागी

मूकमोर्चात सर्वजण चालत होते. मात्र, २३ वृद्ध नातेवाइकांसह मोर्चात आले. ते प्रत्येक चौकात वाहनांवर जात होते आणि मोर्चा चौकात पोहोचल्यावर पुढील चौकात थांबत होते. मूकमोर्चात सभागी होण्याची त्यांची इच्छाशक्ती प्रचंड होती.

### भिक्षुक दाम्पत्याचे १० रुपये

मूकमोर्चाच्या प्रसिद्धी व आयोजनासाठी काही खर्च सुरू होता. त्याची जाणीव शहरातील एका भिक्षेकरी दाम्पत्याला आली. त्यांनी सयोजकांशी संपर्क करून १० रुपये पदरची देणगी दिली.

### मूकमोर्चा संयोजनातील सहयोगी संस्था-संघटना

काही संस्था- संघटना अशा आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ, रोटरी परिवार (जळगाव), इंडियन मेडिकल असोसिएशन (जळगाव), क्रेडाई (जळगाव), जळगाव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी (ग. स. सोसायटी), सकल जैन श्री संघ (जळगाव), गांधी रिसर्च फाउंडेशन (जळगाव), नारीशक्ती बहुउद्देशीय संस्था (जळगाव), लाडशाखीय वाणी समाज (जळगाव), युवाशक्ती फाउंडेशन (जळगाव), टेण्ट हाउस असोसिएशन (जळगाव), नारीशक्ती बहुउद्देशीय संस्था (जळगाव), श्री जैन युवा फाउंडेशन (जळगाव), जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो- जळगाव), जळगाव इंडस्ट्रीज असोसिएशन (जिंदा-जळगाव), जिल्हा व्यापारी महामंडळ (जळगाव), दि ग्रेन किराणा ॲण्ड जनरल म चंट असोसिएशन (दाणा बाजार असोसिएशन- जळगाव), एकता रिटेल किराणा व्यापारी असोसिएशन (जळगाव), जळगाव डिस्ट्रिक्ट मेडिसीन डीलर्स असोसिएशन (जळगाव), एल. के. फाउंडेशन (जळगाव), शिवाजी नगर मित्रमंडळ (जळगाव), भारतीय जैन संघटना (जळगाव शहर), जळगाव जिल्हा मूर्तिकार संघटना, रौद्र शंभो बहुउद्देशीय संस्था (जळगाव), भगवे स्वराज्य सेना (जळगाव), शिववंदन फाउंडेशन (जळगाव), धर्मरथ फाउंडेशन (जळगाव), श्री रामदूत हनुमान सांस्कृतिक व क्रीडा मंडळ (जळगाव), सत्संग भजन मंडळ (जळगाव), दाधीच नवयुवक मंडळ (जळगाव), भारत विकास परिषद (जळगाव), ओम योगा क्लासेस (जळगाव), ओम साई बहुउद्देशीय संस्था (जळगाव), अखिल भारतीय सफाई मजदूर संघ (जळगाव जिल्हा शाखा), शिवा फाउंडेशन (जळगाव), श्री गणाधीश फाउंडेशन (जळगाव), प्रबोधन संस्था (जळगाव), स्वरवेध फाउंडेशन (जळगाव), लोकमित्र फाउंडेशन (जळगाव), जनमत प्रतिष्ठान (जळगाव), श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेना (जळगाव), प्रयास बहुउद्देशीय विकास संस्था (पिंप्राळा-जळगाव), शिवसेना (जळगाव जिल्हा), जळगाव सिव्हिल इंजिनिअर (जळगाव), जळगाव डिस्ट्रिक्ट अकाउंटन्स् असोसिएशन (जळगाव), गोदावरी फाउंडेशन (जळगाव), जळगाव शहर व तालुका माहेश्वरी सभा (जळगाव), आंतरराष्ट्रीय बजरंग दल (जळगाव), जवान फाउंडेशन (जळगाव), दि जळगाव शहर सराफ असोसिएशन (जळगाव), छावा मराठा युवा महासंघ (जळगाव).

### मोर्चासाठी यांची झाली मदत

सुरक्षा व वाहतूक व्यवस्था - नूतन मराठा महाविद्यालय एनसीसी पथक व युवाशक्ती फाउंडेशन, पाणीवाटप - जळगाव डिस्ट्रिक्ट मेडिकल डीलर्स असोसिएशन, एकता रिटेल किराणा व्यापारी असोसिएशन, जैन नवयुवक संघ यांचे फिरते पाणी पथक, कांती चौधरी यांनी थंडगार पाणी बॉटल्सचे वितरण, सिंधी पंचायततर्फे पाणी वाटप. याव्यतिरिक्त अनेक संघटनांनी पाणी वाटपाचे कार्य केले. राष्ट्ररथ वाहन व्यवस्था बच्छाव मोटर्स, ध्वनिक्षेप व्यवस्था - मायटी ब्रदर्स, व्यासपीठ व्यवस्था - राजेश टेन्ट हाउस, सूत्रसंचालक सरिता खाचणे या लोकांनी सेवाव्रती म्हणून आपला एक वेगळा परिचय दिला.

# जबरीने पोत ओढून महिलेस ढकलले

## शहरात सलग दुसऱ्या दिवशी तिसरी घटना; पोलिसांपुढे आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

गल्लीत दुकानासमोर उभ्या असलेल्या महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्यांची सोन्याची पोत ओढली. त्यानंतर महिलेस ढकलून भामटे दुचाकीने पसार झाले. शुक्रवारी (२ मे) सायंकाळी सव्वासातच्या सुमारास ही घटना दादावाडी मंदिर परिसरातील चाळीस खोल्या रस्त्यावर घडली. सलग दुसऱ्या दिवशी महिलेच्या गळ्यातील पोत ओढून नेल्याच्या घटनांनी महिलांमध्ये भीती निर्माण झाली आहे. सीमा ऊर्फ नम्रता संदीप पाटील (वय ४२, रा. चाळीस खोल्या, दादावाडी मंदिर परिसर) या गृहिणी आहेत. शुक्रवारी सायंकाळी त्या घरासमोरील रस्त्याने जाताना आशाबाई भोळे यांच्या किराणा दुकानासमोर उभ्या होत्या. त्या महिलेशी बोलत असताना त्याच वेळी गल्लीतून दुचाकीने दोन अनोळखी व्यक्ती आल्या. दुचाकीवर मागे बसलेल्या भामट्याने काळ्या रंगाचा टी शर्ट घातला होता. सीमा यांच्याजवळून दुचाकी आणताच मागील व्यक्तीने महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र पकडून ओढून घेतले. त्यानंतर महिलेस धक्का देत दोन्ही भामटे वेगाने दुचाकी घेऊन पळून गेले.

महिलेने आरडाओरड केली. मात्र, तोपर्यंत पोत हिसकावून चोरटे पसार झाले होते. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावित, पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांनी धाव घेतली.

याप्रकरणी तक्रारीनुसार तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार गुलाब माळी तपास करीत आहेत. दरम्यान, महाराष्ट्रदिनीही मॉर्निंग वॉक करणाऱ्या महिलांची पोत ओढून चोरटे पसार झाले होते. चोरट्यांनी पोलिसांना आव्हान दिले असल्याची शहरात चर्चा आहे.

# सोपाननगर भागात घरफोडी; अडीच लाखांचा ऐवज लंपास

**जळगाव :** कुलूपबंद घराला लक्ष्य करीत चोरट्यांनी रोकड आणि दागिने असा पावणेतीन लाखांच्या मुद्देमालावर डल्ला मारला. शहरातील सोपाननगर भागातील सत्यम पार्क येथे ही घरफोडी शुक्रवारी (२ मे) सकाळी समोर आली.

राजू जगन्नाथ साळवे (वय ५८, रा. सत्यम पार्क) हे कुटुंबासह तेथे वास्तव्यास आहेत. ते गुरुवारी घराच्या दरवाजाला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. ही संधी चोरट्यांनी हेरली. बंद दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून कपाटातील सामान अस्तव्यस्त केला. सुमारे दोन लाख ६५ हजारांची रोकड तसेच १५ हजारांचे तीन ग्रॅमचे कानातील टॉप्स, साखळ्या, असा सुमारे दोन लाख ८० हजारांचा मुद्देमाल लांबविला. साळवे कुटुंबातील सदस्य शुक्रवारी सकाळी घरी आले असता, दरवाजाचा कडी-कोयंडा तुटलेला दिसला. घरात सामान विखुरलेला होता. रोकड व दागिने चोरून नेल्याचा प्रकार समोर आला. घटनेची माहिती मिळताच तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक संजय गायकवाड यांनी सत्यम पार्क येथे धाव घेत पाहणी केली. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. साहाय्यक पोलीस निरीक्षक अनंत अहिरे तपास करीत आहेत.

# कंजरवाड्यात दोन गटांत दांगडो

## दोन जण जखमी; १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

काचेच्या बाटल्या घरासमोर फेकल्या, याचा जाब विचारला म्हणून तसेच मागील भांडणाच्या रागातून दोन गटांत हाणामारी झाली. लाकडी दांडके आणि चापटा-बुक्क्यांनी मारहाण केली. यात दोन जण जखमी झाले. ही घटना गुरुवारी (१ मे) रात्री साडेअकराच्या सुमारास जाखनीनगर कंजरवाडा येथे घडली. याप्रकरणी परस्पर तक्रारीनुसार दोन्ही गटांच्या १६ जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

वर्षा सुनील बागडे (वय २३, रा. जाखनीनगर) यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्या घरासमोर काचेच्या बाटल्या फेकू नका, असे सांगितले. या बोलण्याचा राग आल्याने आकाश अरुण दहियेकर, टारझन दहियेकर, विक्की दहियेकर, प्रकाश दहियेकर, वीर दहियेकर, गोविंद दहियेकर, अनमोल दहियेकर, रोहित रावळकर (सर्व रा. जाखनीनगर-कंजरवाडा) यांनी वर्षा बागडे यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. महिलेच्या आईला मारहाण केली. भाऊ नीलेश याला लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्याच्या छातीवर दगड फेकून मारला व दुखापत केली. तिघांना शिवीगाळ करून दम भरला. या गुन्ह्यात पोलिसांनी आकाश दहियेकर याला ताब्यात घेतले.

दुसऱ्या गटाच्या शिंगी आकाश दहियेकर (वय ३८, रा जाखनीनगर-कंजरवाडा) यांच्या तक्रारीनुसार, मागील भांडणाच्या रागातून तसेच सायंकाळी झालेल्या भांडणाचा राग मनात ठेवत रात्री साडेअकराच्या सुमारास घरासमोर गर्दी जमा केली. नीलेश सुनील बागडे, मयूर बागडे, राकेश बागडे, सनी बागडे, अंकुश माचरे, विकास बागडे, जितू घमडे, विक्की बागडे (सर्व रा. जाखनीनगर-कंजरवाडा) यांनी शिंगी दहियेकर यांचे पती आकाश, मुलगा प्रेम व रोहित यांना शिवीगाळ करून चापटा-बुक्क्यांनी मारहाण केली. रोहित याला लाकडी दांडक्याने मारहाण करून दुखापत केली. घरावर दगडफेक केली. याप्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळी पोलीस निरीक्षक सुदाम संदीप पाटील, उपनिरीक्षक राहुल तायडे यांनी जाऊन माहिती घेतली. उपनिरीक्षक मोहन पाटील तपास करीत आहेत.

# शासकीय समित्यांवर नियुक्त्यांसाठी कार्यकर्त्यांची लॉबिंग

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

गेल्या ४-५ वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या आहेत. त्या नक्की कधी होतील, हे स्पष्टही कोणी सांगत नाही. त्यामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या कार्यकर्त्यांना नेमके कसे सांभाळायचे? हा त्या त्या मतदारसंघातील नेत्यांसमोर प्रश्न ठाकला आहे. मात्र, भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मे महिन्यात तालुका व जिल्हास्तरीय शासकीय समित्यांच्या नियुक्त्या केल्या जातील, असे सूतोवाच केल्याने आता या कार्यकर्त्यांचा डोळा या शासकीय समित्यांच्या निवडीवर केंद्रित झाला आहे. सध्या इथे तरी संधी मिळावी म्हणून त्यांचे नेत्यांकडे प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे.

राज्यात भाजपच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार कार्यरत आहे. पण तालुका व जिल्हा स्तरावरील कार्यकर्त्यांना सांभाळताना आता महायुतीतील नेत्यांनाही कसरत करावी लागत आहे. म्हणून तर भाजपने संघटन पर्व दोनच्या माध्यमातून संघटना बळकट करताना या वेळी १०० बुथचे एक मंडल व त्याला एक तालुकाध्यक्ष असा निकष लावला. त्यामुळे अनेक तालुक्यांना दोनपेक्षा अधिक तालुकाध्यक्ष मिळाले आहेत. कार्यकर्त्यांना समाधानी करण्याचाच हा एक प्रयत्न मानला जातोय. पण एवढ्यावर सगळे कार्यकर्ते समाधानी नाहीत, अशा भावना काही दिवसांपूर्वी मुंबईत आमदार, खासदार व भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या बैठकीत सांगितल्याचे समजते. या वेळी मंत्री बावनकुळे यांनी मे महिन्यात तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय शासकीय समि त्यांच्या निवडी केल्या जातील असे सुतोवाच केले आहे. त्यामुळे 'दुधाची तहान ताकावर भागवू' म्हणत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी इच्छुक असलेल्या अनेकांनी आता आपला मोर्चा शासकीय समित्यांच्या निवडीकडे वळवल्याचे बोलले जात आहे.

**डोकेदुखी कमी होणार की वाढणार?**

शासकीय समित्यांवर अशासकीय सदस्य निवडले जातात. त्यामुळे या निवडीने काही कार्यकर्त्यांना संधी नक्कीच मिळणार आहे. परिणामी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील नेत्यांना, कार्यकर्त्यांना संधी देता येणार आहे. पण त्यातून डोकेदुखी कमी होणार की वाढणार? हे कळण्यासाठी थोडे थांबावे लागणार आहे. कारण यातही सर्वांना संधी देता येणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

राज्यात महायुती सरकार असल्याने या नियुक्त्या करताना भाजपबरोबरच राष्ट्रवादी व शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनाही संधी द्यावी लागणार आहे. त्यामुळे कोणत्या विधानसभा मतदारसंघात तिन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना कसे सामावून घेतले जाणार? हे पाहणेदेखील महत्त्वाचे ठरणार आहे.

### या आहेत तालुकास्तरीय शासकीय समित्या

भ्रष्टाचार निर्मूलन समिती, समन्वय व पुनर्विलोकन समिती, अवैध दारू प्रतिबंध समिती, शांतता समिती, व्यसनमुक्ती समिती, क्रीडा संकुल समिती, संजय गांधी निराधार अनुदान समिती, पशुगणना समन्वय व सनियंत्रण समिती, शेतकरी समन्वय समिती, बाल संरक्षण समिती, जलसाक्षरता समिती, आजी-माजी सैनिक समिती, नगरपालिका दक्षता समिती, रेतीघाट तांत्रिक समिती, तालुका तंटामुक्ती समिती, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन समिती, जलयुक्त शिवार अभियान आढावा समिती, वेठबिगार निर्मूलन दक्षता समिती, विशाखा समिती, राजीव गांधी गतिमान प्रशासन समिती, रोजगार हमी योजना समिती, तक्रार निवारण समिती, विद्युत वितरण नियंत्रण समिती, रुग्ण कल्याण समिती. यावर नियुक्तीची लॉबिंग सुरू आहे.

### पुण्यातील वृद्धाचा शहरातील हॉटेलमध्ये मृतदेह

**जळगाव :** पुणे जिल्ह्यातून शहरात कामानिमित्त आलेल्या वृद्धाचा नवीन बसस्थानकाशेजारील हॉटेलमध्ये शुक्रवारी (२ मे) सकाळी कुजलेल्या अवस्थेत मृतदेह मिळून आला. मोहम्मद शफी मोहम्मद मोमीन (७०, रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. ते रबरी शिक्के बनवून देण्याचे काम करून उदरनिर्वाह करीत होते, त्यांचा मुलगा वकिली व्यवसाय करतो. २८ एप्रिलला जिल्हा न्यायालयात रबरी शिक्के दिल्यानंतर ते बेपत्ता झाले होते. त्यानुसार शहर पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली होती. त्यानुसार मोहम्मद शफी यांचा शोध सुरू होता. शुक्रवारी (२ मे) सकाळी नवीन बसस्थानकाशेजारी हॉटेलमध्ये शफी यांचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत मिळून आला. मृतदेह जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हलविण्यात आला. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली.

# बलूच आर्मीचा धुडगूस

## अंतर्गत संघर्षाने सरकारची तारांबळ ● बलुचिस्तानमध्ये सरकारी इमारती जाळल्या

### महामार्ग बंडखोरांच्या ताब्यात

◆ **क्वेट्टा, ३ मे**

पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील सिंधमध्ये पाणीवाटपावरून स्थानिक नागरिकांचे महामार्गावर आंदोलन सुरू असताना बलुचिस्तानमधील कलात जिल्ह्यात बलुच लिबरेशन आर्मीने शनिवारी मोठ्या प्रमाणात शासकीय इमारतींची जाळपोळ केली. बलुच आर्मीच्या बंदुकधारी बंडखोरांनी बलुचिस्तानला स्वतंत्र करण्याची मागणी करीत क्वेट्टा-कराची महामार्ग रोखला, तसेच अनेक प्रवासी आणि मालवाहू वाहनांची तोडफोड केली.

कलात जिल्ह्यातील एका पोलिस अधिकाऱ्याने वृत्तवाहिनीला माहिती देताना सांगितले की, शनिवारी पहाटेच्या सुमारात बलुच आर्मीने शासकीय इमारतींना लक्ष्य करीत जाळपोळ केली. यात नॅशनल बँक ऑफ पाकिस्तानचे कार्यालय, स्थानिक न्यायालय आणि अनेक विभागांच्या कार्यालयांचा समावेश आहे. या आगीत इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. यानंतर बंदुकधारी बंडखोरांनी मोंगोचर भागातील अनेक रहिवासी इमारतींना आग लावली आणि क्वेट्टा- कराची महामार्ग रोखला. प्रवासी आणि मालवाहू वाहनांचीदेखील तोडफोड करण्यात आली. राष्ट्रीय महामार्गावरील वाहनांची तपासणी केली आणि अनेक बस आणि कारमधून लोकांना बाहेर काढून चौकशी करण्यात आली. या भागात सध्या पोलिस आणि सैन्याची अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली, असून अजूनही बंदुकधारी बंडखोरांनी महामार्ग रोखला आहे.

◀(वृत्तसंस्था)





### टोल नाक्यावर हल्ला, एकाचा मृत्यू

शुक्रवारी रात्री एका घटनेत दुचाकीवरून आलेल्या सशस्त्र लोकांनी एका चेकपोस्टवर हल्ला केला. यात टोल नाक्यावरील हक नवाज लांगोव्ह या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या एका घटनेत रस्त्यावर बांधलेला एक पूलही स्फोटात उडविण्यात आला. पूल कोसळण्याच्या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. ■

### अनेक इमारतींवर मिळविला ताबा

पंजाबी वंशाच्या लोकांना लक्ष्य करण्यासाठी बलुच बंडखोरांनी महामार्गावर वाहनांची तपासणी केली. सशस्त्र गटाने अनेक इमारती आपल्या ताब्यात घेतल्या, यामध्ये शासकीय इमारतींचादेखील समावेश होता. सुरक्षा दलाचे पथक पोहोचताच त्यांनी पळ काढला. पाकिस्तानी सुरक्षा दलांना कोणालाही पकडता आले नाही. ■

# युट्यूब करणार ८५० कोटींची गुंतवणूक

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिली माहिती ● पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या चॅनेलला २५ मिलियन सबस्क्रायबर्स

◆ **मुंबई, ३ मे**

पहिली जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन वेव्हज शिखर परिषद मुंबईतील वर्ल्ड जिओ सेंटरमध्ये सुरू आहे. या परिषदेत युट्यूब इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नील मोहन सहभागी झाले होते. भारतात सर्वात जास्त क्रिएटर्स असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या युट्यूब चॅनेलला २५ मिलियन सबस्क्रायबर्स असल्याचे नील मोहन म्हणाले.

मागील वर्षभरात भारतात १०० मिलियन चॅनेलवरून व्हिडीओ अपलोड करण्यात आले. १५ हजार चॅनेलचे सब्सक्रायबर्स १० लाखांपेक्षा अधिक आहेत. युट्यूबने मागील तीन वर्षात भारतातील किएटर्सला, माध्यमांच्या कंपन्यांना २१ हजार कोटी रुपये दिले. २३ एप्रिलला युट्यूबवर व्हिडीओ अपलोड करण्याला २० वर्ष पूर्ण झाली आहेत, असे नील मोहन यांनी सांगितले.

**अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी करणार गुंतवणूक**

युट्यूब चॅनेलचे सीईओ नील मोहन यांनी भारतात येत्या दोन वर्षात कंटेंट क्रिएशन अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आणि त्याला प्रोत्साहन देण्यासाठी ८५० कोटींची गुंतवणूक करणार आहे. भारत हा क्रिएटर्स नेशन आहे. भारतात बनवल्या गेलेल्या कंटेंटचा भारताबाहेरील वॉच टाईम ४५ अब्ज तास इतका होता. युट्यूब कोणत्याही ठिकाणच्या क्रिएटरला कोणत्याही ठिकाणच्या दर्शकाशी जोडते. यामुळे सांस्कृतिक आदान प्रदानाचे महत्त्वाचे साधन बनले आहे, असे नील मोहन म्हणाले.

# व्याप्त काश्मीरमध्ये नियंत्रण रेषेच्या भागात पर्यटन बंदी

### पंतप्रधान चौधरी अन्वरुल हकयांचा आदेश

◆ **इस्लामाबाद, ३ मे**

पीओकेचे पंतप्रधान चौधरी अन्वरुल हक यांनी सर्वपक्षीय बैठकीनंतर जारी केलेल्या आदेशानुसार, नियंत्रण रेषेजवळ राहणाऱ्या रहिवाशांना अन्न आणि आवश्यक वस्तूंचा साठा करण्यास सांगितले आहे. नीलम व्हॅली आणि नियंत्रण रेषेच्या इतर लगतच्या भागात पर्यटकांचा प्रवेश बंदी करण्यात आली आहे. तसेच जाहीर केलेल्या अनेक उपाययोजनांमध्ये पाकिस्तानच्या ताब्यातील काश्मीरमधील धार्मिक मदरसे बंद करणे, तसेच लष्करी संघर्ष झाल्यास करावयाच्या मदत उपाययोजनांना पाठिंबा देण्यासाठी १ अब्ज रुपयांचा आपत्कालीन प्रतिसाद निधी स्थापन करणे यांचा समावेश होता.

पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानने सीमेवर सलग आठ वेळा गोळीबार केला आहे. भारताने आपल्या लष्कराला पूर्ण ऑपरेशनल स्वातंत्र्य दिल्यानंतर, पाकिस्तानातून आता दावे करण्यात येत आहेत की, भारत त्यांच्यावर हल्ला करणार असल्याची गुप्तचर माहिती त्यांच्याकडे आहे. तणाव वाढत असताना दोन्ही देशांनी त्यांच्या राजदूतांना परत बोलावले असून, सीमा बंद केल्या आहेत.

### नागरिकांसाठी आपत्कालीन हेल्पलाईन क्रमांक जारी

यात्यतिरिक्त, नीलम, झेलम, पूंछ, हवेली, कोटली आणि भिंबेर यासारख्या प्रमुख नियंत्रण रेषेतील मतदारसंघांमध्ये रस्ते खुले राहावेत यासाठी अधिकृत आणि खाजगी यंत्रणा तैनात करण्यात आल्या आहेत. पीओकेमधील नागरी संरक्षण दलांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे, तर स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने रहिवाशांना कोणत्याही तातडीच्या मदतीची आवश्यकता असल्यास आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक ११२२ देखील जारी केली आहे. ■

### नितीश कुमारांच्या हेलिकॉप्टर लँडिंग दरम्यान टिन शेड उडाले

◆ **नालंदा, ३ मे**

शुक्रवारी राजगीरमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हेलिकॉप्टरच्या लँडिंग दरम्यान दोन टिन शेड हवेत उडू लागले. सुदैवाने ते मुख्यमंत्र्यांच्या हेलिकॉप्टरला धडकले नाही, अन्यथा मोठी दुर्घटना घडू शकली असती.



मुख्यमंत्री त्यांच्या गृहजिल्ह्यातील राजगीर क्रीडा अकादमीचे उद्घाटन करण्यासाठी आले होते. मुख्यमंत्र्यांनी येथील इनडोअर हॉल, बास्केटबॉल कोर्ट, हँडबॉल कोर्ट, व्हॉलीबॉल कोर्ट आणि हॉकी प्रॅक्टिस टर्फचे उद्घाटन केले. याशिवाय, मुख्यमंत्र्यांनी राजगीर पोलिस अकादमीमध्ये एफएसएल लॅबचे उद्घाटनही केले आहे.

## चित्रपट वार्ता

### प्रेक्षकांची पसंती रेट्रोला तर रेड-२ कडे पाठ




**मुंबई** : साऊथचा तमिळ हिरो सूर्याचा ॲक्शन ड्रामा असलेल्या रेट्रोने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. या चित्रपटाने दमदार ओपनिंग केली आहे. दुसरीकडे अजय देवगनचा रेड- २ ने दुसऱ्या दिवशी कासवगती पकडली आहे. कार्तिक सुब्बाराज दिग्दर्शित रेट्रो-२ चित्रपट १ मे ला चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. आयएमडीने चित्रपटाला ८.७ रेटिंग दिले. पहिल्या दिवशी रेट्रोने बॉक्स ऑफिसवर रेड- २ ला टक्कर दिली. रेट्रोने बॉक्स ऑफिसवर १९.२५ कोटींचा गल्ला जमवला तर दुसऱ्या दिवशी रेड- २ च्या कमाईत घसरण झालेली दिसली. दुसऱ्या दिवशी रेड- २ चित्रपटाने ११ कोटींहून अधिक कमाई केली. १ मे रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. आता ओटीटीवरही रेड- २ पाहता येणार आहे. ■

### श्रद्धा कपूरला मिळाला मोठा प्रोजेक्ट

**मुंबई** : श्रद्धा कपूरचा आगामी चित्रपट प्रसिद्ध निर्माती एकता कपूर यांच्या बॅनरखाली तयार केला जाणार आहे. हा एक थरारक चित्रपट असणार आहे. या चित्रपटासाठी श्रद्धा कपूरला सुमारे १७ कोटी रुपयांचे मानधन मिळणार असल्याचे समजले. ही तिच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी रक्कम आहे. या प्रोजेक्टचे दिग्दर्शन अनिल बर्वे करणार आहेत. श्रद्धा आणि राही यांची ही नवी जोडी सिनेप्रेमींमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण करत आहे. चित्रपट सध्या प्री-प्रॉडक्शन टप्प्यात आहे आणि चित्रीकरण २०२५ मध्ये सुरू होण्याची शक्यता आहे. या चित्रपटाची कथा रहस्यांनी भरलेली आणि थरारक असेल. ■



### ओटीटीवर दिसणार हे चित्रपट आणि वेबसीरिज

**मुंबई** : सोनी लिव्ह या ओटीटी माध्यमावर विनोदी चित्रपट ब्रोमांस प्रदर्शित झाली आहे. झी ५ वर नवाजुद्दीन सिद्दकीचा कॉस्टाओ हा बायोपिक प्रदर्शित झाला आहे. हा एका खऱ्या घटनेवर आधारित चित्रपट आहे. कुल: द लेगसी ऑफ रायझिंग्स ही वेब सिरीज जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित झाली आहे. यामध्ये निमृत कौर, अमोल पाराशर आणि रिद्धी डोगरा मुख्य भूमिकेत दिसत आहेत. भूमी पेडणेकर, अर्जुन कपूर आणि रकुल प्रीत सिंग यांचा मेरे हसबंड की बीवी हा चित्रपट जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित झाला आहे. नेटफ्लिक्सच्या बहुप्रतिक्षित वेब सिरीज यू चा शेवटचा आणि पाचवा सीझन प्रदर्शित झाला आहे. सैफ अली खान आणि जयदीप अहलावत यांचा ज्वेल थीफ: द हेइस्ट बिगिन्स हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. ■





२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीर खोऱ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या कमालीची घटली आहे. सुरक्षेचे उपाय म्हणून दल सरोवराकाठी सशस्त्र जवानांचा पहारा ठेवण्यात आला आहे.

# धर्म बदलला तर अनुसूचित जातीचा दर्जाही संपला

## आंध्रप्रदेश हायकोर्टात याचिका फेटाळली

◆ **हैदराबाद, ३ मे**

आंध्रप्रदेश उच्च न्यायालयाने म्हटले आहे की जर अनुसूचित जाती (एससी) समुदायातील व्यक्तीने आपला धर्म बदलला तर तो त्याचा अनुसूचित जातीचा दर्जा गमावतो. यानंतर तो अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ अंतर्गत संरक्षणाचा दावा करू शकत नाही.

गुंटूर जिल्ह्यातील कोठापलेम येथील रहिवासी अक्कला रामी रेड्डी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती हरिनाथ एन यांच्या एकल खंडपीठासमोर सुनावणी सुरू होती. हिंदू-ख्रिश्चन झालेल्या चिंतादा यांनी अक्कला यांच्यावर जातीवादी अपशब्द वापरल्याचा आरोप केला होता.

चिंतादाच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अक्कलाविरुद्ध एससी/एसटी विशेष न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. यानंतर, रेड्डी यांनी उच्च न्यायालयात ते रद्द करण्यासाठी आणि सर्व कार्यवाही थांबवण्यासाठी याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती एन. हरिनाथ म्हणाले की, जेव्हा चिंतादा यांनी स्वतः सांगितले होते की ते गेल्या १० वर्षांपासून ख्रिश्चन धर्माचे पालन करत आहेत, तेव्हा पोलिसांनी आरोपीविरुद्ध एससी/एसटी कायदा लागू करायला नको होता.तक्रारदार चिंताडा यांनी एससी/एसटी कायद्याचा गैरवापर केल्याचे निरीक्षण करत खंडपीठाने रेड्डी आणि आरोपी बनवलेल्या इतरांविरुद्धचा खटला रद्द केला.

# सहा जणांना पाकिस्तानला पाठवण्यास स्थगिती

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

सर्वोच्च न्यायालयाने एकाच कुटुंबातील सहा सदस्यांना पाकिस्तानात पाठवण्यास बंदी घातली. जोपर्यंत या लोकांची ओळखपत्रे पडताळली जात नाहीत, तोपर्यंत त्यांना हद्दपार करू नये, असे न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या न्यायासनाने कुटुंबाला कागदपत्र पडताळणीच्या आदेशावर समाधानी नसल्यास जम्मू आणि काश्मीर उच्च न्यायालयात अपील करण्याची मुभा दिली. वास्तविक, जम्मू आणि काश्मीरमधील श्रीनगर येथील रहिवासी अहमद तारिक भट्ट यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्यांनी दावा केला की, आम्ही एकाच कुटुंबात एकूण सहा सदस्य आहोत. आम्ही दोघे भाऊ बंगळुरूमध्ये काम करतो. आमचे आईवडील, बहीण आणि दुसरा भाऊ श्रीनगरमध्ये आहेत. आपल्या सर्वांना भारतीय नागरिकत्व आहे. प्रत्येकाकडे भारतीय पासपोर्ट, मतदान ओळखपत्र, आधार कार्ड आहे. यानंतरही सरकारने नोटीस बजावली आहे. आम्हाला पाकिस्तानला पाठवले जात आहे. आपण सर्वजण व्हिसावर भारतात आलो हे खोटे आहे. त्याच्या समाप्तीनंतर, ते अजूनही भारतात राहत आहेत.

# अर्जेंटिना-चिलीला भूकंपाचा धक्का

**ब्युनॉस आयर्स,:** शुक्रवारी चिली आणि अर्जेंटिनाला तीव्र भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भूकंपाची तीव्रता ७.४ रिश्टर स्केल इतकी होती. भूकंपाचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

अद्याप कोणत्याही प्रकारच्या नुकसानीची माहिती समोर आलेली नाही. त्सुनामीचा मोठा धोका असल्याने बाधित भाग रिकामे करण्यात आले आहेत. चिलीच्या राष्ट्रपतींनी घरे रिकामी करण्याचे आवाहनही केले आहे. चिली आणि अर्जेंटिनाच्या दक्षिण किनाऱ्यावर ७.४ तीव्रतेचा भूकंप झाल्याचे युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्वेक्षणाने म्हटले आहे. चिलीच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दक्षिण अमेरिकन देशाच्या दक्षिणेकडील मॅगेलन सामुद्रधुनीच्या संपूर्ण किनारपट्टीवर स्थलांतराचा इशारा जारी केला.

# चारधाम यात्रेसाठी धावणार भारत गौरव ट्रेन

◆ **नवी दिल्ली, ३ मे**

चार धामला भेट देऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी भारतीय रेल्वेने एक मोठी घोषणा केली आहे. प्रत्यक्षात, रेल्वे चारधाम यात्रेसाठी भारत गौरव ट्रेन चालवणार आहे. ही ट्रेन २७ मे रोजी दिल्लीच्या सफदरजंग स्टेशनवरून निघेल आणि १७ दिवसांत प्रवास पूर्ण करेल. भारत गौरव डिलक्स टूरिस्ट ट्रेन भारतीय रेल्वे चालवणार आहे.

याद्वारे बद्रीनाथ, जगन्नाथपुरी, रामेश्वरम आणि द्वारका येथे प्रवास करता येईल. या कालावधीत नरसिंह मंदिर, जोशीमठ, ऋषिकेश, माना गाव, पुरी आणि चंद्रभागा समुद्रकिनारे, कोणार्क सूर्य मंदिर, रामेश्वरममधील रामनाथ स्वामी मंदिर, धनुषकोटी, द्वारका येथील नागेश्वर ज्योतिर्लिंग आदी तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे बनारसमधील काशी विश्वनाथ मंदिर, पुण्यातील भीमाशंकर आणि नाशिकमधील त्र्यंबकेश्वर मंदिरही दाखविण्यात येणार आहे.



अशा गाड्या यापूर्वी दोनदा चालवण्यात आल्या आहेत. धार्मिक स्थळांना जोडण्यासाठी अशा गाड्या चालवल्या जातात. अशा गाड्या पर्यटन आणि धार्मिक स्थळांना एकाच धाग्यात जोडण्यासाठी चालवल्या जातात, रेल्वेचे कार्यकारी संचालक दिलीप कुमार म्हणाले. ट्रेनमध्ये १५० जागा उपलब्ध आहेत. या जागा प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर बुक केल्या जातील.

सविस्तर माहिती आयआरसीटीसीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. यावेळी एकूण प्रवास १७ दिवसांत ८४२५ किलोमीटरचा होईल. यामध्ये एसी क्लासमध्ये प्रवास, तीन स्टार हॉटेलमध्ये राहणे आणि शाकाहारी जेवण यांचा समावेश आहे. सर्व प्रवाशांचा विमा उतरवला जाईल. पर्यटक ट्रेनमध्ये अनेक आधुनिक आरामदायी सुविधा देण्यात आल्या आहेत. ट्रेनचे संचालन आणि तिकिटांची विक्री आयआरसीटीसी वेबसाइटद्वारे केली जाईल.




# लवकरच वाजणार स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा बिगुल?

## शासनस्तरावर तयारीला सुरुवात, मुंबई मनपाकडे सर्वांचे लक्ष

**नागपूर, ३ मे**

सर्वोच्च न्यायालयात ६ मे रोजी ओबीसी आरक्षणावर सुनावणी होणार आहे. त्याच दिवशी निवडणुकांच्या तयारीसाठी हजर राहण्याचे आदेश शासन स्तरावरून देण्यात आले आहेत. त्यामुळे निकाल लागल्यानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

सर्वांचे लक्ष लागून असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तयारी संदर्भाने सर्व अधिकाऱ्यांनी हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जे अधिकारी हजर राहणार नाहीत त्यांच्याविरोधात कारवाई करण्याचा इशाराही दिला आहे. शासकीय पातळीवरील हालचाली पाहता मुंबई मनपापाठोपाठ राज्यात गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा बार उडण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

शासनाने शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांना केंद्रस्तरीय अधिकारी पदावर रूजू होण्याचे आदेश जारी केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याचे संकेत मिळाले आहेत. निवडणुका रखडल्याने राज्यातील तब्बल २३ महानगरपालिकांवर प्रशासकीय राजवट आहे. गेल्या चार वर्षांपासून निवडणुका न झाल्याने विकासकामे रखडली असून नागरिकांना जणू नगरसेवकांचा विसर पडला आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयात प्रलंबित असल्याने निवडणुका लांबल्या आहेत.

**मुदत संपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था**

- पंचायत समित्या : २८९
- नगरपंचायती : २९
- नगरपरिषदा : २२८
- जिल्हा परिषदा: २६
- महानगरपालिका: २९

### अभिनेते अनिल कपूर यांना मातृशोक

**मुंबई** : अनिल कपूर, संजय कपूर आणि बोनी कपूर यांच्या आई निर्मल कपूर यांनी शुक्रवारी, २ मे रोजी मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. निर्मल ९० वर्षांच्या होत्या. वृद्धकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर शनिवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.



निर्मल कपूर यांना अंतिम निरोप देण्यासाठी कपूर कुटुंबासह चित्रपट जगतातील अनेक प्रसिद्ध व्यक्ती आल्या होत्या. मागील काही महिन्यांपासून त्या आजारी होत्या.

आरोग्याच्या समस्यांमुळे त्यांना अनेक वेळा रुग्णालयात दाखल करण्यात आले. बोनी कपूर यांनी त्यांच्या इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी त्यांच्या आईला श्रद्धांजली वाहिली आहे.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### दुय्यम निबंधक अधिकारी प्रशांत कुळकर्णींचा सावदा येथील ब्राह्मण समाजातर्फे सत्कार

**सावदा, ता. रावेर :** जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे सरकार दरबारी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा पालक मंत्र्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्यामध्ये सावदा येथील दुय्यम निबंधक अधिकारी प्रशांत कुळकर्णी यांचादेखील समावेश होता. यानिमित्त सावदा येथील ब्राह्मण हितवर्धिनी समितीतर्फे अध्यक्ष सचिन सकळकळे यांच्या हस्ते प्रशांत कुळकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. समाजाच्या कोणत्याही चांगल्या कार्यासाठी सदैव मदतीसाठी तयार असल्याची भावना कुळकर्णी यांनी बोलून दाखविली. या प्रसंगी उपाध्यक्ष प्रदीप कुळकर्णी, कोषाध्यक्ष सानिका मटकरी, श्रीकांत मटकरी, कविता सकळकळे, सचिव रवींद्र कुळकर्णी, अपूर्वा कुळकर्णी, नीलेश कुलकर्णी, दीपक कुळकर्णी, धनश्री कुळकर्णी, मुन्ना कुलकर्णी, सतीश जोशी यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.



### भुसावळातील के. नारखेडे विद्यालयात पी. आर. पाटील यांना अभिवादन

**भुसावळ :** येथील के. नारखेडे विद्यालयात श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ भुसावळ या संस्थेचे माजी शालेय समिती चेअरमन आणि के. नारखेडे कॉम्प्युटर टेक्नोलॉजी संस्थेचे माजी सेक्रेटरी पी. आर. पाटील यांना त्यांच्या नवव्या पुण्यस्मरणानिमित्त विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक वाय. एन. झोपे यांच्या हस्ते प्रतिमेस माल्यार्पण आणि अभिवादन करण्यात आले. विद्यालयाच्या पर्यवेक्षिका संगीता अडकमोल, पर्यवेक्षक सुनील राणे, संगणक विभागप्रमुख बी. ए. पाटील, एस. पी. पाठक, संगणक विभागातील सर्व कर्मचारी व विद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते.



### फैजपूर येथे कामगार दिन साजरा

**फैजपूर, ता. यावल :** येथील एम मुसा जनविकास मल्टीपर्पज सोसायटी संचलित असंघटित गवंडी कामगार संघटना, श्रमिक कोहिनूर कामगार संघटना, नाशिक विभागातर्फे फैजपूर येथील कामगार संघटनेच्या कार्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा करण्यात आला. कामगार संघटनेचे अध्यक्ष शाकीर मलिक यांनी मनोगत व्यक्त केले. कामगारांनी शासनाकडून मिळालेले पेटीचे साहित्य वापरावे, असे आवाहनही त्यांनी सर्व कामगारांना केले. यावेळी हाजी युनूस पिंजारी, शेख इरफान, अभियंता सोहिल मलक, ईदू पिंजारी, इम्रान खान, लुकमान शेख, नईम शेख, ईकबाल मिया, करीम तडवी, शब्बीर तडवी, शफिक खाटीक, आसिफ शेख, शेख खलील, शेख जाकीर, रफिक मिस्तरी, इफ्तेखार एट्या शहा, तय्यब तडवी, सद्दाम तडवी, अकील शेख, फिरोज पटेल, कयुम पटेल, मुलतू मिस्तरी मारूळ आदींसह गवंडी कामगार उपस्थित होते.

### डॉ. रत्नराज बोरकर बीडीएस परीक्षा उत्तीर्ण

**रावेर :** येथील डॉ. रत्नराज विक्रम बोरकर हे बी. डी. एस. फायनल परीक्षा



उत्तीर्ण झाले आहेत. राजस्थानमधील उदयपूर स्थित पॅसिफिक विद्यापीठातून त्यांनी ही पदवी मिळविली आहे. प्रत्यक्ष प्रॅक्टिकल परीक्षेत डॉ. रत्नराज हे प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. त्यांनी स्त्रियांचे दात व पुरुष दात प्रत्यक्ष आकृती सहा स्टॅचू करून त्यांनी स्त्रियांचे दात व पुरुषांच्या दातातील सूक्ष्म फरक दाखविला होता. ते पुढे एम. डी. एस.चे शिक्षण घेणार आहेत. त्यांना अनेक वेळा वैद्यकीय विद्यार्थी वर्गास शिकविण्याचे कार्य पॅसिफिक आयुर्वेद विद्यापीठाने त्यांना दिले होते. चौथ्या वर्षात उदयपूर येथील नामांकित व प्रत्येक सप्ताहात अमेरिकेत प्रॅक्टीस करणारे डॉ. वरदान माहेश्वरी यांच्या दवाखान्यात प्रॅक्टीस करीत होते. डॉ. माहेश्वरी जेव्हा अमेरिकेत प्रॅक्टीस करण्यासाठी जात तेव्हा त्या वेळी त्यांच्या दवाखान्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. रत्नराज सांभाळत होते. दरम्यान, डॉ. रत्नराज यांनी फॅशन शोमधूनदेखील महाराष्ट्रीयन पोशाखाद्वारे प्रावीण्य मिळविले होते. त्यांचे लहान बंधू सुनिर्मल विक्रम बोरकर हेदेखील वाय. डी. पाटील आयुर्वेदिक विद्यापीठ, पिंपरी-चिंचवड, पुणे येथून एम.बी.बी.एस.च्या शेवटच्या वर्षाला कार्यरत आहेत. डॉ. रत्नराज हे विश्वज्योतिषाचार्य सुरेशराव बोरकर गुरुजी यांचे नातू, तर विक्रम सुरेशराव बोरकर यांचे चिरंजीव आहेत. या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.



### मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात अंतुर्ली येथील तराळ विद्यालय तालुक्यात प्रथम

**अंतुर्ली, ता. मुक्ताईनगर :** महाराष्ट्र राज्यातील शालेय विभागाने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमातील दुसऱ्या टप्प्यात सन २०२४-२५ या वर्षासाठी इतर सर्व व्यवस्थापनाच्या शाळा या प्रकारात मुक्ताईनगर तालुक्यातील अंतुर्ली येथील मिठाराम फकिरा तराळ विद्यालयाला तालुकास्तरीय प्रथम क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. बक्षीस वितरण समारंभ मुक्ताईनगर येथील संत मुक्ताबाई महाविद्यालयात झाला. आमदार चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. यात मिठाराम फकिरा तराळ विद्यालयाला तीन लाखांचे बक्षीस मिळाले. बक्षीस घेतेवेळी मिठाराम फकिरा तराळ विद्यालयातील शिक्षक वृंद उपस्थित होते. यावेळी माफदाचे अध्यक्ष विनोद तराळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुख छोटू भोई, धनलाल भोई, एस.एम. कॉलेजचे प्राचार्य आय.डी.पाटील, गटशिक्षणाधिकारी मदन मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी वसंत मोरे, शिक्षण विस्तार अधिकारी सुनील कोंघे, शिक्षण विस्तार अधिकारी संजय ठोसर, सुनील अढगळे तसेच सर्वच शाळेतील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक बावस्कर व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

## पडलेल्या झाडात कार घुसली चार जखमी, एक जण गंभीर

### चिंचोलीजवळील अपघात

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ३ मे**

तालुक्यातील बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राज्य महामार्गावर कोसळलेल्या झाडात चारचाकी वाहन घुसल्याने अपघात झाला. यात चार जण जखमी झाले असून, यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. चिंचोली गावाजवळ शनिवारी (३ मे) पहाटे अडीच ते तीन वाजेदरम्यान हा अपघात झाला.

जीजे-०५-जेई ८०७१ या ह्युंडाई चारचाकी वाहनाने काही जण गुजरातकडून भुसावळला एका लग्न समारंभास जात होते. तेव्हा हे वाहन चिंचोली-धानोरा रस्त्यादरम्यान कोसळलेल्या मोठ्या निंबाच्या झाडात घुसले. या भीषण अपघातात कारमधील चार जण जखमी झाले. त्यातील कारचालकाच्या शेजारी बसलेल्या व्यक्तीस गंभीर दुखापत झाली असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याचे कळते. ही सर्व मंडळी गुजरात राज्यातील असल्याचे समजते.




### जिवंत मोठे झाड पडले कसे?

या अपघातातील जखमींना तत्काळ उपचारासाठी जळगाव येथे पाठविण्यात आले. दरम्यान, राज्य मार्गाच्या कडेला असलेली मोठमोठी जिवंत झाडे पाडण्याचे प्रकार समोर येत असून, हे जिवंत मोठे झाड पडले कसे? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

## जीर्ण झाडे देताय अपघातास आमंत्रण

**तभा वृत्तसेवा**
**यावल, ३ मे**

बऱ्हाणपूर-अंकलेश्वर या राज्य महामार्गावरील काही जीर्ण तसेच पूर्णतः सुकलेली कोरडी झाडे अपघातास आमंत्रण देणारी ठरत आहेत. या सर्व प्रकाराकडे बांधकाम विभागाने लक्ष देण्याची मागणी होत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून सुकलेली ही झाडे 'जैसे थे' परिस्थितीत दिसत आहेत. अनेकवेळा झाडांच्या फांद्या पडून किरकोळ अपघात झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. बऱ्हाणपूर-अंकलेश्वर या राज्य महामार्गावर किनगाव ते यावल रस्त्यावरील जीर्ण झालेली झाडे गेल्या अनेक दिवसांपासून उभी आहेत. रहदारी करणाऱ्या प्रवाशांसह वाहनधारकांना जीव मुठीत धरून त्या झाडांना पाहून प्रवास करावा लागत आहे.



### अशा झाडांची विल्हेवाट लावावी

सध्या वातावरणात अनेक बदल होताना दिसत आहेत. त्यातही अधिक जीर्ण झालेले वृक्ष कधी कोसळतील याची शाश्वती नाही. असे पाहता ही झाडे कधी वाहनांवर पडतील याची खात्री देता नाही. त्यात दिवसरात्र हवेचा प्रवाह सुरू असतो. जोरदार वारे-वादळ आल्यास ही झाडे कोसळू शकतात. यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. झाडे वाहनांवर पडून नागरिकांनी प्राण गमावल्याच्या घटना मागील वर्षी घडल्या आहेत. त्यात चार जण जखमी तर एक गंभीर आहे. ही जीर्ण, कोरडी झाडे सार्वजनिक बांधकाम विभागाने काढून घ्यावीत आणि प्रवास सुखकर करावा. दररोज बांधकाम विभागाचे अधिकारी या रस्त्याने ये-जा करतात. अनेकदा अधिकारी रस्ता बनवण्यासाठी चांगल्या दर्जेदार झाडांची कत्तल करताना दिसतात. मात्र ही जीर्ण झाडे रस्त्याच्या बिलकुल कडेला उभी आहेत. यावर कुऱ्हाड का चालवली जात नाही, हाही प्रश्न वाहनधारक विचारत आहेत. यावल ते चोपडा या रस्त्यावर जवळजवळ १० ते २० अधिक जीर्ण व कोरडी झाडे असतील. हा सर्व प्रकार पाहता बांधकाम विभागाने लक्ष देऊन त्यांची लवकरात लवकर विल्हेवाट लावावी, ही मागणी जोर धरत आहे.

## फैजपुरातील रामदेवजीबाबा नगरमध्ये स्वागत कमान उभारण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, ३ मे**

फैजपूर नगरपरिषदेच्या दक्षिण भागातील ऐतिहासिक व मागास वस्ती असलेल्या श्री रामदेवजीबाबा महाराज नगर येथे भव्य स्वागत कमान (गेट) उभारण्यात यावी, अशी मागणी वाल्मीकी मेहतर समाजातील नागरिकांनी फैजपूर नगर परिषद प्रशासक तथा प्रांताधिकारी बबनराव काकडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात असलेली ही वस्ती आजही रस्ते, पाणी, आरोग्य अशा मूलभूत नागरी सुविधा न मिळाल्याने दुर्लक्षित आहे. या पार्श्वभूमीवर वस्तीच्या ओळखीला सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व प्राप्त व्हावे यासाठी 'श्री रामदेवजीबाबा महाराज नगर' नावाने आकर्षक स्वागत कमान उभारण्याची मागणी करण्यात आली. अशा कमानीमुळे परिसराची सौंदर्यवृद्धी होईल. फैजपूर शहरालाही एक वेगळी ओळख मिळेल. ही कामगिरी दलित वस्ती विकास निधी, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या निधीमधून अथवा अन्य शासकीय योजनांतून करावी, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे.

या वेळी महाकाल सेनेचे अध्यक्ष शुभम करोसिया, महाकाल सेनेचे उपाध्यक्ष मोंटू पंचेरवाल, भीमपुत्र ग्रुपचे अध्यक्ष पप्पू मेढे, करण चावरे, विशाल घावरे, विक्की घावरे, बिरजू चिरावंडे, राज गोयर, अर्जुन चावरे, नितीन, आकाश, जय, आनंद घावरे, अभय चिरावंडे, सनी तेजकर यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासन व लोकप्रतिनिधींनी या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन लवकर कृती करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.




## विहिंप, दुर्गावाहिनीचे लाठीकाठी प्रशिक्षण उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**फैजपूर, ता. यावल, ३ मे**

सरावात सातत्य ठेवल्यास कलेत निपुणता येईल, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या विविध प्रकारच्या घटना पाहता महिला-मुलींनी स्वरक्षणासाठी लाठीकाठी प्रशिक्षण घ्यावे. प्रशिक्षणानंतर सरावात सातत्य ठेवावे, असे आवाहन महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांनी केले.

विश्व हिंदू परिषद, दुर्गा वाहिनी आणि महामंडलेश्वर जनार्दन हरिजी महाराज यांच्या संकल्पनेतून फैजपूर शहरातील महिला आणि मुलींना मोफत लाठीकाठी चालवण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी घेतलेला पुढाकार अतिशय योग्य आहे. येथे मिळालेल्या प्रशिक्षणानंतर सर्वांनी सरावात सातत्य ठेवावे. जेणेकरून या कलेत निपुणता प्राप्त करता येईल.

फैजपूर येथे १० दिवसीय शिबिर शुभदिव्य मंगल कार्यालय येथे नुकतेच झाले. शिबिरास महिला व युवतींनी भरघोस प्रतिसाद दिला.

या वेळी महामंडलेश्वर जनार्दन महाराज, प्रभू महाजन, विकी भिडे, दुर्गा वाहिनीप्रमुख प्रज्ञा चौधरी, परी महाजन, नीलेश चौधरी उपस्थित होते.

महाराजांनी महिला-मुलींना प्रोत्साहन देऊन लाठीकाठी शिकण्याचे फायदे सांगितले. आयुष्यात येणारे विविध प्रसंग, संकटांना धैर्याने सामोरे जावे. शिबिरामुळे आत्मविश्वास वाढेल, असे सांगितले.

## साकरे विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात

**धरणगाव, ३ मे**

तालुक्यातील साकरे येथील बा. च. भाटिया माध्यमिक विद्यालयात रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त माजी विद्यार्थी स्मृतिगंध स्नेहमेळावा प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत झाला. सकाळी सर्व माजी विद्यार्थ्यांची नोंदणी करून विद्यालयात पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी परिचय करून दिला.

सर्वांनी खेळ, मनोरंजन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद घेतला. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे अध्यक्ष दिलीप रामू पाटील होते. रा. स्व. संघाचे विभाग संचालक राजेश पाटील, धरणगाव येथील श्री बालाजी वहन मंडळाचे कार्याध्यक्ष जीवनसिंह बयस, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विकास पाटील, शिक्षण विभागाच्या कक्ष अधिकारी प्रतिभा सुर्वे प्रमुख अतिथी होते.

या वेळी दिवंगत कर्मचारी, माजी विद्यार्थी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राज्य गीताने कार्यक्रमास सुरुवात करून मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. विद्यालयाकडून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका अनिता पाटील यांनी केले. याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षकेतर कर्मचारी प्रकाश पाटील यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन मनोज गुजर व मनीषा शिंदे यांनी केले. राजेश्वर न्हायदे यांनी आभार मानले. साकरे, निमझरी व कंडारी या तीनही गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध अधिकारी, पदाधिकारी, विद्यालयाचे संचालक, तिन्ही गावातील पालक वर्ग मोठ्या संख्येने कार्यक्रमास उपस्थित होते. यशस्वितेसाठी मुख्याध्यापिका अनिता पाटील, चंद्रशेखर पाटील, विद्यालयाचे सांस्कृतिक समितीप्रमुख लीलाधर माळी, किशोर पाटील, नरेंद्र पटाईत, अनिल पाटील, दशरथ साळुंखे, शिक्षकेतर कर्मचारी प्रकाश पाटील, सतीश पाटील यांनी परिश्रम घेतले.



### वर्गमित्र व मैत्रिणींना भेटण्याचा आनंद

प्रमुख मान्यवर तसेच माजी विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. प्रमुख मान्यवर तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांना विद्यालय परिवाराकडून छानशा भेटवस्तू देण्यात आल्या. भोजनानंतर विद्यार्थ्यांनी डीजेच्या तालावर नृत्याचा आनंद घेतला. बऱ्याच वर्षांपासून आपल्या वर्गमित्र व मैत्रिणींना भेटण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. सर्वांच्या जुन्या आठवणी तसेच विद्यालयीन शिक्षणाचा आनंद या मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा अनुभवता आला. सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा सत्कार करून त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली. आयुष्यात कधीही अनुभवायला येणार नाही, असा अनुभव आम्हाला या मेळाव्यात मिळाला, असे गौरवोद्‌गार विद्यार्थ्यांनी या वेळी केले.



### आयसीएसई बोर्ड दहावीत स्नेहराज पाटील भौतिकशास्त्रात प्रथम

**चोपडा :** आय.सी.एस.ई बोर्डाच्या



दहावीच्या परीक्षेत येथील चावरा इंटरनॅशनल स्कूलमधील स्नेहराज नरेंद्रसिंग पाटील या विद्यार्थ्याने भौतिकशास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक प्राप्त केला. या परीक्षेत ९७.४ टक्के गुण मिळवून चावरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये प्रथम क्रमांक मिळवून यशाचे शिखर गाठले. घोडगाव येथील सी.बी निकुंभ विद्यालयातील प्रा.नरेंद्रसिंग रणजित पाटील व जि.प. प्राथमिक शाळा, गोरगावले येथील सरला राजपूत यांचा स्नेहराज हा मुलगा आहे. या यशाबद्दल नूतन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रहास गुजराथी, उपाध्यक्ष द्रविलाल पाटील, सचिव जवरीलाल जैन, संचालक मंडळ, मुख्याध्यापक आर. पी. चौधरी पर्यवेक्षक व्ही. ए. नागपुरे, चावरा इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य बीजू कोट्याकल, सन्मती जैन व शिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले.

## महापुरुषांची जयंती वाचून साजरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

### चिंचखेडा बुद्रूक येथील शाळेचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**कुऱ्हा काकोडा, ता. मुक्ताईनगर :**

महापुरुषांची जयंती नाचून साजरी करण्याच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती वाचून साजरी करणाऱ्या चिंचखेडा बुद्रूक येथील जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त चिंचखेडा बुद्रूक या छोट्याशा गावातील जि. प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा आणि रंगभरण स्पर्धा अशा विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन आगळीवेगळी जयंती साजरी केली. त्यात प्रावीण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, मेडल, ट्रॉफी आणि वही-पेन-पेन्सिल देऊन गौरविण्यात आले.

#### असे आहेत विजेते

**वक्तृत्व स्पर्धा-** स्वाती मधुकर गावंडे (प्रथम), उत्कर्षा पांडुरंग दिवाने (द्वितीय), लक्ष्मी शेषराव इंगळे (तृतीय). निबंध स्पर्धा- सायली शरद गावंडे (प्रथम), स्वाती मधुकर गावंडे (द्वितीय), विराज वाल्मीक गावंडे (तृतीय).

**रंगभरण स्पर्धा-** सायली शरद गावंडे (प्रथम), नंदनी सुनील लिंगे (द्वितीय), पुष्कर विकास पाटील (तृतीय).


**उत्तेजनार्थ बक्षीस-** भाविका पाटील, अंजुमबी फकीर, रीता कोळी, राधिका धायडे, स्वराज गायगोळ, सोहम गावंडे, दर्पण बावस्कर, काजल तायडे, आदित्य कोळी, अथर्व तायडे, मयुरी पिळोदकर, देविका तायडे, वैष्णवी कोळी, रक्षा खोंदले, प्रतीका धायडे, तेजल कचरे, तनुजा नमायते, सारिका पिळोदकर, वेदिका पाटील, तेजस्विनी खोंदले, अर्णव कांडेलकर, रितेश बावस्कर, मोहित नमायते, श्रुती पिळोदकर, प्राची देशमुख, गायत्री पाटील, रीतिका कांडेलकर, सुवर्णा मोरे.



या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून पत्रकार रवींद्र हिरोळे यांनी उपस्थित स्पर्धकांना महापुरुषांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे म्हणून पंकज हिरोळे, दीपक हिरोळे, प्रशांत हिरोळे, विनोद थाटे, शिवाजी वानखेडे, गौतम वाघ, राजू सोनवणे, वायला पोलीस पाटील सुनील तायडे, राहुल इंगळे उपस्थित होते. केंद्रप्रमुख गणेश कोळी, मुख्याध्यापक देवानंद नमायते, समाधान निकम, महादेव कोळी, विष्णू कोळी, पद्माकर तायडे, उपसरपंच अर्जुन इंगळे, अशोक निकम, जितेंद्र तायडे, गोलू कांडेलकर, राजू कोळी, राजू तायडे, कडू पिळोदकर, अजय गायकवाड, भूषण निकम, कैलास इंगळे, दादाराव निकम, चंद्रभान निकम, विलास सावळे, किशोर इंगळे व सम्राट अशोक सामाजिक संघ कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अशोक निकम यांनी केले.

## संघ हीच जीवनगाथा

**अलक (१०७) सहचित्तता**



नमस्कार, आज आपल्या संघ हीच जीवनगाथा याचा समारोप करू या. आज २०२५ साली संघाने १०० व्या वर्षात पदार्पण केले आहे. सर्वच सरसंघचालकांचे जीवन संघ हीच जीवन गाथा असेच होते. आजही आहे. या सर्वांचीच असू आम्ही सुखाने पत्थर पायातील। मंदिर उभविणे हेच आमुचे शील।। अशीच सहचित्तता होती व



आजही आहे. त्यांच्या अथक प्रयत्नातून आज हिंदू जागरणाचा प्रभाव गतीत दिसतो आहे. डॉक्टरांनी संघाच्या वटवृक्षाचे एकमात्र बीज पेरले, आज त्याचा वटवृक्ष झाला आहे. आता उत्तम साधना करून पाने-फांद्या-फुले आणि फळे याचा बहर आणू या. माननीय सरसंघचालक श्री. मोहनजी भागवत म्हणतात, त्यासाठी सर्वांनी एका स्थानावर एका विचाराने एकत्रित व्हा. एक स्वरात- एकमनाने बोला. एकाच ध्येयाने- एक मनाने- एक मताने प्रेरित व्हा. असा एकोपा, अशी एकजूट सहचित्तता निर्माण करेल. अर्थात त्यासाठी सनातन / चिरपुरातन आणि नित्य नूतन यांनी एक साथ चालणे महत्त्वाचे आहे. सनातन शिवाय नित्य नूतन असेल तर ते कटी पतंगसारखे होईल व नित्य नूतनशिवाय पुरातन असेल तर ते युगानुकूल- देशानुकूल होणार नाही.

समजा मला उत्तरेकडे हिमालय पर्वतावर जायचे आहे तर मी फक्त उत्तर दिशेने चालून हिमालय गाठू शकत नाही. उलट मी प्रवासात अनेक वेळा दिशा बदलून हिमालय गाठू शकेल. असे विविध वाटेने एकत्र येऊन भारत मातेला परम वैभवी बनवू या. ही आहे संघाची शिकवण. **(क्रमशः)**

**लेखन- सुरेखा विजय काणे**,
माजी जिल्हा बौद्धिकप्रमुख, राष्ट्रसेविका समिती,
छत्रपती संभाजीनगर.
(मोबाइल ९९६००५३५२१).

## थोडक्यात महत्त्वाचे...



**नंदुरबार येथील नगरपालिकेत संत तुकडोजी महाराज व महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करून अभिवादन करताना मुख्याधिकारी राहुल वाघ, लेखाधिकारी वैशाली जगताप, कार्यालय अधीक्षक सुभाष मराठे, राजेश परदेशी, मानसी मराठे, मोतीराम मराठे यांच्यासह अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी संत तुकडोजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पूजन केले.**



### विजया महिला मंडळातर्फे महात्मा बसवेश्वरांना अभिवादन

**नंदुरबार** : शहरातील शारदानगर परिसरातील विजया महिला मंडळातर्फे अक्षय्यतृतीयेला थोर समाजसुधारक, क्रांतिसूर्य, जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराजांना जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष निवृत्त गटविकास अधिकारी बी. डी. गोसावी यांच्या हस्ते म हात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पार्पण करण्यात आले. कार्यक्रमास पशुधन अधिकारी डॉ. राजेश कानोरे, ज्येष्ठ नागरिक के. पी. सैंदाणे, साहाय्यक महसूल अधिकारी योगेश पाटील, अनिल राजपूत, तुषार सैंदाणे, भूषण सैंदाणे, विजय सोनवणे, कपिल चौधरी आदी उपस्थित होते.



### पाटील महाविद्यालयातील अकरावीचा निकाल घोषित

**नंदुरबार** : जी. टी. पाटील महाविद्यालयातील अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांचा निकाल गुरुवारी (१ मे) घोषित करण्यात आला. त्यात कला शाखेमधून संतोष पावराने (५०४ गुण), वाणिज्य शाखेतून मेहक कोकणी (५६८ गुण), तर विज्ञान शाखेतून गौरी मंदाना (५४२) ही प्रथम आली. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे सचिव यशवंत पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एम. जे. रघुवंशी, संस्थेचे समन्वयक प्रा. डॉ. एम. एस. रघुवंशी, उपप्राचार्य प्रा. एस. यू. पाटील, प्रा. डॉ. एस. पी. पाटील, उपप्राचार्य प्रा. टी. जी. पाटील, परीक्षा समितीचे प्रमुख प्रा. एस. जे. साक्रीकर यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### बोराडीत ब्यूटिपार्लर प्रशिक्षण केंद्राचा प्रारंभ

**शिरपूर** : अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशनतर्फे बोराडी येथे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या मोफत 'कु. द्वेता भूपेशभाई पटेल ब्यूटिपार्लर प्रशिक्षण केंद्रा'चा प्रारंभ करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या जताबाई पावरा व विद्या रंधे यांच्या हस्ते केंद्राचा प्रारंभ झाला. त्यांनी ग्रामीण भागातील महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी व स्वावलंबी बनविण्यासाठी अशी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे उपयुक्त ठरतील, याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाला मयूरी पवार, रमण पावरा, बाजार समितीचे संचालक जगन टेलर, सोनिया भसीन, योगेश्वर माळी, संगीता सोनार, प्रशिक्षक जयश्री चौधरी आदी उपस्थित होते. सोनिया भसीन यांनी प्रास्ताविक केले. योगेश्वर माळी यांनी सूत्रसंचालन केले.



### दहिवदला अभियांत्रिकीत विविध कार्यक्रम

**शिरपूर** : दहिवद येथील एस. व्ही. के. एम. अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक इंग्रजी भाषा, जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिनानिमित्त विविध कार्यक्रम झाले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा आणि पुस्तक वाचनाचे महत्त्व सांगून विविध उपक्रम हाती घेण्यात आले. यात विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेतील शब्दसंग्रह स्पर्धा, कवितावाचन, पठण व विश्लेषण स्पर्धा; त्याचबरोबर महत्त्वाच्या पुस्तकांचे तोंडी सारांश विद्यार्थ्यांकडून प्रस्तुत करण्यात आले. प्रा. संदीप पाटील, प्रा. लोकेश सोनार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अक्षय पवार, प्रा. योगेश चव्हाण यांनी स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राचार्य प्रा. डॉ. नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधींनी सहकार्य केले.

# शिरपूर साखर कारखाना सुरू होणारच

## अध्यक्ष माधवराव पाटील यांचा विश्वास; आमदार पटेल यांचे प्रयत्न

**शिरपूर** : शिरपूर साखर कारखाना लवकरच सुरू होणार असून, कारखान्यासमोर डेरगं भरो आंदोलन करून, हातातोंडाशी आलेला घास मातीत मिळवू नका, असा टोला विरोधकांना हाणत कारखान्याचे अध्यक्ष माधवराव पाटील यांनी कारखाना बंद करण्याचे पाप ज्यांनी केले, त्यांना जाब विचारण्याची नैतिक पात्रता नसलेली काही माणसे आज कारखान्यासाठी हाकाटी पिटत असल्याचा आरोप केला.

जिल्हा बँकेचा कर्जाचा डोंगर मोठा म्हणजे १३२ कोटींचा होता. एवढे पैसे भाडेकरारातून येणाऱ्या पैशांतून परतफेड होणे शक्य नव्हते. त्यासाठी आमदार अमरिशभाई पटेल यांच्या अथक प्रयत्नाने भारतीय स्टेट बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जिल्हा बँकेकडे व्याजमाफीचा प्रस्ताव प्रत्यक्ष परिस्थितीनुसार दाखल केला आणि जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव करून ३२ कोटींवर कर्ज रक्कम अंतिम करण्यात आली, ही कारखान्यासाठी मोठी जमेची बाजू आहे, असेही ते म्हणाले.

अक्षय्यतृतीयेला काही आंदोलकांनी, साखर कारखान्याच्या प्रवेशद्वारावर डेरगं भरो आंदोलन केले. तसे पाहिले तर या आंदोलनात शेतकऱ्यांचा कळवळा कमी व श्रेयवाद घेण्याची धडपड अधिक दिसून आली, असेही त्यांनी म्हटले आहे. कारखान्याच्या पुनरुज्जीवनासाठी शिरपूर साखर कारखाना संचालक मंडळाच्या मागे उभे राहून सर्वांचे नेते, शेतकऱ्यांचे हितचिंतक आमदार अमरिशभाई पटेल यांनी तन, मन, धनाने केलेले, जीवाचे रान व आमदार काशिराम पावरा यांनी वेळोवेळी केलेले सहकार्य आपण समजून घेणे गरजेचे आहे. हा साखर कारखाना २०११ पासून बंद आहे. तो कुणाच्या काळात व कसा बंद झाला याचा काळा इतिहास सर्वांना ज्ञात आहे. तो बंद करण्यात सहभागी असलेले अनेक चेहरे आज कारखाना सुरू करण्याची बोंब ठोकत आहेत.

कारखाना क्षेत्रातील अनुभवी व सभासदांच्या हिताचे रक्षण करण्याची ग्वाही देणाऱ्या माँ रेवा शुगर्स कंपनीशी करार करून १० मे २०२४ रोजी २० वर्षांच्या कराराने देण्यात आला आहे. माँ रेवा शुगर्स कंपनीने यापूर्वी सात साखर कारखाने यशस्वीरीत्या चालविले आहेत. त्यांनी मोठ्या प्रमाणात इथेनॉल व वीजनिर्मिती केली आहे. कंपनीने तीन कोटी रुपये अनामत जमा केले आहेत. जिल्हा बँकेचा कर्जाचा डोंगर मोठा म्हणजे १३२ कोटींचा होता. एवढे पैसे भाडेकरारातून येणाऱ्या पैशांतून परतफेड होणे शक्य नव्हते. त्यासाठी आमदार अमरिशभाई पटेल यांच्या अथक प्रयत्नाने भारतीय स्टेट बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार जिल्हा बँकेकडे व्याजमाफीचा प्रस्ताव प्रत्यक्ष परिस्थितीनुसार दाखल केला व जिल्हा बँकेच्या सर्वसाधारण सभेत ठराव करून ३२ कोटींवर कर्ज अंतिम केले. कारखाना कोणत्याही परिस्थितीत सुरू होणारच, असा विश्वासही अध्यक्ष पाटील यांच्यासह संचालक मंडळ यांनी दिला आहे.

### विरोधकांचा श्रेय घेण्यासाठी आटापिटा

कारखान्याचा ताबा माँ रेवा शुगरला देण्यात आला. काही तांत्रिक व कायदेशीर अडचणींमुळे अंतिम करार बाकी होता. ते करत असताना उद्योग मंत्रालयाने जमीन मोजणी करायला सांगितले व त्यात जास्त वेळ वाया गेला. त्याअगोदर कारखान्याला कच्चा माल ऊस मुबलक प्रमाणात उपलब्ध व्हावा यासाठी माँ रेवा शुगर व संचालक मंडळाने सभासदांची सभा घेतली. त्या तीन कोटींच्या बदल्यात त्यांना काळे फासण्याची वल्गना करत असतील व काळ्या मातीत राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास ओढून घेण्यास सज्ज झाले असतील, त्यांनी आत्मपरीक्षण करावे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला गोड घास पळवत आहेत? त्यांना हा कारखाना सुरू व्हावा असे खरेच वाटते का? आता कारखाना येत्या १०-१५ दिवसांत काम सुरू होण्याची शक्यता असल्यामुळे विरोधकांचा श्रेय घेण्यासाठी आटापिटा सुरू आहे, असा आरोपही अध्यक्ष माधवराव पाटील यांनी केला.

# शिंदखेड्याचा दुष्काळी शिक्का पुसला जाईल

## आर. डी. वाघ : गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**मेथी (शिंदखेडा), ३ मे**

गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजना यशस्वी झाल्यास शिंदखेडा दुष्काळी तालुका म्हणून जो शिक्का आहे, तो पुसला जाईल. मतदारसंघाचे मंत्री जयकुमार रावल यांचे हेच स्वप्न आहे, असे मत गटविकास अधिकारी आर. डी. वाघ यांनी व्यक्त केले.



शिंदखेडा येथील पंचायत समितीच्या सभागृहात झालेल्या ग्रामविकास अधिकारी, सरपंच व संगणक परिचालकांच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार प्रशिक्षण कार्यशाळेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर साहाय्यक गटविकास अधिकारी रमेश नेतनराव, भारतीय जैन संघटनेचे विभागाध्यक्ष तथा जलप्रकल्पाचे जिल्हाप्रमुख प्रा. चंद्रकांत डागा, तालुका समन्वयक अशोक राखेचा, शहर सचिव लखीचंद बोथरा, विस्तार अधिकारी महेश सोनवणे, कपिल वाघ, जिल्हा समन्वयक अविनाश मराठे आदी उपस्थित होते.

वाघ म्हणाले की, वॉटर कन्झर्व्हेशनची आज गरज आहे. यासाठी जे जे करता येईल, ते ते केले पाहिजे, असे मंत्री रावल यांच्या सूचना आहेत. योजनेसाठी सहकार्य करण्याची तयारी असल्याचे सांगून योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रा. डागा यांनी भारतीय जैन संघटना व राज्य शासन यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी www.shiwaar.com या शासनाच्या संकेतस्थळावर गावाचा मागणी अर्ज डाउनलोड करून तो भरून भारतीय जैन संघटनेने तयार केलेल्या बीजेएस ॲपवर ऑनलाइन भरावा, तसेच बीजेएसच्या भित्तिपत्रकासह हस्तपत्रिकेवर अर्ज डाउनलोड करण्यासाठी व अपलोड करण्यासाठी क्यूआर कोडही दिला आहे. ही योजना पूर्णपणे शासकीय असून, पूर्ण राज्यात एक दर निश्चित करण्यात आला आहे. गाळ वाहून नेण्यासाठी अल्पभूधारक, अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, दिव्यांग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला शासनाकडून निश्चित दरानुसार अनुदानही दिले जाणार आहे. गाळ काढण्याच्या कामासाठी स्वयंसेवी संस्था न मिळाल्यास ग्रामपंचायत हे कार्य करू शकतील. भारतीय जैन संघटनेला यासाठी सुहाना स्पाइसेसचे सहकार्य मिळत आहे. योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

साहाय्यक गटविकास अधिकारी रमेश नेतनराव म्हणाले की, लहान लहान उपक्रमानेही दुर्भिक्ष्य गावे पाणीदार झाली आहेत. भारतीय जैन संघटनेने जे प्रचार-प्रसाराचे काम हाती घेतले आहे, त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे. योजना तालुक्यात प्रभावीपणे राबबावी, असे त्यांनी सांगितले. कार्यशाळेचा ६० जणांनी लाभ घेतला.

# श्रीमद् भागवत सप्ताहातच कथा श्रवणाचा आनंद

## वेदमूर्ती अविनाश जोशी महाराज : नंदुरबारला भाविकांची उपस्थिती

**नंदुरबार** : जीवन जगताना कुणीही सत्ता व संपत्तीचा अहंकार बाळगू नका. प्रत्येकाशी प्रेमाने वागल्यास तुमच्याबद्दल आपुलकी निर्माण होईल. जीवनात गोडवा वाढविण्यासाठी प्रेमाने वागणे महत्त्वाचे आहे. तसेच आपले जीवन सार्थकी लावण्यासाठी प्रत्येकाने भागवत कथा श्रवण गरजेचे असून, ते केवळ भागवत सप्ताहात आल्यावरच कथा श्रवणाचा आनंद मिळतो, असे वेदमूर्ती अविनाश जोशी महाराज यांनी सांगितले.



शहरातील जुन्या भोई गल्लीत (कै.) परशराम जयसिंग राजपूत व (कै.) पृथ्वीराज परशराम राजपूत यांच्या स्मरणार्थ श्रीमद् भागवत ज्ञान-यज्ञ कथा सप्ताह ५ मेपर्यंत सुरू आहे. रोज दुपारी ३ ते ६ या वेळेत वेदमूर्ती अविनाश जोशी महाराज हे कथेचे निरूपण करीत आहेत. या कथेतून वेदमूर्ती अविनाश जोशी महाराज यांनी सांगितले की, प्रत्येकाच्या मार्गी असलेले भोग कुणालाही सुटलेले नाहीत. जसे कर्म केले असतील, तसेच भोग याच युगात भोगावे लागतात. म्हणून आई-वडिलांसह वृद्धांना जिवंतपणी ज्याने पाणी पाजविले, खाऊ घातले, तीच खरी सेवा आहे. मृत्यूनंतर कितीही पूजा-अर्चा केली आणि नैवेद्य खाऊ घातले, ते काहीही उपयोगी नाही. संकटात असलेल्या व्यक्तीला वेळेवरच मदत करा, वेळ गेल्यानंतर केलेली मदत ही केवळ उपकाराची असते. संकटात जो मदत करतो, तोच खरा देव असतो. दान देताना समोरच्या व्यक्ती व पुजारींना उपयोगात येईल, असे दान करावे. जीवनात कधीही सत्ता व संपत्तीचा अहंकार बाळगू नका. अहंकाराने व्यवहार करू नका, बोलू नका आणि वागूही नका. अहंकार हा माणसाचा एक आपुलकी संपुष्टात आणणारा गुण आहे. म्हणून जीवन सार्थकी करायचे असेल तर प्रत्येकाशी प्रेमाने वागावे. जेणेकरून तुमच्याबद्दल प्रेमाने बोलतील आणि आपुलकीही वाढेल. जीवनात गोडवा हा व्यक्ती शेवटच्या क्षणी जेव्हा जगाचा निरोप घेतो, तेव्हा उपस्थित लोकांच्या डोळ्यांत अश्रू आल्यावर कळतो. म्हणून शेवटच्या क्षणी लोकांच्या डोळ्यांत आपल्याबद्दल अश्रू येत असतील तर ते खरे जगणे म्हणतात. आपल्या अंतःकरणात दया असेल, तर देवाचीही आपल्यावर कृपा होत असते. त्यासाठी देवाची भक्ती ही श्रीमद् भागवत कथेसारख्या सप्ताहात केली जाते. त्यामुळे कथा सप्ताहात आल्यावरच कथा श्रवणाचा खरा आनंद मिळतो, असेही वेदमूर्ती अविनाश महाराज जोशी यांनी सांगितले.

पद्माबाई परशराम राजपूत, सुमानसिंग परशराम राजपूत, बेबीबाई सुमानसिंग राजपूत, अविनाश रावसिंग पाटील, जयश्री अविनाश पाटील, स्वप्नील सुमानसिंग राजपूत यांच्या परिवारातर्फे कथा सप्ताह होत आहे.



# 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार'च्या कामांना नंदुरबारसह जिल्ह्यात वेग

**शहादा** : शासनाची महत्त्वाकांक्षी गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. ही योजना शेतजमीन सुपीक करणे आणि धरणातील साठा वाढवणे यासाठी उपयुक्त आहे. योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

तालुक्यातील लोंढरे येथे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते या कामाचा प्रारंभ झाला. या वेळी सिंचन विभागाचे अभियंता नीलेश पाटील, पाणी फाउंडेशनचे गुणवंत पाटील, गोपाल पाटील, टाटा मोटर्सच्या स्वाती पाटील, नाम फाउंडेशनचे जितेंद्र पाटील यांच्यासह सरपंच, शेतकरी आणि लाभार्थी उपस्थित होते.

हे काम राज्य शासन, नाम फाउंडेशन व टाटा मोटर्स यांच्यातर्फे गाळमुक्त धरण- गाळयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून करण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश तलावातील गाळ काढून जलसाठा वाढवणे आणि त्याचबरोबर सुपीक गाळ शेतकऱ्यांना शेतीसाठी उपलब्ध करणे हा आहे. यामुळे शेतकऱ्यांना कृषी उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन जलसंधारणासोबतच शेती सुपीक करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी केले आहे.

### शक्ती हनुमान परिवारातर्फे आज श्रद्धांजलीपर सभा

**नंदुरबार** : जम्मू-काश्मीरमधील पहलगामजवळील बैसरन घाटीत झालेल्या भ्याड हल्ल्यातील मृतांना सामूहिक श्रद्धांजलीपर सभा शक्ती हनुमान परिवारातर्फे रविवारी (४ मे) सकाळी साडेअकराला शहरातील वाघोदा रस्त्यावरील सी. बी. गार्डनशेजारील लाल बहादूर शास्त्रीनगर भागात होणार आहे. भागवत कथाकार रवींद्र पाठक, प्रा. ज्ञानेश्वर गवळे उपस्थित राहणार आहेत. श्रद्धांजलीपूर्वी होम हवन कार्यक्रम नाथ वास्तू ज्योतिष पंडित विवेक कुलकर्णी यांच्या सहकार्यातून करण्यात येणार आहे. नंदुरबारकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सुरेश बारकू भोई यांनी केले आहे.

# नंदुरबारमध्ये भीमगीत गायनासह प्रबोधनात्मक कार्यक्रम

## समता युवा मंचतर्फे राज्यस्तरीय समताभूषण पुरस्कार वितरण उत्साहात

**नंदुरबार** : येथील नाका परिसरातील समता युवा मंचच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले संयुक्त जयंती उत्सव समितीतर्फे कोरीट नाका परिसरात प्लेबॅक सिंगर रॉकस्टार राहुल साठे यांचा भीम-बुद्ध गीत गायनासह प्रबोधनात्मक कार्यक्रम उत्साहात झाला.



माजी खासदार डॉ. हिना गावित अध्यक्षस्थानी होत्या. त्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या वेळी डॉ. यशपाल जावरे, आरपीआयचे जिल्हा सरचिटणीस राम साळुंके, नंदुरबार पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जयवंत उगले, नवापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी नंदकिशोर बाविस्कर, चंद्रकांत नगराळे, प्रा. दीपक जयस्वाल, स्वरूप बोरसे, जीवन पाटील, श्रीकांत पवार उपस्थित होते.

माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्या हस्ते राज्यस्तरीय समतारत्न व समता भूषण पुरस्कारांचे वितरण मान्यवरांना करण्यात आले. नवापूरचे माजी नगराध्यक्ष नंदूभाऊ गावित, शहाद्याचे माजी नगरसेवक जितेंद्र जमदाडे, प्रशांत निकुंबे यांना सामाजिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल, शैक्षणिक क्षेत्रातील प्रा. छाया बच्छाव, वैद्यकीय क्षेत्रातील नःस्वार्थ सामाजिक कार्याबद्दल डॉ. पंकज पाटील, पत्रकारिता क्षेत्रातील अविनाश भामरे यांना समतारत्न पुरस्काराने तथा सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रातील गौरवास्पद कार्यासाठी युवा नेतृत्व डॉ. विक्रांत मोरे यांचा राज्यस्तरीय समतारत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या वेळी नंदकिशोर बाविस्कर, ॲड. प्रेमानंद बैसाने, गौरव माळी यांचा विशेष सत्कार समितीतर्फे सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला. रोशनी शिरसाठ यांनी सूत्रसंचालन केले. भीमगीत गायनास हजारो आंबेडकरी माता-भगिनी अनुयायी उपस्थित होते. यशस्वितेसाठी नंदुरबार आरपीआय (आठवले गट)चे युवक जिल्हाध्यक्ष सुभाष पानपाटील, ॲड. प्रवीण वाघ, समितीचे अध्यक्ष जवाहर पवार, महेंद्र बाविस्कर, सचिन पिंपळे, विवेक शिरसाट, अनमोल बाविस्कर, गौतम पानपाटील, सिद्धार्थ साळुंके, सौरव साळुंके, रूपेश बत्तिसे, राहुल रामराजे, मनीष बिरारी, पिंटू इंदवे आदींनी सहकार्य केले.

# दोंडाईचा येथे हस्ती ग्रुपतर्फे कांतिलाल जैन यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**दोंडाईचा (शिंदखेडा)** : येथील दाऊळ शिवारातील हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुलमध्ये शुक्रवारी (२ मे) मानवमित्र, खान्देशरत्न (स्व.) काकाजी कांतिलाल हस्तीमल जैन यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम झाला.



सुरुवातीला (स्व.) काकाजी कांतिलाल जैन यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. याप्रसंगी हस्ती पब्लिक स्कूलचे प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, हस्ती वर्ल्ड स्कूलचे प्राचार्य जीवन सपकाळे, हस्ती गुरुकुलचे मुख्याध्यापक सदाशिव महाजन, उपप्राचार्या रझिया दाऊदी, समन्वयक मनोज ठाकूर, समिना बोहरी व पूनम गुरबाणी आदी उपस्थित होते.

मुख्याध्यापक महाजन यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ शिक्षक सुरेंद्र खंडारे यांनी (स्व.) काकाजी कांतिलाल जैन यांच्या कार्याला उजाळा दिला. ते म्हणाले की, मानवमित्र खान्देशरत्न (स्व.) काकाजी यांनी हस्ती बँकेच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी कार्य करून समाजसेवा केली. सोबतच युवकांना रोजगार उभारणीस साहाय्य केले. गरिबांचे कैवारी म्हणून ते लोकप्रिय होते, असे नमूद केले. विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आदरांजली अर्पण केली.

# विद्यार्थ्यांकडून प्रयोगात्मक, तंत्रज्ञानात्मक प्रात्यक्षिक क्षेत्रांचा अभ्यास

## नंदुरबार येथील श्रॉफ हायस्कूलमधील अटल टिंकरिंग लॅबमध्ये एटीएल कम्युनिटी दिनानिमित्त कार्यक्रम

**नंदुरबार** : येथील हि. गो. श्रॉफ हायस्कूलमधील नीती आयोगाच्या अटल टिंकरिंग लॅबमध्ये 'एटीएल कम्युनिटी दिन' उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विविध प्रयोगात्मक व तंत्रज्ञानात्मक प्रात्यक्षिक क्षेत्रांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास केला.



केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या निर्देशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त देशभरातील अटल टिंकरिंग लॅब्समध्ये एप्रिलमध्ये हा दिवस साजरा केला जातो. प्राचार्या सुषमा शाह व अभिनव विद्यालयाचे मुख्याध्यापक तारकेश्वर पटेल यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांसाठी विविध तंत्रज्ञानावर आधारित प्रयोगात्मक सत्र घेण्यात आले. समिधा देवरे हिचा 'यंग इनोव्हेटर अवॉर्ड' मिळवल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. तिला प्रा. नितीन देवरे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्या सुषमा शाह यांनी सांगितले की, अटल टिंकरिंग लॅब विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष, संशोधन वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. विद्यार्थ्यांनी २१ व्या शतकातील आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी या संधीचा योग्य उपयोग करावा.

मुख्याध्यापक तारकेश्वर पटेल यांनी कार्यशाळेतील सहभागाचे महत्त्व पटवून दिले. कार्यशाळेत शहरातील डी. आर. हायस्कूल, अभिनव विद्यालय, चावरा इंग्लिश मीडियम स्कूल, अहिंसा इंटरनॅशनल स्कूल, पोदार इंटरनॅशनल स्कूल आणि हि. गो. श्रॉफ हायस्कूल मिळून ७० विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

समारोपप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी उपमुख्याध्यापक राजेश शाह, पर्यवेक्षक भिकू त्रिवेदी, पर्यवेक्षिका सीमा पाटील तसेच भूषण मिस्तरी, संतोष पाडवी, आशा पटेल, राजेंद्र पाटील आदी उपस्थित होते. अटल टिंकरिंग लॅबचे प्रमुख राजेंद्र मराठे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी महेंद्र सोमवंशी, हेमंत पाटील, मृणाल देवकर, उदांशू भोपे, नंदू माळी, महादू गवळी आदी सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

### प्रयोगात्मक सत्रांचे ठळक आकर्षण

'आय कॅन मेक इलेक्ट्रॉन मूव्ह' सत्रात राजेंद्र मराठे यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी पेपर सर्किटचा वापर करून आकर्षक ग्रीटिंग कार्ड तयार केली. 'कॅन वी बिल्ड इट' सत्रात सुनील गिरासे यांच्या मदतीने वर्तमानपत्रांपासून स्थिर व मजबूत पूल तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. 'अल्केमी फन' सत्रात महेश पाटील यांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी रासायनिक ऊर्जेचे वीज ऊर्जेत रूपांतर करून एलईडी दिवे प्रज्वलित केली. 'फास्ट अँड क्युरियस' सत्रात विवेक राजपूत व नरेंद्र सूर्यवंशी यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी बलून कार तयार करून शर्यत आयोजित केली.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### रायसोनी शाळेत उन्हाळी क्रीडा शिबिराचा समारोप

**जळगाव :** शहरातील बी. यू. एन. रायसोनी विद्यालय आयोजित उन्हाळी क्रीडा शिबिराचा समारोप झाला. अध्यक्षस्थानी महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश जाधव तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य क्रीडा मार्गदर्शक चंचल माळी, जिल्हा महिला शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाच्या अध्यक्षा तथा पी. के. गुळवे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कांचन नारखेडे, सहज ध्यान योग केंद्राचे सचिन पिंगळे, अनिल रडे, दिनकर फेगडे उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत मुख्याध्यापक चंद्रशेखर पाटील यांनी केले. शिबिरार्थी विद्यार्थ्यांना शाळेचे अध्यक्ष शिरीष रायसोनी यांनी शुभेच्छा दिल्या. २० दिवसीय क्रीडा शिबिरात उत्तेजित व्यायाम प्रकार, पूरक खेळ, सर्वांगसुंदर व्यायाम प्रकार व विविध खेळांचा समावेश होता शिबिरप्रमुख योगेश सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. तर विश्वास जाधव यांनी आभार मानले. या प्रसंगी शिबिरार्थींनी मल्लखांब व रोप मल्लखांबचे प्रात्यक्षिक सादर केले. शिबिरार्थींना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी प्रशिक्षक धनराज भोई, दिव्या सोनार, प्रणव गडे, आकाश पाटील शिबिरार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.



### धरणगाव मुख्याधिकाऱ्यांचा शिवसेनेतर्फे सन्मान

**धरणगाव :** येथील पालिकेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर यांनी प्रशासकीय कामात कोणत्याही प्रकारची तडजोड न करता, कामे करीत असल्याबद्दल शिवसेनेच्या उबाठा गटातर्फे त्यांचा भगवी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख गुलाबराव वाघ, माजी नगराध्यक्ष नीलेश चौधरी, शहरप्रमुख भागवत चौधरी, जिल्हा संघटक राजेंद्र ठाकरे, युवासेना शहरप्रमुख लक्ष्मण महाजन, रमेश चव्हाण, रणजित सिकरवार, भीमराव धनगर, विनोद रोकडे आदी उपस्थित होते.

### ललित कला भवनात ध्वजवंदन

**जळगाव :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ संचलित जळगाव येथील ललित कला भवनात कामगार दिन व महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन करण्यात आले. कामगार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा विश्वकर्मा वीज कामगार पतसंस्थेचे चेअरमन मोहन गारुंगे यांनी ध्वजवंदन केले. प्रा. रवींद्र नेटके यांचे व्याख्यान झाले, तर मराठी राजभाषा दिन यावर गुणवंत कामगार किशोर तळेले यांनी व्याख्यान दिले. प्रास्ताविक कामगार कल्याण अधिकारी सत्यजित चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन कल्याण निरीक्षक भानुदास जोशी यांनी केले. या वेळी राहुल कुलकर्णी, श्यामकांत जगताप, अनंत शिंदे, भावेश गंगावणे, सुधाकर माळी, शिवदास शिंपी, प्रवीण चव्हाण, भागवत बारी, योगेश कदम, हिरालाल चौधरी, भावना कदम, अभय गारुंगे, नरेश पाटील, योगेश कुलकर्णी, प्रशांत देवरे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी शोभा बडगुजर, रती कुलकर्णी, सुनील मोरे यांनी परिश्रम घेतले.

### जिल्ह्यातील दुय्यम निबंधक कार्यालयात आता 'एक जिल्हा-एक नोंदणी' योजना कार्यान्वित

**जळगाव :** राज्य शासनाच्या 'एक जिल्हा-एक नोंदणी' या नव्या योजनेची अंमलबजावणी जिल्ह्यात १ मे पासून सुरू झाली आहे. या योजनेनुसार जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक (वर्ग-१ व वर्ग-२) कार्यालयांचे दस्तऐवज नोंदणीचे कार्यक्षेत्र आता सामाईक करण्यात आले आहे. 'एक जिल्हा-एक नोंदणी' योजनेंतर्गत कोणत्याही तालुक्यातील मालमत्ता अर्थात भूखंड, शेती, तयार घरे आदींची खरेदी-विक्री, हक्कसोड तसेच अन्य नोंदणी व्यवहार आता जिल्ह्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात करता येणार आहेत. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या सोयीच्या ठिकाणी दस्तऐवज नोंदणीची सुविधा उपलब्ध झाली आहे. यासंदर्भात राज्य शासनाने अधिसूचना जारी केली असून, त्याची अंमलबजावणी १ मेपासून करण्यात आली असल्याचे जळगावचे सहजिल्हा निबंधक (वर्ग-१) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी सुनील पाटील यांनी म्हटले आहे.

### बाहेती शाळेत महाराष्ट्रदिनी गुणपत्रके वाटप

**जळगाव :** येथील जानकीबाई आनंदरामजी बाहेती विद्यालयात गुरुवारी (१ मे) महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्याध्यापक पी. आर. जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या अभ्यासाचे फलित म्हणून व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे केलेले मूल्यमापन याद्वारे निकाल घोषित करण्यात आला व विद्यार्थ्यांना गुणपत्रके वाटण्यात आली. आपला निकाल पाहून विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलले होते. या प्रसंगी शिक्षक एन. एम. चौधरी, टी. एस. माळी, पी. एम. पवार, के. एच. पाटील, डी. जी. पाटील, सुनीता महाजन, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सुनीता सिमाले तसेच चारुशीला सोनार, मोहिनी भंगाळे, रत्नमाला मालपुरे, चेतना महाजन, मोनाली जाधव आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ए. एल. बोरोले, आनंद महांगडे, चंद्रकांत वाघ, दीपक बोरोले उपस्थित होते.

### ध्वनी चित्रतरंग सांस्कृतिक कार्यक्रम आज

**जळगाव :** भारत सरकारच्या वतीने 'वेळ २०२५' या जागतिक ध्वनी दृश्य करमणूक विषयावर एक परिषद आयोजित केली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारच्या वतीने ध्वनी चित्रतरंग हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'परिवर्तन जळगाव'मार्फत जळगाव येथे आयोजित केला आहे. भारतीय संस्कृतीत कलेचं असाधारण महत्त्व आहे. नव्या जगात सर्व नवीन तंत्रज्ञान स्वीकारून भारतीय कलांनी जागतिक स्तरावरती आपल्या कलेचा ठसा उमटवला आहे. या सर्व बाबींचा शोध घेणारा दृकश्राव्य माध्यम तसेच सांस्कृतिक माध्यम यामधून एक सुंदर कार्यक्रम जळगाव येथे होणार आहे. हा कार्यक्रम रविवारी (४ मे) सायंकाळी साडेसहा वाजता गंधे सभागृहात होईल. पालकमंत्री गुलाबराव पाटील उद्घाटन करतील. आमदार सुरेश भोळे, आमदार चंद्रकांत सोनवणे व जिल्हाधिकारी आयुष प्रसाद प्रमुख अतिथी असतील. हा कार्यक्रम सर्व रसिकांसाठी खुला आहे. रसिकांनी कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्याचे अपर मुख्य सचिव विलास खर्गे व सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे तसेच 'परिवर्तन'चे नारायण बाविस्कर, हर्षल पाटील, मंजुषा भिडे यांनी केले आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Contractors/Vendors of MSETCL **RFx.7000036251** SRM **E-tender No.** EE/EHV/(O&M)/DN/JLG/T-1/2025-26, **Particulars of Work:** Work of measurement of tower footing resistance of 220/132KV Lines S/C & D/C under jurisdiction of under EHV O&M Division, Jalgaon. **Estimated cost of work:** Rs. 7,40,393/- **E.M.D. (1% of Est. cost) :** Rs.7403.93/-, **Tender Fees:** Rs. 590/-, **Sale period:** 03.05.2025 to 18.05.2025, **Last Date of Submission:** 18.05.2025 upto 11:00 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 18.05.2025 at 11:00 Hrs. (If possible),**Contact person**: Addl. Executive Engineer (Office) Tel. No.7768001155, 7768001165. For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in.**

**Note**:- All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New)portal of MSETCL.

**Executive Engineer, EHV (O&M) Division, MSETCL, Jalgaon.**

# अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा असलेले पहिले उपचार केंद्र

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमआरआय मशीनच्या लोकार्पणप्रसंगी पालकमंत्र्यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

येथील शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात विविध उपचारांसाठी जिल्हा वार्षिक नियोजनाच्या निधीतून अत्याधुनिक यंत्रसामग्री घेतली असून, आज अद्ययावत एमआरआय मशीनचे लोकार्पण झाल्यामुळे एवढ्या सुविधा असलेले हे राज्यातील पहिले केंद्र ठरले असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

केंद्र व राज्य शासनाच्या ईडब्ल्यूएस योजनेंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात अत्याधुनिक थ्री टी एमआरआय मशीनचे लोकार्पण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते तसेच राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

या वेळी पालकमंत्री पाटील म्हणाले की, अत्यंत आधुनिक वैद्यकीय सुविधायुक्त असलेले जळगावचे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय राज्यातील पहिलेच रुग्णालय आहे. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत शेकडो नवजात बालकांना जीवनदान देणारी मिल्क बँक, मूतखड्यांसारख्या वेदनादायक आजारांवर मात करणारी लेझर मशीन यांसह अनेक अद्ययावत साधने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. शनिवारी (३ मे) एमआरआय मशीन कार्यान्वित झाले असून, लवकरच सीटी स्कॅन मशीनही बसवण्यात येणार असल्याचेही पालकमंत्री पाटील यांनी सांगितले.

एमआरआय करताना धातुरहित सुती कपडे परिधान करावेत. कोणतीही धातूची वस्तू अंगावर नसावी. पूर्वीच्या सर्व तपासणी अहवालांची फाईल सोबत आणावी. पेसमेकर, कॉक्लीअर इम्प्लांट, धातूचे इम्प्लांट असलेल्या रुग्णांनी डॉक्टरांचे लिखित प्रमाणपत्र सोबत आणणे आवश्यक आहे. ही तपासणी पूर्वनियोजित वेळेनुसार होणार असून, तपासणीसाठी शासनाकडून निर्धारित असलेले शुल्क आकारले जाईल. आज शनिवारी (३ मे) ही सेवा कार्यान्वित झाल्यामुळे जळगाव व परिसरातील नागरिकांनी याचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहनही डॉ. गिरीश ठाकूर यांनी केले आहे.

### मंत्रीद्वयांकडून एमआरआय मशीनची पाहणी

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयातील अत्याधुनिक थ्री टी एमआरआय मशीनचे होत असलेले कार्य, त्यातील नव्या तंत्रज्ञानाचे स्वरूप, दररोज तपासण्यात येणारी रुग्णसंख्या आदी माहिती पालकमंत्री पाटील व जलसंपदा मंत्री महाजन यांनी सामान्यांच्या दृष्टिकोनातून जाणून घेतली.

### देशातील पहिले मेडिकल हब जळगावमध्ये कार्यान्वित

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयासाठी अत्याधुनिक थ्री टी एमआरआय कार्यान्वित करण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात मानवी अवयव प्रत्यारोपण वगळता सर्व शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. वैद्यकीय महाविद्यालय, दंत महाविद्यालय, आयुर्वेदिक महाविद्यालय, होमिओपॅथी महाविद्यालय व रुग्णालय, असे सर्व समाविष्ट असलेले देशातील पहिले मेडिकल हब जळगावमध्ये साकारले जात आहे.

**- गिरीश महाजन, जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री**



थ्री टी एमआरआय यंत्रणा मॅग्नेटिक रेसोनन्स इमेजिंग (एमआरआय) तंत्रज्ञानावर आधारित असून ती शरीरातील अंतर्गत अवयवांची अति सुस्पष्ट प्रतिमा निर्माण करते. मेंदू, मज्जासंस्था, हृदय, सांधे, कर्करोग निदान, पचनसंस्था आणि प्रजननसंस्थेतील तपासण्यांसाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरते. यातून कोणतेही किरणोत्सर्ग होत नसल्याने ही चाचणी सुरक्षित आहे.

**डॉ. गिरीश ठाकूर,**
**- अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव.**

**यांची होती उपस्थिती**

या वेळी खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. अजय चंदनवाले, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. गिरीश ठाकूर आदी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**



जोपर्यंत माहेरहून पैसे आणत नाहीस, तोपर्यंत तुला मारत राहू, तुला सोडणार नाही, अशी धमकी देत २६ वर्षीय विवाहितेचा छळ करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी किनोद येथील पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गायत्री ज्ञानेश्वर कोळी (वय २६) हिचा विवाह किनोद (ता. जळगाव) येथील ज्ञानेश्वर भास्कर कोळी यांच्याशी झाला होता. २ डिसेंबर २०२४ ते १ मे २०२५ पर्यंत सासरी किनोद येथे पतीसह इतर सासरच्या मंडळींनी विवाहिता गायत्री हिच्याकडे माहेरहून पैसे घेऊन येण्याची सतत मागणी केली. जोपर्यंत माहेरहून पैसे आणत नाही, तोपर्यंत तुला मारत राहू, तुला सोडणार नाही, अशी धमकी दिली. छळ करून त्रास दिला. तसेच आत्महत्येस प्रवृत्त केले, अशी तक्रार प्रियंका दिनेश कोळी (वय २७, रा. शेरी, ता. धरणगाव) यांनी दिली. त्यानुसार शुक्रवारी तालुका पोलीस ठाण्यात विवाहितेचा पती ज्ञानेश्वर कोळी, सासरे भास्कर कोळी, सासू मालूबाई कोळी, नणंद अर्चना कोळी (सर्व रा. किनोद), वंदना कोळी (रा. नांद्रा बुद्रूक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक अमोल पवार तपास करीत आहेत.

# घातक रूढी-परंपरांना छेद देण्यासाठी दशनाम गोसावी संस्थेची स्थापना

### सभेत विविधांगी चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, ३ मे**

भुसावळ परिसरातील तसेच जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील दशनाम गोसावी गिरी, पुरी, भारती, सरस्वती, पर्वत, सागर, आरण्य, बन, तीर्थ आणि आश्रम या दशनाम गोसावी समाजातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच समाजात समाजाच्या विकासाला घातक ठरणाऱ्या ज्या रूढी-परंपरा आहेत, त्यांना छेद देण्याच्या दृष्टीने भुसावळ येथे दशनाम गोसावी बहुउद्देशीय संस्थेची स्थापना करण्यात आली.

ही संस्था २०१४ पासून कार्यरत आहे. परिसरातील तसेच जिल्ह्यातील दशनाम गोसावी समाजाच्या काही समस्या असतील तर त्या जाणून घेणे, निराकरण करणे, योग्य तो न्यायनिर्वाळा करणे, समाजाच्या मदतीला धावून जाणे हे कार्य



कार्यकारी मंडळामार्फत केले जात आहे. शनिवारी (३ मे) भुसावळ येथील मोरया मंगल कार्यालयात सकाळी दशनाम गोसावी बहुद्देशीय संस्थेची सर्वसाधारण सभा झाली.

दशनाम गोसावी समाजाचे आद्यगुरू शंकराचार्य यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन विजय गोसावी, सुरेश गोस्वामी यांच्या हस्ते करून महाआरती घेण्यात आली. त्यानंतर जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथे बळी पडलेल्या भारतीयांना श्रद्धांजली देऊन सभेला सुरुवात झाली. त्यात मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

या सभेस तत्कालीन अध्यक्ष डॉ. ए. डी. गोस्वामी, सचिव संजय गोसावी, राकेश गोसावी, देविदास गोसावी, देवचंद गोसावी, योगेश गोसावी, राहुल गोसावी, उर्वशी गोसावी, शिवराम गोसावी, विजय गोसावी, रवींद्र गोसावी, प्रशांत गिरी, उदय गोसावी, किशोर गोसावी, गणेश गोसावी, सचिन गोसावी आदी कार्यकारिणीचे सदस्य आणि समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित होते.

### सामाजिक समस्यांवर चर्चा

एप्रिल २०२५ पर्यंत संस्थेच्या झालेल्या खर्चास मंजुरी देण्यात आली. दशनाम गोसावी समाजातील सामाजिक समस्यांवर चर्चा करण्यात आली. या चर्चेत सर्वांनी भाग घेतला. समाजातील वाईट रूढी-परंपरा नष्ट करणे, विवाह सोहळ्यात खर्च कमी करणे, विवाह वेळेवर लावणे यावर चर्चा करण्यात आली. हे सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. त्यानंतर २०२४ ते २०२९ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणीच्या निवडीसंदर्भात प्रवीण गोसावी यांनी असे सुचविले की, कार्यकारिणीची निवड न करता जुलै महिन्यात समाजाचा मोठा कार्यक्रम घेण्यात यावा, त्यात विशेष प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव, समाजातील पदोन्नती झालेल्या नागरिकांचा सत्कार समारंभ आयोजित करावा, त्यात नवीन कार्यकारिणी निवडावी, या मताला सर्वांनी मंजुरी दिली.

# शासनाकडून मदत तालुकास्तरावर पोहचली

## पण...ई-केवायसी होऊनही अतिवृष्टी अनुदान लाभ मिळेना

**जळगाव :** जिल्ह्यात गेल्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात बेमोसमी गारपीटसह पाऊस, मॉन्सूनकाळात अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टरवरील शेतपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. याचे शासन स्तरावरून पंचनामे झाले. मदत अनुदान जिल्हा व तालुकास्तरावर वितरितही झाले.

शासन निर्णय निकषानुसार लाभार्थी शेतकऱ्यांनी ई-केवायसीदेखील केले असले तरी अजूनही बऱ्याच शेतकऱ्यांच्या बँक खात्यांवर नुकसान भरपाई अनुदान रक्कम जमा झालेली नाही. परिणामी शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना' अशी अवस्था शेतकऱ्यांची झालेली दिसून येत आहे.

जिल्ह्यात जानेवारी ते मे २०२४ दरम्यान बेमोसमी पावसामुळे ५५ हजार ७१६ शेतकऱ्यांच्या ३२,३५५ हेक्टर क्षेत्रावरील शेतपिकांचे नुकसान झाले होते. जून ते ऑक्टोबर तसेच डिसेंबर दरम्यान अतिवृष्टीमुळे वेचणीला आलेला कापूस, कापणी वा काढणीस आलेल्या हजारो हेक्टरवरील ज्वारी, बाजरी, उडीद, मूग आदी शेतपिकांचे अतोनात नुकसान झाले होते.

१ लाख ६३ हजार २३३ शेतकऱ्यांच्या एक लाख २० हजार ७२२ हेक्टर १४ आर क्षेत्रावरील शेतपिकांचे नुकसान झाले होते. तसेच १४३ शेतकऱ्यांची २७ हेक्टर ४९ आर जमीन पावसामुळे वाहून गेल्याने नुकसानीचे पंचनामे करून अहवाल शासनास सादर करण्याचे पालकमंत्री, तत्कालीन मदत व आपत्ती व्यवस्थापन मंत्री यांनी निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा कृषी व महसूल प्रशासनाकडून पंचनामे करण्यात येऊन शासनाकडे अनुदानाची मागणी नोंदविण्यात आली होती. त्यानुसार अतिवृष्टी पंचनाम्यानुसार शासनस्तरावरून जिल्ह्यात जानेवारी ते डिसेंबर दरम्यान २६४ कोटी चार लाख ९८ हजार रुपये नुकसान भरपाई मदत अनुदान मंजूर करून वितरित करण्यात आले. या नुकसान भरपाईनुसार दोन लाख १९ हजार ६९२ शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत फक्त ७६ हजार ७४१ शेतकऱ्यांचे लॉगीन करण्यात आले आहे. यात १११ कोटी ६५ लाख ६४ हजार ११२ रुपये अनुदान रक्कम आहे. यापैकी फक्त केवायसी करण्यात आलेल्या ४५ हजार ७४१ शेतकऱ्यांच्या संबंधित बँक खात्यावर ७३ कोटी १४ लाख २९ हजार ८९६ रुपये अनुदान वितरण झाले आहे. तर २६ हजार ९०९ लाभार्थी पात्र शेतकऱ्यांचे ईकेवायसी नसल्याने ३२ कोटी २३ लाख २४ हजार ६२० रुपये अजूनही केवायसी अभावी बँक तिजोरीत पडून होते.

यानंतर आतापर्यंत हजारो शेतकऱ्यांनी आपले सरकार सीएसी केंद्रावर जाऊन विशिष्ट क्रमांकानुसार ई-केवायसी केली. एप्रिल महिना संपण्यात आला, परंतु अजूनही बहुतांश शेतकऱ्यांच्या संबंधित बँक खात्यावर नुकसान भरपाईचे अनुदान आलेले नाही. बरेचसे शेतकरी ई-केवायसी आपले सरकार केंद्र, तलाठी, तहसीलदार कार्यालय तसेच बँकेत जाऊन वारंवार मदत अनुदानासाठी विचारणा करीत आहेत.

# परशुराम जयंतीनिमित्त जामनेरात 'अमृत'च्या योजनांची दिली माहिती

**तभा वृत्तसेवा**
**जामनेर, ३ मे**

येथे परशुराम जयंतीनिमित्त आयोजित समारंभात 'अमृत'च्या योजनांची माहिती जिल्हा व्यवस्थापक राजेंद्र कानडे यांनी दिली.

या वेळी माजी नगरसेवक डॉ. प्रशांत भोंडे, जितेंद्र पाटील, आतिष झाल्टे, दीपक तायडे, राजू देशपांडे, मोहन सारस्वत, प्रकाश शर्मा आदींनी श्री परशुराम भगवान यांची पूजा करून आरती केली.

या वेळी 'अमृत'चे जिल्हा व्यवस्थापक राजेंद्र कानडे यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'अमृत'च्या विविध योजनांची माहिती दिली. त्यात १२ टक्के वैयक्तिक व्याज परतावा, आयजेटीआर, अमृत साक्षरता, अमृत कलश, अमृत इंक्युबेशन, एमपीएससी, यूपीएससी, अमृत सूर्यमित्र प्रशिक्षण, अमृत बेकरी प्रशिक्षण, टायपिंग, स्टेनो टायपिंग यासह अनेक योजनांची सविस्तर माहिती दिली.



यावर्षी परशुराम भगवान यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने रांगोळी स्पर्धा व निबंध स्पर्धा आयोजित केल्या आहेत. त्याचीही माहिती यावेळी देण्यात आली. यात सहभागी होणाऱ्या परीक्षार्थींना वेगवेगळ्या विषयांवर निबंध लिहायचे व रांगोळ्या काढायच्या आहेत, असे निवेदन 'अमृत'च्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले.

या वर्षी डीजेला फाटा देऊन लेझिम, टाळ, मृदुंग वाजवून परशुराम भगवान यांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. यात अनेक समाजबांधव, महिला, युवक-युवतींचा सहभाग होता. शेवटी 'अमृत'च्या माहिती चित्रकांचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

# चाळीसगावात नाकाबंदीदरम्यान तपासणीत कारमधून गांजा जप्त

## कारसह २५ लाखांच्या मुद्देमालासह मालेगावातील संशयिताला अटक

**जळगाव :** चाळीसगाव शहर पोलिसांनी नाकाबंदीदरम्यान वाहनातून तब्बल २५ लाखांचा गांजा जप्त करीत मालेगावातील संशयित तरुणाला अटक केली. संशयिताची कारही जप्त करण्यात आली.

शेख नदिम शेख बशीर (वय ४०, गुलवानी खालदा, गल्ली नं. ३, मालेगाव, जि. नाशिक) असे अटकेतील संशयिताचे नाव आहे. चाळीसगाव शहर पोलीस बुधवारी पहाटे गस्तीवर असताना मालेगाव रस्त्यावरील धुळे ते छत्रपती संभाजीनगर बाह्यवळण चौफुलीवर वाहनांची तपासणी करीत होते. गस्तीवर कारची (एमएच १२, केएन २३०५) तपासणी केली असता, डिक्कीत निळ्या रंगाच्या चार प्लास्टिक पिशव्यांत गांजासारखा उग्र वास असलेला पदार्थ मिळून आला. पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी तपासणी केली असता, तो गांजा असल्याचे स्पष्ट झाले. तब्बल गांजाचे वजन ४२ किलो ५८३ ग्रॅम असून, त्याचे अंदाजित बाजारमूल्य २४ लाख ६९ हजार १५० रुपये आहे. गांजा वाहतुकीसाठी वापरलेली कारही जप्त करण्यात आली. संशयिताविरुद्ध चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, उपअधीक्षक राजेश चंदेल यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, उपनिरीक्षक संदीप घुले, योगेश माळी, कैलास पाटील, अरुण बाविस्कर, पोलीस हवालदार राहुल सोनवणे, विनोद पाटील, योगेश बेलदार, अजय पाटील, पोलीस नाईक भूषण पाटील, राकेश पाटील, नितीन आगवणे, महेंद्र पाटील, नरेंद्र चौधरी, अमोल भोसले, नीलेश पाटील, नाना बच्चे, आशुतोष सोनवणे, विजू पाटील, राकेश महाजन, समाधान पाटील, दीपक चौधरी, पवन पाटील, महिला पोलीस शिपाई सबा शेख आदींच्या पथकाने केली.

# जि.प.च्या प्राथ. शाळांमध्ये ७१ विद्यार्थ्यांचे मधुमेहपूर्व निदान

## जूनमध्ये होणार विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी - मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची मधुमेहपूर्व आरोग्य तपासणी करण्यात आली. दरम्यान धरणगाव तालुक्यातील पिंप्री येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आणि कन्या शाळांमधील ७१ विद्यार्थी प्री-डायबेटिक अर्थात मधुमेहपूर्व आढळून आले आहेत. आगामी जून महिन्यात शाळा सुरू झाल्यानंतर शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या दालनात पत्रकार परिषद घेण्यात आली. या वेळी करनवाल यांनी सांगितले की, धरणगाव तालुक्यात पिंप्री येथील







जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा आणि कन्या शाळेतील पहिली ते चौथीच्या वर्गातील २४२ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान ७१ विद्यार्थी हे प्री-डायबेटिक अर्थात मधुमेहपूर्व असल्याचे आढळून आले आहे. आरोग्याच्या दृष्टिकोनातून ही घटना गंभीर असून जिल्हा परिषदेने यासंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

धरणगाव तालुक्यातील पिंप्री येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र क्षेत्रात शाळा सुरू झाल्यानंतर जून महिन्यात शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. व्हिल्स ग्लोबल फाउंडेशन या संस्थेसमवेत करार करण्यात येऊन ही आरोग्य मोहीम राबविण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी जंकफूडपासून दूर राहण्यासाठी आहार बदलासंदर्भात जनजागृती करावी लागणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल यांनी या वेळी सांगितले.

विद्यार्थ्यांना आहारात जंकफूड, ब्रेड, चपातीऐवजी ज्वारी, बाजरी, नाचणी आदी भाकरी आणि फायबर असलेले पदार्थ घरच्या नियमित आहारात देण्यासाठी पालकांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांच्या आहारात बदल केल्यास प्री-डायबेटिक संकटातून निश्चितपणे ते बाहेर पडतील असा विश्वासही मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल यांनी या वेळी व्यक्त केला. नाशिक, नंदुरबार आदी जिल्ह्यांमध्येदेखील विद्यार्थ्यांच्या आहार बदलांसंदर्भात जनजागृती करण्यात येऊन प्रभावी अंमलबजावणी झाल्याने याचे आहार बदलानुसार चांगले परिणाम दिसून आल्याचेही मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल यांनी सांगितले.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : ०४/०५/२०२५ **वार** : रविवार **शके** : १९४७
**अयन** : उत्तर **ऋतू** : ग्रीष्म **मास** : वैशाख **पक्ष** : शुक्ल **महिना** : मे
**संवत** : २०८१ **अयनांश** : २४-१२-४१ **तिथी** : सप्तमी **नक्षत्र** : पुष्य
**योग** : गंड **करण** : वणिज **सूर्योदय** : ६-१० **सूर्यास्त** : १९-०१
**चंद्रराशी प्रवेश** : कर्क **शुभाशुभ** : सकाळी ७ नंतर अशुभ

**दैनिक राशीभविष्य**

**मेष** : मातृचे बोल अनमोल ठरतील.
**वृषभ** : नवीन कामाच्या संधी प्राप्त होतील.
**मिथून** : आर्थिक व्यवहार सांभाळून करावे.
**कर्क** : कार्य करताना शारीरिक दुखापतीची शक्यता.
**सिंह** : स्वत:चे निर्णय स्वत: घ्यावेत.
**कन्या** : शेतकरी वर्गास उत्तम दिवस.
**तुला** : वडिलांसोबत रहाल.
**वृश्चिक** : वास्तू खरेदीचे योग आहेत.
**धनू** : शारीरिक अस्वस्थता जाणवू लागेल.
**मकर** : ऐकावे सर्वांचे करावे मनाचे.
**कुंभ** : पडण्याचा धोका संभवनीय.
**मीन** : मुलांना वाहन चालवायला देऊ नका.
**विशेष** : पिंपळाचे पूजन किंवा नमस्कार करावा.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु. पो. रावेर, जि. जळगाव मोबा. ९८५००१५५५८**

# डांबून ठेवलेल्या चोपड्याच्या ११ ऊसतोड मजुरांची सुटका

## सोलापूरमधील प्रकार : जनसाहस फाउंडेशनच्या हाकेला प्रशासनाची दाद

**तभा वृत्तसेवा**
**चोपडा, ३ मे**

ऊसतोडीसाठी काम आहे, असे सांगून सोलापूर जिल्ह्यात नेलेल्या चोपड्याच्या रामपुरा भागातील ११ मजुरांना अन्यच काम देत त्यांना डांबून ठेवल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मजुरीची रक्कम न देता या मजुरांवर उपासमारीची वेळ आली असताना जनसाहस संस्थेने प्रशासनाचा दरवाजा ठोठावला. त्यानुसार जळगाव आणि सोलापूरच्या जिल्हा प्रशासनाने सूत्रे हलवित या मजुरांना सुखरूपपणे घरी पोहचते केले आहे.

रामपुरा (ता. चोपडा) या गावातील ११ मजुरांना ऊसतोडीच्या कामासाठी पंढरपूर तालुक्यात नेण्यात आले होते. कित्येक दिवसांपासून मजुरांना पंढरपूरसह अन्य गावांमध्ये ऊसतोड व अन्य बांधकाम कामासाठी जुंपण्यात आले. मोबदला मागितल्यावर मात्र धमकावण्यास सुरुवात केली आणि नजरेखाली ठेवत त्यांच्याकडून काम करवून घेण्यात आले. या प्रवासात एकच मालकाकडे वेगवेगळ्या कामांसाठी जुंपले असताना त्यानुसार मंगलबाई प्रकाश भिल व सुनंदा हिंमत भिल या मजुरांनी आपल्यावर होत असलेल्या अन्यायाविषयी माहिती जनसाहस संस्थेच्या कामगार हेल्पलाईनला कळविली. तेव्हा जनसाहस संस्थेने पुढाकार घेत जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची भेट घेतली. त्यांनी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार सोलापूर व पंढरपूर प्रशासनाशी संपर्क सुरू झाला.

सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कारवाईला सुरुवात केली. महसूल विभाग, कामगार विभाग, पोलीस अधिकाऱ्यांसोबत जळगाव जनसाहस संस्थेचे जिल्हा समन्वयक नीलेश शिंदे, राज्य कामगार सुरक्षा समन्वयक सय्यद रुबीना, अॅड. सी. एस. परमार. जळगाव जनसाहस संस्थेचे क्षेत्र अधिकारी हितेंद्र माळी व सोनम केदार, धाराशिव, जनसाहस संस्थेचे क्षेत्र अधिकारी उमा गायकवाड व विक्रम कल्याणकर यांनी मजुरांना गाठले आणि त्यांना ताब्यात घेतले व डी एम. कुमार आशीर्वाद यांना भेटले. त्यांनी पंढरपूरच्या एसडीएम यांच्यासोबत फोनवरून बोलून त्यांना बंधपत्रित कामगार कायद्यानुसार कारवाई करण्याचे आणि बचाव पथक स्थापन करण्याचे आदेश दिले. पुढे रेड ॲण्ड रेस्कू प्रोसेस करण्यात आली व कामगारांना पंढरपूर कार्यालयामध्ये सुखरूप आणले. पंचनामा व जबाब घेऊन बंधपत्रित कामगार कायद्यानुसार ६ कामगारांना रिलीज सर्टिफिकेट देण्यात आले आणि सुखरूपपणे त्यांना जळगाव जिल्हा अधिकारी व जळगाव विधी सेवा प्रधिकारण येथे जळगाव जनसाहस टीमसोबत भेट देऊन कामगारांच्या पुनर्वसन शासकीय योजनेबद्दल चर्चा करण्यात आली व यांच्या गावी सुखरूप पोहचवण्यात आले.



**सुटका करण्यात आलेले रामपुरा येथील मजूर असे**

रूपाबाई ब्रिजलाल भिल (वय ३८), स्वप्नील ब्रिजलाल भिल (१७), विक्की ब्रिजलाल भिल (१५), सुरेश रतन भिल (३०), उषाबाई सुरेश भिल (२५), कुणाल सुरेश भिल (७ वर्षे), शिव सुरेश भिल (४ वर्षे), ऋतिका सुरेश भिल (२ वर्षे), पिरण रतन भिल (२६), गणेश मानसिंग भिल (२२), कविता गणेश भिल (२०) हे सर्व मजूर सुखरूपपणे घरी परतले आहेत.

## थोडक्यात महत्त्वाचे...



### धरणगावातील बालाजी मंदिर जीर्णोद्धारास शेनपडू जाधवांकडून ११ हजार रुपये देणगी

**धरणगाव :** येथील सर्वांचे श्रद्धास्थान श्री बालाजी भगवान मंदिराच्या जीर्णोद्धार देणगीसाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. शुक्रवारी (२ मे) बाजोट गल्ली, धरणगाव येथील शेनपडू टीकाराम जाधव यांच्या स्मरणार्थ लक्ष्मण शेनपडू जाधव, धरणगाव यांनी ११ हजार १११ रुपये देणगी देऊन मंडळास सहकार्य केले. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष डी. आर. पाटील, उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, जीर्णोद्धार प्रमुख जीवन बयस, सचिव प्रशांत वाणी, सहसचिव अशोक येवले, खजिनदार किरण वाणी आणि मंडळाचे सदस्य चंद्रकांत अमृतकर, प्रमोद जगताप, अरुण महाले, श्याम भाटिया व किरण सोनवणी, जितेंद्र बयस उपस्थित होते. देणगीदारांचे मंडळाच्या वतीने आभार मानण्यात आले.

### निमगव्हाण येथील अनिल बाविस्कर यांना शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार

**चोपडा :** तालुक्यातील निमगव्हाण येथील रहिवासी, सामाजिक कार्यकर्ते



अनिल शिवाजी बाविस्कर यांना क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे २०२३-२४ वर्षाचा जिल्हा युवा पुरस्कार देण्यात आला. जळगाव येथे महाराष्ट्रदिनी मुख्य शासकीय कार्यक्रमात पोलीस ग्राउंडवर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या वेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक आदी मान्यवर उपस्थित होते. राज्य शासनाच्या वतीने युवकांनी केलेल्या सामाजिक कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने युवा पुरस्कार दिला जातो. पर्यावरण संवर्धन, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, आपत्ती व्यवस्थापन, कला, क्रीडा, सांस्कृतिक, व्यसनमुक्ती, राष्ट्रीय एकात्मता, युवा विकास या क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन बाविस्कर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



### उमरे-मालखेडा गावात घंटागाडी

**कासोदा, ता. एरंडोल :** येथून जवळच असलेल्या उमरे-मालखेडा गावात कचरा नियोजन व्यवस्थित व्हावे व गावात आणि परिसरात घाणीचे साम्राज्य पसरू नये किंवा कचऱ्यापासून रोगराई पसरू नये म्हणून उमरे मालखेडा ग्रुप ग्रामपंचायतीने पंधराव्या वित्त आयोगातून घंटागाडी घेतली. ही गाडी गावात फिरवून गावातील प्रत्येक घरातील कचरा या गाडीमार्फत जमा करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. गावात या उपक्रमाबाबत सर्वत्र कौतुक होत आहे. याप्रसंगी ग्रामपंचायत सरपंच प्रतिभा पाटील, उपसरपंच सुषमा पाटील, समाधान दयाराम पाटील व प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष सुनील पाटील उमरेकर, पोलीस पाटील, ग्रामपंचायत अधिकारी व गावातील नागरिक उपस्थित होते.

### एरंडोल पतपेढी तज्ज्ञ संचालकपदी मुश्ताक अली मोहब्बत अली नियुक्त

**धरणगाव :** एरंडोल-धरणगाव तालुका माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी



पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालकपदी धरणगाव येथील अँग्लो उर्दू हायस्कूलचे उपशिक्षक मुस्ताक अली मोहम्मद अली यांची धरणगाव तालुक्यातून नियुक्ती करण्यात आली आहे. शिक्षक संघटना, शिक्षकांशी संबंधित असलेल्या निवडणुका, शैक्षणिक कामकाज, आणि विद्यार्थी हिताच्या कार्यासाठी सातत्याने सक्रिय असणाऱ्या अँग्लो उर्दू हायस्कूलमधून पतसंस्थेमध्ये संचालक म्हणून एखादा शिक्षक जावा, अशी सर्व शिक्षक संघटना व तालुक्यातील शिक्षकांची भावना होती. नियुक्तीबद्दल धरणगाव तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सी. के. पाटील, तालुका टीडीएफचे अध्यक्ष डी. एस. पाटील, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष एस. एस. पाटील, शिक्षकेतर कर्मचारी संघ, अँग्लो उर्दू हायस्कूलचे संचालक मंडळ, प्राचार्य शेख शकील यांच्यासह तालुक्यातून शिक्षक शिक्षकेतरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



### शेंदुर्णीत 'बंद'ला १०० टक्के प्रतिसाद

**शेंदुर्णी, ता. जामनेर :** काश्मीरमधील पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी पुकारलेल्या 'शेंदुर्णी बंद'ला १०० टक्के प्रतिसाद मिळाला. सकल हिंदू समाजाने या बंदचे नियोजन केले होते. सकाळपासून सर्व व्यवहार बंद होते. विविध चौकांमध्ये शांतता होती. यात विविध पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.



## आडगाव शिवारात भरउन्हाळ्यात बहरालय, हिरवागार मूग नि उडीद

**चोपडा :** तालुक्यातील आडगाव शेतशिवारात भरउन्हाळ्यातही हिरवागार मूग व उडीद बहरला आहे. रब्बी हंगाम संपल्यानंतर, तिसऱ्या हंगामासाठी शेतकऱ्यांनी मूग, उडीद व बाजरी ही पिके पेरली आहेत. उन्हाळ्यात शेतकऱ्यांच्या हातात खेळते भांडवल नसल्याने या पिकांचा मोठा हातभार लागत असतो.

## तळमळ, चिकाटी व नावीन्यतेने शाळेचा नावलौकिक होतो - विजय भामरे

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, ३ मे**

शिक्षकांच्या अंगी शाळेविषयी, गावाविषयी व विद्यार्थ्यांविषयी तळमळ असेल, नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याची ऊर्मी असेल तर त्या शाळेचा नक्कीच नावलौकिक होतो याचा प्रत्यय जिल्हा परिषद शाळा हिवरखेडे खुर्द शाळेकडे पाहून सर्वांनाच येत आहे, असे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी विजय भामरे यांनी हिवरखेडे खुर्द येथे केले.

हिवरखेडे खुर्द जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरावा, असा शैक्षणिक सोहळा नुकताच त्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्या वेळी ते बोलत होते.



इयत्ता पहिली प्रवेशित बालकांचा शैक्षणिक साहित्य देऊन प्रवेशोत्सव साजरा करणे, २०१९ ते २०२५ या कालावधीत शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेसाठी पात्र चौदा विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार करणे, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना फोटो फ्रेम देऊन निरोप देणे, शालेय उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचा गौरव करणे अशा वैविध्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन या वेळी करण्यात आले होते. .

हिवरखेडे खुर्द शाळेचे कार्य प्रशंसनीय असल्याचे मत केंद्रप्रमुख संजय चव्हाण यांनी याप्रसंगी व्यक्त केले. सेवानिवृत्त आदर्श शिक्षक मुरलीधर मिस्तरी व शाळाबाह्य मुलांना शिक्षण प्रवाहात टिकून राहण्यासाठी मोलाची मदत करणारे बोळे येथील भाईदास निकम यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रकाश भिल, सुरेखा पाटील, शीतल भिल, अर्चना पाटील, ग्यानीराम पाटील, समाधान पाटील, ज्ञानेश्वर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक हर्षदा बोरसे यांनी, तर सूत्रसंचालन मुख्याध्यापिका सीमा पाटील व आभारप्रदर्शन महेंद्र कोळी यांनी केले.

## उमरे जि. प. शाळेत पारितोषिक वितरण

**कासोदा (ता. एरंडोल) :** येथून जवळच असलेल्या उमरे येथे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन व्यवस्थापन समिती सदस्य विष्णू भगवान पाटील, यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी वार्षिक निकाल जाहीर करून प्रत्येक वर्गात प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ७०१ व ४०१ रुपयांचे रोख पारितोषिक मुख्याध्यापक ठाकरे यांचे साडू रोहित विनायकराव पाटील (कापडणे) हल्ली मुक्काम दुबई यांच्याकडून देण्यात आले. प्रसंगी त्यांनी ऑनलाइन विद्यार्थ्यांशी संपर्क साधून मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. एमटीएस परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारोळा तालुक्यातून तृतीय आलेली विद्यार्थिनी योगेश्वरी संदीप पाटील हिला ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले.



प्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज पाटील, ग्रामपंचायत सदस्य सचिन पाटील, पोलीस पाटील किरण पाटील, माजी सरपंच आत्माराम पाटील, समाधान पवार, समाधान पाटील, ह.भ.प. श्रीकांत पाटील, अरुण पाटील, माणिक पाटील, राजाराम पाटील, डिगंबर पाटील, प्रमोद माणिक पाटील, मुख्यमंत्री युवा कार्य योजना प्रशिक्षणार्थी शिक्षक व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य अंगणवाडी सेविका नूतन गायकवाड, मदतनिस उषाबाई पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक ठाकरे यांनी केले. आभार मीनल ठाकरे यांनी मानले.

## नाट्यप्रयोगातून उलगडला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनपट

**धरणगाव :** सतराव्या शतकातील शूर वीरांगना अहिल्यादेवी होळकर यांचा लढावू बाणा, समाज व्यवस्थेतील सहभाग आणि सर्व समाजासाठीचे सर्जनात्मक कार्य धरणगावात नाट्यप्रयोगातून पाहायला मिळाले.

बालकवी ठोंबरे विद्यालयातील विवेकानंद व्याख्यानमालेचे पाचवे पुष्प गुंफताना समारोपाचा कार्यक्रम झाला. इंदूर येथील अर्चना चितळे व अरुण, शनीसह त्यांच्या सहकाऱ्यांकडून मातोश्री अहिल्यादेवी होळकर नाट्य सादर करण्यात आले. अहिल्यादेवी होळकर यांच्या भूमिकेत अर्चना चितळे यांनी हुबेहूब वेशभूषा साकारली होती. आपल्या कलेतून त्यांनी ते पात्र जिवंत केले आणि उपस्थितांची मनेदेखील जिंकली.

प्रारंभी वाचनालयाचे सचिव महेश आहेराव यांनी समारोप कार्यक्रमाची माहिती विशद केली. प्रमुख कलाकारांचा परिचय रजनीराणी पवार यांनी करून दिला तर आभार जे. एस. बोरसे यांनी मानले. संस्थेचे अध्यक्ष हेमलाल भाटिया, उपाध्यक्ष चिंतामण पाटील, सचिव ललित उपासनी, संचालिका शोभा चौधरी यांनी उपस्थित कलावंतांचा संस्थेच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.





### मूकबधिर निवासी विद्यालयात ध्वजवंदन व पूजन

**धरणगाव :** येथील के. जी. गुजराथी मूकबधिर निवासी विद्यालयात १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजवंदन करण्यात आले.

ध्वजवंदन व पूजन मुख्याध्यापक वाल्मीक पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक, अधीक्षक, लिपिक आदी कर्मचारी उपस्थित होते.

## पाणीटंचाईचे संकट गडद, नऊ गावांसाठी ११ टँकर्स

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, ३ मे**

वैशाख वणवा जिल्हाभरात जाणवू लागला आहे. चटकेदार ऊन आणि सातत्याने वाहणारे उष्ण वारे जोमदार नसले तरी त्यांच्या प्रभावाने जिल्ह्यातील जलाशयांची पातळी दिवसेंदिवस घटू लागली आहे. जिल्ह्यात एप्रिलच्या तिसऱ्या सप्ताहात दोन गावांसाठी तीन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू होता. मंगळवारी (२९ एप्रिल) दरम्यान चाळीसगाव तालुक्यात तीन गावांसाठी तीन टँकर, अमळनेर तालुक्यात दोन गावांसाठी तीन टँकर, जामनेर, भडगाव तालुक्यात प्रत्येकी एका गावासाठी एक टँकर, अशा सात गावांसाठी आठ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात होता.

मात्र उन्हाच्या तीव्रतेने दोनच दिवसात टँकरच्या संख्येत वाढ झाली आहे. जिल्ह्यात अमळनेर तालुक्यात डांगर बुद्रूक, तळवाडे, सबगव्हाण आणि जानवे या चार गावांसाठी सहा टँकर, भडगाव तळबंद तांडा एक, जामनेर वाडीकिल्ला एक आणि चाळीसगाव तालुक्यात पिंपळगाव, राजदेहरे गावठाण तांडा आणि कृष्णानगर अशा तीन गावांसाठी तीन टँकर अशा एकूण नऊ गावांसाठी ११ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

**४२ गावांसाठी ४३ विहिरी अधिग्रहित**

जामनेर सहा, एरंडोल एक, मुक्ताईनगर चार, बोदवड एक, पाचोरा चार, चाळीसगाव १०, अमळनेर आठ, पारोळा सात आणि चोपडा एका गावासाठी दोन अशा ४२ गावांसाठी ४३ विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. याशिवाय जळगाव तालुक्यात नवीन विंधन विहिरींसाठी मान्यता देण्यात आली असल्याचेही जिल्हा प्रशासनाने म्हटले आहे.

## वडगाव तिग्जी येथे भिल्ल समाज स्मशानभूमी भिंतीसाठी उपोषणाची सांगता

**सोयगाव :** तालुक्यातील वडगाव तिग्जी येथील भिल समाजाची स्मशानभूमीस



संरक्षण भिंत बांधावी म्हणून २९ एप्रिल रोजी प्रजा सुराज्य पक्षाचे संस्थापक अध्यक्ष शरद तिंगोटे यांच्यासह भिल सम ाजाच्या वतीने यांनी तहसील कार्यालयात निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाची दखल १ मे रोजी उपोषणाची दखल घेऊन उपोषणाला भेट देऊन गटविकास अधिकारी दादाराव अहिरे, सहाय्यक गटविकास अधिकारी यांनी उपोषणाला भेटून आश्वासन देऊन उपोषण सोडण्यात आले.

## हभप देवाचार्य अण्णा महाराज पाटील यांचे उद्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, दि.३**

शहरापासून जवळच असलेल्या श्री क्षेत्र बांभोरी, ता. धरणगाव येथील प्रसिद्ध श्री संत गजानन



महाराज मंदिराचे संस्थापक अध्यक्ष हभप देवाचार्य श्री अण्णा महाराज पाटील सोमवार, ५ मे रोजी ७६ व्या पदार्पण करीत आहेत.

अमृत महोत्सव साजरा करीत असताना हभप देवाचार्य श्री अण्णा महाराज पाटील यांनी मंदिरासंदर्भात अनेक चढउतार पाहिले आहेत. यासाठी त्यांनी अनेकांशी संपर्क साधून या मंदिराचा कायापालट केला आहे. त्यांच्या मृदू आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी विविध क्षेत्रातील अनेक माणसं जोडली आहेत. त्यात खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रतापराव गुलाबराव पाटील, बांभोरी ग्रामपंचायतचे सदस्य भिकन नन्नवरे यांच्यासह विविध क्षेत्रातील व्यक्तींचा समावेश आहे.

दरम्यान, मंदिरापासून तर थेट मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला म्हणजे ४ मे रोजी हभप श्री अण्णा महाराज पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

या मंदिराला महाराष्ट्र शासनाच्या तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत क दर्जा मिळाला आहे. यातून मंदिराचा दिवसेंदिवस कायापालट होत आहे. मंदिराच्या देखभालीत हभप देवाचार्य अण्णा महाराज पाटील यांना त्यांच्या पत्नी पुष्पा पाटील यांची साथ मिळत आहे.

## तांदलवाडी हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळावा

### १६ वर्षांनंतर जुन्या आठवणींना दिला उजाळा

**चोपडा :** तालुक्यातील तांदलवाडी येथील जय श्री दादाजी हायस्कूलमध्ये २००८-०९ या वर्षी इयत्ता दहावीच्या वर्गात असणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांचा स्नेहमेळावा २९ एप्रिल रोजी झाला. यात २६ माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रमापूर्वी शाळेतील विद्यार्थ्यांच्या वतीने प्रवेशद्वारापासून ते शाळेपर्यंत माजी विद्यार्थ्यांचे टाळ्या वाजवून व फुलांच्या पाकळ्या उधळत वाजत गाजत स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थी दहावीच्या वर्गात दाखल झाले. शिक्षक के. एन. पाटील, ए.एल.चव्हाण, इंद्रायणी पाटील यांनी विद्यार्थ्यांना अध्यापन केले व विविध प्रश्न विचारून संवाद साधला. यातून सर्व माजी विद्यार्थ्यांना



जुन्या दिवसांचे स्मरण झाले.

तद्नंतर दीप प्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून स्नेहमेळाव्याला सुरुवात झाली. विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले, अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही.पी. चौधरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षकवृंद के.एन.पाटील, ए.एल. चव्हाण, एस.पी.साळुंखे, एन.पी. पाटील, संदीप लांडगे, इंद्रायणी पाटील, एम.बी. वानखेडे आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.

आजी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व शिक्षकवृंदांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मुख्याध्यापक व्ही.पी चौधरी यांनी सांगितले की, माजी विद्यार्थी यशस्वी होऊन भेटल्यावर नेहमी आनंदच होतो, असे सांगून त्यांचे कौतुक केले. त्यानंतर सर्व माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी परिचय करून दिला. माजी विद्यार्थ्यांमधून प्रा. अनिल शिवाजी बाविस्कर, प्रा. कीर्ती पाटील, भानुबाई धनगर, अरुणा धनगर, भूषण कोळी, योगिता साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात माजी विद्यार्थी हे जुन्या आठवणीत रमल्याचे दिसून आले. शाळेतील गमती-जमती तसेच बालपणीच्या आठवणी या वेळी एकमेकांनी शेअर्स केल्या. माजी विद्यार्थ्यांच्यावतीने शाळेला स्टीलचा ॲडजेस्टेबल फोटो स्टॅण्ड भेट म्हणून देण्यात आला. सूत्रसंचालन शिक्षक संदीप लांडगे यांनी केले तर माजी विद्यार्थी प्रा.अनिल बाविस्कर यांनी आभार मानले.




# जातिनिहाय जनगणना : एक आकलन

**प्रा. अशोक ढगे**

> **जनगणनेतून मागासलेल्या आणि अत्यंत मागासलेल्या वर्गांबद्दल बरेच काही उघड होईल. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता असेल. या आकडेवारीत स्पष्टता असेल, तेव्हा सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल. गरज पडल्यास योग्य ती मदत करता येईल.**



स्वातंत्र्यानंतर देशात प्रथमच जातिनिहाय जनगणना केली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. केंद्र सरकारने जात जनगणना करण्यास मान्यता दिली आहे. विरोधी पक्षांवर हा एक मोठा राजकीय प्रहार म्हणून या घटनेकडे पाहिले जात आहे. काँग्रेस, समाजवादी पक्ष आणि अनेक पक्ष गेल्या काही वर्षांपासून याबाबत सरकारवर दबाव आणत आहेत. आता सरकारच्या घोषणेनंतर सर्व पक्ष एकत्रितपणे त्याचे समर्थन करीत आहेत. त्याच वेळी अनेक जण याचा संबंध बिहार निवडणुकीशी जोडत आहेत. तथापि, या वर्षी जनगणना सुरू झाली, तर त्याचा तपशील २०२६ च्या अखेरीस येण्याची अपेक्षा आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी गेल्या काही वर्षांपासून जातीय जनगणनेच्या मागणीवरून सरकारवर हल्ला करीत आहेत आणि त्याला देशाचा एक्स-रे म्हणत आहेत. पण सत्ताधाऱ्यांनी पुरेसा वेळ घेऊन, या विषयाचा अभ्यास करून घोषणा केली. स्वातंत्र्यापूर्वी १८८१ ते १९३१ दरम्यान भारतात झालेल्या जनगणनेत सर्व जातींची गणना केली जात होती; परंतु १९५१ मध्ये स्वतंत्र भारताच्या पहिल्या जनगणनेच्या वेळी, तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालील सरकारने अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) वगळता इतर जातींची गणना बंद करण्याचा निर्णय घेतला. जातीवर लक्ष केंद्रित केल्याने नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रात विभाजन वाढू शकते आणि राष्ट्रीय एकतेला बाधा येऊ शकते या विश्वासावर हा निर्णय आधारित होता. यानंतर आताच जातीय जनगणनेचा निर्धार केला गेला आहे.

१९६१ मध्ये केंद्र सरकारने राज्यांना स्वतःचे सर्वेक्षण करण्यास आणि इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) याद्या तयार करण्यास सांगितले होते. त्यानंतर आता वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या मागणीनंतर सरकारने पुढील देशव्यापी जनगणनेत जातीची गणना समाविष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच वेळी जातीय जनगणना हा राजकीय मुद्दा कसा बनला, हे समजावून घ्यावे लागेल. जातीय जनगणनेबाबत वेळोवेळी आवाज उठवण्यात आला आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे आरक्षण. १९८० मध्ये मंडल आयोगाने ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षणाच्या शिफारशीमुळे जात पुन्हा राजकीय चर्चेत आली. जातीशी संबंधित सर्वसमावेशक डेटाच्या अभावामुळे ओबीसी लोकसंख्येची अचूक ओळख पटवणे आणि त्यांची संख्या निश्चित करणे आव्हानात्मक बनले. त्यामुळे जात जनगणनेची मागणी झाली. त्याच वेळी २०११ मध्ये काँग्रेस आघाडी सरकारने सामाजिक-आर्थिक आणि जात जनगणना केली. हा १९३१ नंतर देशभरातील जातीचा डेटा गोळा करण्याचा पहिला प्रयत्न होता. तथापि, 'एसईसीसी २०११'चा डेटा कधीही पूर्णपणे जाहीर केला गेला किंवा वापरला गेला नाही. राष्ट्रीय जात जनगणना नसतानाही बिहार, तेलंगणा आणि कर्नाटकसारख्या राज्यांनी अलिकडच्या वर्षांमध्ये स्वतःचे जात सर्वेक्षण केले आहे. राज्य-विशिष्ट आरक्षण धोरणे आणि कल्याणकारी कार्यक्रमांना समर्थन देण्यासाठी हा डेटा गोळा केला गेला होता. २०२३ मध्ये बिहार सरकारने जात सर्वेक्षण केले. या आधारावर आरक्षणही वाढवण्यात आले; पण प्रकरण न्यायालयात गेले आणि आरक्षण थांबवण्यात आले.

सरकारने मूलभूत जनगणनेसोबत जातीय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्यामुळे संपूर्ण देशाच्या राजकारणात खळबळ उडाली. गमतीशीर बाब म्हणजे विरोधी पक्ष याला आपला विजय मानत आहेत. त्यांचा युक्तिवाद असा आहे की, काँग्रेस आणि इतर समाजवादी पक्ष बऱ्याच काळापासून केंद्रावर दबाव आणत होते; त्यानंतरच जातीय जनगणनेची घोषणा करण्यात आली. आता येथे प्रश्न उद्भवतो की, जात जनगणनेचा अर्थ काय आहे, ती का आवश्यक आहे? जातीय जनगणनेचा साधा अर्थ असा आहे की, देशातील विशिष्ट जातीच्या लोकांची संख्या स्पष्टपणे सादर करणे. देशात यापूर्वीही जातीय जनगणना झाली आहे; परंतु त्यात ओबीसींचा समावेश नव्हता. अशा परिस्थितीत, जेव्हा जेव्हा जातीय जनगणनेची चर्चा होते, तेव्हा सर्वात जास्त चर्चेचा असणारा विषय म्हणजे देशात ओबीसी वर्ग किती मोठा झाला आहे. या वेळच्या जातीय जनगणनेत सर्वांचे लक्ष ओबीसींची टक्केवारी किती आहे यावर असेल. पहिली जातीय जनगणना १९३१ मध्ये करण्यात आली. ब्रिटिश काळात भारतातील लोकांकडे जातीच्या आधारावर पाहिले जात होते. त्यामुळे त्यावेळी अशी कोणतीही जनगणना ही अगदी सामान्य बाब होती. तथापि, तेव्हाच एक गोष्ट निश्चित करण्यात आली होती की, दर १० वर्षांनी जातीय जनगणना केली जाईल. अशा परिस्थितीत ही प्रक्रिया १९४१ मध्येदेखील पार पाडण्यात आली होती; परंतु त्यावेळी डेटा सादर करण्यात आला नव्हता. तेव्हा असा युक्तिवाद करण्यात आला की, जातीवर आधारित तक्ता तयार करता आला नाही, म्हणून डेटा जाहीर करण्यात आला नाही.

पुढे देश स्वतंत्र झाला आणि १९५१ मध्ये पुन्हा जातीची जनगणना करण्यात आली. येथे पहिल्यांदाच एक मोठा खेळ खेळला गेला. इतक्या मोठ्या सर्वेक्षणात ओबीसी प्रवर्गाचा समावेश नव्हता. जनगणनेमध्ये फक्त अनुसूचित जाती आणि जमातींचा समावेश करण्यात आला. हे २०११ पर्यंत चालू राहिले; जनगणना झाली; पण ओबीसी प्रवर्गाबद्दल फारशी माहिती समोर आली नाही. या पृष्ठभूमीवर आताच जात जनगणनेची गरज का आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. देशात मंडल आयोग लागू करण्यात आला, तेव्हा म्हटले गेले होते की, देशातील ओबीसी लोकसंख्या ५२ टक्के आहे; सरकारने गाठलेला ५२ टक्के आकडा १९३१ च्या जनगणनेवर आधारित होता. अशा परिस्थितीत ते किती अचूक असेल हा सर्वात मोठा प्रश्न होता. देशातील ओबीसी लोकसंख्या काळानुसार बदलली असून त्यात लक्षणीय वाढदेखील झाली आहे, त्यामुळे ५२ टक्के हा आकडा किती अचूक मानला पाहिजे, असा युक्तिवाद करण्यात आला. आता हा प्रश्न सर्वात जास्त त्या पक्षांनी उपस्थित केला, ज्यांना जातीय जनगणना हवी होती. सर्वोच्च न्यायालयानेही आपल्या एका निर्णयात स्पष्ट केले होते की, सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा जास्त असू शकत नाही. विरोध करणाऱ्यांच्या मते ओबीसी लोकसंख्या वाढली तर ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादादेखील ओलांडली जाईल. काही जणांच्या मते अशा कोणत्याही जनगणनेमुळे देशात आणखी विभाजन होईल.

जातीच्या जनगणनेचे समर्थन करणाऱ्यांचा मात्र विश्वास आहे की, जनगणनेतून मागासलेल्या आणि अत्यंत मागासलेल्या वर्गांबद्दल बरेच काही उघड होईल. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता असेल. या आकडेवारीत स्पष्टता असेल, तेव्हा सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल. गरज पडल्यास योग्य ती मदत करता येईल. जातीय जनगणनेबाबत भाजपाची विचारसरणी ठाम आहे. १९८५ मध्ये या पक्षाने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा ठराव मंजूर केला. त्यावेळी असे अधोरेखित झाले होते की, भाजपा मागास जातींना सोबत घेऊन पुढे जाऊ पाहात आहे. राम मंदिर चळवळीने भाजपाला हिंदुत्वाच्या राजकारणाच्या प्रकाशझोतात आणले. मात्र, पक्षाचे मागास जातींना सोबत घेऊन पुढे जाण्याचे राजकारण कायम राहिले. गेल्या अनेक वर्षांपासून भाजपा असे राजकारण करीत आहे. त्याला हिंदूंच्या अनेक जातींकडून मते मिळाली; पण देशातला विविध जातींचा नेमका आकडा पुढे येणे गरजेचे होते. अशा परिस्थितीत मोदी सरकार पहिल्यांदाच केंद्रात सत्तेवर आले, तेव्हा या वर्गाला विश्वासात घेण्याची तयारी सुरू झाली. त्यानंतर २०१९ मध्ये आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या उच्चवर्णीय लोकांसाठी १० टक्के आरक्षणाच्या तरतुदीनेही समीकरणे बदलली. आज सत्ताधारी असो वा विरोधक, देशात सर्वसमावेशक राजकारणाची तीव्र गरज आहे. अशा वेळी पुढे आलेले जातीय जनगणनेचे पेव नेमके काय साधते हे बघायचे.

---

> **भारत आपल्या संस्कृतीप्रमाणे युद्धनीती आखतो. आजही आपल्यातील तो भाव जिवंत आहे. मात्र आता उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे असल्याचे ताज्या दहशतवादी हल्ल्याने दाखवून दिले आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत, असे स्पष्ट सांगण्याची वेळ आली आहे. देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजले तर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल.**

**कर्नल (नि.) अनिल आठल्ये**
अभ्यासक

# 'गझवा ए हिंद'ला उत्तर द्यावे



अलिकडेच पहलगाममध्ये पाकिस्तानी आणि काश्मिरी दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची हत्या केली, तेव्हा २६/११ च्या मुंबई हल्ल्याची आठवण झाली. त्या वेळीही या हल्ल्यात आपला काहीच हात नाही, असा कांगावा पाकिस्तानने केला होता तसेच काही काँग्रेस नेत्यांनी हा हल्ला आरएसएसच्या लोकांनी केल्याचा आरोपी केला होता. सुदैवाने तुकाराम ओंबळे यांनी दाखवलेल्या शौर्यामुळे अजमल कसाब जिवंत पकडला गेला आणि पाकिस्तानशी हल्ल्याचा थेट संबंध समोर आला. पहलगामच्या हल्ल्यानंतर आता येत्या काही दिवसांमध्ये अशी ठोस माहिती समोर येण्याची शक्यता आहे. परंतु, हल्ल्यामागे पाकिस्तानच होता याचा सज्जड पुरावा म्हणजे दहशतवाद्यांनी वापरलेल्या बंदुका. ही हत्यारे त्यांना पाकिस्तानमधून मिळाली होती, यात शंका नाही. त्यामुळे या हल्ल्याविरोधात पाकिस्तानवर कारवाई केली जावी, अशीच सर्व जनतेची सर्वपक्षीय नेत्यांकडून इच्छा व्यक्त झाली.

पाकिस्तानसंदर्भात अगदी १९४७ पासून आपले धोरण चुकीचे राहिले आहे. भारताप्रमाणेच पाकिस्तानलाही आपल्या देशातील लोकांची काळजी आहे आणि आर्थिकदृष्ट्या पाकिस्तान समृद्ध व्हावा यासाठी तेथील सरकार आपल्या सरकारप्रमाणेच काम करेल, अशी भाबडी आशा आपण गेली ७५ वर्षे बाळगून आहोत. इतिहासाचा दाखला घेतला तर १९४७ मध्ये पाकिस्तानमध्ये आर्थिक सुबत्ता होती. तेथील जनतेचे राहणीमान बाकी भारतापेक्षा चांगले होते. तसेच पाकिस्तानी नागरिकांचे दरडोई उत्पन्न भारताच्या दुप्पट होते. पण या ७५ वर्षांनंतर पाकिस्तानी जनता सर्वसामान्य भारतीय नागरिकांपेक्षा गरीब झाली आहे तसेच त्यांचे दरडोई उत्पन्न भारतीयांच्या उत्पन्नाच्या निम्मेदेखील नाही, हे वास्तव आहे. आज पाकिस्तान भिकेला लागण्याचे मुख्य कारण म्हणजे या देशाचे उद्दिष्ट्य युद्ध आणि काश्मीर काबीज करणे हेच आहे. जनतेच्या आर्थिक विकासाला त्यांनी कधीच प्राथमिकता मानले नाही. उत्तर भारताच्या इतिहासाकडे नजर टाकली तर दिल्लीचे सुलतान आणि नंतरचे मोघल साम्राज्य यांनीही हेच केल्याचे दिसते. त्याचाच कित्ता पाकिस्तान गिरवत आहे. खेरीज इस्लामी धार्मिक शिकवणीप्रमाणे भारताला 'गझवा ए हिंद' म्हणजे पादाक्रांत करून त्याचे संपूर्ण इस्लामीकरण करणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे, असेच मानले जाते. काश्मीर हे केवळ निमित्त आहे. परंतु, संपूर्ण हिंदुस्तान पादाक्रांत करणे हेच पाकिस्तानचे जन्मापासूनचे उद्दिष्ट्य राहिले आहे. मात्र, दुर्दैवाने भारताच्या नेतृत्वाला आजपर्यंत या मूलभूत प्रश्नाची समज आलेली नाही. पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री, अटलबिहारी वाजपेयी, इंदिरा गांधी आणि अगदी पंतप्रधान मोदी आदींनी कधी ना कधी पाकिस्तानशी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. पण या मूलभूत धार्मिक धारणेमुळे पाकिस्तान भारताशी कधीच शांतता ठेवणार नाही, हे भारतीयांना आजपावेतो समजलेले नाही.

जनरल मुशर्रफ कारगील युद्धावेळी पाकिस्तानचे हुकूमशहा होते. त्यांनी सत्तेतून पायउतार झाल्यानंतर एकदा म्हटले होते की, काश्मीर प्रश्न पाकिस्तानच्या मनाप्रमाणे सुटला तरी भारत-पाकिस्तानात शांतता नांदणे शक्य नाही. त्यामुळेच भारतीयांची एकूणच युद्ध आणि त्याचा उपयोग याबद्दलची मनोवृत्ती आणि धारणा अजूनही श्रीरामाच्या काळातील सत्ययुगात अडकलेल्या आहेत, असे म्हणावे लागेल. भारतीय इतिहासाकडे डोळसपणे पाहिले तर जाणवते की, परकीय आक्रमणांसमोर आपण कधीच टिकाव धरू शकलो नाही. अर्थातच याला आपापसातली भांडणे आणि राजकीय ऐक्याचा अभाव कारणीभूत आहे. परंतु, त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे अगदी महाभारत काळापासून भारतीय युद्धाकडे 'सीमित युद्ध' अशाच भावनेने पाहतात. दुसरीकडे परकीय आक्रमक संपूर्ण युद्ध आणि शत्रूचा संपूर्ण विनाश या उद्दिष्टाने लढतात. या मूलभूत फरकामुळे वैयक्तिक शौर्य असूनही धर्मयुद्धाच्या कालबाह्य कल्पनांमुळे भारतीय अनेक लढाया हरत राहिले.


छत्रपती शिवाजी महाराजांनी १६ व्या शतकात या ऐतिहासिक चुकीला तिलांजली देऊन हिंदवी साम्राज्य स्थापन केले. जवळपास ५०० वर्षांनंतर महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी आक्रमकांवर निर्भेळ विजय मिळविले. त्यांच्या काळाआधी रात्रीच्या वेळी हल्ला किंवा झोपलेल्या शत्रूंवर वार करणे हे सर्व निषिद्ध मानले जात असे. राजपूतांचा सर्व भर वैयक्तिक शौर्यावर असे. यापुढचे पाऊल म्हणजे विजय मिळविण्याऐवजी हौतात्म्य पत्करण्याचीच फुशारकी मुरवली जाऊ लागली. आज पाकिस्तानशी सामना करताना पुन्हा एकदा शिवाजी महाराजांनी शिकवलेला धडा गिरवण्याची गरज आहे. आज भारतीयांनी मनाशी खूणगाठ बांधण्याची गरज आहे की, पाकिस्तानचे राष्ट्रीय उद्दिष्ट भारतावर कब्जा करणे आणि संपूर्ण भारत इस्लाममय करणे हेच आहे. पाकिस्तानच्या मते शांतता ही तात्पुरती सोय असते. यामुळे भारताला पाकिस्तानी आव्हानाचा यशस्वी सामना करायचा असेल तर पाकिस्तान पूर्णपणे नष्ट करणे हे राष्ट्रीय उद्दिष्ट ठेवण्याखेरीज पर्याय नाही. एकदा हे राष्ट्रीय उद्दिष्ट सर्वसंमत झाले की त्यानंतर देशाचे धोरण, रणनीती आणि डावपेच आपोआपच बदलतील.

नेहमीप्रमाणे पहलगामचा हल्ला झाल्यानंतर ही गुप्तहेर तंत्राची चूक होती, अशी आवई उठवली गेली. परंतु गुप्तहेर संस्थांना दोष देणारे लोक विसरतात की, गेल्या ३० वर्षांमध्ये काश्मीरमध्ये पर्यटकांवर कधीच हल्ले झालेले नाहीत. पहलगाममध्ये ज्या प्रकारे एका आडबाजूला अनेक पर्यटक गेले होते तसेच मी स्वतः दोन वर्षांपूर्वी पत्नीसह सोनमर्गजवळ अशाच एका ठिकाणी गेलो होतो. तेथेही जाण्यास घोड्यावरून प्रवास करावा लागला होता. आमच्यासारखे असेच शंभरभर पर्यटक तेव्हा तेथे होते. पहलगामप्रमाणेच त्या ठिकाणीदेखील आमच्याबरोबर कोणीही पोलिस किंवा सैनिक नव्हते. आम्ही फिरत होतो तेथून जवळची सैनिक चौकी पहलगामप्रमाणेच १० किलोमीटर दूरवर होती. त्यामुळे पहलगामच्या पर्यटनस्थळावर पोलिस नसणे ही काही नवी गोष्ट नाही. फरक हा की, आजपर्यंत पाळली जाणारी लक्ष्मणरेषा यावेळी पाकिस्तानने आणि पाक दहशतवाद्यांनी पार केली आहे. अर्थातच या आगळिकीसाठी पाकिस्तानला धडा शिकवणारी कारवाई होणे गरजेचे आहे.

आता सिंधी जलसंधी निलंबित करून भारताने पाकिस्तानच्या मर्मावर घाव घातला आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये हिमालयातले बर्फ वितळून सिंधू आणि इतर नद्यांमध्ये पाणी येते आणि त्यावरच पाकिस्तानची तहान भागते. सध्या भारताकडे चिनाब आणि झेलम नदीवर जलविद्युत प्रकल्प असून त्यात उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पाणी साठून आपण पाकिस्तानमध्ये जाणारा ओघ कमी करू शकतो. याउलट पावसाळ्यात पूर आले असताना साठवलेले अधिक पाणी सोडून तेथील पूरस्थिती आणखी गंभीर करू शकतो. आता ताबडतोब या नद्यांचे पाणी वळवणे शक्य नसले, तरी आपल्या मर्जीप्रमाणे पाकिस्तानवर आपण नियंत्रण ठेवू शकतो. याचा त्यांच्या शेतीवर तसेच तेथील उद्योगधंद्यांवर नक्कीच परिणाम होईल.

गेल्या महिनाभरापासून काश्मीरला जोडणारा रेल्वेमार्ग तयार आहे. एकदा तो सुरू झाला की काश्मिरी लोकांची खूप सोय होणार आहे. कारण त्यांच्याकडे होणाऱ्या फळे तसेच इतर उत्पादनाचा वाहतूक खर्च निम्म्यावर येणार आहे. अर्थातच त्यामुळे काश्मीरमध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण होईल, यात शंका नाही. एकदा एखाद्या प्रदेशात आर्थिक सुबत्ता निर्माण झाली की, तेथील लोक सहजसहजी हिंसाचाराला उद्युक्त होत नाहीत. पाकिस्तानला नेमकी हीच भीती सतावत आहे. म्हणूनच त्यांनी पहलगामची घटना घडवून आणली. गेल्या अनेक महिन्यांपासून गुप्तहेर संघटनांना याची कुणकुण आहे. त्यामुळेच तयार होऊनही श्रीनगरची रेल्वेसेवा सुरू करण्यात आलेली नाही. पाकिस्तानी अतिरेक्यांचा पूर्ण बीमोड केल्याखेरीज ही रेल्वेसेवा सुरू केली तर त्यावर दहशतवादी हल्ले होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पहलगाम हल्ल्याच्या निमित्ताने पाकिस्तानमधील दहशतवादाची पाळेमुळे नष्ट करण्याची संधी मिळाली आहे.


पाकिस्तानचा पंजाब प्रांत दहशतवादाची जननी आहे. पाणी तोडल्यामुळे सगळ्यात जास्त परिणाम पंजाबवर होणार आहे. आपल्या सैन्याने चालवलेल्या दहशतवादामुळे ही परिस्थिती झाली आहे, अशी जाणीव पाकिस्तानी पंजाबात होईल तेव्हा तेथील लोकच सैन्याविरुद्ध उठाव करतील. मात्र यासाठी भारताने उघडपणे धोरणात्मक बदल करणे गरजेचे आहे. थोडक्यात, आता आपण पाकिस्तानचे तुकडे करण्याच्या उद्दिष्टावर काम करणार आहोत असे उघडपणे सांगण्याची वेळ आज आली आहे. असे झाल्यास आपल्या देशाचे अस्तित्वच संकटात आल्याचे समजल्यावर पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करणे बंद करेल का, या प्रश्नाचे उत्तर मिळू शकेल.



## कशासाठी? यशासाठी!

**डॉ. नितीन विघ्ने**
९८२२४६२९६८

# जुळल्या सगळ्या त्या आठवणी...!



अणुबॉम्बचा स्फोट
६ ऑगस्ट १९४५



२०२५ : हारुकी व अमिको
कार्यक्रम सादर करताना

६ ऑगस्ट १९४५ ची गोष्ट. जपानच्या एका शाळेतील कार्यक्रमात १८ वर्षांचा हारुकी व्हॉयोलीन वाजवणार होता तर त्याच्या सोबत त्याची मैत्रीण अमिको पियानो वाजविणार होती. दोघांनी मिळून त्याचे संगीत तयार केले होते. दोघेही कार्यक्रमापूर्वीची उजळणी करीत होते. कार्यक्रमानंतर तो अमिकोजवळ त्याचे प्रेम व्यक्त करणार होता. पण, त्यांचा कार्यक्रम झालाच नाही! कारण सकाळी बरोबर सव्वाआठ वाजता त्यांच्या हिरोशिमा शहरावर अमेरिकेने जगातील पहिला अणुबॉम्ब टाकला. यात १ लाख ६६ हजार लोक मृत्यू पावले व ८० हजार जखमी झाले. त्याच्या शब्दात सांगायचे तर तेव्हा त्याने आकाशातून सूर्य पडताना पाहिला! म्हणजे प्रचंड आवाज करत डोळे दिपवणारा प्रकाश सगळीकडे पसरला आणि त्याची शुद्ध हरपली. काही दिवसांनी हारुकी एका हॉस्पिटलमध्ये शुद्धीवर आला तेव्हा त्याला काय घडले आहे, तेच कळत नव्हते. मग कळले की, तो अणुबॉम्ब हल्ला होता व त्याचे आई-वडील, भावंड, मित्र सगळे त्या हल्ल्यात मृत्यू पावले. अमिकोचासुद्धा त्या हल्ल्यात मृत्यू झाला, असे त्याला वाटले. अशी ७० वर्षे गेलीत. आता तो ८८ वर्षांचा होता. एक दिवस त्याला सरकारी पत्र मिळाले की, अमिको नावाची वृद्धा त्याला शोधते आहे. पत्रात तिचा नंबर दिलेला होता. त्याला धक्काच बसला. ७० वर्षे भोगलेले एकटेपणाचे दुःख, विरह यामुळे तो सतत रडत होता. कारण ती जिवंत नाही हे स्वतःला पटवण्यात तारुण्य, प्रौढत्वाचे टप्पे पार करून आता तो म्हातारा झाला होता. शेवटी थरथरत्या बोटांनी त्याने तिला फोन केला. अनेक वेळा रिंग वाजल्यावर तिने फोन उचलला आणि तिचा आवाज ऐकू आला. प्रयत्न करूनही त्याच्या घशातून आवाजच निघेना. पण त्याने जी बोलण्याची धडपड केली, ती तिला बरोबर कळली. थरथरत्या आवाजात तिने म्हटले, ''हा..हा.. हारुकी?'' तो 'होय' म्हणाला. मग दोघेही फक्त हुंदके देत रडलेत. जुन्या सगळ्या आठवणी जाग्या झाल्यात. मनात तेच जुने स्वर झंकारलेत.

'स्वर आले दुरुनी, जुळल्या सगळ्या त्या आठवणी'

यशवंत देव यांनी लिहिलेल्या, प्रभाकर जोग यांच्या संगीतात सुधीर फडके यांनी गायलेल्या या मराठी भावगीतासारखीच परिस्थिती प्रत्यक्ष तयार झाली. ७० वर्षांनी का होईना दोन जीव पुन्हा भेटलेत. त्याने तिला विचारले, ''तुला आपलं संगीत आठवतंय का?'' तिने हसून मान डोलावली आणि मग त्या तारुण्यातील जुन्या आठवणींच्या शक्तीने दोघांनीही पुन्हा त्यांचे संगीत वाजवायचे ठरवले. ज्या देशाच्या अणुबॉम्बमुळे त्यांचा कार्यक्रम झाला नव्हता, त्या अमेरिकेतच जेव्हा त्यांनी कार्यक्रम सादर केला. तेव्हा त्यांची गाष्ट व संगीत ऐकून हजारो प्रेक्षक भावविभोर होऊन रडत होते. आज ९८ व्या वर्षी दोघेही अप्रतिम कार्यक्रम सादर करतात. बालपणीच्या रम्य आठवणी व संस्कार आम्हाला आजही शक्ती व आनंद देतात. त्या शक्तीने कठीण आव्हाने पेलता येतात.

### महत्त्वाचा प्रश्न

**मुलांच्या भविष्यासाठी अशा शक्तिदायक आठवणींचा खजिना, संस्कार आपण देऊ शकतो का?**

**नष्टचक्र** : मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा शोध लागण्यापूर्वीच्या काळात कुटुंब व्यवस्था जास्त सशक्त होती. संपर्क साधण्याची साधने नसूनही प्रत्येक कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या संपर्कात होते. अगदी एकाच खोलीत बसलेले असूनही आज प्रत्येक जण स्वतःचा मोबाईल हातात घेऊन बसलेला असतो. दुसऱ्यांना संदेश पाठवण्यात किंवा वाचण्यात, पाहण्यात गर्क असतो. तासन्‌तास आकर्षक व्हिडीओ पाहताना इतका गर्क होऊन जातो की, फक्त काही इंचाच्या अंतरावर बसलेल्या किंवा झोपलेल्या व्यक्तीचा प्राण गेला तरी कळणार नाही. अतिजास्त स्क्रीन टाईम वाढल्यामुळे म्हणजे लॅपटॉप, डेस्कटॉप, टीव्ही, टॅब किंवा मोबाईल या गॅजेट्सच्या स्क्रीनकडे सतत पाहण्यामुळे खालील मानसिक, शारीरिक व सामाजिक समस्या तयार होतात.

१. मेंदू अतिजास्त उत्तेजित अवस्थेत जास्त वेळ राहिल्यामुळे मेंदू आणि पूर्ण शरीरावर, मनावर तणाव वाढतो.

२. झोपेची गुणवत्ता व प्रमाण खालावते. मेंदूवर अतिताण वाढून झटके येतात व ब्रेन अटॅक येऊन मुलांचा मृत्यूसुद्धा होतो.

३. मनाची एकाग्रता शक्ती, स्मरणशक्ती, धारणाशक्ती, समस्या निराकरण शक्ती, कल्पनाशक्ती कमी होऊन अभ्यासात अपयश व निराशेत वाढ होते. मोबाईलच्या रेडिएशनमुळे शरीराची वाढ खुंटते. प्रजननशक्ती कमी होते.

४. सतत वेगात हलणारी चित्रे व व्हिडीओ स्क्रीनवर पाहण्याची सवय मनाला लागल्यामुळे प्रत्यक्ष जीवनातील प्रसंग व शिक्षकांचे शिकवणे खूपच कंटाळवाणे वाटू लागते व मोबाईलचे व्यसन लागते. याशिवाय आपल्या अनुपस्थितीत फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप, एक्स वगैरे ग्रुपवर काही महत्त्वाचा(?) मेसेज किंवा चॅट आपण मिस तर नाही केला ना? या भावनेतून असुरक्षितता वाढून लोकांना 'फोमो' म्हणजेच 'फियर ऑफ मिसिंग आऊट' हा मानसिक रोग होतो व मोबाईल-सोशल मीडियाचे व्यसन अजून वाढत जाते.

५. सातत्याने मेंदू व मज्जासंस्था तणावात राहिल्यामुळे भावनांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता कमी होऊन चिडचिड किंवा पटकन राग येण्याचे प्रमाण वाढते. इतके की, चांगला मोबाईल घेऊन दिला नाही किंवा मोबाईल वापरू दिला नाही म्हणून १२ ते २० वर्षे वयाच्या मुलांनी स्वतःच्या आईवडील किंवा जवळच्या व्यक्तीचा जीव घेतल्याची किंवा आत्महत्या केल्याची उदाहरणे आहेत. दुर्दैवाने अशा गुन्ह्यांची संख्या वाढत चालली आहे.

६. आई, वडील, भावंडे सगळेच आपापल्या मोबाईलमध्ये व्यस्त असल्यामुळे कुटुंबाचा आपसातील संवाद हरवला आहे. त्यामुळे नात्यांची ओढ कमी होते. बेपर्वा वृत्ती व उर्मटपणा वाढतो. स्वभाव रागीट बनत जातो. याचा परिणाम स्वरूप सहनशीलता, कार्यातील समरसता, आपलेपणा कमी झाल्यामुळे पती-पत्नीतील दुरावा वाढून घरातील हिंसाचार व घटस्फोटाची संख्या वाढते. याच्याही पुढे एकल पालकत्व असणाऱ्या मुलांची संख्या वाढते आहे. घरात प्रेमळपणे लक्ष द्यायला कुणीच नाही. प्रकृती, खानपान, आराम, व्यायाम, संस्कृती याबद्दलची काळजी घेणारे कुणीच नाही. कारण एकतर दोन्ही पालक नोकरीवर किंवा एकच आई पालक व ती घरी नाही. आईशी किंवा पालकांशी ऑफिसातून बोलता यावे म्हणून कोवळ्या वयाच्या हातात सतत हातात स्मार्ट फोन दिला जातो! आणि मग वर वर्णन केलेले वाईट परिणाम आपल्याला पाहायला मिळतात.

७. अशा घरातील मुले शाळेत, महाविद्यालयात किंवा समाजात आक्रमक-हिंसक वृत्तीने वागल्यामुळे समाजातील इतर लोकांना त्याचा त्रास भोगावा लागतो. अनेकदा ज्या मुलांना हातात मोबाईल मिळत नाही त्यांना इतर बिघडलेली मुले किंवा मुली त्यांच्या मोबाईलवर सेक्स किंवा गुन्हेगारीचे आक्षेपार्ह व्हिडीओ दाखवतात किंवा पाठवतात. त्यामुळे कोवळ्या वयातील मुले चुकीच्या संगतीत अडकून स्वतःचे व इतरांचे आयुष्य खराब करतात. त्यांना अशा संगतीतून सिगारेट, सेक्स किंवा ड्रग्सचे व्यसन लागते. दुर्दैवाने अशा मुलांच्या समस्या सोडविण्यासाठी मुलांच्या तक्रारी घेऊन अनेक पालक आमच्याकडे येतच असतात.

### शिकायचे काय? करायचे काय?

उत्तम आठवणी अमोल आहेत. बालपणीच्या किंवा आपल्या कुटुंबातील व्यक्तींच्या सोबत घालवलेल्या चांगल्या क्षणांच्या आठवणी आपल्याला कायम शक्ती व स्फूर्ती देतात. पुढे त्या व्यक्ती जरी देवाघरी गेल्यात तरी जुने संस्कार व आठवणी आपल्याला वर्तमान व भविष्यकाळात मार्गदर्शन करतात किंवा आपल्या मनावरील ताण हलका करतात. मुलांच्या आणि मोठ्यांच्या मनात अमूल्य व सकारात्मक आठवणी जोपासण्यासाठी खालील प्रसंग सातत्याने घडवून आणण्याची आज गरज आहे.

१) मुलांच्या सोबत जेवा. आपल्या ताटात अन्न पोहोचविण्यासाठी ऊन, पाउस, थंडीची पर्वा न करता शेतकरी किती मेहनत घेतात ते त्यांना पटवून द्या. तसेच ही भाजी हवी की ती हवी असे पर्याय न देता ताटात वाढलंय ते पूर्ण खायचेच आहे. ताटात उष्टे टाकायचे नाही हे पहा. पिझ्झा, बर्गर, नुडल्स, कोल्ड ड्रिंक्स हे पदार्थ भारतीय वातावरणात पोषक नाहीत. ते टाळा. संतुलित आहार म्हणजे काय ते समजावून प्रत्यक्षात आणा.

२) त्यांना स्वतःचे ताट, कपडे व खोली स्वच्छ करायला सांगा.

३) हौसेने स्वयंपाक करायला शिकवा. जी मुले आईसोबत घरात मदत करतात किंवा स्वयंपाक करायला शिकतात ती कुटुंबाशी जास्त जुळलेली असतात, असे आढळले आहे. सुरुवातीला जरी मुलांनी कुरकूर केली तरी नंतर पुढच्या आयुष्यात मुले पालकांना धन्यवाद देतात. मात्र जे पालक मुलांचे अवाजवी लाड करतात त्या पालकांची मुले आयुष्यात कमजोर व घरात हट्टी असतात.

४) घरात आजी-आजोबा असतील तर त्यांच्याशी आदराने वागायला शिकवा. आजी-आजोबांशी गट्टी जमल्यामुळे मुलांचा बुद्ध्यांक वाढतो व आजी-आजोबांचे आरोग्य छान राहते. तुमचे बालपण, कुटुंबाचा इतिहास व विस्तार याबद्दल त्यांना सांगा. विविध खेळ, संगीत, नृत्य, विनोद यापैकी जमेल त्या पद्धतीने घरातील वातावरण छान खेळीमेळीच ठेवा.

५) त्यांना रोज मंदिरात न्या. संध्याकाळी देवाजवळ काही मिनिटे मुलांसोबत बसून दैनंदिन उपासना, साधनाबद्दल शिक्षण व आपल्या धर्माची व संस्कृतीची व्यवस्थित माहिती द्या. गीता पाठांतर, मनाचे श्लोक अशा स्पर्धांचे आयोजन करा.

६) दर आठवड्यात आपल्या शेजारच्या वेगवेगळ्या कुटुंबांना भेट देत चला. त्यांच्या घरच्या मंडळींची ओळख नसेल तर करून घ्या.

७) आपल्या सणांची व त्या मागच्या विज्ञानाची माहितीचा स्वतः नीट अभ्यास करून मुलांना शास्त्रोक्त पद्धतीने व उत्साहाने सण साजरे करायला शिकवा.

सणांच्या काळात बाजारात कशी वर्दळ असते ते दाखवा. सगळ्या वस्तू स्वदेशी निवडा व त्या आपल्या लोकांच्या दुकानातूनच खरेदी करा. अनेक लोक ग्राहकांना फसविण्यासाठी दुकानाची व हॉटेलांची नावे हिंदू ठेवतात. पैसे देण्यापूर्वी दुकानाचा क्यूआर कोड स्कॅन केल्यास दुकानाचा मालक कोण ते कळेल. अगदीच आवश्यक असल्याशिवाय ऑनलाईन खरेदी करू नका.

८) गीता, रामायण, महाभारत, चाणक्य सोबतच चित्रे असलेली गोष्टीची पुस्तके व आपल्या भारतीय स्वातंत्र्यवीरांची माहिती देणारी पुस्तके आणून त्यांना वाचनाची गोडी लावा.

९) अष्टांगयोग, सूर्यनमस्कार व व्यायामाची गोडी लावून स्वतःचे रक्षण करता येईल असे मार्शल आर्ट्सचे प्रशिक्षण द्या.

१०) वृक्षारोपण, संवर्धन व पर्यावरणाचे रक्षण करायला शिकवा. शक्य असल्यास घरीसुद्धा भाजीची लागवड करता येते.

*(लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)*

---

## सिनेसृष्टी

**रमेश विनायक पोफळी**
७७७५९००८२४

### भारतीय चित्रपटातील फर्स्ट लेडी-स्टंट क्वीन

# ललिता पवार

(मराठी चित्रपट कारकीर्द)



'काठेवाडी घोड्यावर पुढ्यात घ्या हो मला' तसेच 'व्हटाचं डाळिंब फुटलं...' १९४० च्या दशकात 'जय मल्हार' चित्रपटात या दोन्ही लावण्या ललिता पवार या अभिनेत्रीवर चित्रित झाल्या होत्या. आधीच्या दोन-तीन पिढ्यातील रसिकांनी खाष्ट सासूच्या, दुष्ट स्त्रीच्या व 'रामायण' मालिकेत मंथरेच्या भूमिकेत या दिग्गज अभिनेत्रीला पाहिले. त्यांनी एक काळ तब्बल २० वर्षे नायिकेच्या व अनेक बहुढंगी भूमिका केल्या.

ललिताबाईने चक्क मूकपटापासून १९२८ पासून चित्रपटात योगदान दिले. त्या काळी चित्रपट अभिनय संस्था नव्हत्या. अभिनय त्यांच्या नसानसात नैसर्गिकरीत्या भिनला होता. त्या स्वतःच अभिनयाची पाठशाळा होत्या. भारतीय चित्रसृष्टीत अगदी मूकपटापासूनच मराठी स्त्री कलाकारांचे योगदान नेत्रदीपक आहे. १९१३ साली दादासाहेब फाळकेच्या 'भस्मासुर मोहिनी' चित्रपटात पहिली स्त्री मूकपटातील नायिका दुर्गाबाई कामत व पहिली स्त्री बालकलाकार कमला गोखले होत्या. सिनेमात काम करताना प्रसंगातील कल्पनाचित्रे मनात रंगविताना जो आपसूकच नैसर्गिक भाव चेहऱ्यावर प्रकट होतो, हाच नैसर्गिक अभिनय. कुठल्याही प्रसंगात समरस झाल्यास नेत्र, भृकुटी, कपोल, नासिका, औष्ठद्वय यांच्या नैसर्गिक हालचाली आपोआप सहज होतात व चेहऱ्यावर प्रसंगानुरूप छटा उमटतात. हाच अभिनय. अभिनयाची ही रीत ललिताला अवगत होती. ७० वर्षांच्या चित्रपट कारकीर्दीत त्यांनी स्टंट, पौराणिक, सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक, कौटुंबिक अशी वेगवेगळी स्त्री पात्रे साकारली.

ललिता पवार नाशिक जिल्ह्यातील येवला (पैठणीसाठी प्रसिद्ध) येथील लक्ष्मणराव सगुण यांची कन्या. १८ एप्रिल १९१६ साली इंदूरला आजोळी अंबाबाईच्या देवळात जन्म झाला म्हणून तिला 'अंबू' हे नाव मिळाले. त्यांनी मूकपट, मराठी, हिंदी व गुजराथी बोलपट मिळून ७०० च्या वर चित्रपटात कामे केली. जगात सर्वात जास्त चित्रपटात कामे करण्याचा रेकॉर्ड मनोरमा या दाक्षिणात्य अभिनेत्रीच्या नावे आहे. बॉलिवूडमध्ये हा रेकॉर्ड ललिता पवारच्या नावे आहे. यामुळे तिची 'भारतीय चित्रपटातील फर्स्ट लेडी' म्हणून गणना व ख्याती झाली. याचा समस्त महाराष्ट्रीयन रसिकांना अभिमान वाटावा. चित्रपट व्यवसायात एवढे मोठे योगदान देऊनही तिला राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कार मिळाला नाही, ही खंत पु. ल. देशपांडे यांनी अनेकदा व्यक्त केली होती.

हिंदी-मराठी सिनेमातील खाष्ट सासू म्हटले की, ललिता पवारांचे रूप डोळ्यांपुढे येते. सासूच्या कडक शिस्तीचा व वाकडेपणाचा ताठा दाखविणारी, पांढऱ्या केसांचा भांग, सोनेरी कड्याचा चष्मा, खांद्यावर मोठी शाल, चष्म्याच्या काचातून दिसणारे प्रथम अधिकच मोठे डोळे व नंतर बारीक होणारे डोळे. साधारणपणे ३०० चित्रपटात (हिंदी-मराठी) मराठमोळी तरुणी, गृहिणी, वृद्ध महिला, खाष्ट सासू, प्रेमळ घरमालकीण, कामगार महिला आदी बहुआयामी पात्रे साकारली. या थोर अभिनेत्रीच्या संपूर्ण चित्रपट कारकीर्दीवर प्रकाश टाकणे, मोठ्यया पुस्तकाचा विषय आहे. या लेखात मूकपटापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्या तिच्या चित्रपट जीवनाचा मागोवा घेऊ.

१९२८ सालची गोष्ट आहे. कोल्हापूर मुक्कामी सिनेमा शूटिंग पाहण्याच्या जिज्ञासेने जवळच्या स्टुडिओच्या भिंतीवरून आत उडी घेतली. चौकीदाराने पकडून मूक सिनेमातील दिग्गज नानासाहेब सरपोतदारांकडे नेले. अवघ्या १२ वर्षांच्या अंबूच्या त्या देखण्या, करारी व निर्भय चेहऱ्यात त्यांना त्यांच्या चित्रपटातील नायिका दिसली. रत्नपारखीच रत्नाची पारख करू शकतो. 'पतितोद्धार' या चित्रपटाद्वारे तिचा चित्रपटात प्रवेश झाला. नैसर्गिक अभिनय अंगात भिनल्यामुळे तिने या संधीचे सोने केले. १९२८ 'पतितोद्धार' ते १९९८ 'भाई' ही तिची कारकीर्द. पुढील दोन वर्षात नऊ चित्रपट केलेत. 'ग्यालंट हार्ट' चित्रपटात तिचे लावण्य खुलले. लांब व मुलायम केसांच्या वेण्या, मोहक व रुबाबदार चेहरा. हॉलिवूड अभिनेत्रीच शोभणाऱ्या ललिताची तुलना तत्कालीन जाहिरातदार व पत्रकार वसंतराव मराठे यांनी हॉलिवूड गाजवणारी ग्रेटा गार्बोशी केली. परंतु, या सुंदर चेहऱ्याला लवकरच दृष्ट लागली. अल्पकाळात आपल्या मागून येऊन पुढे गेल्यामुळे तत्कालीन काही अभिनेत्रींनी तिला त्रास देऊन संपविण्याचाही प्रयत्न केला, अशी माहिती आहे. धाडशी अंबू पोहणे, तलवारबाजी, लाठीकाठी, घुडसवारी आदी कलाबाजीत निपूण होती. स्टंट चित्रपटात ती डमी न वापरता साहसी दृश्ये सहज शूट करायची. या तिच्या धाडसी व शूर गुणांमुळे तिचे 'स्टंट क्वीन' म्हणूनही तिचे नामकरण झाले होते. खालील काही प्रसंगात हे धाडस जीवावरही बेतले, पण माघार घेईल ती 'स्टंट क्वीन' कसली?

गनिमी कावा, नया जमाना, रावी, पृथ्वीराज संयोगिता चित्रपटात जीवघेण्या प्रसंगातून ती सहीसलामत सुखरूप बाहेर पडली. मात्र 'जंग-ए-आझादी' चित्रपटात मा. भगवानच्या हातून थप्पड खाण्याच्या प्रसंगात त्यांचा डावा डोळा कायमचा बारीक झाला होता. बॉलिवूडमधील दक्षिणेत जाऊन चित्रपटात कामे करणारी ती पहिली स्त्री अभिनेत्री ठरली. 'समशेर बहाद्दूर' व 'ठकसेन राजपुत्र' हे तिचे तेथील मूकपट खूप गाजलेत. महाराष्ट्राच्या अभिमानात भर पडली. अशा कितीतरी बाबतीत या अभिनेत्रीने आपले कर्तृत्व सिद्ध केले.

मुंबईत आल्यावर ललिता पवारने तीन चित्रपट केले. 'नेकदोस्त' या चित्रपटात तिहेरी भूमिका केली. नायिका, खलनायिका व आई अशी विविधांगी भूमिका करणारी ही पहिली अभिनेत्री ठरली. १९३२ साली १५ चित्रपटांचा करार करून पूर्ण केले. १९३५ साली 'हिम्मत-ए-दर्द' या बोलपटात पदार्पण केले. चंद्रकांत कदम नायक व तिच्या थोरल्या बहिणीचे यजमान जी. पी. पवार हे निर्देशक होते. एका माहितीद्वारे तिचा जी. पी. छवारांशी विवाह झाला होता. एवढे मात्र खरे की, या चित्रपटाद्वारे त्या अंबू सगुणेच्या 'ललिता पवार' झाल्या.

एके ठिकाणी असेही वाचण्यात आले की, त्यांचा विवाह तत्कालीन संगीतकार हनुमान प्रसादशी झाला होता. (थोर संगीतकार सज्जाद हुसेन हे हनुमान प्रसादचे काही काळ सहायक होते. प्रसिद्ध गायिका गीता रॉय (दत्त) हिला सिनेमात हनुमान प्रसादनेच संधी दिली होती.)

ललिता पवारने १९३८ साली 'अंबिका पिक्चर्स' ही स्वतःची संस्था काढली. जवळपास ४० चित्रपट काढलेत. 'दुनिया क्या है' हा तिचा पहिला सामाजिक चित्रपट ठरला. मा. विनायक यांचा 'अमृत', आनंदकुमार यांचा 'गोरा कुंभार', भालजी पेंढारकर यांचा 'नेताजी पालकर', व्ही. शांतारामसोबत 'होनाजी बाळ', 'मतवाला शायर', 'परछाई' व 'दहेज' या नावाजलेल्या चित्रपटात तिने कीर्तिमान शाबीत केला. त्या काळातील प्रतिभावान कलाकार बाबुराव पेंढारकरांबरोबर ललिता पवारची जोडी खूप गाजली. मूकपटापासून बोलपटापर्यंत आजवर ललिता पवारने अभिनयाचे सर्व कंगोरे उलगडून दाखविले, तरीपण प्रभातच्या १९४४ सालच्या 'रामशास्त्री' चित्रपटातील तिने साकारलेली 'आनंदीबाई'ची भूमिका सर्वश्रेष्ठ ठरली. त्यातील एक प्रसंग देण्याचा मोह आवरीत नाही.

प्रसंग असा-- ध चा मा करून नारायणचा वध करण्याआधीच्या एका दृश्यात रघुनाथराव, आनंदीबाई, नारायणची पत्नी, नारायण ही पात्रे उभी राहून संवाद साधत होते. हातावर लोंबणारे मोठ्या व लांब पदराचे नऊवारी पातळ, खोप्याचा आंबाडा, मोठी नथ अशा मालकिणीच्या तोऱ्यात आनंदीबाई खरमरीत संवाद म्हणत तिथून फणकाऱ्याने निघून जाताना हातावरील लोंबता पदर अशारीतीने मागे भिरकावला की, बाजूस उभ्या असलेल्या नारायणच्या बायकोच्या कपाळावरील ठसठशीत कुंकू अलगत पुसल्या गेले. एकाच 'टेक'मध्ये हा प्रसंग कॅमेराबद्ध होतो .हे केवळ ललिताच्या परफेक्ट टाईमिंग अभिनयामुळे. दिग्दर्शक व रामशास्त्रीची भूमिका करणारे गजानन जागीरदार व प्रभातच्या संपूर्ण टीमने ललिताच्या तडफदार अभिनयाचे कौतुक केले. गजानन जागीरदारने तर स्पष्टच म्हटले की, या आधी दुर्गा खोट व शोभना समर्थने सादर केलेल्या आनंदीबाईपेक्षा ललिताची आनंदीबाई श्रेष्ठ ठरली. चित्रपटातील हा प्रसंग व ललिताबाईंचा अजरामर अभिनय पाहण्यासाठी रसिकांनी हा दर्जेदार चित्रपट अनेकदा पाहिला. प्रसिद्ध चित्रपट समीक्षक व पत्रकार बाबुराव पटेल यांनीही या चित्रपटाची व ललिताच्या अभिनयाची तारीफ वृत्तपत्रातून केली. एवढी ताकद असते एखाद्या कलाकाराच्या अभिनय क्षमतेत.



ललिताबाईंची चित्रपट कारकीर्द विस्तीर्ण आहे. इथपर्यंत तिच्या मराठी चित्रपटातील योगदानाचा धावता आढावा घेतला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ललिताबाईंच्या अभिनयाचा वारू हिंदी-मराठी चित्रपटात चौफेर उधळला. त्यासाठी स्वतंत्र लेख लिहावा लागेल. हिंदी चित्रपटात विविध भूमिका साकारून १९९८ साली 'भाई' या चित्रपटात काम करून त्यांनी आपला दीर्घ अभिनय प्रवास थांबविला. भारतीय चित्रपटसृष्टीत भरभरून योगदान देऊन भरभराटीला आणणाऱ्या कलाकारात ललिता पवार श्रेष्ठ ठरतील. भारतीय चित्रपटसृष्टीतील 'फर्स्ट लेडी', 'स्टंट क्वीन' बहुआयामी व्यक्तिमत्त्व रजत पडद्यावर प्रदर्शित करणाऱ्या ललिताबाईंची प्राणज्योत २४ फेब्रुवारी १९९८ रोजी मालवली. धगधगते व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड कायमचे गेले, पण तिच्या चित्रपटांद्वारे अभिनयाचे विद्यापीठ रसिकांना व नवोदित कलाकारांना मिळाले, हे नक्की.

---

## कथा

**रश्मी वाघमारे**
९९७०१७५२८०

# तू त्याची सांगाती

'इतनी शक्ती हमे दे ना दाता, मन का विश्वास कमजोर हो ना...' सुमधुर आवाजात उमा गात होती. सारं वातावरण भारावून गेलं होतं. विद्या मंदिर शाळेच्या वार्षिक उत्सवाचे आयोजन होते. ज्या माजी विद्यार्थिनींनी विशेष प्रावीण्य मिळविले त्यांचा आज सत्कार होता. उमाने मानसशास्त्रात सुवर्ण पदक मिळविले होते. रावसाहेब देशमुख यांनी सुरू केलेली विद्या मंदिर ही मुलींची एक आदर्श शाळा होती. उमा सावळी सतेज वर्णाची, भावपूर्ण डोळ्यांची, सुमारे २२-२३ वर्षांची तरुणी. परंतु आई-वडील गमावलेली एक अभागी मुलगी म्हणून सतत हेटाळणी. काका-काकूंनी नाईलाजाने आश्रित म्हणून सांभाळले, एक हक्काची मोलकरीण मिळाली जणू! ती हुशार असल्यामुळे शिकली, उत्तम गुणांमुळे शिष्यवृत्ती मिळवत पदवीधर झाली मानसशास्त्र विषय घेऊन. त्यानंतर बी.एड केले आणि तिथल्याच विद्या मंदिर या नामवंत शाळेत रुजू झाली.

रावसाहेब देशमुख या गावातील एक बडे प्रस्थ! त्यांनी त्यांच्या मुलासाठी-महेशसाठी उमाचा हात मागितला. त्यांच्या मोठ्या इस्टेटीचा, जमीन-जुमल्याचा तो एकमेव वारसदार. काका-काकूंना आनंद झाला. एवढ्या मोठ्या घरात उमाची सोयरीक होणार, गावात आपला दबदबा वाढणार. महेश पुण्याला होता शिकायला, त्यामुळे कुणाला फारसा माहीत नव्हताच. कधीतरी सुट्टीत यायचा. उमाला फोटो दाखविण्यात आला. दिसायला तर चांगलाच होता महेश. रावसाहेबांनी लग्नाची जरा घाईच केली. एकदम आठ दिवसात लग्न. नंतर म्हणे मुलाला ग्रहदशा अनुकूल नाही.

काका-काकू हरखले. त्यांचा व्यवहार बदलला, ती अभागी मुलगी नशीबवान म्हणवली जाऊ लागली. अचानक उमाचे महत्त्व वाढले. सर्व नातेवाईक तिच्याशी आता जवळिकीने वागायला लागले. उमाला पण सारे हवेहवेसे वाटू लागले, पण एक शंका तिच्या डोक्यात सारखी येत होती, महेश शिकलेला देखणा.. मग छोट्या गावातील आपल्या सारख्या एका अनाथ मुलीमध्ये रावसाहेबांना असे काय दिसले की, त्यांनी घरी येऊन तिला एकदम मागणीच घातली.

रावसाहेब देशमुख आणि त्यांची पत्नी सावित्री लगोलग तिला कुंकू लावायला आले, तेव्हा त्यांनी उमाला भरजरी पैठणी, सोन्याचे गळाभर दागिने आणि मोठमोठ्या भेटवस्तू देऊन काका-काकूंना अक्षरशः दिपवून टाकले. मुळातच तरतरीत असलेली उमा तिचे सौंदर्य जणू नव्याने उमलले, झळाळून उठले. पुढच्या आठ दिवसात एका आटोपशीर समारंभात उमा रावसाहेब देशमुख यांची सून म्हणून गृहप्रवेश करती झाली. सजवलेल्या वाड्यात गृहप्रवेशाचा देखणा समारंभ झाला. महेश पण आनंदी दिसत होता; मात्र त्याने तिच्याकडे सरळ असे एकदाही बघितले नाही. सावित्रीबाईंनी उमाला एक भले मोठे दालन दाखविले. तिथे अप्रतिम सजावट होती. त्या म्हणाल्या,

''तुम्ही आपले सामान इथे ठेवा आणि आता आराम करा. दिवसभर खूप दगदग झाली आहे.'' उमा जरा सैलावली. तिने भारी पैठणी बदलून एक साधीशी निळ्या रंगाची बारीक जरी असलेली साडी बदलली. केसांचा एक शेपटा घालून, ती तिथल्या मोठ्या आरामखुर्चीवर विसावली.

ती विचार करू लागली. आठ दिवसात इतका बदल माझ्या आयुष्यात? गेले अनेक दिवस अव्याहत चाललेली दगदग, गडबड, गोंधळ आणि डोक्यात विचारचक्र, तिचा थकून डोळा लागला. जाग आली तेव्हा चक्क संध्याकाळ झाली होती. ती संकोचली आणि घाईघाईने जिना उतरून खाली आली.

''...ते मला जरा.'' चाचरत ती म्हणाली.

''काही हरकत नाही सूनबाई, आम्हाला माहीत आहे तुम्ही खूप दमला आहात.'' एक दमदार आवाज आला, रावसाहेब देशमुख यांचा! ती किंचित आश्वस्त झाली. जेवणे आटोपली. दुसऱ्या दिवशीची सकाळ, सुस्नात उमा सकाळी खाली उतरली आणि त्या भल्या मोठ्या स्वयंपाकघरात गेली. तयार असलेला नाश्ता सर्वांना वाढला; तिलाही आग्रहाने नाश्ता करायला बसविले.

''महेश, चल ये, तूही नाश्ता करायला'' सावित्रीबाई म्हणाल्या. महेश खाली पाहात टेबलाजवळ आला. आपल्या प्लेटमधील पदार्थ खाऊ लागला. कोणीतरी त्याला मदत केली; मात्र त्याच्या चमच्यातला पदार्थ त्याच्या कपड्यांवर सांडला. त्याच्या मागे उभा असलेला एक गडी रुमालाने ते सगळं साफ करू लागला. तो अजिबातच उमाकडे बघत नव्हता. उमाच्या डोक्यात किंचित प्रकाश पडला आणि ती ताडकन उभी राहिली... 'रावसाहेब...' तिच्या तोंडून शब्द फुटेना.

''हे काय? महेश नॉर्मल नाही काय?'' ती मटकन तशीच खुर्चीवर बसली. रावसाहेब व सावित्रीबाई दोघेही तिच्या समोर हात जोडून डोळ्यात अश्रू आणून उभे राहिले.

''सूनबाई, आम्ही तुम्हाला मुद्दाम सांगितलं नव्हतं, महेश तसा चांगला आहे. त्याला सर्व काही समजतं. तो शिकलेला आहे. त्याने विशिष्ट विषयात प्रावीण्यही मिळविले आहे, पण तो आत्ममग्न आहे. तुमच्यामध्ये आम्हाला एक कर्तबगार मुलगी दिसली जी पुढे महेशला सावरून घेऊ शकेल म्हणून आम्ही हे घोर पाप केले तुम्हाला न सांगता.'' दोघेही हात जोडून माफी मागू लागले.

...हे काय वाढून आलं माझ्यापुढे? मी आगीतून फुफाट्यात पडले. माझ्या नशिबात सरळ साधे काहीच नाही काय...? उमा व्याकुळली, हादरली. ती धावत धावत जिन्यावरून तिच्या दालनाकडे पळाली. हे सर्व रावसाहेबांना आणि सावित्रीबाईंना अपेक्षितच असावं. त्यांनी महेशला म्हटले,

''जा, वर जाऊन त्यांची समजूत काढा.''

महेशला कितपत कळले कोण जाणे, पण तो खाली मान घालून जिन्याच्या कठड्याला धरून हळूहळू चालत तिच्या दालनाकडे निघाला. ती उशीत डोकं खुपसून रडत होती. तिने मान उचलून पाहिले तेव्हा त्याने स्वतःच्या खिशातून एक रुमाल काढून दिला, आणि तिला 'जाऊ नका, जाऊ नका' असे एकच वाक्य दोन-तीनदा म्हणाला. त्याच्या डोळ्यातले आर्त भाव बघून तिचे मन हेलावले. पण आपले संपूर्ण आयुष्य कसे काढायचे या विचाराने तिचे डोके गरगरू लागले. हा काय नवीन भोगवटा माझ्या नशिबी? ती उठून बसली, मन विषण्ण झालेलं!

बराच वेळ ती तशीच पडून होती. डोळे उघडले तेव्हा पाहिलं महेश तिथेच बसून होता. तिच्या पायाजवळ! अरेरे!.. ती उठली आणि खाली आली. तोंडावर पाण्याचा शिपका मारला. सध्या तरी कोणताही विचार करायचा नाही असा तिच्या मनानं कौल दिला. रावसाहेब आणि सावित्रीबाई तिच्याकडे अपराधी नजरेने बघत राहिले, तिच्या मागोमाग महेशही उतरला.

''चला जेवायचे ना?'' तिने एक सामायिक प्रश्न केला. सगळेच उठले. खरं तर तिचा जीव दडपला होता. काय असेल माझ्या या नात्याचं भविष्य, कसं होणार माझं?

जेवणे आटोपली. महेश तिच्या समोर येऊन उभा राहिला, जणू डोळ्यांनी विनवत होता. त्याने आपली वह्या-पुस्तके आणली आणि तिला दाखवू लागला. ती घेऊन बघू लागली. त्याची डिझाईन्स मशीनच्या एका विशिष्ट भागाची होती. त्याचा त्या विषयात डिप्लोमा होता; मात्र त्याला नीट सांगता येत नव्हते. उमा विमनस्क होती, चिंतित होती.

असाच एक आठवडा गेला. त्याला तिच्याशी सलग संवाद करता येत नसे. सासूबाईंनी सांगितले, त्याला कसं समजून घ्यायचं. तो खाणाखुणा करून बऱ्याच गोष्टी सांगत असे. उमा लक्ष देऊन ऐकत राही. रावसाहेबांनी आतापावेतो त्याच्यावर केलेल्या उपचारांची संपूर्ण कागदपत्रे तिला दाखवली. उमा दररोज शाळेत जात होती. तिने आधीच हे सांगितले होते की, ती नोकरी सोडणार नाही. मुलांना शिकवणे हे तिच्या जीवनाचे लाडके ध्येय होते. ती शाळेतून यायच्या ठरावीक वेळी महेश तिची वाट पाहत राही. त्याला त्याच्या भावना व्यक्त करता येत नसत; मात्र त्याच्या चेहऱ्यावर आनंद दिसत असे. दोन महिन्यांनी तो तिच्याकडे थोडेफार बघू लागला, किंचित हसू लागला.

उमाने ठरवले जे काही शक्य आहे ते सारं काही करायचं, महेशसाठी! नियमित कौन्सिलिंगचे सेशन, बोलण्यातील सुसूत्रता, त्यासाठी ती त्याला घेऊन मुंबईच्या एका मोठ्या सेंटर फॉर ऑटिस्टिकमध्ये गेली. तिथे अनेक प्रकारच्या नवीन चाचण्या झाल्या, बरीच चर्चा झाली. रावसाहेब आणि सावित्रीबाई सतत तिला प्रोत्साहन देत आणि आधार देत.

''तू कर त्याच्यासाठी जे जमेल ते, आम्ही तुला मदत करू'' अशी त्यांची भूमिका असे. ती शाळा, घर, जबाबदाऱ्या आणि महेशच्या उपचारांमध्ये गरगर फिरू लागली. तसाही माहेरचा कोणताच ओलावा शिल्लक नव्हताच.

महेशचे त्या विशिष्ट डिझाईनमधले ज्ञान अफाट होते. त्याला तो भाग बनवायला फार आवडत असे. त्याचे अचूक ज्ञान, चिकाटी पाहून रावसाहेबांनी ठरवले त्याला एक छोटासा कारखाना काढून द्यायचा! महेशने मूळ काम करायचे आणि बाकीची मदत इतरांनी करायची असे ठरले.

बघता बघता एक वर्ष झालं! आता उमा आणि महेशमध्ये बऱ्यापैकी दोस्ती झाली होती. आज त्यांच्या लग्नाचा दुसरा वाढदिवस होता. महेश आता तिच्याकडे प्रेमभरल्या नजरेने पाहू लागला. तिला आवाज देताना 'उमा' म्हणताना त्याला खूप आनंद होत असे. त्याचा छोटासा कारखाना व्यवस्थित चालू लागला. त्यावर निगराणी देखरेख करायला त्याला समजून घेणारी त्याची जोडीदार होतीच की!

आज देशमुख परिवारासाठी अत्यंत आनंदाचा दिवस होता. महेशला 'तरुण उद्योजक' असे शासनाचे उत्तेजनार्थ बक्षीस मिळणार होते. उमा-महेश आणि देशमुख परिवार दिल्लीला निघाले होते. महेश मोठ्या गर्दीतून पारितोषिक घेऊन पुढे आला आणि त्याने ते मेडल उमाच्या हातात दिले. उमाने त्याला आज प्रेमाने मिठी मारली होती भर गर्दीत, जशी एका जोडीदाराला मारतात अगदी तशी! रावसाहेब आणि सावित्रीबाईंच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. ते म्हणाले,

''पोरी, तू जिंकलीस आणि आम्ही पण जिंकलो, आमचा निर्णय योग्य होता. आता आम्हाला काळजी नाही, तू त्याची सांगाती आहे.''

# ‘शुद्ध ज्याचा भाव झाला, दुरी नाही देव त्याला ।’

**दीपमाळ**

प्रकाश एदलाबादकर
९८२२२२२११५

वैशाख महिना लागला की, तीव्रतेने आठवण येते ती माय मुक्ताबाईची. विचलित आणि विषण्ण मनाला शांत करणाऱ्या आणि योग्य मार्गावर आणणाऱ्या तिच्या ताटीच्या अभंगांची! मन विचलित होण्याचे, संभ्रम निर्माण होण्याचे, अवसान गळून पडण्याचे, किंकर्तव्यमूढ होण्याचे, दिशाहीन होण्याचे असे अनेक प्रसंग व्यक्तीच्या आयुष्यात येत असतात. त्यावेळी त्याला, त्याच्या अंतरंगातील कौशल्याची जाणीव करून द्यावी लागते. त्याच्या आतील शक्तीची ओळख करून द्यावी लागते. संभ्रमावस्थेने किंवा अन्य कोणत्याही कारणाने व्यक्ती स्वतःचीच ओळख विसरते. त्याच्या आतील आत्मशक्तीचा त्याला विसर पडतो. तो दिशाहीन होतो. अशावेळी त्याला कुणीतरी सांभाळून घेणारे हवे असते. त्याला योग्य मार्ग दाखविणारे हवे असते. एकदा का त्याला, त्याच्या अस्तित्वाची आणि त्याच्या प्रयोजनाची जाणीव झाली की, अशी व्यक्ती महान कार्य करून जाते. असे दीपस्तंभ आणि मार्गदर्शक आज समाजात हवे आहेत. प्रत्यक्ष महाबली हनुमंतालाही त्याच्या शक्तीची आठवण जाम्बुवंताने करून दिल्याची त्रेतायुगातील कथा आहे. युद्धापासून निवृत्त होण्याच्या मनःस्थितीत असलेल्या अर्जुनासारख्या महापराक्रमी धनुर्धराचा मोह नष्ट करून भगवान श्रीकृष्णाने त्याला, त्याच्या निहित कर्माची जाणीव करून दिली आणि युद्धप्रवृत्त केले ही कथा द्वापारयुगात आहे...

जाम्बुवंताने हनुमंताला केलेल्या उपदेशाने रामायणाची दिशा बदलली. भगवंताने अर्जुनाला केलेल्या उपदेशाने महाभारताने वेगळेच वळण घेतले. अगदी तसेच संत मुक्ताबाईने करुणासागर ज्ञानदेवांना केलेल्या उपदेशाने महाराष्ट्राच्या भाग्याला उज्ज्वल वळण मिळाले. ही कथा कलियुगात घडलेली आहे ७०० वर्षांपूर्वी. गावात माधुकरी मागायला गेलेल्या ज्ञानोबांच्या झोळीत, गावातील विघ्नसंतोषी मंडळींनी शेणमाती कालविली. आपल्या झोळीत लोकांनी कालविलेल्या शेणमातीने तो शांतिब्रह्म योगीश्वर संतापून गेला, दुखावला. आपल्या झोपडीत जाऊन बसला. झोपडीची ताटी बंद केली. नदीवरून परतलेल्या मुक्ताईने ती बंद ताटी पहिली. ती ब्रह्मचित्कला आदिशक्ती होती. तिला परिस्थितीची कल्पना आली. तिने ज्ञानोबांची समजूत काढली. त्यांच्या अंगीकृत ईश्वरी कार्याची आठवण करून दिली. तेच ताटीचे अभंग! कुणाच्याही सुखाच्या झोळीत माती कालविण्याचे कसब असलेली मंडळी आजही समाजात विद्यमान आहेत. सर्वच क्षेत्रात असे लोक आजही आहेत. पण ज्यांच्या झोळीमध्ये आजही अशी विघ्नसंतोषी माती कालविली जाते, त्या प्रत्येकाच्या वाट्याला मुक्ताई येतेच असे नाही. मायेचा अपरंपार ओलावा मनात साठवून, वाणीने मात्र अत्यंत परखड आणि यथातथ्य उपदेश करणे या वृत्तीलाच मुक्ताई म्हणतात. या वृत्तीला कोणत्याही व्यावहारिक लोभाची आस नसते. आपपरभावाच्या पल्याड गेलेली, नातेसंबंधांच्या पलीकडे पोचलेली ही माया असते.

"योगियांचे ध्यान पै विश्रांती ।
आदिशक्ती म्हणती तुम्हालागी।
नित्य मक्त तुम्ही सर्व जीवा वंद्य ।
अकार उकार मकार भेद मावळला ॥
अहंकार सोहं तुमचा प्रकार ।
वेदशास्त्रसार तुम्ही जाणा ।
अनुग्रह कृपेचा मजलागी द्यावा ।
एकाजनार्दनी करावा कृपामात्र ॥"

नाथ महाराज म्हणतात ते खोटे कसे असेल बरे? मुक्ताईचा अधिकार फार मोठा होता. ज्ञानदेवांच्या भिक्षेच्या झोळीत तत्कालीन समाजकंटकांनी शेण आणि माती कालावल्याची कथा सांगितली जाते. ज्ञानदेव संतापून गेले. त्यांना वाईट वाटले आणि ते आपल्या झोपडीत येऊन बसले. रागावलेल्या ज्ञानमाउलीला मुक्ताईने हळुवारपणे समजावले. त्यांच्यातील योगसामर्थ्याची, संतत्वाची, एका यथार्थ अधिकाराने मुक्ताईने जाणीव करून दिली. ताटीचे अभंग हे त्याचे शब्दरूप आहे. मुक्ताई, ज्ञानोबांना ते संत असल्याची जाणीव करून देतात. त्यांना त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण करून देतात. त्यांचे आत्मभान जागृत करतात. ताटीच्या अभंगांचा एकूण सूर जरी विनवणीचा असला, तरी त्यात आग्रह, आर्जव आणि ज्ञानाचा अधिकार आहे. मोठ्या भावाचा रुसवा दूर करणारी लडिवाळ बहीण असे जर या उपदेशाचे दृश्य रूप असेल, तर एका योगिनीने दुसऱ्या एका योगीश्वराला त्याच्या साधनेची आणि कर्तव्याची जाणीव करून देणे हे त्याचे अंतर्निहित रूप आहे. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे यातून मुक्ताईने संत लक्षणे सांगितलेली आहेत...

"योगी पावन मनाचा । साही अपराध जनांचा ॥
विश्व रागे झाले वन्ही । संती सुखे व्हावे पाणी ॥
शब्दशस्त्रे झाले क्लेश । संती मानावा उपदेश ॥
विश्व पट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"

मुक्ताई ही सर्व भावंडात लहान आहे. निवृत्ती, ज्ञानदेव आणि सोपान यांची ती लहान बहीण आहे, असे म्हणण्यापेक्षा हे तिघे, तिचे मोठे भाऊ आहेत, असेच म्हणावे लागेल. तिचा अधिकार असामान्य होता. "ज्या सामान्य लोकांचा उद्धार करायला तुझा जन्म झाला आहे, त्यांचा राग कशाला करतोस?" असा प्रश्न विचारत ती ज्ञानोबांना म्हणते, "तुला जगाचा आणि जगायचा कंटाळा आला? असा विचार योग्य नाही. तुझी आजवरची साधना या जगाच्या उद्धारासाठीच कामी येणार आहे. आता तुला आलेला जगाचा राग त्यांच्याच कामी येणार. तुला कुणाशीही बोलावेसे वाटत नाही ना, मग नको बोलू की कुणाशी. स्वतःशी बोल. मग आपोआप सगळ्यांशी बोलायला लागशील. तू साक्षात ज्ञानाचा अवतार आहेस. ज्ञानच आमच्यावर रुसून बसले तर आम्ही जायचे कुठे?"

"संत तोचि जाणा जगी । दया क्षमा जायचे अंगी ॥
लोभ अहंता नये मना । जागी विरक्त तोचि जाणा ॥
इह परलोकी सुखी । शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी ॥
मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"

ताटीच्या अभंगात मुक्ताई ही ज्ञानदेवांची लहान बहीण राहिलीच नाही. ती झाली होती त्यांची आई! तो संवाद केवळ दोन बहीण भावांचा नव्हता, तर नाथपंथातील दोन सिद्ध साधकांचा होता. परंपरेमध्ये प्रक्षेपक अभंग म्हणून प्रसिद्ध असलेल्या ताटीच्या अभंगातून मुक्ताईने संपूर्ण योग उभा केलेला आहे. मुक्ताईने केलेला हा उपदेश म्हणजे एकप्रकारे भागवत धर्माची विचारपरंपराच आहे. ज्ञानदेवांच्या हातून "सुखसागर आपण व्हावे । जग बोधे निववावे" या उक्तीला अनुसरून लोकोद्धार घडला. हे सुखसागर होणे सोपे नसते. त्याला आवश्यक असते सहनशीलता. ताटीच्या अभंगांच्या निमित्ताने मुक्ताईने ज्ञानोबांना ही सहनशीलता, ही सहनसिद्धी दिली, असे नाही का वाटत? आज समाजात आणि कुटुंबातही ही सहनशीलता नष्ट झालेली आहे. प्रत्येकच जण फक्त आणि फक्त स्वतःभोवतीच गरगरतो आहे. स्वार्थ हाच एकमेव परमार्थ झाला आहे. आपले भले व्हावे हे प्रत्येकालाच वाटते, पण त्याच सोबत इतरांचेही भले व्हावे, ही भावनाच नष्ट झालेली आहे. अशा वेळी मुक्ताईचेच शब्द आठवतात-

"एक आपण साधू झाले । येर कोण वाया गेले ॥
उठे विकार ब्रह्मी मूळ । अवघे मायेचे गबाळ ॥
तेथे कोणी शिकवावे । सार साधुनिया घ्यावे ॥
लडिवाळ मुक्ताबाई । जीव मुद्दलाचे ठायी ॥
तुम्ही तरून विश्व तारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"

करुणेचा सागर असलेला तो शांतिब्रह्म योगीश्वरही संतापून जावा, अशी मंडळी त्या काळात होती. त्यांची वळवळणारी पिलावळ आजही समाजात आहे, फक्त नाही ती मुक्ताई! तिच्या उपदेशानेच माउलीच्या मनात करुणा जागृत झाली. स्वतःसोबत अवघ्या मानवजातीचे कल्याण करणारी ‘भावार्थदीपिका’ त्यांचा मुखातून प्रकट झाली. विश्वाचे आर्त प्रकट झाले.

"वरी भगवा झाला नामे । अंतरी वश्य केला कामे ॥
त्याला म्हणू नये साधू । जगी विटंबना बाधू ॥
आप आपण शोधूनि घ्यावे । विवेक नांदे त्याचा सवे ॥
आशा दंभ अवघे आवरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ॥"

शेवटी परमेश्वर भक्ती म्हणजे तरी काय? स्वतःचे अंतरंग शोधणे. प्रत्येकाच्या वाटा जन्मसिद्ध असतात. परंतु त्यात एक वाट नक्कीच देवाकडे जाण्याची असते. देवाकडे जाण्याची म्हणजे नेमकी कुठे? ही वाट असते आपल्याच अंतरंगात जाण्याची. आपलाच शोध घेण्याची. स्वतःचा शोध हाच परमेश्वराचा शोध. जो स्वतःला शोधतो तोच विवेकी असतो. कुठलीही अपेक्षा-आशा कुणाकडूनही ठेवू नका आणि अहंकार तर पूर्णतः विसर्जित करा, असा माउलीला उपदेश करणारी मुक्ताई म्हणजे केवळ त्या भावंडांचीच नव्हे तर संपूर्ण मानवजातीची प्रेरक शक्ती आहे. आपण आपलीच कठोर चिकित्सा करायला लागलो की, आपल्या जाणिवा स्पष्ट व्हायला लागतात. आपण कशासाठी जन्मलो याचे भान येते. आपले मन सर्वशक्ती समन्वित होते. म्हणून अस्थिर आणि चंचल मनाला समजावण्याचा उपदेश मुक्ताईने या ताटीच्या अभंगांच्या माध्यमातून केलेला आहे.

"शुद्ध ज्याचा भाव झाला । दुरी नाही देव त्याला ॥
अवघी साधने हातवटी । मोले मिळत नाही हाटी ॥
अहो आपण तैसे व्हावे । अवघे अनमानुनि घ्यावे ॥
ऐसे केले सद्‌गुरुनाथे । बापरखुमादेवी कांते ॥"

संपूर्ण विश्वाला तुम्हाला तारून न्यायचे आहे, असे मुक्ताई ठामपणे सांगते. माउलीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देते. तो क्षण मराठी जगताच्या आणि साहित्याच्या इतिहासातील सुवर्णक्षण आहे. भावार्थदीपिकेच्या म्हणजेच ज्ञानेश्वरीच्या निर्मितीची बीजे या ताटीच्या अभंगांमध्ये आहेत, असे सहजपणे वाटून जाते.

"मग आर्तचिनि वोरसे । गीतार्थ ग्रथनमिसें ।
वर्षला शांतरसे । तो हा ग्रंथु ॥"

अशी भावार्थदीपिका-ज्ञानेश्वरी निर्माण झाली. महाराष्ट्राच्या मातीचा उद्धार करून गेली. याला कारण मुक्ताईचा उपदेश, तिचे द्रष्टेपण! मुक्ताईचे आयुष्य होतेच किती? आश्विन शुद्ध प्रतिपदा शके १२०१ चा जन्म आणि वैशाख वद्य दशमी शके १२१९ हा समाधी दिन! लौकिक वय म्हणाल तर अवघे पावणेअठरा वर्षांचे आयुष्य. चांगदेवांना तिने केलेला उपदेश, संत नामदेवांचे केलेले अहंकारहरण, तापी नदीच्या तीरावर फुलविलेला भक्तीचा मळा असे अनेक प्रसंग तिच्या लौकिक आयुष्यात घडले. या प्रसंगांवर एकेक ग्रंथ लिहिता येईल. संत नामदेव लिहितात की, संत निवृत्तिनाथांनी तिला विचारले...

"निवृत्तीने एकांत केला मुक्ताईसी ।
गमन कोणे एके दिवशी आरंभिले ॥
मुक्ताई म्हणे जावे यावे कोठे ।
अवघे निघोट स्वरूप स्वामी ॥
गर्जता गगन कडाडली वीज ।
स्वरूपी सहज मिळियेली ॥
मावळला दीप ज्योत कोठे होती ।
सहज सामाविती निरंजनी ॥"

ऐन वैशाखाच्या जळत्या उन्हात, तापी तीराच्या वाळवंटावरील कोरड्याठण्ण आकाशात ढग दाटून आले. गडगडाट झाला. प्रचंड कडकडाटासह विजेचा चकाकता प्रचंड लोळ वाळवंटी आला आणि मुक्ताई त्यात विलीन झाली.

संत नामदेव लिहितात...

"कडाडली वीज निरंजनी जेव्हा ।
मुक्ताबाई तेव्हा गुप्त झाली ॥
वैकुंठी लक्षघंटा वाजती एक घाई ।
झाली मुक्ताबाई स्वरूपाकार ॥
नामा म्हणे देवा कैचे आता काही ।
आम्हा मुक्ताबाई बोलली नाही ॥"

---

**सुखात्म**

डॉ. अविनाश भास्कर मोहरील
९४२३१२३९०६



# काय काय शिकवाल?

हा लेख वाचू शकणाऱ्या प्रत्येकाला मी आज एक छोटीशी गंमत करायला लावणार आहे. प्रत्येकाने काही क्षणापुरते आपले आयुष्य टाईम मशीनमध्ये टाकल्यागत मागे न्यायचे आणि मनाने थेट बालपणात पोहोचायचे... पोहोचलात? अरेरे... लगेच स्वप्नाळू होऊ नका. लगेच ‘बालपण देगा देवा’ वगैरे तूर्तास नको. कारण मला एका महत्त्वाच्या विषयावर तुमच्याशी बोलायचे आहे. चला तर मग! झालात मनाने लहानगे? ठीक! आता आठवा पाहू आपल्याला कोणत्या कोणत्या गोष्टी आपल्या आई-वडिलांनी किंवा गुरुजींनी किंवा स्पेशल ट्रेनरने शिकविल्या? आणि आपणच आपल्या किती गोष्टी शिकलो? जसे, आपल्याला पाढे आणि इंग्रजी ग्रामरचे नियम गुरुजींनी शिकविले. सायंकाळी देवाजवळ ‘शुभम् करोति’ म्हणायला आजीने शिकविले. आकडेमोड करायला आजोबांनी शिकविली. नीट वागणे-बोलणे आई-बाबांनी शिकविले. साधारणपणे आपल्या प्रत्येकाच्याच बाबतीत जीवनाचे हे सारे प्राथमिक धडे याच मंडळींकडून आपण शिकलो. परंतु, आता मी आपल्या बालपणीच्या काही गोष्टी सांगणार आहे, ज्याचे ट्रेनर आपल्याला सापडत नाहीत. या सगळ्या गोष्टींचे आपण शिक्षण घेतले नाही, तरी आपण सारे या सर्व बाबींमध्ये तरबेज होतो. किंबहुना आपल्यापैकी काही जण तर या सर्व गोष्टींमध्ये विशेष प्रावीण्य बाळगून होते. कोणत्या गोष्टी होत्या त्या? लोकांच्या बागेतून पेरू किंवा चिंचा गुपचूप तोडून आणणे आणि त्या फस्त करणे, कंचे खेळणे, गारा खेळून ढोपर फुटणे, लपाछपी, एकमेकांच्या खोड्या काढणे, मित्रांच्या नकला करणे, भांडणे करणे; त्यात सपाटून शिव्या देणे, आपल्या गुरुजींच्या नकला करणे, त्यापायी त्यांच्या हातचा मार खाणे, मातीत खेळणे, एकमेकांचे शर्ट ओढणे, अंगावर शाई उडविणे, होळीच्या दिवशी इतके रंगणे की आईलाही ओळखायला न येणे; सर्वात महत्त्वाचे म्हणजे धुमाकूळ करणे. ज्या घरांमध्ये पोरे आहेत त्या घरात केवळ हैदोस चालायचा, ते घर नीटनेटके राहण्याचा प्रश्नच नव्हता. त्या गोंधळापायी पोट्टे मारही खायचे, आया ओरडायच्या, पुन्हा आवरायच्या, परंतु परत आमची पोरे किती मस्ती करतात म्हणून कौतुकही असायचे. या साऱ्या गोंधळ व गडबड करण्याच्या गोष्टी आपल्याला कुणी शिकविल्या का? या गोष्टी काय शिकवायच्या असतात का? या सर्व मुलांच्या अंगभूत बाबी आहेत; किंबहुना मुलांचे धमाल बालपण याच बाबींनी सिद्ध होते. या सर्व गोष्टी मुलांनी कराव्या म्हणून आजकाल मुलांना या सर्व गोष्टींचे ट्रेनिंग दिले जाते व ते देखील पालकांकडून फी घेऊन, या गोष्टीवर विश्वास बसेल का? माझाही विश्वास नव्हता. खरे तर असे काही होऊ शकते, ही गोष्ट मी मानायलाच तयार नव्हतो. अशा पद्धतीचे ट्रेनिंग प्रत्यक्ष बघितल्यानंतर मात्र मी चक्रावून गेलो. आधुनिक काळात आपण प्रोफेशनॅलिझम स्वीकारायला हवा व त्याकरिता लहानपणापासूनच मुलांना वेगवेगळ्या प्रकारचे ट्रेनिंग द्यायला हवे, हे मी काही प्रमाणात समजू शकतो. मी बघितला तो प्रकार मात्र वेगळा व धक्कादायक होता. प्रोफेशनॅलिझम या थराला पोहोचावा की, लहान लहान पोरांना केवळ मशीन समजून त्यांच्याशी वागावे?

आधुनिक काळात बरेच पालक आपल्या मुलांच्या विकासाबद्दल जागरूक राहतात. स्पर्धेच्या युगामध्ये ते योग्यच आहे. म्हणूनच बऱ्याच लहान वयापासून मुलांना नीटनेटके राहणे, चांगले कपडे नीट परिधान करणे, जेवण नीट करणे वगैरे शिकविले जाते. या गोष्टींमुळे खरे तर मुले अकारणच बालपण हरवून बसतात. मुंबईच्या त्या चमकदार शाळेमध्ये जवळपास मशीन झालेली साधारण १०० पिटुकली मुले मला मैदानावर उभी दिसली. एका शिबिरांतर्गत ही मुले तेथे होती. माझ्या बहिणीने मला त्या प्रकाराबद्दल कल्पना दिली होती; प्रत्यक्षात असे काही घडू शकते, हे बघून मला काही सुचेना. या साऱ्या मुलांचे मायबापदेखील त्या दिवशी हजर होते. शिबिराचा तो शेवटचा दिवस होता. त्या दिवशी जे काही १० दिवसांमध्ये त्या मुलांना शिकविण्यात आले त्या सर्व गोष्टींचे सादरीकरण केले जाणार होते. प्रत्येकच पालक मोठमोठ्या चमकदार गाड्यांमधून आलेले होते. गाड्यांची मोठी रांग शाळेसमोर होती. कारण ज्या पोरांचे सादरीकरण होते ती पोरे नर्सरीतील होती व नर्सरीची त्या शाळेची फी पावणेदोन लाख रुपये आहे. ज्या शिबिराचा समारोप होता त्या शिबिराची १० दिवसांची फी ३० हजार रुपये होती. इतकी फी घेऊन त्या छोट्या छोट्या पोरांना काय शिकवितात, हे बघण्याची उत्सुकता मला लागलेली होती. सादरीकरण सुरू झाले व मी जे काही बघितले, त्यावर माझा अजूनही विश्वास बसलेला नाही. पालक आपल्या मुलांसोबत असे काही करू शकतात, हे कल्पनेच्या पलीकडे आहे. त्या शिबिराचे नाव होते ‘बी-ऑड.’ नावावरून काही लक्षात येत नव्हते. प्रत्यक्षात तो सारा प्रकार बघून मीच स्वतः त्या परिसरात ‘ऑड व्यक्ती’ भासू लागलो.

त्या साऱ्या पोरांनी अतिशय गोड व नेटका पांढरा शुभ्र गणवेष परिधान केला होता. अगदी नीट ॲन्ड क्लीन. त्यांच्या ट्रेनरने सादरीकरण सुरू केले. सूचनांनुसार त्या मुलांनी एक एक गोष्टी करून दाखविल्या. त्या बघत असताना त्यांचे पालक त्यांचे फोटो काढीत होते, हसत होते, टाळ्या वाजवत होते व त्यांच्यात ऑड ठरलेला मी डोक्यावर हात मारून त्यांची कीव करीत बसलो होतो. सूचना देण्यात येत होती.

**सूचना १ :** एकमेकांच्या डोक्यावर हात फिरवून भांग मोडा. पोरे दोनच्या जोडीमध्ये एकमेकांच्या केसांवरून हात फिरवत होती.

**सूचना २ :** एकमेकांचे इन केलेले शर्ट खेचून बाहेर काढा. मुलांनी तेदेखील केले.

**सूचना ३ :** बाजूच्या टेबलवर ठेवलेला शाईचा पेन उचलून एकमेकांच्या शर्टवर उडवा. मुलांनी असे केल्यावर अंगावर पाल पडल्यागत तोंडे त्यांच्या आयांनी केली.

**सूचना ४ :** एकमेकांना वाकुल्या दाखवा. मुलांनी तसे पण केले.

आता आपणा सर्वांच्या लक्षात आलेच असेल, तो वर्ग मुलांना खोड्या शिकविण्याचा वर्ग होता! खोड्या शिकवण्याचा वर्ग? होय. साधारण १० प्रकारच्या खोड्या या वर्गामध्ये शिकविल्या गेल्या व त्याचे सादरीकरण करण्यात आले. सारे काही संपल्यावर ट्रेनरने मुलांना सूचना दिली की, आता हे सारे विसरून जायचे व पुन्हा ‘गुड बॉय’ आणि ‘गुड गर्ल’ बनायचे. साऱ्यांना परत नीट ड्रेस अप करण्यासाठी आत नेण्यात आले व माती-शाई इत्यादींनी खराब झालेले कपडे बदलून ही पोरे पुन्हा नवा नीट आणि क्लीन ड्रेस घालून आलीत. मग बक्षीस समारंभ झाला व सर्वात चांगले खोड्यांचे सादरीकरण करणाऱ्या मुलांना बक्षिसे देण्यात आली. आपल्या चिमुरड्यांना बक्षिसे स्वीकारताना बघून काही पालकांना भरून वगैरे आले. खोड्यांच्या सादरीकरणाचा कार्यक्रम आटोपल्यावर जवळपास पालकांच्या वेडाचाराचे बळी ठरलेली, प्रोफेशनॅलिझमच्या नावाखाली सुरू असलेल्या विकृत प्रकारामध्ये भरडून निघालेली व यांत्रिकतेच्या जगामध्ये जवळपास यंत्रांमध्ये परावर्तित झालेली ती १०० कोवळी मुले शिस्तीत परत गेली. सारेच जवळपास गेले होते. मी एकटा सुन्न होऊन त्या मैदानाच्या एका टोकावर उभा होतो. कोणते भविष्य बघितले मी? कोण आहेत हे लोक जे लहान कोवळ्या मुलांना व्यापारी दृष्टिकोनातून वापरतात, त्यांच्यातले बालपण करपून टाकून त्यांना खोड्या करायला शिकविण्यासाठी वर्ग चालवितात आणि या वर्गांमध्ये आपल्या मुलांना पाठवून त्याचा आनंद घेणारे हे पालक कोण आहेत? काय हक्क आहे त्यांना या कोवळ्या मुलांना लहानपणीच प्रोफेशनल बनविण्याचा? केवळ जन्म दिला म्हणून!! त्यांना मुले म्हणून जगण्याचा अधिकार त्या सर्वशक्तिमान परमपित्याने दिलाय. तो अधिकार हरवून घेण्याचा हा प्रकार म्हणजे अमानवीय कृत्य आहे. परंतु हे सारे होत आहे. हे थांबवायला हवे. प्रोफेशनॅलिझमचा खरा अर्थ शिक्षितांनाच कळत नसेल तर त्यांना सुशिक्षित तरी कसे म्हणायचे? यासंबंधी काय म्हणावे व काय बोलावे हे सुचतच नाहीये! वाचकांना सुचत असल्यास सांगावे!! एकच म्हणावे वाटते, अजून आपल्यालाही समज आलेली नाहीये, बालपणीचं निखळ सुख कळलेलंच नाहीये. खरं सांगायचे तर सुख म्हणजे नक्की काय असतं... तेच कळलेलं नाहीये!

---

**प्रबंधांची बीजे**

श्रीरंग श्री. हिर्लेकर
९४२२१११८९३

# ‘विष्णू सहस्रनाम’ आदर्शांचा विभूतियोग

ज्या स्तुतीने आपले रक्षण होते ते स्तोत्र. या अर्थाने विष्णूच्या १००० नावांचे हे स्तोत्र पठन केल्यास आपले निश्चित रक्षण होईल, हा प्रत्येकाचा विश्वास आहे. तसे बघितल्यास अनेक दैवतांची सहस्त्रनाम स्तोत्रे आहेत. मग याचे निराळे वैशिष्ट्य ते काय? असंख्य लोक याचे श्रद्धेने पठन-श्रवण करतात. या रचनेवर आद्य शंकराचार्यांपासून ते अलिकडील अनेक थोर पंडित, विद्वान तत्त्वचिंतकांनी भाष्ये केली आहेत. प्रत्येकाची दृष्टी निराळी असली, तरी सर्वांना यात विष्णूचा अथांगपणाच जाणवला.

"पाया पडू गेले परि पाऊलची ना दिसे,
उभाची स्वयंभू असे । समोरची पाठीमोरा न कळे ॥"

अशी अवस्था सर्वांचीच झाली. सर्व तत्त्वज्ञांना या रचनेत असे काय विशेष आढळले की, त्यांनी आपली भिन्न भाष्ये करावीत? समाजधुरिण हे दीपस्तंभ असतात. त्यांना कधी काळाच्या गरजेनुसार लिहावे लागते. गीताभाष्य लिहिताना आचार्य, ज्ञानेश्वर माउली, लोकमान्य, प्रत्येकाचा दृष्टिकोन निराळा. अर्जुनाप्रमाणे ‘किं कर्म किम कर्मेति’ अशा संभ्रमित अवस्थेत सापडलेल्या हतोत्साह भारतीय समाजाला कार्यप्रवण करावयाचे म्हणून कदाचित टिळकांनी ‘कर्मयोग’ सिद्धांत सांगितला. विनोबांनी काही ठिकाणी ‘ग्रामोद्धार’ ही कल्पना मनाशी ठेवली. विष्णू सहस्रनामाविषयी असेच झाले. आचार्य, लोकमान्य, विनोबा, पंडित सातवळेकर, कुंदर दिवाण आणि अनेक अभ्यासक हे सर्वच बरोबर.

‘तुका म्हणे जे जे बोला, ते साधे या विठ्ठला’

या उक्तीप्रमाणे अनंत वेषे, अनंत देशे विविध रूपांनी नटलेल्या विष्णूला हे सर्वच लागू पडते.

‘यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।’

तसे विचारांचे हे सर्व कल्लोळ एकाच नारायणाचे गुणवर्णन करतात. नाहीतरी व्याकरणकारांनी ‘विष्णू’ हा शब्द ‘वेवेष्टि यत् व्याप्नोति तत् विष्णूः’ सर्व जगाला आतून आणि बाहेरून व्यापतो तो विष्णू असाच सोडवला आहे.

‘सबाह्य अभ्यंतरी । अवघा व्यापक मुरारी ॥’

पंडित सातवळेकरांना विष्णू रूपात आदर्श व्यक्ती, आदर्श समाज, आदर्श नेता, राष्ट्रप्रमुखाची लक्षणे दिसली. मलाही हेच रूप जास्त जवळचे वाटते. त्यांचेच मत मी अधिक स्पष्ट करीत आहे, असा विद्वानांचा ग्रह झाला तर तो मला अधिक श्रेयस्कर वाटेल आणि असे वाटण्याचे कारण-


## नामसहस्राचे प्रयोजन

महाभारताच्या अनुशासन पर्वात अध्याय क्र. १४९ मध्ये तर दुसऱ्या एका मताप्रमाणे शांतिपर्वात ही रचना आहे. युद्धारंभी गीता आणि युद्धसमाप्तीनंतर विष्णू सहस्रनाम सांगितले गेले. याचे खरे नाव नामसहस्र. सहसनाम म्हटले की, ‘सहस्र’ या संख्याविशेषणाची मर्यादा येते. विष्णू तर अमर्याद. नामसहस्र शब्दात ‘हजारो’ हा अर्थ ध्वनित होतो. तसे बघितले तर गीता आणि नामसहस्र या दोनही रचना व्यासांच्याच. मला दोन रचनेत फार साम्य आढळते. गीता म्हणजे कृष्णार्जुन संवाद तर हे स्तोत्र म्हणजे आचार्य भीष्म आणि नुकताच राज्याभिषेक झालेला धर्मराज युधिष्ठिर यांच्यातील प्रश्नोत्तरी. गीतेत अधूनमधून अर्जुनाचे प्रश्न व त्यावर कृष्णाची उत्तरे असे आहे. यात मात्र वैशंपायनांचे एका श्लोकाचे प्रास्ताविक झाल्यावर एकदाच काय ते युधिष्ठिराने सहा प्रश्न विचारले व नंतर भीष्मांनी त्याची सोदाहरण उत्तरे दिलीत. गीतेत अर्जुनाला कार्यप्रवृत्त करावयाचे होते तर येथे कोणतेही कार्य आदर्श कसे करावे ते सांगावयाचे होते.

आपली प्रबोधनाची पद्धत म्हणजे उपनिषद. नेणत्या शिष्याने जाणत्या गुरूंजवळ जावे, नम्रपणाने शंका विचाराव्यात आणि गुरूंनी आपले सर्व ज्ञानभांडार उघडे करून त्याला गतसंदेह करावे. यानिमित्त सर्व समाजाला एक नवीन तत्त्वज्ञान आपोआपच प्राप्त होते तर कधी जुनेच ज्ञान नवीन रूपात मांडल्या जाते. गीता म्हणजे सर्व उपनिषदरूपी गायींचे दोहन प्रत्यक्ष गोपालनंदन कृष्णाने सुधीर पार्थाच्या निमित्ताने करून गीतेचे अमृत जगाला दिले.

‘सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।’

पार्थ म्हणजे अर्जुन; मला मात्र या नामाचा ‘समस्त पृथ्वीवासी’ हा अर्थ अधिक प्रशस्त वाटतो.



भारतीय युद्धात प्रचंड संहार झाला. जगाची लोकसंख्या जवळजवळ ८० टक्क्यांनी घसरली. अतोनात वित्तहानी झाली. शौर्यापेक्षा क्रौर्यालाच महत्त्व आले. जगाचे नकाशे बदलले. मोठमोठे राजे, महाराजे, वीर अस्तंगत झाले. प्रजेचेही नुकसान झाले. म्हणायला धर्मयुद्ध, पण सर्व नियम तोडल्या गेले. युद्धामुळे समाजाची घडी विस्कटेल ही अर्जुनाची भीती खरी ठरली. नीती, धर्म, न्याय सर्व लयाला गेले. अशारीतीने उरल्यासुरल्या लोकसंख्येवर राज्य करण्याचा प्रसंग युधिष्ठिरावर आला.

## राजा कालस्य कारणम्:

युधिष्ठिर शककर्ता राजा होता. पंचांगात आजही त्याचा शक लिहितात. शांतिपर्वात भीष्म युधिष्ठिराला सांगतात-

"कालो वा कारणं राज्ञः । राजा वा काल कारणम् ।
इति मे संशयो मा भूत । राजा कालस्य कारणम् ॥"

राजाचे वर्तन हे परिस्थितीनुसार बदलत नसते तर राजामुळेच चांगली अथवा वाईट समाज आकारास येतो. तो स्वतःच्या वर्तनाने आदर्श समाज निर्माण करू शकतो. एकवेळ युद्ध जिंकणे सोपे, पण नवराज्याची प्रस्थापना करणे, नवीन राज्यघटना तयार करणे, प्रजेला नवीन नीतिमूल्ये, आदर्श दाखवून त्या वळणावर नेणे हे अधिक कठीण असते. एक बलाढ्य, वैभवशाली, नीती आणि धर्मयुक्त आदर्श समाज आणि राज्य उभारण्याचे आव्हान युधिष्ठिरापुढे उभे ठाकले. युद्धापूर्वी अनेक ज्ञानी, विद्वान, तत्त्ववेत्ते, धर्ममार्तंड, तेजस्वी, शूर, वीर, प्रतापी आणि विविध विषयातील आदर्शांचे मापदंड अशांनी हे भारतवर्ष समृद्ध असूनही या सर्वनाशी युद्धाची वेळ आली. मग आदर्शाची नेमकी व्याख्या ती काय, कोणता मार्ग श्रेयस्कर, काय धरावे आणि काय टाळावे, ध्येय काय असावे, चिंतन कशाचे करावे, काय केले तर, कसे वागले असता या इतिहासाची पुनरावृत्ती होणार नाही या चिंतेने युधिष्ठिराला अस्वस्थ केले व भेटीच्या वेळेस त्याने आचार्यांना सहा प्रश्न विचारून मार्गदर्शन करावे, अशी विनंती केली. धर्मराजाने त्यांना पुढील दोन श्लोकात सहा प्रश्न विचारले.

"किमेकं दैवंत लोके किं वाप्येकं परायणम् ।
स्तुवन्तः कं कमर्चन्तः प्राप्नुयुर्मानवाःशुभम् ॥२॥
को धर्मः सर्वधर्माणां भवतः परमो मतः
किं जपन्मुच्यते जन्तुर्जन्मसंसारबन्धनात् ॥३॥"

म्हणजे या विश्वात असे एकमेव दैवत कोणते आहे की, ज्याच्या आज्ञेने सर्वजण प्रेरित होतात? श्रेष्ठ अशी अंतिम गती किंवा परम प्राप्तव्य स्थान कोणते? कोणाची स्तुती आणि अर्चना करावी? कोणत्या दैवताच्या गुणगायनाने अथवा पूजनाने मानवाचे कल्याण होते? सर्वश्रेष्ठ किंवा आचरणीय असा धर्म कोणता? संसारबंधनातून सुटण्यासाठी कोणाचे चिंतन करावे?

पुढे ४ ते ११ व्या श्लोकात युधिष्ठिराच्या सहा प्रश्नांची उत्तरे देऊन आता या सर्व वैशिष्ट्यांनी युक्त अशा विश्वपती विष्णूची असंख्य गुणवैशिष्ट्ये सांगण्यास सुरुवात करताना ते म्हणतात-

"तस्य लोकप्रधानस्य जगन्नाथस्य भूपते ।
विष्णोर्नामसहस्रं मे श्रृणु पापभयापहम् ॥१२॥"

यावेळेस प्रथमच भीष्माचार्य युधिष्ठिराला ‘हे राजा’ असे संबोधन करीत आहेत. व्यास महर्षींनी फार मार्मिकतेने हे संबोधन योजले आहे. यातून धर्मराजाला त्याच्या राजधर्माची ते जाणीव करून देत आहेत आणि म्हणूनच विष्णूचा उल्लेखही ते ‘लोकप्रधान’ आणि ‘जगन्नाथ’ असाच करून म्हणतात की, अशा श्रीविष्णूची हजारो नाम-विशेषणे तू लक्षपूर्वक ऐक.

आणि येथे ‘विष्णू’ हेच नाम का वापरले तर व्युत्पत्तीप्रमाणे सर्व जगताला अंतरबाह्य वेष्टीत करतो तो. राजानेही असेच आपल्या प्रजेशी अंतरबाह्य समरस असावे हा अर्थ ते सुचवतात.

‘व्यासाय विष्णुरूपाय व्यासरूपाय विष्णवे ।’

त्या बहुआयामी बुद्धीने एकही विषय अस्पर्शित ठेवला नाही. या रचनेत धर्म, तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र, न्याय, व्यवहार, शुक्रनीती, भविष्यात उत्पन्न झालेले ‘कौटिल्याचे राज्यशास्त्र’ हे सर्व विविध उदाहरणांनी आढळते. हे स्तोत्र त्या दृष्टीने अभ्यासावे. कृष्णाने १० व्या अध्यायात आपल्या विभूती सांगितल्या आणि नंतर लगेच ११ व्यात त्यांचे प्रत्यंतर दिले. नामसहस्रातील नामांवर भाष्य करताना त्या हजारो आदर्शांचे प्रत्यंतर दिसते. व्यासांना इतर कोणतीही देवता निवडता आली असताना त्यांनी विष्णूचीच निवड केली. कारण-

"यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः ।
ऋषिभीः परिगीतानि तानि वक्ष्यामि भूतये ॥"

जगत्पती विष्णूची ही हजारो गुणविशेषणे सर्व शास्त्रांचे जाणकार, वय, ज्ञान आणि राज्य कारभाराचा दीर्घ अनुभव यांनी श्रीमंत अशा आचार्य भीष्मांच्या मुखातून पृथ्वीपती युधिष्ठिराला व्यासांनी ऐकवली. यावेळेस दोघांच्या भूमिका ज्ञानसमृद्ध गुरू आणि पिपासू शिष्य अशा होत्या.

‘नामानि गौणानि’ म्हणजे गुणवाचक नामे अर्थात विशेषणे. हे युधिष्ठिरा, अनेक मंत्रद्रष्टे ऋषी विविध माध्यमांच्या द्वारे सतत गात असलेल्या गीतातून एकाच विष्णूच्या हजारो नामातून व्यक्त होणारी हजारो वैशिष्ट्ये तू आता धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांच्या प्राप्तीकरिता कशी उपयुक्त आहेत, हे लक्षपूर्वक ऐक.

## विष्णू हा उत्तम वैद्य आहे

‘अच्युतानंत गोविंद नामोच्चारण भेषजात् ।
नश्यन्ति सकला रोगा: सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥"

औषध घेताना हा मंत्र म्हणतात. नारदपुराण, विष्णुधर्म उ. पुराण, पद्मपुराण, इतकेच नव्हे तर चरकाचार्यांचे गुरू काशिपती दिवोदासांच्या आयुर्वेद संहितेत हा मंत्र आहे. विष्णूला ‘भेषजम् भिषक’ म्हणजे औषध आणि वैद्य. (श्लो. ७५) म्हटले आहे तर फलश्रुतीत-

"वीर्यंतेजश्चविन्दति।
भवत्यरोगो द्युतिमान्बलरूपगुणान्वितः ।
रोगार्तो मुच्यतेरोगात् ॥"

असे म्हटले आहे. दुर्बलता जाऊन पराक्रम, तेज, ओज, बल, रूप व गुण हे सर्व मिळेल. अच्युत, अनंत आणि गोविंद या तीन नामांतच सर्व शारीरिक, मानसिक व भौतिक व्याधी दूर करण्याचे सामर्थ्य आहे आणि येथे तर सहस्रनामे उपलब्ध आहेत.

स्वस्थ शरीरासाठी वात, पित्त आणि कफ या तिघांचेही महत्त्व असून त्यांच्यात परस्पर साहचर्य उत्तम असते तोपर्यंतच प्रकृती उत्तम राहते. नसेल तर विकृती येते. उत्तम समाजासाठीही सत्त्व, रज आणि तम या तिघांचेही प्रमाण सम हवे. ‘वैद्यो नारायणो हरिः’ म्हणून समाजपुरुषाच्या सुदृढ आरोग्यासाठी त्रिदोषांचा समतोल सांभाळणाऱ्या श्रीविष्णूच्या या सहस्र आदर्शांचे हे फलित आहे. तेव्हा-

हे स्तोत्र नित्य पठनात असावे;
त्याहीपेक्षा चिंतनात असावे
वर्तणुकीतही उतरावे.

आणि असे झाले तरच व्यक्ती आणि संपूर्ण समाजाचेच मानसिक आरोग्य सुस्थितीत आणि बलवान राहील, हे या स्तोत्राचे खरे प्रयोजन आहे. युधिष्ठिराच्या प्रश्नांचे हे खरे उत्तर.

# साप्ताहिक राशिभविष्य

**दि. ४ मे २०२५ ते दि. १० मे २०२५**

**मिलिन्द माधव ठेंगडी**/ज्योतिष शास्त्री, ८६००१०५७४६

### आर्थिक आघाडीवर समाधान

**मेष**

या आठवड्याच्या सुरुवातीला राशिस्वामी मंगळाचा सुखस्थानात चंद्रासोबत लक्ष्मीकारक योग बनला आहे. तीन दिवस हा योग कायम राहणार असून नंतर चंद्र भ्रमण करीत सप्तम स्थानापर्यंत जाणार आहे. हे भ्रमण आपल्या आर्थिक आघाडीवर समाधानकारक स्थिती निर्माण करण्यास अतिशय उपयुक्त आहे. आपली आर्थिक बाजू बरीच सावरता येईल. नोकरी व व्यवसायात काही महत्त्वाचे टप्पे गाठू शकाल. सरकारी कामात यश मिळेल. व्यवसाय व संपत्तीविषयक महत्त्वाच्या व्यवहारांची पूर्तता आपण करू शकाल. गुंतवणुकीला चालना मिळेल; मात्र शेअर बाजारातील सौदे सांभाळूनच करायला हवेत.

**शुभ दिनांक - ४, ५, ६, ८.**

### योजना सफल व्हाव्या

**वृषभ**

या आठवड्यातील ग्रहमान बरेच गतिशील आहे. लाभ स्थानात उच्चस्थितीत असलेला आपला राशिस्वामी शुक्र हा शनी, बुध व राहूसोबत सुयोग निर्माण करीत आहे. आपल्या राशीत गुरू आहे तर चंद्राचे भ्रमण पराक्रम स्थानातून मंगळासोबतच्या लक्ष्मीयोगाने सुरू होत आहे. हे योग आर्थिक व कौटुंबिक दृष्टीने अतिशय उत्तम ठरणारे आहेत. काही मंडळींना संततीसंबंधानेदेखील उत्तम योग लाभावेत. आठवड्याच्या मध्यात नोकरी व व्यवसायाच्या संबंधाने काही शुभकारक घटना घडू शक तात. सरकारी कामात व व्यवसायाच्या अनुषंगाने योजनांमध्ये सफलता मिळेल. आपले कर्तृत्व सिद्ध होईल.

**शुभ दिनांक - ४, ६, ७, ९.**

### खर्चिक स्वभाव आवरा

**मिथुन**

या आठवड्यात आपला राशिस्वामी बुध राश्यंतर करणार आहे. सुरुवातीला तो दशम कर्मस्थानी मीन राशीत असून आठवड्याच्या मध्यात मेष राशीत लाभस्थानी दाईल. त्याचे हे राश्यंतर उपयोगी ठरेल. चंद्राचे भ्रमण धनस्थानातून मंगळासोबतच्या लक्ष्मीयोगाने सुरू होणार आहे. त्यामुळे या सप्ताहाची सुरुवात अतिशय उत्तम होऊन हा प्रगतिशील ठरावा. सारी महत्त्वाची व अर्थार्जनाला मदत करणारी कामे या आठवड्यात पूर्णत्वास नेता येतील. आर्थिक आवक वाढेल. व्यापारात लाभ होईल. नोकरीत चांगल्या घडामोडी घडतील. मात्र, खर्चिक स्वभावाच्या मंडळींनी सावध राहावयास हवे. खर्च वाढविणारी अनेक कारणे समोर दिसतील.

**शुभ दिनांक - ४, ५, ८, १०.**

### धनवर्धक व समाधानकारक

**कर्क**

या आठवड्यात राशिस्वामी चंद्र आपल्याच राशीत मंगळासोबत अतिशय शुभ व अर्थवाढीस उपयुक्त लक्ष्मीयोग बनवीत आहे. युरुवातीचे तीन दिवस हा योग सक्रिय राहील. या सोबतच लाभस्थानात गुरू व भाग्य स्थानात तीन ग्रह सक्रिय आहेत. हे सारे पाहता हा आठवडा आपणास मुख्यत्वे धनवर्धक, आनंदी व समाधानकारक जावा. काहींना आठवड्याच्या सुरुवातीलाच कामाच्या निमित्ताने एखादा प्रवास घडू शकतो. आठवड्याच्या मध्यात कुटुंबीय व आप्तेष्टांसोबत सहवासाचे योग यावेत. कुटुंबात एखादे कार्य ठरून त्यानिमित्ताने सर्वजण एकत्र येऊ शकतात. आठवड्याच्या शेवटी संततीकडून आनंदाच्या बातम्या कळतील. कार्यक्षेत्रातील हितशत्रूंपासून सावध राहावे.

**शुभ दिनांक - ४, ६, ८, १०.**

### नवीन संधी मिळेल

**सिंह**

या आठवड्यातील ग्रहमान आपणास बरेच उपयुक्त आहे. राशिस्वामी रवी दशम कर्मस्थानी उच्च राशीत उत्तम आहे. सप्ताहाच्या सुरुवातीला व्यय स्थानात मंगळासोबत लक्ष्मीयोग करणारा चंद्र पराक्रम स्थानापर्यंतचा प्रवास करणार आहे. ही स्थिती अतियश उपयुक्त, धनवर्धक व सुखदायी ठरावी. या आठवड्याची सुरुवातच मुळी आर्थिक कामांनी व्हावयास हवी. व्यवसायात आवक वाढेल. आर्थिक बाजू भक्कम होईल. जुणी येणी वसूल व्हायला हवीत. प्रतिष्ठा, मानसन्मान लाभावेत. चांगली गुंतवणूक करता येईल. आठवड्याच्या मध्यात एखादी भाग्यकारक घटना घडू शकते. नवीन संधी मिळेल. कौटुंबिक समाधान राहील.

**शुभ दिनांक - ५, ७, ८, ९.**

### चढ-उताराचा काळ

**कन्या**

या आठवड्यात राशिस्वामी बुध राश्यंतर करणार आहे. सुरुवातीला तो सप्तम स्थानी मीन राशीत असून सप्ताहाच्या मध्यात बुध अष्टम या पीडादायक स्थानात मेष राशीत जाईल. हे भ्रमण काहीसे क्लेषकारक ठरणार आहे. चंद्र मात्र या सप्ताहात लाभ स्थानी मंगळासोबत लक्ष्मीयोग करीत असून तो सप्ताहाअखेर आपल्या धनस्थानी येणार आहे. त्याचे हे भ्रमण आपणास बव्हंशी उपयुक्त असून सप्ताहाचा मधला दोनेक दिवसांचा काळ काहीसा कष्टदायक व खर्चवाढ करणारा ठरू शकेल. त्यामुळे नोकरदार वर्ग व व्यवसायात असलेल्यांना हा आठवडा जरा चढ-उताराचा काळ ठरू शकतो, मात्र आपण प्रतिष्ठा जपण्यात यशस्वी होऊ शकाल.

**शुभ दिनांक - ६, ७, ९, १०.**

### कार्यक्षेत्रात उत्तम योग

**तूळ**

या आठवड्यात राशिस्वामी शुक्र सहाव्या कर्मस्थानात उच्च स्थितीत शनी, राहू व बुधासोबत आहे. चंद्राचे भ्रमण दहाव्या कर्मस्थानातून सुरू होत आहे. चंद्र तेथे मंगळासोबत लक्ष्मीकारक शुभ योग करीत आहे. सप्ताहाच्या शेवटी चंद्र आपल्याच राशीत येणार आहे. हे सारे योग पाहता आपणास कार्यक्षेत्रात उत्तम योग लाभण्याची शक्यता आहे. आठवड्याची सुरुवात कार्यक्षेत्रातील एखाद्या उत्तम घटनेने होऊ शकेल. मधला काळ संमिश्र स्वरूपाचा राहील. मात्र पुन्हा शेवटचे दोन दिवस आर्थिक लाभ देणारे ठरावेत. व्यवसायात आर्थिक आवक वाढेल. नोकरीत आपले महत्त्व वाढेल. काही लाभ अचानक पदरी पडू शकतील.

**शुभ दिनांक - ४, ६, ८, १०.**

### सुरुवात धनवर्धक, भाग्यकारक

**वृश्चिक**

राशिस्वामी मंगळ सध्या भाग्य स्थानात नीच राशीत कमजोर झाला असला, तरी तेथे चंद्रासोबत लक्ष्मीयोग झाल्याने त्याची स्थिती सुधारली आहे. सुमारे तीन दिवस हा शुभ योग सक्रिय राहील. नंतर चंद्र पुढचा प्रवास करीत सप्ताहाअखेर व्यय स्थानी जाईल. यामुळे आठवड्याची सुरुवात अतिशय उत्तम, धनवर्धक, भाग्यकारक ठरणार असून शेवट मात्र खर्चिक, काहीसा त्रासदायक, दगदग वाढविणारा ठरू शकेल. मात्र राशीवरील गुरूची दृष्टी दोन्ही स्थितीत उत्तम असून सप्ताहाअखेर बरेच सांभाळून घेण्याचा प्रयत्न करेल. नोकरी-व्यवसायातून आर्थिक लाभ वाढावा. एखादी उत्तम संधी मिळावी. सप्ताहाअखेर आर्थिक व्यवहारात सतर्क राहावे. कुटुंबातील वातावरण उत्तम राहील.

**शुभ दिनांक - ६, ७, ८, ९.**

### उपयुक्त आर्थिक बदल

**धनू**

या आठवड्यात राशिस्वामी गुरू सहाव्या कर्म स्थानात असतानाच त्याच्या शुभ दृष्टीने आपले धनस्थान व भाग्यस्थान सक्रिय झाले आहे. अशात चंद्र अष्टम स्थानात मंगळासोबत लक्ष्मीयोग करीत आहे. अशुभ स्थानात हा योग होत असला, तरी त्याचा धनस्थानावरील प्रभाव उत्तम राहील. या आठवड्यात काही उपयुक्त आर्थिक बदल व विशेष स्वरूपाच्या घटना अनुभवास येतील. त्यामुळे सप्ताहाची सुरुवात नोकरी, व्यवसायास उत्तम ठरेल. नोकरीत असलेल्यांना स्वतःची छाप जमविता येईल. साहेबांची मर्जी मिळवता येईल. व्यवसायात प्रगती होईल. परिश्रमांना शुभ आर्थिक फलांचे वरदान देताना दिसेल. मेहनत लाभदायक ठरेल.

**शुभ दिनांक - ५, ६, ७, ९.**

### भाग्यवर्धक, लाभकारक संधी

**मकर**

या आठवड्यात राशिस्वामी शनीची स्थिती पराक्रम स्थानात शुक्र, राहू व बुधासोबत कायम असली, तरी सप्ताहाच्या मध्यात बुधाच्या राश्यंतरानंतर शनीच्या प्रभावात काही परिवर्तन होण्याची शक्यता आहे. चंद्राचे भ्रमण सप्तम स्थानापासून दशम कर्मस्थानापर्यंत होणार आहे. सप्तमात चंद्र मंगळासोबत लक्ष्मीयोग करीत असून त्याची आपल्या राशीवर दृष्टी आहे. त्यामुळे हा सप्ताह उत्तम, भाग्यवर्धक व लाभकारक संधी देणारा ठरण्याची शक्यता आहे. आतापर्यंत प्रलंबित राहिलेली काही कामे पूर्णत्वास जाऊ शकतात. युवकांना नोकरीच्या, विवाहाच्या संबंधात काही चांगल्या संधी लाभू शकतील.

**शुभ दिनांक - ४, ५, ९, १०.**

### आर्थिक, व्यावसायिक लाभ

**कुंभ**

या आठवड्यात राशिस्वामी शनी धनस्थानात शुक्र, राहू व बुधासोबत कायम असून सप्ताहाच्या मध्यात बुधाच्या राश्यंतरानंतर शनीच्या प्रभावात काही बदल होण्याची शक्यता आहे. चंद्र सहाव्या कर्म स्थानात मंगळासोबत लक्ष्मीयोग करीत आहे. या सप्ताहात चंद्र अष्टम स्थानापर्यंत भ्रमण करेल. यामुळे आपल्या कर्मस्थानात आर्थिक व व्यावसायिक आघाडीवर काही उत्तम घडामोडी घडताना दिसतील. आर्थिक लाभ होऊ शकेल. कुटुंबात समाधान राहील. कुटुंबात एखाद्या सदस्याच्या कुरबुरीमुळे त्रस्त राहाल. काही मोठे खर्च अचानक समोर येऊन अंदाजपत्रक बिघडू शकते.

**शुभ दिनांक - ४, ५, ७, १०.**

### कार्यक्षेत्रात प्रगतीचे योग

**मीन**

राशिस्वामी गुरू सध्या पराक्रम स्थानात आहे, तर आपल्या राशीस्थानात शुक्र, शनी, राहू व बुध या ग्रहांची उथलपुथल सुरू आहे. आठवड्याच्या मध्यात बुध तेथून बाहेर पडेल. चंद्र सुरुवातीला पंचम या शुभ स्थानात मंगळासोबत लक्ष्मीयोग करीत आहे. या शुभ स्थितीमुळे आठवड्याची सुरुवात कौटुंबिक समाधान, सामंजस्य, उत्साह, आनंदाच्या वातावरणात होऊ शकेल. कार्यक्षेत्रात प्रगतीचे योग लाभू शकतील; मात्र सध्याच्या साडेसातीमुळे त्याचे प्रमाण काहीसे मर्यादित असलेले जाणवेल. काहीशी अपूर्णता जाणव शकते. नोकरी-व्यवसायात काही तणाव निर्माण होऊ शकतो. काहींना सप्ताहात मधला काळ स्वतः व जोडीदाराच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.

**शुभ दिनांक - ५, ७, ८, १०.**

## गाथा पर्यावरणाची

मिलिंद बेंडाळे

# सागरातील बदलांचा जीवसृष्टीवरील परिणाम



**महासागर सध्या ९० टक्के जागतिक उष्णता आणि सुमारे ३० टक्के कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात. महासागरातील भौतिक आणि जैविक बदलांमुळे हे दर कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यकाळात वातावरणातील तापमानात वाढ होईल. परिणामी येत्या काळात परिसंस्थेच्या लवचीकतेत घट होऊन अन्नपुरवठा आणि उपजीविकेवर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे.**

मानवजात पूर्णपणे महासागरांवर अवलंबून आहे. आपल्या अनेक महान संस्कृतींचा विकास महासागरांच्या किनाऱ्यावर झाला आहे. आज आपण आपल्या आर्थिक, सामाजिक आणि भौतिक कल्याणासाठी महासागरावर अधिक अवलंबून आहोत. जागतिक व्यापारापासून पर्यटनापर्यंत सागरी क्रियाकलाप वार्षिक ३० ट्रिलियन डॉलरपेक्षा अधिक रकमेची उलाढाल करतात. 'ओशन इकॉनॉमी' ही जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था आहे. पाणबुडीच्या केबल्सपासून शिपिंग, मत्स्यपालन आणि मत्स्यपालनापर्यंत आपण निळ्या अर्थव्यवस्थेवर अधिकाधिक अवलंबून राहात आहोत. आपण खात असलेल्या प्राणी प्रथिनांपैकी २० टक्के समुद्री माशांपासून येतात; परंतु गेल्या शतकात महासागर नाटकीयरीत्या बदलत असून भविष्यात आणखी बदल घडू शकतात. आज मानवता सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय आणि वैज्ञानिक बदलांच्या केंद्रस्थानी आहे. समुद्राचे निरीक्षण करण्याची, मॉडेल करण्याची आणि समजून घेण्याची आपली क्षमता अलिकडच्या वर्षांमध्ये प्रचंड वाढली आहे; परंतु मानवी कल्याणावर लक्ष केंद्रित करणे आणि त्याचे सागरी प्रक्रियांवर अवलंबून राहणे हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. आज समुद्राच्या तळाच्या प्रक्रियेद्वारे चाललेल्या हवामान बदलाच्या मोठ्या घटनांचा अंदाज घेण्याची आपली क्षमता सुधारणे आवश्यक आहे. सागरी भूकंप, त्सुनामी, चक्रीवादळ आणि वादळामुळे मानवी कल्याणाला गंभीर धोका निर्माण होतो. आज या घटनांचे निरीक्षण करण्याची, समजून घेण्याची आणि भाकित करण्याची क्षमता सुधारणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे.

महासागर संशोधन आणि मूलभूत अभ्यासासाठी सतत निधी मिळणे आवश्यक आहे. महासागर विज्ञान पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीवर अवलंबून असते. आपण उदयोन्मुख तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विद्यमान महासागर पायाभूत सुविधांचा विस्तारित वापर एकत्र केला पाहिजे. यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य आवश्यक आहे, कारण यापैकी काही आव्हाने प्रत्यक्षात स्थानिक आहेत. तात्कालिक समस्यांकडे लक्ष देण्याची गरज असली, तरी गंभीर संशोधनासाठी आपली वचनबद्धता महासागरातील जटिल बदलांचे व्यवस्थापन करण्याची क्षमता निश्चित करते. त्यामुळे सामूहिक कृती आवश्यक आहे. त्यासाठी संशोधन संस्थांनी आपला दृष्टिकोन बदलायला हवा. धोरणकर्त्यांनी दीर्घकालीन तपासाला महत्त्व देणारी चौकट तयार करायला हवी. हंपबॅक व्हेल दरवर्षी आग्नेय पॅसिफिक महासागर ओलांडून एक लांब आणि आव्हानात्मक प्रवास करतात. ते अन्नासाठी मध्य आणि दक्षिण अमेरिकेपासून अंटार्क्टिकापर्यंत सुमारे १० हजार किलोमीटरचा प्रवास करतात. नवीन संशोधनात दिसून आले आहे की, व्हेल त्यांच्या स्थलांतराची वेळ निश्चित करण्यासाठी पर्यावरण आणि समुद्राच्या परिस्थितीतील बदलांच्या त्यांच्या भूतकाळातील आठवणी वापरतात; पण हवामानात बदल होत असताना, सागरी परिस्थिती झपाट्याने बदलत असल्याने ही रणनीती तितकी प्रभावी ठरणार नाही, अशी शास्त्रज्ञांची चिंता आहे.

मध्यंतरी मॅकगिल विद्यापीठाशी संबंधित शास्त्रज्ञांच्या नेतृत्वाखाली एक अभ्यास करण्यात आला. या अभ्यासात २००९ ते २०१६ दरम्यानचा 'सॅटेलाईट ट्रॅकिंग डेटा' वापरला. या कालावधीत कोस्टा रिका, पनामा आणि इक्वाडोरजवळ ४२ टॅग केलेल्या व्हेलचा मागोवा घेण्यात आला. अंटार्क्टिका ओलांडून दक्षिणेकडे त्यांच्या हालचालींचे अनुसरण करून शास्त्रज्ञांना समजून घ्यायचे होते की, व्हेलला दरवर्षी स्थलांतर कधी करायचे हे ठरवण्यासाठी कोणते संकेत मदत करतात. या अभ्यासाचे निष्कर्ष 'सायंटिफिक रिपोर्ट्स जर्नल'मध्ये प्रकाशित करण्यात आले आहेत. अभ्यासात असे दिसून आले आहे की, व्हेल समुद्राचे तापमान आणि अन्न उपलब्धता यासारख्या स्थानिक संकेतांकडे लक्ष देतात. हवामान बदलामुळे महासागरातील आवाज पाच पटीने वाढू शकतो, सागरी जीवांना त्याचा फटका सहन करावा लागतो. त्यांच्या स्मृती आणि विद्यमान संकेतांच्या मदतीने ते लांबचा प्रवास कधी सुरू करायचा हे ठरवतात. दक्षिण महासागरात त्यांचे मुख्य अन्न केव्हा मुबलक असेल हे निर्धारित करण्यात ही माहिती त्यांना मदत करते. क्रिल हा एक लहान क्रस्टेशियन प्राणी आहे. तो अंटार्क्टिकामधील व्हेलचे मुख्य अन्न आहे. दर वर्षी, एका विशिष्ट हंगामात क्रिलची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. यासंदर्भात या अभ्यासाशी संबंधित प्रमुख संशोधक प्रा. व्हर्जिनी मिलियन यांनी म्हटले आहे की, त्याला त्याच्या मुक्कामाची योग्य वेळ ठरवण्यास मदत होते. त्यामुळे ते अगदी त्याच वेळी पोहोचतात, जेव्हा त्यांचे अन्न मुबलक असते. व्हेल मासे हवामानातील बदलांशी जुळवून घेऊ शकत नाहीत. हजारो वर्षांपासून व्हेल या वेळेची पद्धत वापरून स्थलांतर करीत आहेत; मात्र हवामानातील बदलांमुळे हे अवघड होत आहे. गरम होणारे महासागर आणि समुद्रातील बर्फातील बदल क्रिलच्या वाढीच्या वेळेवर परिणाम करीत आहेत. व्हेल या बदलांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत असले, तरी असमर्थ ठरत आहेत. २०१६ पासूनचे प्रत्येक वर्ष अधिकाधिक उष्ण ठरत आहे. प्रकाश प्रदूषणामुळे सागरी जीवांच्या पुनरुत्पादक आणि हार्मोनल चक्रात अडथळा निर्माण होत आहे. नर आणि मादी व्हेल वेगवेगळ्या प्रकारे स्थलांतर करतात, असेही या अभ्यासातून समोर आले आहे. नर हंपबॅक व्हेल जलद प्रवास करतात आणि सरळ मार्ग घेतात. दुसरीकडे मादी, विशेषतः संतती असलेल्या, भक्षक टाळण्यासाठी आणि विश्रांतीसाठी वेळ मिळावा यासाठी लांब किनारी मार्ग स्वीकारतात. शास्त्रज्ञांच्या मते व्हेलचे स्थलांतर मार्ग आणि खाद्य क्षेत्रांचे संरक्षण अत्यावश्यक आहे. किनारपट्टीवरील जहाजांची वाहतूक वाढत जाते, तसतसे व्हेल माशांपुढील धोकेही वाढतात. अशा वेळी व्हेल माशांची जहाजांशी टक्कर होणे आणि स्थलांतराच्या मार्गात अडथळा येणे यामुळे या प्राण्यांची संख्या कमी होते. व्हेल समुद्राला निरोगी ठेवण्यास मदत करतात. ते सागरी परिसंस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. ते खाऊन कचरा उत्सर्जित करतात, तेव्हा पाण्याद्वारे महत्त्वपूर्ण पोषक तत्त्वांचे वितरण करण्यास मदत करतात. हे 'फायटोप्लँक्टन'सारख्या लहान वनस्पतींना वाढण्यास मदत करते. या वनस्पती कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. हे सागरी अन्न साखळीला समर्थन देते आणि जमिनीवरील हवामानावरदेखील परिणाम करते.

व्हेल शार्कसाठी शिपिंग हा मोठा धोका आहे. व्हेल त्यांच्यावर अवलंबून असलेल्या इतर सागरी प्राण्यांसाठी अन्नाच्या नवीन संधी निर्माण करतात. म्हणजे त्यांचे अस्तित्व जैवविविधतेलाही प्रोत्साहन देते. दुसरीकडे व्हेल नामशेष झाल्यास समुद्राची उत्पादकताही कमी होईल. अशा परिस्थितीत संशोधकांनी हंपबॅक व्हेलचे खाद्य क्षेत्र आणि स्थलांतर मार्गांच्या संरक्षणावर भर दिला आहे. विशेषतः हवामान वेगाने आणि सतत बदलत असताना हे केले जात आहे. शास्त्रज्ञांच्या मते या भागांच्या संरक्षणामुळे व्हेललाच फायदा होणार नाही, तर संपूर्ण सागरी अन्नसाखळीलाही आधार मिळेल. सतत हवामान बदल आणि शक्तिशाली 'एल निनो' इव्हेंटचा परिणाम जागतिक स्तरावर, विशेषतः होनोलुलूसारख्या बेट शहरांसाठी किनारपट्टीवरील समुदायांसाठी धोक्याची घंटा आहे. येथे वाढत्या महासागरांनी वास्तविक तत्काळ धोका निर्माण केला आहे. हा केवळ नजीकच्या काळातला धोका नाही, तर सध्याचे वास्तव आहे, जे अनेक लोकांचे दैनंदिन जीवन बदलत आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची मोजण्यासाठी शास्त्रज्ञ अनेक आधुनिक साधने वापरतात. उपग्रहांवरील विशेष उपकरणे समुद्रात मायक्रोवेव्ह सिग्नल पाठवतात आणि सिग्नल परत येण्यासाठी किती वेळ लागतो हे मोजतात. गेल्या ३० वर्षांमधील उपग्रह निरीक्षणांनी एक स्पष्ट चित्र रंगवले आहे. १९९३ पासून जागतिक सरासरी समुद्रपातळीमध्ये तब्बल ४ इंच (९.४ सेंटीमीटर) वाढ झाली आहे. सर्वात वाईट बाब म्हणजे या वाढीचा वेग अधिक आहे. १९९३ पर्यंत समुद्राची पातळी दरवर्षी सुमारे ०.०७ इंच (०.१८ सेंटीमीटर) वाढत होती. आता वार्षिक वाढ दुप्पट झाली आहे. २०५० पर्यंत जागतिक सरासरी समुद्रपातळीत आणखी २० सेंटीमीटर वाढ होण्याच्या मार्गावर आहे. त्याचा परिणाम समुद्री जीवावर होऊ शकतो.

*(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)*


## रविवारचे महाशब्दकोडे ४९४



*आडवे शब्द:-* 1) अल्प, 3) सुळका, 5) मॅट्रिक नापास असूनही मोठी वाङ्मयीन उंची गाठणारा एक प्रसिद्ध वैदर्भीय साहित्यिक-पत्रकार, 8) एक जिल्हा, 12) पर्वत, 13) वास्तव रूप, 15) नाकातील मळाच्या खरपुड्या, 16) साफल्य, 17) नीच, 19) घागर, 20) वाद्यांचा मोठा आवाज, 22) दारू, 23) एक वैदर्भीय मराठी नाटककार, 26) देवालय, 28) टरफल, 31) दैत्य, 32) एक धान्य, 34) पाऊल, 36) प्रत्येक, 37) ज्याच्याजवळ ढाल आहे असा लढवय्या, 40) नोकराचाकरांना सणावारी दिलेला बक्षिसाचा पैसा, 41) अंगचोर, 43) एक संख्या, 45) कानांना गोड लागणारे, 47) स्वीकार, 49) बुद्धाच्या पूर्वजन्माच्या कथा, 51) लगेच, 54) भोजनास बसलेल्या लोकांची रांग, 55) स्वीकारलेली वैचारिक बाजू, 57) हळकुंडाची पूड, 58) मरणाइतक्याच दु:सह वेदना, 59) जामिनकी, 60) रोखठोक, 62) मनोरंजन, 64) एक अधिक त्याचा पाव भाग, 65) एक झाड, 66) एक धातू, 68) अभिप्राय, 69) एक देवांगना, 71) देण्याघेण्यासंबंधीचा तंटा, 72) दारिद्र्य, 73) श्वास कोंडला जाईपर्यन्त, 74) वागणुकीची शिस्त, 75) नदीकाठचा उंचवटा, 77) वर, 80) तृण, 83) एक वाद्य, 85) होकार, 87) लाक्षणिक अर्थाने तेज, 88) काही खाताना होणारा तोंडाचा आवाज, 90) मानसिक अस्वस्थता, 92) प्राणावरच्या संकटात अविचाराने शिरणे, 94) पगार, 95) एक फळ, 97) कारण नसताना, 98) आंबा वगैरे फळाचा लांबट तुकडा, 100) आवरण, 102) अधिक स्पष्टीकरण, 103) डोळ्यातील बाहुली, 105) हे म्हणजे ते आणि ते म्हणजे हे, 106) भूल पडणारे भूत, 108) सैन्याचा दाणा-गोटा, 110) उधळपट्टी, 112) एक विषम संख्या, 113) घागरा, 115) ताडाच्या झाडापासून निघणारा रस, 116) संगीतातील एक रागिणी, 118) नाश पावणारे, 119) एक पक्षी, 120) कारणासह, 123) अग्नी, 124) फक्त, 125) अरेरावीचे धोरण, 126) नकली.

*उभे शब्द:-* 1) बाजारगप्प, 2) घुस्सा, 3) एक गोड पक्वान्न, 4) कलंक, 5) प्रमाणाने मोजून निश्चित केलेले साधन, 6) त्वरेने, 7) चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध *मराठी* अभिनेता, 8) निरुपयोगी सामान, 9) चरबी, 10) वडील, 11) चीत, 14) एक *रशियन* नाणे, 17) चमकदार, 18) एक संख्या, 21) पृथ्वी, 23) इतका मोठा, 24) रावणाचा एक भाऊ, 25) एक पशू, 27) एक गोड वनस्पती, 29) खोटा, 30) ताणलेले आच्छादन, 32) एक धातू, 33) युद्धाचे मैदान, 35) दहांचा समुदाय, 36) संप, 38) शैली, 39) चारशेऐंशी कागद, 40) लहान मुलगा किंवा मुलगी, 41) आईचा दीर, 42) सुटी, 44) तुकडा, 46) अग्रणी, 47) स्त्री, 48) गाणे, 50) चलाख, 52) एक उभयचर प्राणी, 53) बालंट, 54) देशाचा महामंत्री, 56) वस्त्र, 57) शिक्षेदाखल देशाबाहेर घालविणे, 58) पुष्परस, 59) वारा, 61) अस्थिर, 63) घाई न करता बिनत्रासाने, 64) एक संख्या, 65) कबूल, 67) एक फूल-झाड, 70) एका देशाचे नाव, 72) प्रारब्ध, 73) निर्लज्ज, 76) उतरती कळा, 78) झाडाच्या सालीचे वस्त्र, 79) अप्सरा, 81) आधारभूत वाक्य, 82) अंधार, 84) क्रांतिसूचक रंग, 85) एक-रूप, 86) कारणाचे स्पष्टीकरण, 87) पायदळातील शिपाई, 89) वीज, 91) पृथ्वी, 93) अक्षरांवरची उभी रेघ, 94) निवडक, 96) केव्हाच न समजता निघून जाणे, 97) हळूहळू होत जाणारी वाढ, 99) दया, 101) करार मोडणे, 102) रतीब, 103) सोवळ्याचे वस्त्र, 104) आश्रय, 107) उपयोग, 109) सदस्य, 111) प्रिय, 114) रसमय, 115) सन्मानपूर्वक बोळवण, 116) शपथ, 117) बढाई, 120) स्वाक्षरी, 121) राख, 122) झोपडी. *(उत्तर: पुढील अंकात)*

*मागील शब्दकोड्याचे उत्तर*



© Created By AMRITA NANDANWAR Mob. 09822568532

## कोणे एके काळी

# शेतकरी : संस्कृतीचा मूलस्रोत

स्वाती काळे (कोलारकर)
swatimak@gmail.com

भारतीय समाजमनाचा पहिला हुंकार म्हणजे प्राचीन काळातली हिरव्यागार अरण्यात वसलेली आपली चिमुकली खेडी. आपण असंही म्हणू शकतो, आपल्या सामाजिक जाणिवेचा पहिला आविष्कार आपण प्राचीन ग्राम संस्कृतीतून अनुभवला. पुरातत्त्व शास्त्राच्या चष्म्यातून बघायचं तर इ. स. पूर्व सहाव्या शतकात मेहरगड येथे आपल्याला या ग्राम संस्कृतीची चिमुकली पावलं दिसली. तेथील उत्खननात मृगया करणारा, रानावनातून अन्न गोळा करून आणणारा माणूस शेती आणि पशुपालनाकडे वळताना आढळतो. रानाच्या कुशीत खेड्यात विसावलेला दिसतो.

आपली ग्राम संस्कृती शेतातल्या भरड पायवाटेनेच आपल्यापर्यंत पोहोचली. ऋग्वेद काळात काही समुदाय एका जागी स्थिर राहून पशुसंवर्धन करीत असताना शेतीचाही प्रयोग करीत असल्याचे उल्लेख आहेत. ऋग्वेदातील प्रथम मंडळ सर्वात प्राचीन मंडळ समजले जाते. त्यातील ३८ व्या सूक्तात घौर नावाच्या ऋषींनी दुष्काळाची तीव्रता कमी व्हावी, अन्नधान्याची टंचाई होऊ नये म्हणून मरुताची आणि इंद्राची करुण आळवणी केली आहे. घौर ऋषींप्रमाणेच कण्व ऋषींच्या परंपरेतील २३ व्या सूक्ताच्या १५ व्या ऋचेत शेतीचा पहिल्यांदा उल्लेख केलेला दिसतो.

'गोभिर्यवं न च कृर्षृत' (१.२३.१५)

'बैलांच्या साहाय्याने यवासारखा (रानात आपोआप उगवलेल्या अन्नधान्यासारखा) धान्य प्रकार आम्ही उत्पन्न केला आहे.' याच पहिल्या मंडळात विखुरलेल्या मोत्यांच्या दाण्यांप्रमाणे शेतीचे उल्लेख आहेत.

'यवं न च कृषन वृषा' म्हणजे आम्ही बैलांच्या मदतीने यवासारखा धान्य प्रकार निर्माण केला किंवा वसिष्ठ कुळातल्या शक्तिपुत्र पराशरने म्हटल्याप्रमाणे 'यवो न पणर्वा' म्हणजे कापणीसाठी तयार झालेल्या यवासारखं, नैसर्गिकरीत्या उगवलेल्या धान्यासारखं हे पीक आहे.



ऋग्वेदातले शेतीचे हे तीनही उल्लेख अतिशय बोलके आहेत. या ऋचांवरून असं दिसून येतं की, शेती हा व्यवसाय ऋग्वेद काळात निश्चितच होता. त्याही काळात सर्व प्रकारचे, सर्व वृत्तींचे लोक होते. त्यामध्ये जुगारी व व्यसनीही होते. एवढ्या प्राचीन काळात जुगाऱ्याला व्यावहारिक सल्ला देण्यात आलेला आहे की, "जुगार सोड आणि शेती कर. शेतीमुळे पत्नी, संपत्ती आणि पशुधनही मिळते." या काळात शेतीची संपन्न अवस्था आपल्याला दिसून येते. सहा, आठ आणि कधी कधी तर बारा बैल नांगराला जोडल्याचे उल्लेख वेदिक वाङ्मयात आलेले आहेत. भगवान गौतम बुद्धानेही शेती हा महत्त्वाचा व्यवसाय असल्याचे सांगितले आहे. पाणिनीच्या 'अष्टाध्यायी'मध्ये लागवडीखालच्या जमिनीला क्षेत्र आणि केदार असं म्हटलेलं आहे. जमिनीचे मोजमाप आणि सर्व्हे क्षेत्रकार करायचे. क्षेत्र या शब्दावरूनच क्षेत्रफळ हा शब्द निर्माण झाला असावा. क्षेत्रावर किती बीजे पेरली जाऊ शकतात, यावरूनही जमिनीचे मोजमाप केले जायचे.

'तुझ्या नांगराला भाग्य लाभो.' असे तोंडभरून आशीर्वाद दिले जायचे. या आशीर्वादानेच समजतं की, नांगर समृद्धीचे प्रतीक होतं. घरात अनेक नांगर असणं ही प्रतिष्ठेची गोष्ट होती. बलराम खांद्यावर नांगर घेऊन फिरायचे म्हणूनच ते 'हलधर' होते. राजा जनक स्वतः शेती करायचे. नांगराची चोरी करणे हा फार मोठा अपराध होता. 'इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमी'ने प्रकाशित केलेल्या 'हिस्टरी ऑफ टेक्नॉलॉजी इन इंडिया' या पुस्तकात शेती अवजारांचा इतिहास अतिशय बारकाईने टिपला आहे. वेदिक वाङ्मयात 'अभ्री' या जमीन खणण्याच्या अवजाराचा उल्लेख आहे. अभ्री आणि नांगर दोन्ही अवजारे वेगळी आहेत बरं. नांगराला 'सिरा' म्हणायचे. औदुंबर किंवा खदिराच्या पवित्र खोडापासून सिरा बनवायचे. अमरकोष आणि कृषिपराशर वाङ्मयात नांगराचे तपशीलवार वर्णन केले आहे. इशा म्हणजे मुख्य लाकडी पट्टी, युग म्हणजे नांगराचा फाळ, निर्योला म्हणजे तुळई, निर्योलपासिका म्हणजे हँडल यासारखे अनेक शब्द प्राचीन नांगराचे चित्र आपल्या डोळ्यांसमोर हुबेहूब उभे करतात. पाणिनीने शेतकऱ्यांचे तीन प्रकार सांगितले आहेत. अहली म्हणजे असे शेतकरी ज्यांच्याकडे नांगर नाही, सुहली म्हणजे असे शेतकरी ज्यांच्याकडे चांगले नांगर आहेत आणि शेतजमीनही सुपीक आहे. दुऱ्हली म्हणजे असे शेतकरी ज्यांच्याकडे जुने नांगर आहेत. अथर्ववेदामध्ये शेतकऱ्यांना शिक्षण देण्यावर भर आहे. वार्ता विद्या शिकली की पीक चांगलं येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

'अष्टाध्यायी'मध्ये व्रिही नावाच्या तांदळाला व्रैहेय आणि साळी जातीच्या तांदळाला साळिया म्हणायचे. हे तांदळाचे प्रकार आहेत, पण व्रिही तांदूळ म्हणजे प्रक्रिया न केलेले, टरफले न काढलेले आणि साळी तांदूळ म्हणजे स्वच्छ धुतलेले, स्वयंपाकासाठी योग्य असेही अर्थ निघतात. आजही साळीचे तांदूळ आपण बाजारात शोधत असतो आणि मिळाले की जग जिंकल्याचा आनंद होतो. कौटिल्यानेदेखील साळी, व्रिही तांदळाचा उल्लेख केला आहे. जातक कथांमध्ये वाराणसीजवळच्या कापसाच्या शेतीची रसभरीत वर्णने आहेत. पाणिनी हायन आणि षष्ठिका (ज्याला पिकण्यासाठी ६० दिवस लागतात) अशा तांदळाचे वर्णन करतो. ग्रीक वाङ्मयात भारतातल्या दोन पिकांची वर्णने आहेत. हिवाळ्यात येणारे तांदूळ आणि कडधान्य आणि उन्हाळ्यातले गहू आणि बार्ली ही पिके.

कौटिल्याच्या काळात घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याला जपलं गेलं. खेड्यांना निर्मितीची स्वयंभू केंद्रे बनवली गेलीत. त्याच्या म्हणण्यानुसार, कोणतेही बाहेरचे व्यावसायिक मंडळ किंवा संस्था खेड्यात शिरकाव करणार नाही. फक्त स्थानिक हित जपलं जाईल. बाहेरच्या नृत्यांगना, गायक-गायिका, नट-नट्यांना खेड्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही. कारण त्याचा परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होऊ शकतो.

प्राचीन काळातल्या खेड्यांची जडणघडण शेतीमुळे झाली. शेतीमुळे कधी त्यांची भरभराट झाली तर कधी दुष्काळामुळे खेडी ओस पडली. पूर, दुष्काळ, लुटारू, दरोडेखोर, रोगराई, पाणीटंचाई अशी अनेक कारणे होती; ज्यामुळे खेड्यातल्या शेतकऱ्यांना राहते घर सोडून जावे लागे. विनयपीटिकेमध्ये अमानुष ग्रामाचे वर्णन आहे. तेथे एकही माणूस राहात नव्हता. संपूर्ण खेडे यक्ष-यक्षिणींनी व्यापले होते. अलेक्झांडर राजाच्या सतत बरोबर असणारा ॲरिस्टोबुलस या अधिकाऱ्याने लिहून ठेवले आहे की, एकेकाळी दाट वस्ती असणारी हजारो खेडी त्याने भग्नावस्थेत बघितली आहेत. प्राचीन वाङ्मयात अंगुलिमाला डाकूच्या भीतीने हजारो खेडी ओस झाली, अशी वर्णने आहेत.

शेतकऱ्याची आपल्या जमिनीवर माया असते. जमिनीला तो आपले सर्वस्व मानतो. प्राचीन वाङ्मयात खेडी ओस पडल्याची हजारो उदाहरणे दिली आहेत. पण स्वतःचं राहतं घर, शेती सोडल्यावर त्या शेतकऱ्याची झालेली ससेहोलपट, त्याने भोगलेल्या यातना, त्याने जिद्दीने केलेला पुढचा प्रवास याबद्दल मात्र इतिहास मूकपणे अश्रू ढाळत उभा आहे. कदाचित शेजारच्या खेड्यांनी त्यांना आसरा दिला असेल. कदाचित त्यांचे गुलाम बनूनही त्यांनी त्यांच्या शेतात नांगरणी केली असेल. त्यांची जगण्याची केविलवाणी धडपड काळाच्या आवरणाखाली चिरडल्या गेली असेल आणि त्याच राखेतून कदाचित संस्कृतीचे इवलुसे रोप वर येऊन आज आपल्याकडे टकमक पाहत असेल. काळाची गुपिते काळालाच माहीत!

परिस्थिती पालटल्यावर शेतकरी त्यांच्या मूळ खेड्याकडे परत येण्याचा प्रयत्न करीत असतीलही. जमीन आपल्या लेकराला स्वतःजवळ अक्षरशः ओढते म्हणतात. मोहेंजोदारोच्या उत्खननात एक आश्चर्यकारक गोष्ट आढळून आली होती. प्रचंड पूर आल्यामुळे सात वेळेस लोकांनी त्यांचे मूळ वस्तिस्थान सोडले आणि पूर नियंत्रणात आल्यावर सातही वेळेस ते परत आपल्या मूळ जागेवर परत आले. माणूस नावाचा प्राणी खरोखरीच अगम्य आहे.

प्राचीन काळात शेतजमिनी तयार करण्यासाठी घनदाट जंगल नष्ट करावे लागत असे. महाभारत काळात यामुळेच जनपदे अस्तित्वात आली. त्यांचे रूपांतर नंतर महाजनपदांत आणि कालांतराने राज्यांमध्ये झाले. लोखंडाच्या शोधामुळे नांगर, कुऱ्हाड ही हत्यारे शेतकऱ्यांच्या हातात आली आणि धनधान्याने कोठारे गजबजली. नांगर-कुऱ्हाडीमुळे शेतीमध्ये क्रांतिकारी बदल झाले हे मान्य; पण खरी लक्षणीय क्रांती तोड आणि जाळ पद्धतीने (स्लॅश अँड बर्न मेथड) झाली. या पद्धतीमुळे शेतकऱ्यांना विस्तीर्ण जमिनी नांगरण्यासाठी मिळाल्या आणि संपूर्ण राज्याला पुरेल एवढे धान्य कोठारांमध्ये साठू लागले. प्राचीन इतिहास संशोधक ए. घोष म्हणतात की, प्राचीन काळात सगळीकडे घनदाट जंगलच होते. शेतीसाठी जमीन काही भागाला आग लावून तोड आणि जाळ पद्धतीने झाली. यामुळेच प्राचीन अर्थकारणामध्ये खरी क्रांती आली. अरण्याच्या कुशीत खेडी जन्माला आली. शेतकरी विस्तीर्ण शेतीची नांगरणी करू लागले. महाभारतातल्या कृष्णार्जुनाच्या खांडव वन दाहचे हे खरे रहस्य आहे. खांडव वन दाहातल्या प्रलयाला समाजशास्त्रीय चष्म्यातून बघितले तर असे लक्षात येते की, महाभारत काळात राज्य ही संकल्पना मूळ धरू पाहत होती. शेती करण्यासाठी आणि खेडी वसविण्यासाठी अरण्ये जाळण्याचा तेव्हा प्रघात असावा. भटक्या टोळ्या कमी झाल्या होत्या. शेती करणारे लोक एका जागी स्थिरावत होते.

अथर्ववेदात म्हटलेलं आहे की, जो जमीन कसतो तोच खरा शेतकरी आहे. ऋग्वेदात म्हटलेलं आहे, क्षेत्रपती म्हणजेच शेतकऱ्याशी आमचा संबंध आला तर आम्ही कायम विजयी होऊ. त्यांच्या ऋणात राहू. आयुष्यात नेहमी आनंदी राहू. शेती करणे म्हणजे यज्ञ करणे. जमीन कसणारा शेतकरीच फक्त भूपती होऊ शकतो. त्याने पिकवलेलं अन्न हे पूर्णब्रह्म आहे. आपल्या संस्कृतीत जेवण झाल्यावर तृप्तीने म्हटलं जातं; 'अन्नदाता सुखी भव!'

आद्य शेतकऱ्याने जमिनीची मशागत केली. धनधान्याचा मळा फुलवला. खेडी वसवली. मनुष्यवंशाची वृद्धी केली. तो आहे म्हणून आज आपण आहोत. म्हणूनच त्याच्या सुखातच आपलं सुख दडलेलं आहे.

'शेतकरी सुखी तर जग सुखी हेच खरं!'



# बांगलादेशी घुसखोरांवर धडक कारवाई करा!

राहुल गोखले
९८२२८२८८१९

पहलगाम येथे अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात २७ पर्यटकांचा करुण मृत्यू झाल्यानंतर केंद्र सरकारने पाकिस्तानविरोधात कडक भूमिका स्वीकारली आहे. त्या अनुषंगाने भारतात सार्क व्हिसावर आलेल्या किंवा अवैधरीत्या भारतात वास्तव्य करीत असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांत भारत सोडण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर एकही पाकिस्तानी नागरिक भारतात राहता कामा नये याची खबरदारी घ्या, असे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सर्व राज्यांच्या गृहमंत्र्यांना दिले आहेत. त्यानुसार सर्वच राज्यांत कार्यवाही सुरू झाली आहे. ती शोधमोहीम सुरू असताना गुजरातेत बेकायदेशीररीत्या राहणाऱ्या हजारेक बांगलादेशी नागरिकांचा शोध लागला. यात अहमदाबाद येथे ८९० तर १३४ बांगलादेशी नागरिकांचा समावेश आहे. गुजरात पोलिसांनी आजवरच्या इतिहासात केलेली ही सर्वांत मोठी कारवाई आहे, यात शंका नाही. या सर्वांना स्थानबद्ध करण्यात आले आहेच; पण त्यांची रवानगी पुन्हा बांगलादेशात करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ती यथावकाश होईलच; तथापि बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांची केवढी जटिल आणि गंभीर समस्या भारतासमोर उभी आहे, याची कल्पना यातून अवश्य येईल.

ही समस्या गंभीर आहेच; त्याहून गंभीर असणारी बाब म्हणजे इतक्या मोठ्या संख्येने हे बांगलादेशी घुसखोर भारतात येऊ कसे शकले आणि देशभर संचार कसा करू शकले ही. गुजरातचे गृहराज्य मंत्री हर्ष संघवी यांनी दिलेल्या माहितीनुसार या घुसखोरांना भारतात वास्तव्य करण्यासाठी बनावट कागदपत्रे पश्चिम बंगालमध्ये उपलब्ध झाली. त्या कागदपत्रांच्या साह्याने त्या घुसखोरांनी भारतात अनेक ठिकाणी प्रवास केला, वास्तव्य केले. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या सदैव अल्पसंख्यकांच्या तुष्टीकरणात अग्रेसर असतात. संसदेने केलेला नागरिकत्व सुधारणा कायदा असो अथवा वक्फ सुधारणा कायदा असो; त्या कायद्यांचा त्या केवळ विरोधच करतात असे नाही तर ते कायदा पश्चिम बंगालमध्ये लागू करणार नाही, अशी दर्पोक्तीही करतात. या सगळ्याचा थेट संबंध मतपेढीच्या राजकारणाशी असतो हे वेगळे सांगावयास नको. तथापि, बेकायदेशीररीत्या घुसखोरी करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना त्या राज्यात बनावट कागदपत्रे करून मिळत असतील आणि तरीही ममता बॅनर्जी प्रशासन त्याकडे सोयीस्कर कानाडोळा करीत असेल तर ते अतिशय गंभीर आहे. एकीकडे बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत; दुसरीकडे बांगलादेशी घुसखोर भारतात सर्रास येऊन येथील समाजस्वास्थ्यास नख लावत आहेत, असे दुहेरी आव्हान भारतासमोर आहे. काहीच दिवसांपूर्वी संसदेने 'इमिग्रेशन अँड फॉरिनर्स' विधेयक मंजूर केले. त्यावर बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले होते की, या कायद्याचे प्रयोजन 'भारताची धर्मशाळा होऊ नये' हे आहे. त्यांच्या त्या प्रतिपादनातील तथ्याचा प्रत्यय गुजरातेतील धरपकडीवरून आला. त्या विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरू असताना काँग्रेस व तृणमूल काँग्रेसने मात्र सभात्याग केला होता. हे विधेयक प्रत्येक परकीय व्यक्तीकडे संभाव्य गुन्हेगार या दृष्टीने पाहण्यास उद्युक्त करते, असे काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांनी म्हटले होते. ते हास्यास्पदच. याचे कारण त्याच विधेयकात भारताप्रती निकोप दृष्टिकोन ठेवून येणाऱ्या विद्यार्थ्यांपासून पर्यटकांपर्यंत सर्वांसाठी प्रक्रिया अधिक सुकर करण्याची तरतूद आहे. मात्र याचा अर्थ कोणीही बेकायदेशीररीत्या भारतात यावे, येथे गुन्हे करावेत आणि तरीही 'अतिथी देवो भव' मंत्र जपत त्यांना भारताने आश्रय द्यावा असा नाही. कुटिल हेतूने भारतात येणाऱ्यांवर नजर ठेवणे, त्यांच्यावर कठोर कारवाई करणे हे देशाच्या सुरक्षेसाठी अनिवार्यच. पण तृणमूल काँग्रेसने आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्या विधेयकाला विरोध केला. आता गुजरातच्या गृहराज्य मंत्र्यांनी हजारेक बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांच्या बनावट कागदपत्रांचा उगम उघड केल्यानंतर ममता बॅनर्जी आणि तृणमूल काँग्रेस यांचा इमिग्रेशन विधेयकाला विरोध का होता, याची कल्पना येऊ शकते.

मध्यंतरी मुंबईत अभिनेता सैफ अली खान यांच्या निवासस्थानी घुसून खान यांच्यावर हल्ला चढविलेला आरोपी बांगलादेशी घुसखोर असल्याचे निष्पन्न झाले होते. काहीच महिन्यांपूर्वी (फेब्रुवारी २०२५) कोलकाता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिबांगशु बसाक आणि न्यायमूर्ती मोहम्मद शब्बार राशिदी यांच्या खंडपीठाने एका बांगलादेशी दाम्पत्याचा जामिनाचा अर्ज फेटाळून लावला होता. सुनावणीच्या वेळी या न्यायाधीशांनी बांगलादेशातून भारतात अवैधरीत्या येणाऱ्यांकडे आधार कार्डापासून मतदार ओळखपत्रापर्यंत सगळे दस्तावेज असतात, असे निरीक्षण नोंदविले होते. हे सगळे कायदेशीरपणे होणे शक्यच नाही. किंबहुना अशाच बनावट पारपत्र प्रकरणात पोलिसांनी नऊ जणांना अटक केली होती. अटक करण्यात आलेल्यांमध्ये समीर दास या बसारत न्यायालयातील एका कारकुनाचा समावेश होता; तद्वत कोलकाता पारपत्र कार्यालयातील निवृत्त पोलिस अधिकाऱ्याचाही समावेश होता. या गैरप्रकारात किमान ७३ बांगलादेशी नागरिकांना भारतीय पारपत्र बनावटपणे तयार करून दिल्याचा आरोप झाला होता. डिसेंबर २०२४ मध्ये केंद्रीय गृहखात्याने सर्व राज्यांना निर्देश दिले होते की, अवैधरीत्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे आणि त्यांची रवानगी बांगलादेशात करावी. दिल्ली पोलिसांनी दोन महिने अशी शोध मोहीम राबविली होती. अन्य राज्यांतही अशी मोहीम राबविण्यात आली होती. देशात असे बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांची नेमकी संख्या किती हे सांगणे कठीण. मात्र त्याचा अंदाज लावता येऊ शकतो. २०१६ साली तत्कालीन केंद्रीय गृहराज्य मंत्री किरेन रिजिजू यांनी राज्यसभेत बोलताना हा आकडा दोन कोटी इतका असल्याचे नमूद केले होते. तत्पूर्वी २००४ साली तत्कालीन संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारतर्फे (युपीए) हा आकडा सुमारे सव्वा कोटी असल्याचे संसदेच्या सभागृहात सांगण्यात आले होते. केवळ आसाममध्येच ती संख्या ५० लाखांवर आहे, अशी माहिती तत्कालीन मंत्री श्रीप्रकाश जयस्वाल यांनी दिली होती. त्यावेळी विरोधी बाकांवर असलेल्या भाजपाने बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांना हुडकून त्यांची देशातून हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्यावरून काहूर उठला होता आणि युपीए सरकारने स्वतःच दिलेल्या आकडेवारीवरून माघार घेतली. जयस्वाल यांनी आपले उत्तर मागे घेत ही आकडेवारी केवळ सांगोवांगीच्या माहितीवर आधारित आहे, अशी सारवासारव केली. मात्र एकूण ही समस्या किती बिकट आहे हे लक्षात येऊ शकते. बनावट कागदपत्रांच्या साह्याने भारतात घुसायचे; मग त्याच कागदपत्रांच्या साह्याने येथील मतदार ओळखपत्रापासून रेशनकार्डापर्यंत सर्व दस्तावेज करून घ्यायचे; त्याचे लाभ उठवायचे आणि दुसरीकडे गुन्हेगारीत सामील व्हायचे हे दुष्टचक्र आहे. ते भेदणे गरजेचे. अमेरिकेने अशा बेकायदेशीररीत्या वास्तव्य करणाऱ्या स्थलांतरितांविषयी कडक नियमांची कठोर अंमलबजावणी सुरू केली आहे. भारतानेदेखील तशी तयारी आता सुरू केली असली, तरी सर्व राज्यांनी पुरेशा गांभीर्याने आणि सातत्याने ही कारवाई सुरू ठेवणे निकडीचे आहे. विरोधकांनी राजकीय स्वार्थाच्या पलीकडे जाऊन राष्ट्रीय हिताचा विचार प्रधान मानला पाहिजे. गुजरातने धोक्याचा इशारा दिला आहे. आता महाराष्ट्रासह अन्य राज्ये अशीच धडक कारवाई करतील, अशी अपेक्षा आहे.

## काव्यनाद

### मोगरा..!

दरवळला सुवास
मन माझे हेलावले
आठवणींचा हिंदोळा
आली मोगऱ्याला फुले...

सुगंधीत सारा परिसर
घरी चांदणे फुलले
शीतलता सर्वदूर
आली मोगऱ्याला फुले...

ऊन तापले प्रचंड
मोगरा अंगणी डुले
सांगे झुळूक वाऱ्याची
आली मोगऱ्याला फुले...

हिरव्याकंच झाडात
स्वप्न रात्री बहरले
खाली आले नभांगण
आली मोगऱ्याला फुले...

आवड तिला फुलांची
झाड तिनेच लावले
बाग जपतो अजून
आली मोगऱ्याला फुले...

निरागसता फुलांची
पाणी डोळा तरारले
आला आठव आईचा
आली मोगऱ्याला फुले...

**बाबा देशपांडे**
९४२३६१३२२६

### अंदाधुंद

इकडे पाकिस्तान, तिकडे देश बांगला
फास जातो आहे दोन्हींकडून करकचून आवळला
हिंसाचार, दहशतीचा उद्रेक पोळतो तनामनाला
त्यातच देशांतर्गत दंगेधोपे आगळेवेगळे
सर्व बाजूंनी पोखरला जातो आहे देश माझा
पोलिस नाही सुरक्षित, त्यांच्यावरपण हल्ला
जनता नाही सुरक्षित, गुन्हेगाराला होत नाही शिक्षा
तत्काळ नाही अंमलबजावणी, भरपूर पळवाटा गुन्हेगाराला
कुणावर ठेवावा भरोसा! विश्वासघात फोफावला
हरविले आहे स्वास्थ्य तिचे, बेचैन झाली आहे जनता
जगायचे कसे जनतेने! पडले आहे तिला गूढ कोडे
संताप व्यक्त करणे, एवढेच तिच्या हाती आहे.....

**अशोक जोशी**
९६६५८११९८१

### महिमा हिंदुत्वाचा

आम्ही कधी न कापले
बाग कुणाचे केळीचे
आम्ही कधी न कापले
बाग कुणाचे पोळीचे
मग, का आम्ही
शिकार झालो गोळीचे...?
केवळ आम्ही
हिंदू आहोत म्हणून...?
की, आम्ही भारत वासी
माणूस आहोत म्हणून...?
भ्याड तुम्ही, पाठीत सुरा
खुपसणाऱ्याची जात तुमची
माणूस म्हणून जगण्याचा
हक्क नाही तुमचा




चला रे आता
धरा त्याला ओढा घरातून
दाखवा त्याला
महिमा हिंदुत्वाचा !
दाखवा त्याला
महिमा हिंदुत्वाचा !!

**डॉ. माधव शोभणे**
नागपूर

### भावविश्व..!

मन खूपच चंचल असतं
तितकच हळवंही
प्रत्येकाचं मन बोलत असतं
स्वतःशीच संवाद साधत असतं

मन आणि भावनांचं
काहीतरी घनिष्ठ असावं
त्याशिवाय काय तर
मन दुःखात रडतं,
भावनाविवश होतं



तर सुखात खूप सुखावतं
आपल्याच भावविश्वात रमतं

मनात खूप साठलेलं असतं
मन कधी उदास होतं
तर कधी एकट्यातच हसतं
इच्छांना खतपाणी घालतं
भावनांना मुरडही घालतं
स्वप्नात रंगही मनच भरतं
म्हणूनच तर म्हणतात ना,
मन आभाळासारखं
विशाल असतं

मनात भाव असला की
चेहऱ्यावर दिसतो
सद्गुण असले की
सद्भाव जागृत होतो
मनातील भाव योग्य असेल
तर भावार्थ उमगतो

निर्गुण निःस्वार्थ
भाव मनी असावा
जिथे दगडातही
मूर्तिमंत देव दिसावा

पूर्वार्धाचा भाव सत्कर्माचा
मनी भाव असेल चैतन्याचा
तर उत्तरार्धाचा
कळस असेल आनंदाचा
मन भरून जगावं
स्वप्नात हरवलं तरी
सत्यात गवसावं!

**रंजना डाऊ**
७०८३८९०८९१

### संघटित हिंदू

पाऱ्यापरी पळे हा
गोळा कसा करावा
विखुरित, विभाजित, विघटित
संघटित कसा करावा
संघटित कसा करावा?

कोणा न त्रास देतो
सर्वांचा आदर करतो
तरीही मार खातो
सुरक्षित कसा करावा
संघटित कसा करावा?

असंख्य यामध्ये जाती
त्यामध्येच भांडणे किती
सोबत कधी न येती
एकत्रित कसा करावा
संघटित कसा करावा?

हर घरी रामाचे चित्र
परी भाऊ नाही एकत्र
भांडती कचाकच मित्र
प्रबोधित कसा करावा
संघटित कसा करावा?

व्यवसायात सारे मग्न
आहेत किती स्वमग्न
ते स्वप्न होईल का भग्न?
जागृत कसा करावा
संघटित कसा करावा?


झालीत शंभर वर्षे
त्याआधी शेकडो वर्षे
हे युद्ध वर्षानुवर्षे
शेवट कसा करावा
संघटित कसा करावा?

**शंतनू कुळकर्णी**
९०४९३०००९९

### अरण्यरुदन

आसवे ढाळू नकोस आता
मी तुझी नच राहिले
ऐकू येणार नाही मजला
कितीही मज तू बाहिले
तुझे नि माझे किनारे आता
झालेत सख्या रे वेगळे
दिसणार नाही कधी तुला मी
कितीही मज तू पाहिले
अबोल झाली सतार माझी
संगीतसंगत संपली
साथ देऊ शकणार नाही
कितीही गीते तूं गायिली
कोंडुनि घे तुं कढत उमाळे
वाट मोकळी करू नको
सांगू नको रे व्यथा जनासि
किती दुःख तू साहिले
विसर सख्या रे झाले गेले
आवर तुझे तूं हुंदके
अरण्यरुदन होईल सारे
कितीही अश्रू तूं वाहिले

**रमेश ढाकुलकर**
९९२३२२६७६३



### नदी

नदीत तहान आहे, पावसाला गहाण आहे
बाप सांगायचा नदी अमृताची खाण आहे

वाहत राहते निरंतर, शेत शिवार पिकवते
देता देता जगावं, रीत जगाला शिकवते

पाऊस दूर गेल्यावर कोरडी पडते नदी
झरा होऊन रडते आतल्या आत नदी!

थकते, हिरमुसते वाट पावसाची पाहून
तेवत ठेवते प्राण दुःख सारं पिऊन!

पाऊस परततो, नदीला फुटतो पान्हा
नदी वाहू लागते घाण होऊन पुन्हा!

खळखळ वाहताना नदी बनते काळ
वैरिणीपरी गिळू लागते एकेक माळ

पुन्हा निर्मळ होते माय बनते नदी
तापल्या दुधाची साय बनते नदी!

**-पुंडलिक आंबटकर**
९८८१७१६०२७

तरुण भारत // आसमंत



## विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**
७२०८५५५४५८

# एम.आय. ६ ची विजयध्वजा आणि कर्नल गोर्दियेव्हस्की

**कर्नल गोर्दियेव्हस्की हा नुकताच म्हणजे ४ मार्च २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी लंडनमध्ये मरण पावला. साम्यवादी राज्यव्यवस्था म्हणजे पृथ्वीवर अवतरलेला स्वर्ग आहे, असे मानून देशोदेशींच्या अनेक नामवंतांनी स्वदेशाशी बेईमानी केली. म्हणजे स्वदेशातील गुप्त माहिती सोव्हिएत रशियाला पुरवली. कर्नल ओलेग गोर्दियेव्हस्की यांचे मत नेमके उलटे होते. साम्यवादी राज्यव्यवस्था म्हणजे निखळ गुंडगिरी आहे हे प्रत्यक्ष अनुभव घेऊन कळल्यावर त्याने रशियन गुप्त माहिती ब्रिटनला पुरवली.**
**लेखाच्या या पहिल्या भागात आपण या घटनेचा पूर्ववृत्तांत पाहू. दुसऱ्या भागात गोर्दियेव्हस्कीने गुप्त माहिती देण्यासाठी काय-काय युक्त्या लढवल्या, याबद्दल जाणून घेऊ.**

सन १९८८ च्या जून महिन्यातली ती एक छानशी संध्याकाळ होती. लंडनच्या वॅक्झॉल क्रॉस परिसरातील एम.आय. ६ च्या मुख्यालयात म्हणजेच ब्रिटिश गुप्तहेर खात्याच्या कार्यालयात नेहमीप्रमाणेच कामे चालू होती. खरे पाहता आज तिथे प्रचंड जल्लोष असायला हवा होता. विजय दिन साजरा केला जात असायला हवा होता. हाच विजय जर उघड-उघड राजकीय किंवा लष्करी क्षेत्रातला असता, तर कदाचित प्रचंड मोठी जाहीर सभा, नेत्यांची भाषणे, लष्करी मानवंदना, संचलने, सैनिकी पथकांच्या थरारक कसरती वगैरे नेत्रदीपक कार्यक्रम झाले असते. पण वॅक्झॉल क्रॉस मुख्यालयात यापैकी कसलाही हासभाससुद्धा नव्हता. कारण तो गुप्तहेर खात्याच्या एका मोठ्या कामगिरीचा विजय होता. तो गुप्तपणेच साजरा करणे आवश्यक होते. ब्रिटिश हेरखात्याचा एक निवृत्त हेरप्रमुख म्हणतो, ''आमच्या अपयशाचे जाहीर वाभाडे काढले जातात; आमच्या यशाचा मात्र कुणालाही पत्ताच नसतो.'' हे अगदी खरे आहे. पण त्याला इलाजच नसतो. कारण त्यांचे यश जाहीर झाले तर शत्रू सावध होणार आणि ज्या मार्गाने ते यश मिळाले, तो मार्ग बंद होणार. परंतु, १९८८ सालचे ते यश इतके मोठे आणि इतके दूरगामी परिणाम करणारे होते की, ते साजरे करण्यासाठी एक मेजवानी देणे आवश्यक होतेच. त्यासाठी ठिकाण मुद्दामच मुख्यालयापासून खूप दूर उत्तर लंडनमधले एक हॉटेल निवडण्यात आले. एम.आय. ६ चे अनेक उच्चपदस्थ अधिकारी तिथे जमले. सगळ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू होता एक उंच, धिप्पाड, कपाळावरून केस मागे फिरलेला, चष्मिस, टिपिकल रशियन चेहऱ्याचा वयस्कर माणूस; त्याचे नाव कर्नल ओलेग गोर्दियेव्हस्की. सोव्हियत रशियाच्या के. जी. बी. या कुख्यात गुप्तहेर खात्याच्या लंडन कार्यालयाचा प्रमुख.

मेजवानीला अपेक्षित असलेले सर्व लोक जमल्यावर पाश्चिमात्य पद्धतीनुसार दारूचे ग्लास घेऊन सगळे जण गोर्दियेव्हस्कीभोवती जमले. एक जण म्हणाला, ''अफगाणिस्तानातून रशियन सैन्याच्या सुरू झालेल्या केविलवाण्या माघारीकरिता...!'' सगळ्यांनी चिअर्स म्हणत ग्लास उंचावून गोर्दियेव्हस्कीला अभिवादन केले. या प्रकाराला 'टोस्ट' असे म्हटले जाते.

हे सगळे इतक्या सहजतेने, सफाईने झाले की, हॉटेलमधल्या इतर बघ्यांना तो माणूस काय बोलला आणि हे सगळे कोण आहेत, याचा कसलाही थांगपत्ता लागला नाही. एम.आय. ६ चे ते सगळे अधिकारी मात्र त्या दिवशी कमालीचे खुशीत होते. त्यांना कळून चुकले होते की, ही रशियन सैन्याची नुसतीच माघार नाही; तर एका सैतानी साम्राज्याच्या एका एव्हिल एम्पायरच्या पतनाची सुरुवात आहे आणि खरोखरच आणखी जेमतेम अडीच-तीन वर्षांत ते साम्राज्य कोसळले. १९८८ ते १९९१. ब्रिटिशांचा आणि लोकशाहीवादी जगाचा एक जबरदस्त शत्रू खलास झाला. खरोखरच हा फार मोठा विजय होता.

ही सगळी काय भानगड आहे हे नीट समजून घेण्यासाठी आपण इतिहासावर एक वेगवान दृष्टिक्षेप टाकू या. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या बळावर युरोपातल्या देशांमध्ये जग जिंकण्याची स्पर्धा लागली. ती मुख्यतः इंग्लंडने, पण अधिकृत भाषेत इंग्लंड, स्कॉटलंड, आयर्लंड आणि वेल्स हे चार प्रांत मिळून बनलेल्या ब्रिटनने जिंकली. नेपोलियन बोनापार्टने ब्रिटनसमोर जबरदस्त आव्हान उभे केले होते, पण ब्रिटनने त्यालाही यशस्वीपणे संपवले. तेवढ्यात ब्रिटनला जाणीव झाली रशियाच्या वाढत्या बळाची. रशियन सम्राट म्हणजे झार पीटर द ग्रेट (जन्म १६७२, राज्यारोहण १६८२, मृत्यू १७२५) याने अतिशय योजनाबद्धरीतीने रशियाला अत्याधुनिक बनवले. त्याला संपूर्ण पूर्व युरोप आणि स्कॅंडिनेव्हियन देश (नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क) तर हवेच होते;




पण रशियाच्या दक्षिणेकडचे कझाकस्तान, उझबेकिस्तान ते अफगाणिस्तानपर्यंतचे सर्व देश जिंकून थेट भारतापर्यंत पोचायची म्हणजे भारत जिंकण्याची त्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा होती. त्यासाठी ब्रिटिशांनी अफगाणिस्तान जिंकून तिकडची सरहद्द सुरक्षित करण्याचे आटोकाट प्रयत्न केले. ते जमेना. मग त्यांनी मुत्सद्देगिरी चालवून अफगाणांच्या शहाला कायमचा मित्र बनवले.

रशियात १९१७ साली साम्यवादी क्रांती झाली. झारशाही संपली. पण साम्यवादी नेते लेनिन आणि त्याच्याहीपेक्षा स्टॅलिन हे झार राजे फिके पडावेत इतके सत्तापिपासू होते. झारशाहीप्रमाणेच साम्यवादी राजवट आणि ब्रिटन यांचे जुने हाडवैर चालूच राहिले; किंबहुना त्याला अधिकच धार चढली. तेवढ्यात जग जिंकू पाहणारा एक नवाच महाखलनायक जगाच्या रंगभूमीवर अवतरला. ॲडॉल्फ हिटलर. त्याने निर्माण केलेल्या महाभयानक उत्पाताने त्याच्या स्वतःच्या देशासकट सगळेच युरोपीय देश खिळखिळे झाले. पण स्टॅलिन अधिकच प्रबळ झाला. पाहता पाहता त्याने संपूर्ण पूर्व युरोप आणि अफगाणिस्तानपर्यंतचे देश आपल्या पंजाखाली आणले. साम्यवादी तत्त्वज्ञान नावाच्या मायावी आवरणाखाली त्याने जगभरच्या विचारवंत, बुद्धिवंतांना भुलवून आपल्या कच्छपी लावले. स्टॅलिननेच निर्माण केलेल्या के. जी. बी. या रशियन गुप्तहेर खात्याने स्वदेशासकट जगभर विश्वासघात, फंदफितुरी आणि घातपात यांचा नुसता कहर उसळून दिला. साम्यवादाच्या मायावी तत्त्वज्ञानाने भ्रमित झालेले जगभरचे विचारवंत, बुद्धिमंत, साहित्यिक, कलावंत आपापल्या देशाशी बेधडक बेईमानी करायला उद्युक्त झाले. पुढे स्टॅलिनच्याच काही चेल्याचपाट्यांना त्याची दादागिरी असह्य होऊ लागली. त्यांनी बंड केले. तेव्हा सोव्हियत रणगाडे दणाणत आले नि त्यांनी ते बंड अक्षरशः चिरडून टाकले. उदा. १९५६ साली हंगेरीचा साम्यवादी नेता इम्रे नागी आणि १९६८ साली झेकोस्लोव्हाकियाचा अलेक्झांडर ड्युबचेक यांनी बंड केले. त्याची प्रचंड लष्करी बळावर साफ वासलात लावण्यात आली. ब्रिटन-अमेरिका दातओठ चावत फक्त बघत राहिले आणि उरलेले जग भयचकित होऊन पाहात राहिले.

१९७९ साली अफगाणिस्तानात यादवी सुरू झाली. तेव्हा तिथल्या साम्यवादी पक्षाची पाठराखण करायला पुन्हा एकदा सोव्हियत रणगाडे काबूलमध्ये उतरले. पण आता हे १९५६ किंवा १९६८ साल नसून १९७९ साल होते. रणगाड्यांना घाबरायला पठाण म्हणजे हंगेरियन किंवा झेकोस्लोव्हाक पांढरपेशे नागरिक नव्हते. एक जबरदस्त गनिमी युद्ध सुरू झाले, जे पुढची ९ वर्षे सतत सुरू राहिले.

ओलेग गार्दियेव्हस्की १९६८ सालीच के. जी. बी. हस्तक म्हणून डेन्मार्क देशाची राजधानी कोपनहेगनमध्ये कामाला लागला. उत्कृष्ट काम केल्याबद्दल १९७३ साली त्याची बढती आणि बदली लंडन केंद्राचा प्रमुख म्हणून करण्यात आली. डॅनिश गुप्तहेर खात्यातील म्हणजे एम.आय. ६ मधील योग्य व्यक्तीपर्यंत पोचला आणि त्याने ब्रिटनला गुप्त माहिती देण्याचे काम सुरू केले. केवढे आश्चर्य! के. जी. बी. चा लंडन केंद्रप्रमुख स्वतः होऊन ब्रिटिश हस्तक बनला. १९५० आणि ६० च्या दशकात हेरॉल्ड ॲड्रियन रसेल उर्फ किम फिल्बी हा उच्चपदस्थ ब्रिटिश हेर स्वत होऊन के. जी. बी. चा हस्तक बनला होता आणि त्याने फार महत्त्वाची माहिती रशियाला पुरवली होती. हे त्याने केले, यात त्याला देशद्रोह वाटला नाही. कारण तो साम्यवादी होता. आपण हे केलेच पाहिजे असे त्याला वाटत होते. गोर्दियेव्हस्कीची भूमिका नेमकी त्याच्या उलट होती. साम्यवादी तत्त्वज्ञान आणि त्याहीपेक्षा म्हणजे के. जी. बी.च्या कारवाया ही चक्क गुन्हेगारी, गुंडगिरी आहे आणि ती संपवलीच पाहिजे, असे त्याचे मत बनले होते.

१९७३ ते १९८५ पर्यंत गोर्दियेव्हस्कीने एम.आय. ६ ला फार मौल्यवान माहिती पुरवली. त्यातला मुख्य भाग हा की, सोव्हियत रशियन नेते कायम जी दादागिरी करतात त्यामागे सामर्थ्याचा अहंकार हा भाग नसून युरोप-अमेरिकेच्या विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ते मनातून घाबरलेले आहेत, ही गोष्ट मार्गरिट थॅचर आणि रोनाल्ड रीगन यांना पटवून दिले. १९८३ साली रीगन यांनी उघडपणे सोव्हियत राजवटीला एव्हिल एम्पायर म्हटल्यावर तर रशियन नेतृत्वाची पाटलोण सुटायची वेळ आली होती. हे गोर्दियेव्हस्कीकडून एम.आय. ६ ला समजले.

१९८५ नंतर सगळेच वेगाने बदलले. सत्तेवर आलेल्या मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी मे १९८८ पासून अफगाणिस्तानातली पठाणांकडून हग्या मार खाणारी सोव्हियत सेना काढून घ्यायला सुरुवात केली. १९८९ साली त्यांनी पूर्व युरोपातल्या आपल्या मांडलिक चमच्यांना वाऱ्यावर सोडले. त्यासरशी पूर्व जर्मनी ते ताजिकीस्तानपर्यंतचे सोव्हियत साम्राज्य धडाधडा कोसळले आणि १९९१ साली तर यू. एस. एस. आर. नावाच्या सैतानी राजवटीची संपूर्ण इतिश्री होऊन रशियन फेडरेशन हा नवा देश अस्तित्वात आला.

बेन मॅकिंटायर हा एक नाव ब्रिटिश इतिहासक-लेखक आहे. 'द स्पाय ॲन्ड द ट्रेटर' या नावाने त्याने कर्नल ओलेग गोर्दियेव्हस्कीचे चरित्र आणि एकंदर त्या काळाचा लिहिलेला वृत्तांत नुकताच प्रकाशित झाला आहे.

*(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)*

## दुर्ग जिज्ञासा

**प्राची श्रीकांत पालकर**
९८२३०४९१९८

# स्वातंत्र्यसूर्य उगवला!

हिंदुस्थानात परकीय सत्ता आल्या. त्यांनी आपल्या सुजलाम् सुफलाम् भूमीचे लचके तोडून हिंदू धर्मीयांवर अनन्वित अत्याचार केले. मुसलमान आणि पोर्तुगीज छळ करून धर्मपरिवर्तन कार्य जोमात करू लागले. त्याचा परिणाम असा झाला की, समाजातील नित्य आचारधर्म लोप पावत गेले. जनतेवर काहीही धर्मकार्य करताना भीतीचे सावट असे. जाधवांची लेक आणि भोसल्यांची अत्यंत महत्त्वाकांक्षी परंतु तितकीच विवेकी सून जिजाबाई, सतत मराठी रयतेवर होणाऱ्या सुलतानी अत्याचाराने व्यथित होती. शहाजी राजे अत्यंत मानी होते. त्यांनाही स्वराज्याची आस होती. सुलतानी सत्तेची चीड येई. मात्र परिस्थिती पूरक नव्हती. अवतीभोवती कुणी साथीला नव्हते. सुलतानी चाकरी म्हणजे विष होते. बंडखोरी केली असती तर परिणाम भयंकर होते. शहाजी राजांच्या मनात मराठी रयतेसाठी अपार प्रेम होते. त्यांच्या कल्याणासाठी त्यांची सतत धडपड असे. जिजाबाई सतत रामायण-महाभारत वाचत. त्यांना वाटे या सुलतानांचा नायनाट करण्यास श्रीराम-श्रीकृष्णासारखा अवतार पृथ्वीवर पुन्हा जन्माला यावा. शुद्ध हेतू असला की, आपल्या मनातील इच्छा आपल्याला सतत ध्येयाकडे ओढत असते तसेच जिजाऊंच्या बाबतीत घडत होते.

वैशाखात काही काळ शहाजीराजे मोहिमा करून घरी आले. त्यांच्या सहवासात जिजाऊंचा काही काळ सुखात गेला. आषाढ महिन्यात जिजाऊंच्या चेहऱ्यावर विलक्षण तेज झळाळू लागले. आई भवानीने त्यांची आर्त हाक ऐकली होती. बाळाच्या आगमनाची चाहूल लागली. शहाजी राजांच्या लाडक्या जिजाऊला डोहाळे लागले. हा आनंद साजरा होतच होता की, इकडे देवगिरीच्या दरबारात वडील आणि भावांची क्रूरपणे हत्या करण्यात आली. ही बातमी आली अशा नाजुक काळात, जिजाऊला झालेल्या वेदनांचे शाब्दिक वर्णन अशक्य आहे. लखुजीराव जाधव आणि त्यांच्या पुत्रांची देवगिरीच्या दरबारात झालेली हत्या शहाजी राजांच्याही जिव्हारी लागली. त्यांच्या मनात सुलतानी सत्तेविरुद्ध बंडाचे झेंडे फडकू लागले. त्यांनी ठरविले की, आता गुलामगिरीच्या बेड्या तोडायच्या. ते परांड्याला होते. तेथून संगमनेरला आले आणि पुढे पुण्यात पोहोचले. पुण्याची जहागीर त्यांचीच होती. त्यांनी बंड केले. पुण्याच्या आसपासचा आदिलशाही परिसर ताब्यात घेण्यास सुरुवात केली.



शहाजी राजांनी बंड केल्यामुळे सर्वत्र धामधूम होती. सतत आक्रमणे, लढाई यामुळे वातावरण अस्थिर झाले होते. त्यांना अशा युद्धजन्य परिस्थितीत, उघड्या मुलूखात जिजाऊला ठेवणे धोक्याचे वाटले. त्यामुळे त्यांनी जुन्नर परिसरातील बुलंद दुर्ग शिवनेरीवर त्यांना पाठवायचे ठरविले. शिवनेरीचे किल्लेदार विजयराव त्यांच्या नात्यात होते; शिवाय गडदेखील दुर्गम व सुरक्षित होता. जिजाबाई शिवनेरीकडे निघाल्या. त्या सुरक्षित पोहोचल्या होत्या. इकडे सुलतानी आक्रमणाची बातमी आली. पुण्यात घरादारांच्या होळ्या पेटल्या. शहाजी राजांनी आदिलशाहीविरुद्ध बंड केले, ही बातमी समजल्यावर पुण्यात आदिलशाही फौज घुसली. शहाजी राजांच्या स्वराज्याच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली. दुष्ट सुलतानी सत्तेने पुण्यावरून गाढवाचे नांगर फिरविले. जिजाबाईंना पुण्यातील या बातम्या ऐकून प्रचंड वेदना झाल्या. त्यांच्या मनात क्रोधाग्नी भडकली. तितक्यात नाशिकवरून अजून एक अत्यंत वाईट बातमी आली, शहाजीराजांच्या चुलत भावाची बायको पंचवटी येथे गोदावरी स्नान करण्यास गेली असताना, मोगल सरदार महाबत खानाने तिला पळवून नेले. भोसल्यांच्या घरच्या सुनेची ही परिस्थिती होती तर सामान्य स्त्रियांची हिंदुस्थानात काय परिस्थिती असेल, याची कल्पनाही करवत नाही. स्त्रीला केवळ उपभोग्य वस्तू समजणाऱ्या या हिंस्र श्वापदांना जरब बसविणे आवश्यक होते. सुलतानांच्या राजवटीत किती स्त्रिया भ्रष्ट झाल्या, बाटविल्या, विकल्या व मारल्या याची नोंदच नाही. या जुलमी मानसिकतेची राख करण्यास नृसिंहानेच जन्म घेणे आवश्यक होते.

जिजाऊंचे डोहाळेदेखील शौर्याचे होते. त्यांना वाटे घोड्यावर बसून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात फिरावे, गडकिल्ले सर करावे, महिषासुरमर्दिनीसम वाघावर बसून यवनांचा नाश करावा, हत्तीची सवारी करावी, उंच उंच भगवा ध्वज उभारावा, शस्त्र चालविणे शिकावे. थोडक्यात काय तर गर्भारपणात जिजाबाईंचा स्वराज्याचा ध्यास अधिकच वाढला होता. पोटातील गर्भावर त्यांच्या या विचारांचे गर्भसंस्कार नक्कीच होत असणार. शिवाई देवीच्या मंदिरात सतत त्या साकडे घालत होत्या की, मोगलांच्या अन्यायाने त्रस्त असलेल्या जनतेला मुक्त करण्यासाठी माझ्या पोटी नरवीर जन्माला येऊ दे. दुष्ट शक्तीची वाईट नजर आपल्या राष्ट्रावर, धर्मावर आजही आहेच; म्हणून प्रत्येक आईच्या मनात हिंदू धर्माबद्दलची आस्था जागृत असण्याची, राष्ट्रहिताचे भान असण्याची आजही गरज आहे.

जिजाऊ एक एक दिवस बाळाच्या आगमनाची वाट पाहत होत्या. जिजाऊंची प्रार्थना शिवाई देवीने ऐकली आणि शिवनेरीवर स्वातंत्र्यपर्वाची सुरुवात झाली. फाल्गुन वद्य तृतीया, शके १५५१ शिवनेरीवर, शिवाई देवीच्या कृपेने जिजाऊंच्या पोटी पुत्ररत्न जन्माला आले. गडावर सनई चौघडा वाजू लागला, शिवनेरी आनंदला. शहाजी राजांना ही आनंदाची बातमी कळविण्यात आली. बाराव्या दिवशी बाळाचे बारसे करण्यात आले, शिवनेरीवर, शिवाई देवीच्या सहवासात जन्मलेल्या बाळाचे नाव ठेवले 'शिवाजी!'

शिवनेरी, महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसूर्याचे जन्मस्थान. सह्याद्रीतील हा बुलंद दुर्ग चारही बाजूंनी देवस्थानांनी वेढलेला आहे. भीमाशंकर ज्योतिर्लिंग, लेण्याद्रीचा गणपती, निमगिरीचा खंडोबा, ओझरचा श्री गजानन यांच्या मध्यावर शिवनेरी! नाणेघाटाचा संरक्षक दुर्ग म्हणून ख्याती असलेल्या या दुर्गाची कथा अत्यंत प्रेरणादायी आहे. जुन्नर ही शकराजा नहपानाची राजधानी होती. सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने शकांचा नाश केला. जुन्नर व येथील सर्व परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. नाणेघाट हा त्यावेळी व्यापारी मार्ग होता. या मार्गावरून फार मोठ्या प्रमाणावर वाहतूक चालत असे. या व्यापारी मार्गावर लक्ष ठेवण्यासाठी या मार्गावर दुर्गांची निर्मिती करण्यात आली. सातवाहनाची सत्ता स्थिर झाली आणि त्यांनी या परिसरात अनेक ठिकाणी लेणी खोदवून घेतली. सातवाहनांनंतर शिवनेरी चालुक्य, राष्ट्रकूट या राजवटींच्या सत्तेखाली होता. मात्र, यादवांची सत्ता असताना शिवनेरीला गडाचे स्वरूप प्राप्त झाले. नंतर किल्ला बहमनी राजवटीखाली आला. यानंतर निजामशाहीत आणि पुढे किल्ला तसेच जुन्नर प्रांत मालोजी राजे भोसले यांच्याकडे आला.

जुन्नर या गावापासून अवघ्या तीन कि.मी. अंतरावर शिवनेरी किल्ला आहे. गडावर जायला दोन मार्ग आहेत. सातवाहनकालीन दगडी पायऱ्यांचा व दुसरा साखळीचा मार्ग. शिवनेरीवर जाताना शिवजन्मस्थळ पाहण्याची एक अनामिक ओढ मनात असते. ज्या गडावर शिवजन्म झाला, बाल शिवाजी घडले, खेळले, बागडले, शिकले, त्या भूमीवर आपण आहोत हा विचारच इतका सुखद असतो की, इतर जगापासून मन अलिप्त करून हा किल्ला पाहावा. महादरवाज्यातून आत गेलो की परवानगी दरवाजा लागतो. या दरवाज्याच्या कमानीवर कोरीव शिल्पे आहेत. त्यातील गरुड, हत्ती, वाघ किंवा सिंह असे काही आकार आपल्या लक्षात येतात. थोडं समोर गेलात की हत्ती दरवाजा व पीर दरवाजा आहे. गडाच्या अर्ध्यात शिपाई दरवाजा लागतो. येथून उजवीकडे गेलो की शिवाई देवीचे मंदिर आहे. किल्ल्यावरच्या मंदिरात एक अनामिक शांतता लाभते. त्या शांततेत शरीराची आत्म्याशी असलेली एकरूपता अनुभवता येते.

पुढे थोड्या पायऱ्या आहेत. मग फाटक दरवाजा व कुलाबकर दरवाजा ओलांडून मुख्य गडात प्रवेश होतो. शिवनेरीचा अंबरखाना खूप छान आहे. गडावर मुबलक पाणीही आहे; शिवाय वीजही आली आहे. गंगा व जमुना नावाची दोन पाण्याची टाकी आहेत. थोडं अजून चालत गेलात की समोर शिवकुंज आहे. तिथे जिजाऊ व बाल शिवाजी यांचा पुतळा आहे. शिवजन्मस्थळ असलेल्या इमारतीत खाली एक खोली आहे, त्यात पाळणा ठेवला आहे. आत प्रवेश नाही, पण जाळीतून आतलं दृश्य दिसतं. वर जायला एक अरुंद जीना आहे. वर गेल्यावर संपूर्ण गड व आसपासचा परिसर दिसतो. पूर्वीचे दगडी बांधकाम किती मजबूत व सर्वांगाने विचार करून करायचे, याचे उत्तम उदाहरण म्हणजे किल्ल्यावरचे बांधकाम. महाराष्ट्रातील हे किल्ले स्थापत्य कलेचे उत्कृष्ट नमुने आहेत.

गडावरील बदामी तलाव, कडेलोट करायची जागा, फडणीसांचे घर पाहून परतीच्या वाटेवर एक चौथरा लागतो; तो 'कोळी चौथरा' नावाने ओळखला जातो. मोगलांनी केलेल्या अत्याचाराचे प्रतीक म्हणजे कोळी चौथरा. पुणे प्रांतातील कोळ्यांनी बंड केले. मोगलांनी त्यांचे हे बंड खोडून काढले. त्यांना बंदी केले. याच चौथऱ्याच्या ठिकाणी त्यांना शिक्षा केली. अनेकांचे शीर धडावेगळे करून आपल्या क्रूरतेचा परिचय करून दिला. या कोळी चौथऱ्याच्या आधी गडावर येण्याची एक चोरवाट आहे; तिला 'साखळी वाट' असेही म्हणतात. या मार्गावर लेण्या आहेत. हा मार्ग खडतर आहे. शिवनेरी किल्ला नारायणगड, हरिश्चंद्रगड, जीवधन, राजमाची असा चारही बाजूने किल्ल्यांनी वेढला आहे. सह्याद्रीचे निसर्गसौंदर्य वर्णावे तेवढे कमीच आहे. सह्याद्रीचे कडे, त्यातील गडकिल्ल्यांच्या उल्लेखाशिवाय अपूर्ण आहेत. 'रांगडा' या शब्दाचा अर्थ अनुभवायचा असेल तर हे सह्यकडे सर करावे. शिवनेरी किल्ल्यावर तर महाराष्ट्रातील प्रत्येकाने जायलाच हवे. कारण ही आपल्या जाणत्या राजाची जन्मभूमी आहे.

## संस्कारांच्या देशा

**डॉ. रमा गोळवलकर**
९४२२११४६२०

# पितृदेवो भव

लहान मूल जसं जसं वाढू लागतं तसं तसं त्याच्या मेंदूला सभोवतालाचं भान येतं. इंग्रजी भाषेत त्याला 'ओरिएन्टेशन' म्हणतात. आईच्या गर्भाशयाशी जुळलेली नाळ जन्मल्याबरोबर कापली जाते आणि नवजाताला सुटं करण्यात येतं. काही दिवसांनी नाभीत उरलेलं नाळेचं टोकदेखील गळून पडतं, पण आईशी असलेला बंध मात्र नित्य असतो.

कापून वेगळा केलेला हात किंवा पाय प्रत्यक्षात अस्तित्वात नसूनही होता त्या जागी तो अवयव तसाच आहे असा भास त्या व्यक्तीला नेहमीच होत असतो. मग तो दुखतो, खाजवतो आणि इतरही संवेदना त्यात तशाच आहेत, असं वाटत असतं. म्हणजे तो आहेच ही जाणीव सतत होत असते. या आभासी संवेदनेला आजच्या आधुनिक विज्ञानात 'फॅण्टम फूट' म्हणतात. आई आणि बाळाला जोडणारी नाळ प्रत्यक्षात कापून टाकली असली, तरीही ती जुळलेलीच भासते ती याच एका कारणामुळे. हा प्रकृतीचा नियम आहे. लैंगिक प्रजोत्पादन करणाऱ्या प्राणिमात्रांच्या मादीच्या शरीरातली सर्वात मोठी पेशी बीजांड असते. या उलट नराच्या शरीरातली आकारानं सर्वात लहान असलेली पेशी म्हणजे शुक्राणू.

नवीन संशोधनात दोन गोष्टी प्रकर्षानं उजेडात आल्या आहेत. त्यातली पहिली गोष्ट पुरुष वीर्यात करोडोंच्या संख्येनं असलेल्या शुक्राणूंपैकी कोणत्या शुक्राणूचा स्वीकार करायचा हा निर्णय सर्वस्वी त्या बीजांडाचा असतो. दुसरी गोष्ट म्हणजे ज्यावेळी तो निर्णय होऊन बीजांड त्या शुक्राणूला त्यात प्रवेश करण्याची परवानगी देते आणि निवडल्या गेलेला तो शुक्राणू त्यात प्रवेश करून त्याला फलित करतो, त्यावेळी जैवरासायनिक प्रक्रिया होऊन तेजाची एक ठिणगी (स्पार्क) उत्पन्न होते. शिवाय इतर शुक्राणूंना मज्जाव करणारे रासायनिक संदेशही बीजांडाकडून प्रक्षेपित केले जातात. फलन प्रक्रियेत तो शुक्राणू फक्त २३ गुणसूत्रं बीजांडाला देऊ करतो. ही देवाणघेवाण सुरू असताना जर 'एक्स' हे स्त्री गुणसूत्र देण्यात आलं तर मुलगी आणि 'वाय' हे पुरुष गुणसूत्र दिल्या गेलं तर मुलगा हे निश्चित करून त्याची भूमिका तात्पुरती संपते.



**'मम प्रथमो गुरूः प्रत्यक्ष विघ्नहर्ता'**
**व्रतबंधाच्या वेळी पित्याच्या हाती हात दिलेला बटू**

नंतरचा सगळा सोपस्कार मातेच्या शरीरात घडत असतो. माता प्रसूत होते, बाळाचं संगोपन करते. वयाच्या पाचव्या वर्षी तिचं/त्याचं अनौपचारिक शिक्षण सुरू होतं, ते आईच्या मांडीवर बसूनच. जीवनाचा हा सुरुवातीचा काळ आईच्या पदराआड, तिच्या सुरक्षित कुशीत, तिचा हात धरून पूर्ण होतो. तोवर जवळचे सगळेच नातेवाईक आईला संगोपनात मदत करतात, पण या दोघांच्यात फारसं कोणी येत नाही. वयाच्या आठव्या वर्षीपासून मूल आईपासून विलग होण्याची प्रक्रिया सुरू होते. आईवर विसंबून असलेल्या आयुष्यात बदल घडून येतात. औपचारिक शिक्षण देत बालक/बालिकेला स्वतंत्र आणि स्वयंपूर्ण करण्यात पित्याची भूमिका सुरू होते. यास्काचार्यांनी 'निरुक्त' नावाचा ग्रंथ सिद्ध केला. त्यात ते लिहून जातात - पिता हा शब्द 'पा म्हणजे रक्षणे' या धातूपासून तयार होतो. 'यः पाति स पिता' जो रक्षण करतो तो पिता. 'पिता पाता वा पालयिता वा' म्हणजे जो पालन करतो तो पिता. त्यामुळे पिता कोणाला म्हणावं किंवा मानावं याचीही व्याख्या करण्यात आलेली आहे-

'शरीरकृत् प्राणदाता यस्य चान्नानि भुंजते।
क्रमेणैते त्रयोऽप्युक्ताः पितरो धर्मशासने॥'

जो गर्भाधानाच्या माध्यमातून शरीर निर्माण करतो तो प्रथम, जो अभय देत प्राणांचं रक्षण करतो तो द्वितीय आणि ज्याचं अन्न भक्षण केलं आहे तो तिसरा असे तिघेही पिताच असतात.

आपल्या पूर्वजांनी आईला पृथ्वी आणि पित्याला स्वर्गाची उपमा दिलेली आहे. कारण स्पष्टच आहे. आई आणि पृथ्वी आपल्याला धारण करतात, भौतिक जगात आणतात, त्यात वावरण्यासाठी आधार देतात, प्रत्यक्ष पोषण करतात. तर, पिता आणि स्वर्ग आपल्या जीवनाला उदात्तता आणि नैतिकतेची चौकट देतात, मानसिक बळ आणि संरक्षक छत्र देतात, आयुष्याला दिशा आणि उद्देश देऊन आपल्या अस्तित्वाला अर्थ देतात.

आठव्या वर्षी मौंजीबंधन अर्थात उपनयन संस्कार पित्याच्या मांडीवर करतात तो याच कारणामुळे. वडिलांच्या बटूच्या मधला अंतरपाट दूर सारल्यानंतर बटू त्यांना पुष्पमाला अर्पण करतो. त्यांच्या सारखंच तेजस्वी, कणखर, विद्यासंपन्न, सामर्थ्यवान आणि कर्तृत्ववान होणं हा जीवनाचा उद्देश वरतो, असा या कर्मकांडाचा अंतरनिहित अर्थ होतो. 'वरणे' या क्रियापदाचा अर्थ होतो उपलब्ध पर्यायांतून सर्वोत्तम निवडणं. 'तत् सवितुर्वरेण्यम्' = वरण्यास योग्य असा तो सवितृ (सूर्य)...' यानंतर बटू विद्यार्थी म्हणून विद्या आणि ज्ञानार्जन करण्यासाठी व्रतबद्ध होतो.

या खडतर जीवनातला संघर्ष यशस्वीपणे करता यावा म्हणून जे जे काही विद्या- ज्ञान- गुण- कौशल्य- सिद्धी आवश्यक आहेत ते ते सारं आत्मसात करण्याची सुरुवात पित्याच्या मांडीवर बसून होते. म्हणूनच सर्वसामान्य कुटुंबात पिता हा नीतिमत्ता आणि जीवनमूल्यांचा आदर्श असतो. त्यामुळे पिता या संकल्पनेत पाच प्रकारच्या व्यक्ती सामील करण्यात आल्या आहेत-

'जनकश्चोपनेता च यश्च विद्यां प्रयच्छति।
अन्नदाता भयत्राता पश्चैते पितरः स्मृताः॥'

अर्थात जनक, उपनेता, विद्यादाता, अन्नदाता आणि भयापासून रक्षण करणारा ही पाच कार्ये करणारा तो पिता, हे लक्षात ठेवा. याचा अर्थ असा की, आई जर नौका असेल तर तिचं शीड, सुकाणू आणि वल्ही वडील आहेत.

हे पुरते लक्षात आलेल्या युधिष्ठिर धर्मराजानं यक्षाला काय उत्तर दिलं बघा. महाभारताच्या वनपर्वातली ही कथा उद्बोधक आहे. वनवासात असलेल्या पांडवांना तहान लागते म्हणून सहदेव पाण्याच्या शोधात निघतो. खूप वेळ गेला तरी तो परत येत नाही म्हणून नकुल त्याला शोधायला जातो. तोही परतत नाही म्हणून अर्जुन आणि मग त्या तिघांना शोधायला भीमही निघतो. ते चौघेही परत आले नाहीत हे बघून शेवटी युधिष्ठिर जातो. एका तळ्याकाठी चौघेही अस्ताव्यस्त पडलेले दिसतात. अखेर तो त्या तळ्याला नमस्कार करून चारही भावांची अशी अवस्था का झाली, असा प्रश्न विनम्रपणे करतो. तळ्यात राहणारा यक्ष त्याच्यासमोर प्रकट होतो. त्याच्या चारही भावांनी यक्षाची अनुमती न घेताच तळ्यातलं पाणी घेण्याचा प्रयत्न केला. यक्षानं आक्षेप घेताच दुरुत्तरं केली आणि त्याचा अनादर केला. परिणामी त्या चौघांनाही आपले प्राण गमवावे लागले. युधिष्ठिरानं आपल्या भावांच्या दुर्व्यवहारासाठी यक्षाची क्षमा मागितली आणि भावांना उःशाप देऊन जीवनदान द्यावं, अशी विनंती केली. त्यावर यक्षानं एक अट घातली की, तो युधिष्ठिराला काही प्रश्न विचारेल. त्या सगळ्या प्रश्नांची यथायोग्य उत्तरं द्यावीत आणि आपल्या भावांना जिवंत करवून घ्यावं. चारही भावांचा जीव पणाला लागलेले असताना त्यांचा मोठा भाऊ म्हणून जितक्या शांततेनं, गांभीर्यानं, स्थिरमनानं युधिष्ठिर उत्तरं देतो, त्याला तोड नाही. भारतीय परंपरेत विकसित झालेलं दिव्य विचारधन म्हणूनच धर्मराज युधिष्ठिरानं दिलेल्या उत्तरांकडे बघायला हवं.

यक्ष विचारतो -

'किंस्विद् गुरुतरं भूमेः किंस्विदुच्चतरं च खात्?
किंस्विद् शीघ्रतरं वातात् किंस्विद् बहुतरं तृणात्?'

पृथ्वीपेक्षा मोठा भार कोणाचा? आकाशाहून उंच काय? वायूहून वेगानं काय वाहतं गवतापेक्षा असीम विस्तृत असंख्य काय आहे? त्यावर युधिष्ठिराचं उत्तर आहे -

'माता गुरुतरा भूमेः खात् पितोच्चतरस्तथा।
मनः शीघ्रतरं वातात् चिन्ता बहुतरी तृणात्॥'

पृथ्वीहून मातेचा भार अधिक असतो आणि पिता आकाशाहून उंच असतो. मन वायूपेक्षा वेगाने वाहतं आणि चिंता ही गवतापेक्षा अधिक विस्तारलेली आणि अनंत असते. यातली गंमत बघा हं- आईपण ही एक भौतिक आणि मूर्त प्रक्रिया आहे. बाळंत होणारी बाई आणि तिच्या पोटी जन्माला येणारं मूल हे वास्तव आहे तर पितृत्व हा आईच्या शब्दांवरचा विश्वास, श्रद्धा आणि विसंबण्याची अमूर्तता आहे. आई सांगते म्हणून, त्यावर विश्वास ठेवून संबंधित बाळाचा पिता कोण ते, ते मूल, तो पुरुष आणि जग मान्य करतं. धरणी ही मूर्त आहे आणि आकाश अमूर्त. पण हे दोन्ही असल्याखेरीज अस्तित्वाला अर्थच नसतो. जातक म्हणजे जन्माला आलेल्या प्रत्येक प्राणिमात्रांत आणि विशेष करून मानव प्राण्यात पित्याचं महत्त्व विशद करताना आपले शास्त्रकार म्हणतात-

'मम प्रथमो गुरूः प्रत्यक्ष विघ्नहर्ता पितरि प्रीतिमापन्ने सर्वाः प्रीयन्ति देवताः॥'

माझे प्रथम गुरू, माझे प्रत्यक्ष विघ्नहर्ता असे माझे पिता जर प्रसन्न असले तर सगळे देव प्रसन्न असतात. याच बरोबर आणखी एक श्लोक आपण नेहमी लक्षात ठेवावा असाच आहे. माझे सख्खे नातेवाईक कोण कोण आहेत, याची एक सूचीच सुभाषितकार करतात-

'सत्यं माता पिता ज्ञानं धर्मो भ्राता दया सखा।
शान्तिः पत्नी क्षमा पुत्रः षडेते मम बान्धवाः॥'

सत्य ही माझी माता आहे तर ज्ञान माझे पिता आहेत. धर्म माझा भाऊ असून दया माझा सखा आहे. (मनः) शांती ही माझी पत्नी असून क्षमा माझा पुत्र आहे, असे हे सहा माझे बांधव आहेत. या सुभाषितकारानंदेखील सत्याचा संबंध आईशी आणि ज्ञानासारख्या अमूर्त पण जगण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या पावित्र्याचा संबंध पित्याशी जोडलेला आहे. म्हणूनच मातेच्या पाठोपाठ पिता हा ज्याचा देवता आहे असा तू हो अर्थात 'पितृदेवो भव' असा आशीर्वादपर संस्कार आपल्या भारतात सर्वत्र केला जातो. आपल्याकडे आकाशातल्या बापाकडे करुणा भाकायची नसून आपला साक्षात बापच आकाशासारखा विस्तीर्ण आणि विशाल असल्याचा संस्कार आहे. या आपल्या भारतीय संस्काराचं कसोशीनं पालन करणं हे आपलं नैतिक कर्तव्य आहे.